'Dalit Movement in Sangli District

# ''सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ (सन १९६० ते २०००)''

## तात्त्विक व सामाजिक विद्या शाखांतर्गत

## 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी

**सादर करणेत आलेला संशोधन प्रबंध**


- संशोधक -

**श्री. भगवान संतू मिणचेकर** (सहयोगी प्राध्यापक)

एम. ए. बी. एड्.,

कायम नोंदणी क्रमांक PRN. No. ०२१११०००९४८

आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव.

- मार्गदर्शक -

**प्रा. डॉ. श्रीमती निकम आर. डी.**

एम. ए., बी. एड्. एम. फिल., पीएच. डी.

(हेड डिपार्टमेंट ऑफ हिस्ट्री)

कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक


# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**जानेवारी २०१९**

# प्रतिज्ञापत्र

मी श्री. मिणचेकर भगवान संतू असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, ''सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ (सन १९६० ते २०००)'' या विषयावरील संशोधन प्रबंधामध्ये करण्यात आलेले संशोधन कार्य हे माझ्या स्वतःच्या प्रयत्नाचे फलित आहे. त्यासाठी माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनाचे संदर्भ घेण्यात आले आहेत. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही विद्यापीठ स्तरावर कोणतीही पदवी मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेले नाही, असे मी घोषित करतो.

सांगली

दिनांक : जानेवारी २०१९

**श्री. भगवान संतू मिणचेकर**

एम. ए. बी. एड्.,

आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव.

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, सदर विद्या वाचस्पती पदवीसाठी श्री. भगवान संतू मिणचेकर यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या पीएच. डी. (Ph. D.) अभ्यासक्रमांतर्गत असलेला एक भाग म्हणून सदर प्रबंध आपणाकडे सादर करीत आहेत. शोध प्रबंधाचा विषय ''सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ (सन १९६० ते २०००)'' हा आहे. हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

– मार्गदर्शक –

**प्रा. डॉ. श्रीमती निकम आर. डी.** (सहाय्यक प्राध्यापक)

एम. ए., एम. फिल., पीएच. डी.

स्थळ : कासेगाव

दिनांक : जानेवारी २०१९

# ऋणनिर्देश

मी भगवान संतू मिणचेकर, रा. इस्लामपूर, आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, या ठिकाणी इतिहास या विषयाचा सहयोगी प्राध्यापक म्हणून काम करीत आहे. आपल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये पीएच. डी (विद्या वाचस्पती) Ph. D या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ (सन १९६० ते २०००) या विषयाचे संशोधन करत आहे. या संशोधन कार्यात ज्यांचे अनमोल मार्गदर्शन, सहकार्य, प्रेरणा व प्रोत्साहन लाभले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही माझी औपचारिकता असून ते मी माझे परम कर्तव्य समजतो. प्रस्तूत विषयाच्या संशोधनासाठी ज्यांचे प्रोत्साहन, सहकार्य व अनमोल असे मार्गदर्शन लाभले आणि ज्यांच्यामुळे उत्स्फूर्त प्रेरणा मिळून माझे संशोधनाचे कार्य पूर्णत्वास गेले, असे माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीमती निकम आर. डी. यांच्यामुळे हा प्रबंध मला वेळेत पूर्ण करता आला. मी ज्या ज्या वेळी मॅडम यांच्याकडे जात असे, त्या त्या वेळी मॅडम मला नेहमी एखादी तरी नवीन सूचना करीत. त्यामुळे या प्रबंधाचे काम करीत असताना त्यांची उत्स्फूर्त प्रेरणा मला मिळाली, त्याबद्दल मी मॅडम यांचा सदैव ऋणी आहे.

तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या आपल्या विद्यापीठाने मला पीएच. डी. शिक्षणक्रम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी विद्यापीठाचा आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय कुलगुरु डॉ. दिपक टिळक, विद्यापीठाचे माजी इतिहास विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. दिपक देशपांडे, सौ. डॉ. एन. ए. वाघमारे, अध्यक्ष शामराव पाटील (काका), तसेच सचिव आर. डी. सावंत, सहसचिव डॉ. राजेंद्र कुरळपकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज कासेगावचे प्र.प्राचार्य डॉ. शिवाजी पवार, सहयोगी प्रा. बी. जी. बोराटे, प्रा. शशिकांत मोहिते, प्रा. सुरेश दांडगे आणि सर्व स्टाफ व मान्यवरांचे मला अनमोल सहकार्य मिळाले म्हणून त्यांचाही मी आभारी आहे.

सदरच्या शोध प्रबंधासाठी माझे गुरुवर्य डॉ. अमर पांडे, डॉ. बी. डी. खणे, डॉ. दिपक गायकवाड या सर्वांचे मला विशेष मार्गदर्शन मिळाले, म्हणून त्यांचाही मी खास आभारी आहे. माझे मित्र प्रा. मोहन

साबळे, डॉ. सुरेश साळवी, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. गौतम ढाले, प्रा. डॉ. विकास कांबळे, प्रकाश कांबळे, भाऊसोा कांबळे, भास्कर कांबळे आदींचाही ऋणी आहे.

श्री. शरद कांबळे, मधुकर वायदंडे कुरळप, संतोष कुदळे कवठेमहांकाळ, संजय जाधव विटा, विलास कुदळे सांगली, कल्पना कुदळे सांगली, दिलीप कांबळे समडोळी, सुचिता कांबळे समडोळी, शंकर कांबळे भेंडवडे, पीआरपीचे नितीन गोंधळी, विश्वास कुदळे, डॉ. चंद्रकांत कुरणे, विश्वास घस्ते (आष्टा), दैनिक सत्यवादी, कोल्हापूरचे सुरेश पाटील व त्यांचे काका, कोलपूरचे सिध्दार्थनगरचे आयु. सुधीर पोवार, त्यांचे बंधू, डॉ. बापट वसतिगृहाचे संचालिका तिरमारे भगिनी, आनंदा कांबळे (मामा) इस्लामपूर, मुकुंद कांबळे इस्लामपूर, माजी उपनगराध्यक्ष, आर्टस अँड कॉमर्स कॉलेज आष्टा, प्राचार्य डॉ. विलास काळे, ग्रंथपाल सुनिता पाटील, आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज कासेगाव या सर्व पदाधिकारी व सर्व स्टाफ यांचा मी आभारी आहे.

तसेच सांगली महानगरपालिकेचे नगरसेवक जगन्नाथ ठोकळे, भारिपचे जिल्हाध्यक्ष गौतम लोटे, प्रताप गोंधळे, दलित पँथर, प्रा. राजेंद्र कांबळे आष्टा आदींचाही मी नम्रपूर्वक आभारी आहे.

माझा प्रबंध पूर्ण होण्यासाठी तसेच टायपिंग व सेटींग करून तो वेळेत पूर्ण करून देणे यासाठी सहजयोग कॉम्प्युटर्सचे जगन्नाथ पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

माझी पत्नी संगीता मिणचेकर, मुलगा मयूर मिणचेकर, मुलगी मानसी मिणचेकर तसेच माझे बंधू भाऊसोा कांबळे, भास्कर कांबळे (सामाजिक कार्यकर्ते) यांनी याकामी मला मोलाचे सहकार्य दिले, त्यांचाही मी आभारी आहे.

स्थळ : सांगली — संशोधक,

दिनांक : जानेवारी २०१९ — **श्री. भगवान संतु मिणचेकर**

आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव.

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | 2 |
| | प्रमाणपत्र | 3 |
| | ऋणनिर्देश | 4 |
| | अनुक्रमणिका | 6 |
| १. | प्रकरण - १ सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ | १-२२ |
| | प्रस्तावना | १ |
| | सांगली जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी | ७ |
| | संशोधनाची गृहितके | ९ |
| | संशोधनाची उद्दिष्ट्ये | १० |
| | व्याप्ती व मर्यादा | १० |
| | विषय निवडीचे महत्त्व | १० |
| | संशोधन पध्दती | ११ |
| | सर्वेक्षण पध्दती / मुलाखत पध्दती | १२ |
| | प्राथमिक व दुय्यम साधने | १२/१३ |
| | संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा | १५ |
| | संशोधन संबंधित साहित्याच आढाव्याची उद्दिष्टे | १६ |
| | साहित्याचे स्वरूप | १६ |
| | संशोधन समस्येसंबंधी आढावा | १७ |
| | समारोप | २१ |
| | प्रकरण संदर्भ | २२ |

| | | |
|---|---|---|
| २. | प्रकरण - २ | २३-६५ |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सांगली जिल्ह्यातील संपर्क व | |
| | सांगली संस्थानने दलितांना दिलेल्या सवलती | २३ |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मिरज भेट व भेटीने | |
| | यशस्वी झालेला सत्याग्रह | ३९ |
| | समारोप | ६० |
| | प्रकरण संदर्भ | ६३ |
| ३. | प्रकरण - ३ | ६६-१७२ |
| | दलित चळवळ १९६० ते २००० | |
| | प्रमुख घटनांचा आढावा | ६८ |
| | समारोप | १६५ |
| | प्रकरण संदर्भ | १६७ |
| ४. | प्रकरण - ४ | १७३-२३८ |
| | दलित पक्ष व संघटनांचे सांगली जिल्ह्यातील कार्य | १७३ |
| | रिपब्लिकन पक्षाच्या उदयाची पार्श्वभूमी, पक्षाची स्थापना व | |
| | डॉ. आंबेडकरांची भूमिका / कार्यकारिणीचे ठराव | १७५ |
| | रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया ध्येय व उद्दिष्ट्ये | १८० |
| | रिपब्लिकन पक्षाने केलेले कार्य | १८२ |
| | आगामी सार्वत्रिक निवडणुकीवर विचारविनीमय | १८३ |
| | दलित पँथर उदयाची पार्श्वभूमी | १८९ |
| | समारोप | २३५ |
| | प्रकरण संदर्भ | २३६ |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रकरण - ५ | २३९-२७२ |
| | सांगली जिल्ह्यातील दलित कार्यकर्ते, साहित्यिक व इतर | २३९ |
| | व्यक्तींच्या कार्याचा अभ्यास | |
| | सामाजिक कार्यकर्त्यांच्या निवडक मुलाखती | २६१ |
| | समारोप | २७१ |
| | प्रकरण संदर्भ | २७२ |
| ६. | प्रकरण - ६ | २७३-२९८ |
| | सांगली जिल्ह्यातील राखीव आमदारांचे दलित उध्दारक कार्य | २७३ |
| | पी. टी. मधाळे | २७७ |
| | शिवरुद्र बामणे | २८० |
| | सोहानी जयवंत ईश्वर | २८१ |
| | उमाजी धनाप्पा समनडीकर | २८२ |
| | भगवानराव लालासाहेब पवार | २८४ |
| | समारोप | २८८ |
| | दलित चळवळीस यशवंतराव चव्हाणांचे योगदान | २८९ |
| | वसंतदादा पाटील व दलित चळवळ | २९४ |
| | प्रकरण संदर्भ | २९७ |
| ७. | प्रकरण - ७ | २९९-३२७ |
| | उपसंहार | २९९ |
| | संदर्भ सूची | ३०९ |

| | | |
|---|---|---|
| ८. | परिशिष्ट्ये - | ३२८-३३८ |
| | नमुना १ - निवडणूक अधिसूचना (विधानसभा) | ३२९ |
| | मुलाखत-प्रश्नावली | ३३१ |
| | नकाशा - सांगली जिल्हा | ३३३ |
| | दलित चळवळीचे कार्यकते - श्री. गौतम लवटे | ३३४ |
| | दलित चळवळतील मोर्चे, आंदोलने आदी कार्यकर्त्यांचे फोटो | ३३५ |

## प्रकरण १ ले

### प्रास्ताविक –

भारतात गेली अडीच हजार वर्षे किंबहुना त्यापेक्षा अधिक काळ जातीव्यवस्था अस्तित्वात होती व आजही काही प्रमाणात ती आहे. या जाती व्यवस्थेत उच्चवर्णीयांनी मागासलेल्या अस्पृश्य जातीवर अतोनात बंधने लादून मागासलेल्या जातींना गुलामगिरीत ठेवले व त्यांना पशुतुल्य वागणूक दिलेली आपणास पहावयास मिळते. संकर आणि पावित्र्य या दोन कल्पनावर आधारलेली जाती व्यवस्था भारतीय जनमाणसात इतकी सखोल भिनली आहे की, संपूर्ण समाज व्यवस्थाच बदलल्याशिवाय अस्पृश्यता जाणे शक्य नाही.[१] भारतात जवळजवळ एक चतुर्थांश पेक्षा जास्त मागासलेले लोक अतिशय दारिद्र्य अवस्थेत जीवन कंठित होते. त्यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक स्वातंत्र्य नव्हते.

ब्रिटिश कालखंडात महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू झाली. महाराष्ट्रात पहिल्यांदा जाती व्यवस्थेविरुध्द म. फुले यांनी बंड पुकारले. मागासलेल्या लोकांच्यासाठी व स्त्रियांसाठी म. फुले यांनी शिक्षणाची दारे खुली केली. सामाजिक कार्य पुढे शाहू महाराजांनी चालू ठेवून बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी बहुमूल्य योगदान दिले व जाती भेद नष्ट करण्यासाठी कोल्हापूर संस्थानात कडक कायदे केले. मागासलेल्या समाजाला अनेक सवलती देवून उच्च जाती बरोबर आणण्याचा प्रयत्न केला. दलितांचे भावी पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना परदेशी शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली आणि १९२० ला त्यांचा आपल्या संस्थानात माणगाव या ठिकाणी भव्य सत्कार केला व दलित चळवळीला प्रोत्साहन दिले. अस्पृश्यात अन्यायाविरुध्द लढण्याची जाणीव झपाट्याने निर्माण होत जाऊन विखुरलेला तत्कालीन अतिशुद्र समाज डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत सामील होत गेला.[२]

शाहू महाराजानंतर दलितांचे नेते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय समाजात उदय झाला आणि दलित चळवळीस फार मोठी चालना मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण जीवन हे

भारतातील दीन दलित आपल्या मागासलेल्या जाती बांधवांसाठी खर्च कले व ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा दिव्य संदेश मागासलेल्या समाजाला दिला व गेली दोन अडीच हजार वर्षे जो समाज हिंदू धर्माचे अन्याय सहन करत होता तो जागृत झाला व आपल्या हक्कासाठी सामाजिक समतेसाठी जागृत झाला आणि भारताच्या सर्व भागात दलितांच्या चळवळी सुरू झाल्या. दलित स्त्री–पुरुषांच्या माणूस म्हणून असलेल्या अस्तित्वाचे, मानापमनाचे स्त्री–पुरुष समतेचे प्रश्न तर त्यांना अद्याप शिवलेले नाहीत.[३]

१९५६ पर्यंत बाबासाहेबांचे प्रमुख नेतृत्व हे दलित चळवळीला मिळाले. सन १९४७ ला भारत स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्वात आली. या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकर असलेले पहावयास मिळते. घटनेमध्ये दलित व मागासलेल्या समाजास राजकीय, सामाजिक क्षेत्रात अधिकार मिळाले. राज्य घटनेत जरी वरील अधिकार समाविष्ट असले तरी उच्चवर्णिय समाजाने दलितांना सहजासहजी सवलती दिल्या नाहीत. त्यासाठी भारताच्या प्रत्येक प्रदेशात दलितांना चळवळी करून आपले हक्क मिळवावे लागले. बऱ्याच ठिकाणी दलितांच्यावर अन्याय होवून जातीय दंगली झालेल्या दिसून येतात. ह्याचवेळी प्रत्येक भागात दलित युवक शिक्षण घेवून बाबासाहेबांच्या कार्याचा वारसा पुढे नेवू लागले. आपल्या जातबांधवांसाठी नवीन नेतृत्व उदयास आले. दलित चळवळीचा अभ्यास वेगवेगळ्या भागात प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्रपणे वेगवेगळ्या संशोधकांनी केलेला आहे. परंतु सांगली जिल्हा हा स्वतंत्र भारतात (महाराष्ट्रात) थोडा उशिरा म्हणजे १९६० ला अस्तित्वात आला. सांगली जिल्ह्याची दलित चळवळीकडे अभ्यासकांचे फारसे लक्ष गेले नाही. सांगली जिल्ह्यातच अखिल भारतीय दलित नेते रामदास आठवले, ॲड. बी. सी. कांबळे, राजा ढाले नंतर दलित साहित्यिक बंधू माधव, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, प्रा. अरुण कांबळे इत्यादी नेते साहित्यिक हे सांगली जिल्ह्यातीलच. त्यामुळे सांगली जिल्ह्यात दलित चळवळ फार जोमात होती आणि दलित मागासलेल्या समाजाच्या हक्कासाठी दलित नेत्यांनी बरेच कार्य केले आहे. त्याचबरोबर सांगली जिल्ह्यात रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, दलित महासंघ, बहुजन समाज पार्टी, भारिप बहुजन महासंघ, राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षाच्या शाखाही कार्य करीत होत्या. ह्या पक्षाने दलित चळवळीस योगदान दिलेले आहे. तसेच केंद्रीय व महाराष्ट्र शासनाच्या सवलतीचाही दलित समाजाच्या उन्नतीसाठी (शासकीय) व प्रगतीसाठी काही

प्रमाणात मदत झालेली आहे. ह्या सर्व बाबींचा आढावा घेवून ''सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ'' (१९६० ते २०००) ह्या कालखंडातील दलित चळवळीचा इतिहास जो आजपर्यंत दुर्लक्षित होता. त्याचा अभ्यास करण्याचा, मी प्रामाणिकपणे ह्या शोध प्रबंधात प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे नम्र प्रयत्न केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ग्रंथाच्या सागरात नेहमी समाधिस्त राहणारा ज्ञानियांचा राजा. जगात मान्यता असणारा विद्वान, डोळ्यात ज्ञानाचं प्रखर तेज आणि चेहऱ्यावर विलक्षण गांभिर्य असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. डॉ. आंबेडकरांनी आपल्या उण्यापुऱ्या ६५ वर्षांच्या आयुष्यात प्रत्येक क्षण न् क्षण फक्त दीनदलितांच्या उध्दाराचाच विचार केला आहे. आजही भारत त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यसूत्रांवर आधारित 'एक व्यक्ती एक मूल्य' वोट असणाऱ्या लोकशाहीचा दस्तावेज म्हणजे आपली राज्यघटना लिहून देशावर अनंत उपकार केले आहेत.

महारजात ही हिंदू समाजातील अस्पृश्य गणलेल्या अनेक जातीपैकी एक जात. अनेक पददलित जातींचा अलग बनलेला हा सर्वच्या सर्व समाज अस्पृश्य, अदृश्य नि ज्याच्याजवळ जाऊ नये, ह्या अर्थी अगंतव्य मानला जाई. ह्या अस्पृश्य समाजाची लोकसंख्या सहा कोटीवर होती. म्हणजे हिंदू समाजातील प्रत्येक पाचवा घटक पुरुष, स्त्री वा मूल अस्पृश्य मानण्यात येई.

भारताच्या विविध भागात कोणी त्यांना बहिष्कृत, अस्पृश्य परिया किंवा अतिशुद्र म्हणत तर कोणी त्यांना अत्यंज अवर्ण अथवा नामशुद्र म्हणून संबोधित. अस्पृश्यतेच्या भयंकर रुढीने त्यांचे जीवन शापून कलंकित केले होते. सवर्ण हिंदुंना कुत्रा, मांजर, गाय या पाळीव जनावरांच्या स्पर्शाचा विटाळ वाटत नसे. स्पृश्य हिंदू मुग्यांना साखर अर्पण करत, परंतु ह्या स्वधर्मीयांचा स्पर्श अपवित्र मानीत. त्यांना त्यांच्या सावलीचाही विटाळ होई. त्यांची वाणी कानावर पडली तर ती त्यांना पाणी भरण्यास प्रतिबंध असे. त्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश नसे. देवळात त्यांना देवदर्शनास बंदी असे. वस्तुस्थिती अशी होती की जाती–भेदाच्या उच्चनीचतादर्शक

शिडीच्या खालच्या पायऱ्यावर अपमानीत जीवन कंठीत असणारे न्हावी नि धोबी हे सुध्दा महारमांगाचा विटाळ मानीत असत. आम्ही केवळ संकटात उभे राहिलेले बापच![४]

सवर्ण हिंदूंच्या निर्दयतेमुळे नि अस्पृश्यतेच्या पोटी जन्मलेल्या निरक्षरतेमुळे व अज्ञानामुळे अस्पृश्य समाजाचे जीवन मातीमोल झाले होते. सरकारी चांगल्या नोकऱ्या प्रतिष्ठित धंदे अथवा पोलीस खाते ह्यात त्यांना प्रवेश नसे. त्यांनी रस्ते झाडावे, संडास साफ करावे, जोडे शिवावे, मृत ढोरांची कातडी सोलावी नि बांबूच्या वस्तू तयार कराव्यात, ही हलकी सलकी कामे पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना करावी लागत.

त्यांच्यापैकी जे काहीसे सुदैवी असत त्यांनी सवर्ण हिंदूंच्या शेतात अल्पस्वल्प रोजगार मरमर काम करावे, त्यांचे दास म्हणून शेतीवर राबावे. ग्रामसंस्थेतील शुद्र असे सरकारी काम अल्पशा वेतनावर करीत झिजावे हीच असत. त्यांच्या उपजीविकेची साधने, निरक्षर, निर्बल अन् निर्धन अशा ह्या अनाथ जातीचे नष्टचर्य एवढ्यावरच संपले नाही. त्यांचा जीवनक्रम नाना प्रकारच्या अलिखित पण अनुल्लंघनीय अशा आणखी निर्दय बंधनांनी करकचून आवळला गेलेला असे. त्यांची राहणी कशी असावी, त्यांचा वेश कसा असावा, त्यांचा आहारविहार कोणता असावा, त्यांनी भांडी कोणत्या धातूची बाळगावीत, दागिने कोणत्या धातूचे वापरावेत, यावरही निर्बंध असे. अस्पृश्योउध्दाराच्या बाबतीत राजकीय पक्षाचे पुढारी केवळ वादविवाद व भाषणे करण्यापलिकडे काही करत नाहीत.[५]

गावाबाहेरील ओंगळ, रोगट, उकिरड्यावर त्यांच्या उघड्या बोडक्या खोपट्या कशाबशा उभ्या असत. अंगभर वस्त्र नाही, पोटभर अन्न नाही, निवाऱ्यासाठी जागा नाही, अशा कंगाल स्थितीत ह्या दीनदुबळ्यांना कुडीत जीव धरून कसेबसे रहावे लागे. जेमतेम गुडघ्यापर्यंत अन् लज्जारक्षणापुरते पुरेल एवढ्या फाटक्या धडुतालाही त्यांच्या स्त्रिया महाग असत. मुलांना तर फडक्यांचा साज. अंगावर पटकूर, डोक्यावर एकदोन वेटोळ्यांचे मुंडासे, हातात काठी, खांद्यावर कांबळे नि कंबरेस लंगोटी असा पुरुषांचा वेश असे. हा त्यांचा जीवनक्रम भारतातील गत युगांचे जणू स्मृतीचिन्हच.

सारांश, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक नि व्यावसायिक बंधनामुळे हा समाज अगदी माणुसकीस पारखा झाला होता.

हिंदू समाजाचा तो घटक असूनही उकिरड्यात अस्पृश्य म्हणून जन्मास यायचा. उकिरड्यावरच धूळ फुंकता फुंकता जीवन कंठायचा. दारिद्र्यात अन् उपासमारीत जीव सोडायचा. सवर्ण हिंदुंनी ह्या राक्षसी नि विध्वंसक रुढीच्या वरवंट्याखाली हा सर्वच्या सर्व समाज रगडून टाकला. दुःख दारिद्र्य नि दास्य ह्यांच्या चिखलात युगानुयुगे गाडून टाकला, जनावरांहूनही हीनतर अवस्थेस पोचविला.

अस्पृश्यतेचे उगमस्थान कोणते? भारताच्या इतिहासातील ही एक मोठी कटु समस्या आहे. त्यासंबंधी अनेक मते आढळतात. जातीभेदाचे विकृत नि विपरीत पर्यवसान म्हणजेच अस्पृश्यतेची रुढी, हे त्यापैकी एक मत.

अर्थात प्रारंभी जातीसंस्था नव्हती. आर्यवंश हा एकजिनसी होता. श्रमविभागाच्या तत्त्वाप्रमाणे प्रत्येकजण आपल्या आवडीनिवडीप्रमाणे व्यवसाय करी. जे अध्ययन नि अध्यापन करीत त्यांना ब्राह्मण ह्या नावाने संबोधले जाई. जे राज्य कारभार करीत त्यांना क्षत्रिय असे म्हणत. जे धान्योत्पादन करीत त्यांना वैश्य असे म्हटले जाई आणि जे ह्या त्रैवर्णिकांची सेवा करीत त्यांना शुद्र म्हणत. श्रम विभागानुसार बनविलेल्या ह्या सामाजिक व्यवस्थेला चातुर्वण्य व्यवस्था म्हणत.

समाजाला आपल्या दुःस्थितीबद्दल अन्य सर्व लोक जनावरांसारखी किड्या मुंग्यांच्या पात्रतेने वागवतात याचा खेद न वाटता शुद्र, भेदाभेद आणि उच्च–नीचपणाचा पोकळ तोरा मिरविण्यातच त्यांना भूषण वाटते.[६]

परंतु हे श्रमविभागणीचे तत्त्व पुढे फार काळ टिकू शकले नाही. वर्ण ही गुणवाचक संज्ञा पुढे जातीवाचक ठरली. त्यामुळे ब्राह्मणात आवश्यक असलेल्या गुणांचा लवलेशही जर नसला तो जरीमूर्ख नि भ्रष्ट असला तरी तोतिन्ही लोकी श्रेष्ठ मानावा, अशी समजूत असे. जो क्षत्रियापोटी जन्मला तो क्षात्रगुणशुन्य जरी असला तरी शस्त्रधर अथवा शासक होई. जो शुद्राच्या पोटी जन्मला तो जरी ज्ञानसंपन्न झाला तरी तो शुद्रच अन हीनच

मानला जाई. अशा प्रकारे शेवटी चार वर्णाच्या चार जाती झाल्या. पुढे प्रांतभेद, पंचभेद नि वंश भेद ह्यांची संख्या अगणित झाली. भिन्न चालीरीती, भिन्न आहार आणि संकर ह्यामुळे या अनेक जातीमधून शेकडो उपजाती, पोटजाती उत्पन्न झाल्या.

दुसरी एक उपपती अशी की भारतातील ज्या मूळ रहिवाशांनी आर्यांचे प्रभुत्व नाकारले, त्यांना आर्यांनी चेपून टाकले. त्यांच्यावर दास्य लादले आणि शेवटी त्यांच्या कपाळी अस्पृश्यतेचा शिक्का मारला. तिसरे मत असे की हा एक छिन्नविछिन्न झालेला समाज होता. पुढे या समाजातील लोकांनी बौध्द धर्म स्वीकारला. त्यांच्या अवनतीच्या काळीही ते आर्यांशी एकजीव झाले नाहीत. त्यांनी गोमांस भक्ष्य सोडले नाही म्हणून त्या समाजावर बहिष्कार पडला. तो समाज अस्पृश्य गणला गेला.

डॉ. आंबेडकर हे स्वतः दलित समाजात जन्माला आल्यामुळे त्यांना जातीयतेचे चटके बसले होते. म्हणून त्यांनी प्रथम शिक्षण घेतले. कारण शिक्षणाशिवाय दलितांना पर्याय नाही. उच्च शिक्षण, उच्च राहणीमान, उच्च विचार व आचार हे गुण डॉ. आंबेडकरांच्याकडे होते. म्हणून त्यांनी या देशातील पिढ्यानपिढ्या उद्ध्वस्त केलेल्या जाती व्यवस्थेला प्रखर आव्हान दिले. धर्मग्रंथाची चिकित्सा केली. आम्ही पूर्वीचे क्षत्रिय आहोत हे सिध्द केले व सामाजिक आंदोलने लढविली. डॉ. बाबासाहेबांना अजितबात वेळ नव्हता. पण नाईलाज म्हणून समाजास भेद देत होते.[७]

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीदहन, काळाराम मंदिर, सत्यागृह, गावातील खालच्या दर्जाची कामे नाकारणे, स्वच्छ रहाणे अशा आंदोलनातून त्यांनी दलित समाजात आत्मप्रेरणा निर्माण केली. डॉ. आंबेडकरांनी दलितावरील अन्याय अत्याचार नाहिसा करण्यासाठी दलित, गरीब पिढीत जनतेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही शिकवण दिली. त्यामुळे संपूर्ण भारतात मागासलेल्या व दलित समाजात जागृती निर्माण झाली व आपल्या हक्कासाठी त्यांनी देशभर आंदोलने व चळवळी सुरू केल्या. अस्पृश्य समाजाने आपल्या ऐतिहासिक स्वातंत्र्य लढ्यात जेव्हा प्रथमच महाड मुक्कामी सुरुवात केली, तेव्हा अनेकांना या लढ्याचे अंतिम ध्येय तरी काय आहे, ह्याची पुसटही कल्पना करता आला नाही.[८]

## अ) सांगली जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी

१) **रचना व व्याप्ती–** भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४९ मध्ये तत्कालीन सातारा जिल्ह्यातील तासगाव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालुके हस्तांतरीत करून तसेच राज्याच्या इतर संलग्न भागातून मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण करून सहा तालुक्याचा दक्षिण सातारा नावाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने औंध, जत, सांगली, कुरुंदवाड, मिरज. ज्या संस्थानाचा समावेश होता. जिल्ह्याचे २१ नोव्हेंबर १९६० ला दक्षिण सातारा हे नाव बदलून सांगली करण्यात आले.  १९६५ ला मिरज व खानापूर या तालुक्याचे विभाजन करून कवठेमहांकाळ व आटपाडी असे आणखी दोन तालुके नव्याने करण्यात आले. दि. १ जुलै १९९९ रोजी खानापूर व तासगाव या तालुक्याचे विभाजन करून पलूस हा नवीन तालुका निर्माण करण्यात आला. तद्नंतर पलूस व खानापूरचे विभाजन करून 'कडेगाव' हा दहावा तालुका दि. २८–३–२००२ ला नव्याने करण्यात आला. सध्या सांगली जिल्हा १० तालुक्याचा झाला असून सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका, इस्लामपूर, आष्टा, तासगाव, विटा या चार नगरपालिका कार्यरत आहेत.

२) **स्थान –** सांगली जिल्ह्याचे क्षेत्रलळ ८५७२ चौ. कि. मी. असून भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यामध्ये २१ वा क्रमांक आहे. जिल्ह्याचा विस्तार १६०४५ अंश ते १७.२२ अंश ुत्तर अक्षांश व ७३.४२ अंश ते ७५.४० अंश पूर्व रेखांश असा आहे. पूर्वपश्चिम लांबी अंदाजे २०५ किमी व दक्षिण उत्तर रुंदी अंदाजे ९६ कि. मी. आहे. सांगली जिल्ह्याची समुद्रसपाटीपासून उंची ५५३ मीटर आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस सातारा व सोलापूर जिल्हा दक्षिणेस कोल्हापूर जिल्हा व कर्नाटक राज्यातील बेळगाव व विजापूर जिल्हा पुर्वेस कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा व पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा आहे.

३) **भुपृष्ठ व भूस्तरीत संरचना–** भुपृष्ठ, हवामान व पर्जन्यमान यानुसार जिल्ह्याचे १) पश्चिमीकडील डोंगराळ व जास्त पावसाचा प्रदेश प्रदेश २) नद्यांच्या सानिध्यातील मध्यम पावसाचा सपाट प्रदेश व ३) पुर्वेकडील पठारांवरचा व भरड मातीचा कमी पावसाचा काहीसा दुष्काळी प्रदेश असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. पश्चिमेकडील सह्याद्रीच्या पूर्व उताराच्या डोंगर रांगा व त्यातून निघणाऱ्या भैरवगड, डोंगररांगा यांनी मुख्यतः शिराळा व वाळवा तहसीलमधील पश्चिम भाग व्यापालेला आहे. कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या

सानिध्यातील मध्यम पावसाचा सपाट व सुपीक प्रदेश यामध्ये मिरज तहसीलचा पश्चिम व उत्तर भाग पलूस तहसीलचा पश्चिम तर वाळवा व शिराळा तहसीलचा पूर्वभाग येतो. पुर्वेकडील प्रदेश कमी पावसाचा भरड मातीचा भाग असून यात आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, खानापूर व तासगाव या तहसीलच्या पूर्व भागाचाही समावेश होतो.

४**) पर्जन्य –** जिल्ह्याच्या पश्चिमेकडील शिराळा तालुक्यात पर्जन्यमान सर्वात अधिक असून तेथील हवामान थंड आहे. पश्चिमेकडून पुर्वेकडे पर्जन्यमान कमीत कमी होत जाते. २००५ मधील जिल्ह्याचे एकूण पर्जन्यमान ७१६५.०१ मि. मी. असून सर्वात जास्त पाऊस शिराळा तहसीलमध्ये व सर्वात कमी पाऊस आटपाडी तहसीलमध्ये झाला आहे.

५) **नद्या–** प्रामुख्याने कृष्णा, वारणा, येरळा, माण व अग्रणी या नद्या सांगली जिल्ह्यातून वाहतात. कृष्णा, वारणा व येरळा या नद्या निश्चित पाऊस असलेल्या प्रदेशातून वाहतात. कृष्णा नदीही सुरुवातीस पश्चिमेकडून पुर्वेकडे, नंतर दक्षिण पूर्व दिशेकडे जिल्ह्यातून अंदाजे १३० कि. मी. वाहते. वारणा नदी पश्चिम, दक्षिण दिशेकडून पुर्वेकडे कोलपूर सांगली जिल्ह्याचया हद्दीवरून १७३ कि. मी. वाहत जाऊन सांगली जवळील हरिपूर येथे कृष्णस मिळते. जिल्ह्यातून येरळा नदी उत्तर दक्षिण ८५ कि. मी. अग्रणी व माण नदी उत्तर पश्चिम दिशेकडून दक्षिण पुर्वेकडे अनुक्रमे ८५ कि. मी. व ३५ कि. मी तर बोर नदी अनुक्रमे पश्चिमेकडून पुर्वेकडे अंदाजे ६४ कि. मी. वाहते.

वरीलपैकी कृष्णा व वारणा नद्यावरून पाटबंधारे व उपसा सिंचन योजनांद्वारे जमिनी ओलिताखाली आणलेल्या आहेत. त्याशिवाय महत्त्वाकांक्षी कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प टेंभू प्रकल्प व वाकुर्डे पाणी योजनांची कामे सुरू आहेत.

६) **प्रशासकीय विभाग –** जिल्हा मुख्यालय सांगली येथे असून लोहमार्गाद्वारे थेट मुंबई, पुणे, बेंगलोर, कलकत्ता इ. शहरांना जोडलेले आहे. पुणे, बेंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४, या जिल्ह्यातून जातो. पोस्ट, दूरध्वनी, आकाशवाणी, दूरदर्शन इ. सर्व माध्यमांनी सदर जिल्हा संपूर्ण जगाशी जोडला आहे. प्रशासकीय

सोयीसाठी जिल्ह्यामध्ये वाळवा, मिरज व खानापूर असे तीन प्रशासकीय विभाग कार्यरत असून दा तहसील, दहा विकास गट एक महानगरपालिका व चार नगरपालिका जिल्ह्यात कार्यरत आहेत.

७) **अनु. जाती/जमातीचे प्रमाण –**

२००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या १२ टक्के अनु. जातीचे व ०.६९ टक्के अनु. जमातीचे लोक आहेत. अनु. जाती व जमातींच्या लोकसंख्येपैकी ७४% ग्रामीण भागात व उर्वरित २६% शहरी भागात राहतात.[९]

टीप : सामाजिक पार्श्वभूमी व दलित चळवळीची सांगली जिल्ह्याची पार्श्वभूमी– प्रकरण दुसऱ्यात सविस्तर घेतली आहे.

**संशोधनाची गृहितके –**

१) १९६० ला नवीन सांगली जिल्हा अस्तित्वात आला.

२) १९६० ते २००० या काळात दलित नेत्यांचे सांगली जिल्ह्यात संपर्क दौरे झाले.

३) १९६० ते २००० या काळात दलित नेत्यांनी सांगली जिल्हा कार्य केले आहे.

४) १९६० ते २००० या काळात विविध संघटनांनी सांगली जिल्हा कार्य केले आहे.

५) १९६० ते २००० या काळात सांगली जिल्हा दलित नेते व संघटनांच्या कार्याचा कार्यकर्त्यांचे जीवनात परिणाम झाला.

६) १९६० ते २००० च्या काळात सांगली जिल्ह्यात दलित आमदारांनी कार्य केले.

७) १९६० ते २००० च्या काळात सांगली जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाने विविध धोरणांची अंमलबजावणी केली आहे.

८) १९६० ते २००० या काळात सांगली जिल्ह्यात विविध साहित्यिकांचे साहित्य प्रकाशित झाले आहे.

९) चिंतामणराव पटवर्धन दुसरे हे सांगली संस्थानचे हे शेवटचे अधिपती यांनी दलित समाजाच्या उद्धारासाठी काही योजना, सवलती दिल्या.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये –**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सांगली, मिरज, वाळवा, शिराळा या भागातील संपर्क व्याख्याने कार्यकर्ते यांचा अभ्यास करणे.

२. १९६० ते २००० या काळातील प्रमुख दलित नेत्यांचे कार्य अभ्यासणे.

३. विविध दलित संघटना, रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, दलित महासंघ यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

४. सांगली जिल्ह्यातील दलित कार्यकर्त्यांच्या कार्याचे काय परिणाम झाले ते अभ्यासणे.

५. राखीव आमदारांच्या कार्याचा परिणाम काय झाला ते अभ्यासणे.

६. विविध दलित संघटनांच्या कार्याचे महत्त्व अभ्यासणे.

७. केंद्र शासनाचे आरक्षण धोरण व इतर सवलतीचा दलित समाजावर काय परिणाम झाला ते अभ्यासणे.

८. महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणाचा काय परिणाम झाला ते अभ्यासणे.

९. सांगली जिल्ह्यातील दलित राष्ट्रीय नेते यांचा विशेष अभ्यास करणे.

१०. प्रसिध्द साहित्यिकांचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन समस्या –** सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ १९६० ते २०००

**व्याप्ती व मर्यादा** – सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीचा १९६० ते २००० या कालखंडातील अभ्यासापुरते हे संशोधन मर्यादित आहे.

**विषय निवडीचे महत्त्व –**

कोल्हापूर, पुणे, सातारा व इतर जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास संशोधकांनी केलेला आहे. सांगली जिल्हा इतर जिल्ह्याची निर्मिती स्वातंत्र्योत्तर काळात झाली. (१९६०) पूर्वी सांगली, मिरज ही प्रामुख्याने पटवर्धन संस्थान व जहागीर होती. सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीवर कोणी संशोधकांनी काम

केलेले नाही. हा विषय दुर्लक्षित राहिला. सांगली संस्थानातील राज्यपातळीवर व देशपातळीवर दलित नेते राजा ढाले, रामदास आठवले, ॲड. बी. सी. कांबळे, सांगली जिल्ह्यातील सुप्रसिध्द साहित्यिक बंधु माधव शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, मा. सो. कांबळे इत्यादी मंडळींनी लिखानाद्वारे व कार्यकर्तृत्वाने सांगली जिल्ह्यातील चळवळीला प्रोत्साहन दिले. त्याचा अभ्यास ह्या शोध प्रबंधात केलेला आहे. म्हणून हा विषय अतिशय महत्त्वाचा परंतु दुर्लक्षित असल्याने पीएच. डी साठी निवडलेला आहे. तसेच सांगली जिल्ह्यातील दोन विधानसभा मतदार संघात विटा व जत हे राखीव असल्याने तेथून निवडून आलेल्या राखीव आमदारांनी पण दलितांच्या उध्दारासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्याचबरोबर देशपातळीवर व राज्य पातळीवर कार्यरत असलेले दलित पक्ष व संघटना, रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, दलित महासंघ, भारिप बसप यांच्याही शाखा सांगली जिल्ह्यात अस्तित्वात आहेत. त्यांनी पण दलित चळवळीचे कार्य केलेले आहे. या सर्व गोष्टींचा या शोध प्रबंधात पध्दतशीर व शास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. म्हणून हा विषय पीएच. डी साठी निवडलेला आहे.

**संशोधन पध्दती –**

सदरचे संशोधन हे पूर्वग्रह न ठेवता तात्त्विक पध्दतीने केलेले आहे. कोठेही पूर्वग्रहदूषित विधान केलेले नाही. विषयाची मांडणी करत असताना खालील संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

**१. ऐतिहासिक संशोधन पध्दती –**

ह्या शोध प्रबंधात ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे. जुनी कागदपत्रे, पत्रव्यवहार, जुने ग्रंथ यांच्यामार्फत माहिती गोळा करून त्या माहितीवर अंतर्गत व बाह्य परीक्षण करून योग्य तो अन्वयार्थ काढलेला आहे. एखाद्या साधनात आलेली माहिती परीक्षण करून ती योग्य आहे काय हे पाहून ह्या शोध प्रबंधात मांडलेली आहे. कोठेही भावनाविवश होवून एखादा प्रसंग घटना सांगितलेली नाही. तर जे घडले ते सत्य आहे की नाही हे पाहूनच ते विधान ह्या शोधप्रबंधात मांडलेले आहे. संशोधक विद्यार्थी हा गेली २५ वर्षे

उच्च महाविद्यालयात इतिहासाचा प्राध्यापक असल्याने ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर काटेकोर पध्दतीने केलेला आहे.

### २) सर्व्हेक्षण पध्दती –

संशोधनाचा विषय हा अलिकडच्या पन्नास साठ वर्षातला असल्याने सर्व्हेक्षण पध्दतीचा वापर करून माहिती गोळा केलेली आहे. सांगली जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी जावून ज्या ज्या ठिकाणी महत्त्वाच्या दलित चळवळी झाल्या त्याचा वृत्तांत गोळा केलेला आहे. त्या काळातील जुनी वर्तमानपत्रे सत्यवादी, द. महाराष्ट्र केसरी, टाईम्स, पुढारी यांच्या कार्यालयात जावून जुन्या व दुर्मिळ फाईल्स यांचा अभ्यास करून माहिती गोळा केलेली आहे. ती माहिती तपासून शोध प्रबंधात योग्य पध्दतीने मांडलेली आहे.

### ३) मुलाखत पध्दती –

सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीतील कार्यकर्ते, नातेवाईक त्यांचे वारसदार यांच्या मुलाखती त्यांच्या घरी जावून घेतलेल्या आहेत. त्यांनी सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ बाबासाहेबांच्या आठवणी व त्यांचा प्रभाव यासंबंधी माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर त्यांच्या संग्रही असलेले दलित चळवळीसंबंधीची कागदपत्रे, कात्रणे, मला अभ्यासासाठी दिलेली आहेत. मुलाखतीसाठी प्रश्नावली तयार करून त्यांच्याकडून ती भरून घेतली आहे व त्याचा वापर मी ह्या शोधप्रबंधात तपासून शोध प्रबंधात मांडलेला आहे. तयार केलेल्या प्रश्नावलीचा नमुना मी शेवटी जोडलेला आहे. या तिन्ही पध्दतीचा वापर मी या शोध प्रबंधात केलेला आहे.

### प्राथमिक साधने –

१) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, १ ते १२ खंड, चांगदेव भगवानराव खैरमोडे, सुगावा प्रकाशन, पुणे ३०

२) समग्र आंबेडकर चरित्र, १ ते २४ खंड, ॲड. बी. सी. कांबळे

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग १, २, ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र., प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन २००२.

४) आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ (१९५६ ते १९९४) १ ते ५ खंड, ज. वि. पवार, प्रकाशक वितरक अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई.

५) सांगली गॅझेट

६) डॉ. आंबेडकरांची पत्रे, संपादन– शंकरराव खरात

७) गु. शिवराम कृष्णाजी ऊर्फ आण्णासाहेब तिरमारे, सेवक ए. दा. कांबळे, रा. भा. न्न, सांगली.

**दुय्यम साधने –**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, शंकरराव खरात.

२) सांगली संस्थानचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास. (१९८० ते १९४८)

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर

४) तराळ–अंतराळ, शंकरराव खरात

५) बहिष्कृत भारतातील विचार विश्व, विजय गेडाम कांबळे

६) अस्मिता दर्श. ऑगस्ट ९४ ते ऑग ९५

७) दलित पँथर चळवळ, डॉ. लता मुरुगकर.

**वर्तमानपत्रे –**

मूकनायक २) बहिष्कृत भारत ३) जनता ४) प्रबुध्द भारत (प्राथमिक साधने)

सत्यवादीच्या जुन्या फाईल्स, दै. पुढारी सांगली, तरुण भारत, संस्था नि स्वराज्य, गरुड, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, केसरी इ.

**प्रकरणनिहाय माहिती –**

सदरचा शोध प्रबंध अभ्यासाच्या सोयीसाठी सात प्रकरणात विभागलेला आहे.

**प्रकरण पहिले –**

**प्रस्तावना –** या प्रकरणात विषय का निवडला, विषयाचे महत्त्व, संशोधन पध्दती, प्राथमिक दुय्यम साधने, वर्तमानपत्राची माहिती, मुलाखती प्रकरणवाईज माहिती इ. घटकाचा थोडक्यात उहापोह केलेला आहे.

**प्रकरण दुसरे –**

१९६० (सांगली) जिल्हा निर्मिती होण्यापूर्वी सांगली, मिरज भागातील दलित चळवळ व शेवटचे अधिपती चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन, दुसरे यांनी केलेले दलित उध्दारक कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा या काळात आलेला संपर्क व त्यांनी तयार केलेले कार्यकर्ते इ. घटकाचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे.

**प्रकरण तिसरे –**

या कालखंडात काही ठिकाणी दलितावर अन्याय झाले, त्याचबरोबर दलित चळवळीने मोर्चे काढले, त्याचा वृत्तांत वर्तमानपत्रातून आलेला आहे. त्याचा आढावा घेतलेला आहे.

**प्रकरण चौथे –**

दलित पक्षाचे सांगली जिल्ह्यातील कार्य. सांगली जिल्ह्यात रिपब्लिकन पक्ष यांच्या शाखा पहिल्यापासून कार्यरत होत्या. त्यांनी केलेले दलित चळवळीतील योगदान, त्याचा थोडक्यात आढावा यात घेतलेला आहे.

**प्रकरण ५ वे –**

दलित नेते व प्रमुख कार्यकर्ते, सांगली जिल्ह्यातून आंबेडकर चळवळीचे काही प्रमुख नेते देशभर व राज्य पातळीवर कार्य करत आहेत. त्यात प्रामुख्याने रामदास आठवले, बी. सी. कांबळे, राजा ढाले, (राजकीय पुढारी), (ब) साहित्यिक– बंधु माधव, मा. सो. कांबळे, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, (क) प्रा. अरुण कांबळे, वामन होवाळ (सामाजिक कार्यकर्ते यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे) (तिरमारे गुरुजी).

**प्रकरण सहावे –**

सांगली जिल्ह्यातील राखीव मतदार संघ जत, विटा, खानापूर मतदार संघातील दलित कार्य १९५२ पासून सांगली जिल्ह्यातील विधानसभेच्या मतदार संघात जत हा राखीव मतदार संघ होता. तो आजही आहे.

तेथील आमदार हा दलित मागासलेल्या समाजातीलच असल्याने त्यानेही सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीसंबंधी विधानसभेत काही प्रश्न विचारलेले होते. तसेच सांगली जिल्ह्यात कोठेही दलितावर अन्याय झाला तर त्यासंबंधी विधानसभेत प्रश्न विचारून शासकीय सहकार्य मिळविलेले आहे. त्याचबरोबर काही काळ सांगली जिल्ह्यातील विटा हा मतदार संघही राखीव दिसतो. तेथूनही भगवान पवार यांनी दलितांचे नेतृत्व केलेले दिसते, त्याचा आढावा घेतलेला आहे.

**प्रकरण सातवे –**

**समारोप** : या प्रकरणात संपूर्ण अभ्यासाचे निष्कर्ष काढलेले आहेत. सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीने भारतीय व राज्य पातळीवर महत्वाचे राजकीय नेते निर्माण केले. तसेच सुप्रसिध्द साहित्यिक उदयास आले. या शोध प्रबंधाच्या अभ्यासामुळे इतर संशोधक अभ्यासकांना आपापल्या भागातील दलित चळवळीचा अभ्यास करण्यास मार्गदर्शन मिळणार आहे.

रामदास आठवले यांच्यासारखा केंदीय मंत्री सुरुवातीच्या काळात सांगलीतून उदयास आले. पी. टी. मधाळे, राजा ढाले, बी. सी. कांबळे, शंकरराव खरात, मां. सो. कांबळे, बंधु माधव, आण्णाभाऊ साठे, तिरमारे गुरुजी इ. व्यक्तींच्या जीवन कार्यावर स्वतंत्र एम. फिल, पीएच. डी चे प्रबंध होवू शकतील. इतके मोठे योगदान त्यांचे आहे. म्हणून सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीने असे बरेच लहान मोठे कार्यकर्ते तयार केले आणि या सर्वांचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्य व विचाराकडे निश्चितपणे जाते.

## संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा

**प्रस्तावना –**

संशोधन विषयाचा संबंधात जे महत्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार घेऊन त्यापुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा नवीन परिस्थितीतील बदललेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधित संशोधन विषयाचा पाया भक्कम करणे म्हणजे संबंधित साहित्याचा आढावा घेणे होय. हे महत्वपूर्ण ज्ञान संशोधन विषयाच्या संबंधातील विविध

ग्रंथालयामध्ये लेखामध्ये उपलब्ध असते. त्यातील योग्य घटकाचे वाचन चिंतन व उपयोजन म्हणजे संबंधित साहित्याचा आढावा.

तसेच संशोधना विषयी संबंधित यापूर्वी कोणते संशोधन झाले आहे का, त्यातील कोणत्या संशोधनातील कोणते निष्कर्ष प्रस्तूत संशोधनात सुरु आहेत. कोणते निष्कर्ष वेगळे आहेत. कोठे साम्य आहे. कोठे तफावत आहे याचा प्रथमतः अभ्यास करणे आणि त्याचा आधार घेवून त्यापुढील गोष्टी शोधून काढणे अथवा जुन्या निष्कर्षांना बदलत्या परिस्थितीत नवा उपयोजन करणे म्हणजे संबंधित संशोधनाचा आढावा होय.

## संबंधित साहित्याचा आढाव्याची उद्दिष्टे –

१. निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पद्धत तंत्रे यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

२. निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य अशी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास योग्य मार्गदर्शन मिळविणे.

३. संशोधन विषयासंबंधित सिद्धांत व गृहितकृत्य यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना करून देणे.

४. संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वतःचे ज्ञान वाढविणे.

## संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे स्वरूप

१. संबंधित संशोधन पूर्ण झालेले आहे की नाही ते समजते.

२. संशोधकाला आपल्या संशोधनाची कार्यपद्धती समजते.

३. संशोधन समस्येशी निगडीत असलेल्या संशोधनाची माहिती मिळते.

४. संशोधनात माहिती मिळविण्यासाठी कोणती साधने वापरावीत यांचे मार्गदर्शन मिळते.

५. संशोधनाची गृहितके व मर्यादा ठरविता येते.

६. वेळ व श्रम यांचा अपव्यय टाळता येतो.

७. संख्याशास्त्रीय पद्धतीचा वापर कसा करावा हे समजते.

८. संशोधनातील माहितीला आधार देता येतो.

## संशोधन समस्येसंबंधित इतर संशोधनाचा आढावा –

संशोधकाने समस्येसंबंधित इतर संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेतला आहे. **''सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ''** अभ्यास या संबंधित संशोधनाचा आढावा घेत असताना संशोधकाने आपले संशोधन विषयासंदर्भातील सखोल माहिती अभ्यास करून घेणे आवश्यक आहे, हे त्यातून समजू शकेल. त्यामुळे समस्येची पुनरावृत्ती टाळता येईल. तसेच या अभ्यासामुळे संशोधकाला आपली समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, स्पष्टीकरण उपलब्ध होईल व संशोधन पध्दतीही निवडता येईल. संबंधित संशोधन हे ''सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ'' अभ्यास या विषयावरील असून, सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे जागृत झालेला दलित समाज व दलित युवक दिशादर्शक बनलेला दिसून येतो. या चळवळीच्या माध्यमातून समाजाभिमुख उपक्रम, दलित समाजातील समस्या व दलित समाजाच्या विकासासाठी संघटितपणे राहिले पाहिजे ही जाणीव या चळवळीच्या माध्यमातून निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला विचार दलित बांधवांनी या चळवळीच्या माध्यमातून अशिक्षित दलित समाजाकडे पोहोचविला व संघटितरित्या या समाजाला एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच दलित समाजातील युवक आज आमदार, खासदार व मंत्रीपदापर्यंत पोहोचले, याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला देणे उचित ठरेल.

सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीच्या जनजागृतीमुळे सुधारणा घडून राबविलेली धोरणे आजच्या राज्यकर्त्यांना विचार करावयास लावणारी आहेत. चळवळीच्या उपक्रमाचा व धोरणांचा तर त्यांचा आदर्श सर्वांनीच घ्यावा, असे त्यांचे योगदान चळवळीचे दिसून येते. कारण या चळवळीने सांगली जिल्ह्याला गौतमीपूत्र कांबळे, विवेक कांबळे, मच्छिंद्र सकटे, धो. ल. थोरात, प्रा. सुकुमार कांबळे, प्रा. किरण कांबळे, प्रा. नितीन गोंधळे, जगन्नाथ ठोकळे, प्रा. मोहन साबळे असे अनेक महत्वपूर्ण कार्यकर्ते निर्माण केले. आज ते समाजातील सर्व समस्यांच्या निपटारा करण्यासाठी झटत आहेत. याचे सारे श्रेय सांगली जिल्ह्यातील

चळवळीला पर्यायाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना द्यावे लागेल. या दलित चळवळीच्या कार्याचे संशोधनामध्ये केले गेले आहे.

या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते. याचा फायदा निश्चितच इतिहासाचे अभ्यासक, वाचक, इतिहासकार विद्यार्थी संशोधकांना, विद्वानांना होईल. त्याचबरोबर या संबंधित संशोधनाचा अभ्यास करीत असताना संबंधित संशोधनाबाबत यापूर्वी कोणकोणत्या व्यक्तींनी अभ्यासकांनी संशोधकांनी काही संशोधन केले आहे का, किंवा काही लिखाण केले आहे का? याचाही आढावा या संशोधनामध्ये खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

## संशोधन समस्येसंदर्भात संशोधन साहित्याचा आढावा–

**१) डॉ. विजया गेडाम कांबळे**

**संशोधनाचा विषय –** बहिष्कृत भारतातील विचारविश्व

पीएच. डी. प्रबंध, जुलै २०१३

**उद्दिष्ट्ये –**

१) अस्पृश्य समाजातील वंचितांचा अभ्यास करणे

२) चातुर्वर्ण्य व्यवस्था व तत्कालीन परिस्थितीचा शोध घेणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जागृतीच्या कार्याचा अभ्यास करणे.

४) अस्पृश्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) बहिष्कृत भारतातील दलित चळवळीचा आढावा घेणे.

**निष्कर्ष –**

१) अस्पृश्य समाजातील वंचित घटकातील सर्वसामान्य जनतेचा अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे.

२) या संशोधनामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था व तत्कालीन परिस्थितीचे अवलोकन करण्यात आले आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजामध्ये शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या विचारातून बष्हिकृत समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या कामगिरीची माहिती या संशोधनात मांडली आहे.

४) या संशोधनामध्ये भारतातील दलित समाजाची स्थिती व समस्यांची माहिती या संशोधनातून सांगितली आहे.

५) या संशोधनामध्ये बहिष्कृत भारतातील व चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे निर्माण झालेला दलित समाज व या समाजातील समस्या, विवंचनेचा आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे.

**२) प्रा. अनिल जगताप**

**संशोधनाचा विषय –** सातारा जिल्ह्यातील दलित चळवळ

पीएच. डी प्रबंध २०१४

**उद्दिष्ट्ये –**

१) सातारा जिल्ह्यातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीच्या समस्यांचा शोध घेणे.

३) सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीतून निर्माण झालेले विचारवंत नेते व त्यांचे कार्याची माहिती घेणे.

४) सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीने केलेल्या कार्याचा शोध घेणे.

५) सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचे नेतृत्व अभ्यासणे.

**निष्कर्ष –**

१) या संशोधनामध्ये सातारा जिल्ह्यातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक तसेच सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घेणेत आला आहे.

२) या संशोधनामध्ये सातारा जिल्ह्यातील दलित समाज, त्यांची परिस्थिती व समस्या, शैक्षणिक भूमिका इत्यादीची माहिती या संशोधनात घेणेत आली आहे.

३) या संशोधनामध्ये दलित चळवळीच्या माध्यमातून तयार झालेले विचारवंत, नेते, त्यांच्या कार्याची नोंद या संशोधनात घेणेत आली आहे.

४) या संशोधनामुळे सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीला कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श विचाराची पेरणी या चळवळीच्या माध्यमातून केली तसेच या चळवळीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची जाणीव ठेवून सामाजिक दृष्टीकोनातून दलित कार्यकर्त्यांनी केलेल्या कार्याची नोंद या संशोधनात घेण्यात आली.

५) या संशोधनामध्ये डॉ. अनिल जगताप, डॉ. शिंदे, डॉ. गौतम धुमाळ, डॉ. सचिन गरुड, प्रा. कवी मोहिते, नेताजी सूर्यवंशी, अभय पाटील, प्रा. कदम, डॉ. आ. ह. साळुंखे प्रा. पोवार असे नेतृत्व साताऱ्यातील दलित चळवळीला जिवंत ठेवण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत, आदींची नोंद या संशोधनात घेण्यात आली आहे.

**३) डॉ. लता मुरुगकर**

संशोधनाचा विषय – दलित पँथर चळवळ

पीएच. डी. प्रबंध

**संशोधनाची उद्दिष्ट्ये –**

१) या संशोधनात दलित चळवळीचा अभ्यास करणे.

२) दलित पँथरच्या माध्यमातून दलित युवकांची संघटना तयार करणे.

३) दलित पँथरच्या माध्यमातून दलित युवकांच्यामध्ये प्रबोधनात्मक विचार रुजविणे.

४) दलित पँथरच्या माध्यमातून दलितांवर होणाऱ्या अन्यायाचा निपटारा करणे.

५) दलित पँथरच्या माध्यमातून दलितांचे प्रश्न सोडवून समाजाच्या वाटचालीवर निर्णय घेणे.

**निष्कर्ष –**

१) या संशोधनामध्ये संशोधकाने दलित चळवळीची प्रारंभीची भूमिका व दलित समाजाची अवस्था स्पष्ट केली आहे.

२) या संशोधनामध्ये दलित पँथरच्या माध्यमातून दलित युवकाला जागृत करून संघटितरित्या त्याला समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी मजबूत केले.

३) या संशोधनामध्ये संशोधकाने दलित युवकांच्यामध्ये प्रबोधनात्मक विचारासाठी संस्कारित केले.

४) या संशोधनातून दलित पँथरच्या माध्यमातून दलित समाजावर होणारा अन्याय निपटून काढण्यासाठी सज्ज केले.

५) या संशोधनातून संशोधकाने दलित पँथरच्या माध्यमातून दलितांच्या समस्या, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय सोडविण्यासाठी संघटित झाले पाहिजे, हा विचार स्पष्ट केला.

**समारोप –**

या प्रकरणामध्ये संशोधकाने दलित चळवळीची पार्श्र्वभूमी, दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार, संशोधनाची उद्दिष्ट्ये, व्याप्ती, मर्यादा, संशोधन पध्दती तसेच अभ्यासाची साधने इत्यादींचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर संशोधकाने या प्रकरणामध्ये दलित चळवळीचा अभ्यास १ ते ७ प्रकरणामध्ये मांडण्यात आलेला आहे. या विषयाचा अभ्यास करीत असताना संशोधकाने विषय निवडीचे महत्त्व तसेच संशोधनात्मक पध्दती, संशोधनसंबंधित साहित्याचा आढावा व संशोधनाचा आढावा घेतलेला आहे.

## प्रकरण संदर्भ –


१) मुरुगकर लता, (डॉ.), दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन, पुणे ३०, १९९५; पान १०

२) अनावृत्त विनोद, (डॉ.), नव परिपब्लिकन आणि बहुजनवादाचे अंतर्द्वंद्व, सुगावा प्रकाशन, २०१५, प्रथम आवृत्ती; पान ७

३) वाघ विलास, (संपादक), शिंदे पी. एन. (डॉ.), थोरात ए. जी., रिपब्लिकन खासदाराकडून दलित जनतेच्या अपेक्षा, फडके प्रकाशन, कोल्हापूर २०१६. पान ५०

४) खरात शंकरराव (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २०१३ पान २८

५) खैरमोडे चांगदेव भगवानराव, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड १, सुगावा प्रकाशन, आवृत्ती ५ वी आवृत्ती, २००२, पान नं. २३९.

६) लोकराज्य ऑक्टोबर २००१ (कर्मवीर दादासाहेब गायकवाड विशेषांक), पान ५

७) कुदळे डी. एस., विचारमंथन, प्रियांका ऑफसेट, सदासुख थिएटरजवळ, सांगली. १९९५, पान २४

८) गायकवाड प्रदीप लतिकाबाई, (संपादक), प्रबुध्द भारत– नाशिक प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २०१०, पान २१.

९) महाराष्ट्र शासन विभाग, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पान १ ते ३.

प्रकरण २ रे

# सांगली – दलित चळवळीची पार्श्वभूमी :


# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सांगली जिल्ह्यातील संपर्क व सांगली संस्थानाने दलितांना दिलेल्या सवलती

भारत स्वतंत्र झाल्यानंतर महाराष्ट्रातील काही भागात नवीन जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यापैकी १९६० ला महाराष्ट्रात पहिल्यांदा सांगली जिल्हा अस्तित्वात आला. १९६० पूर्वी सांगली, मिरज तासगांव व जत ही इंग्रजी अमदानीत संस्थाने होती. ८ मार्च १९४८ ला द. महाराष्ट्रातील १७ संस्थाने मुंबई प्रांतात विलीन झाली. त्यात सांगली, मिरज, मिरजमळा, जत इत्यादी संस्थानाचा समावेश होता. हा भाग दक्षिण सातारा, जिल्ह्यात १९६० पर्यंत होता. नंतर १९६० ला नवीन सांगली जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात असणारे शिराळा, वाळवा ह्या तालुक्यांचा समावेश सांगली जिल्ह्यात करण्यात आला. इ. सन. १९१९ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारतात आणि मुंबई प्रांतात राजकीय चळवळीचा उदय झाला. ''**बाबासाहेब ही एक व्यक्ती नसून सात कोटी समाजाची ती एकवटलेली शक्ती आहे**'' बाबासाहेबांचे सहकारी आमदार बी. एच. वराळे एके ठिकाणी लिहितात'' ते (डॉ. आंबेडकर) कुठल्याही मादक पदार्थाला स्पर्शही करीत नाहीत इतकेच नाही तर विडीचे पानपट्टीचे साधे व्यसन सुद्धा त्यांना नाही. हे सांगण्यास मला मोठा आनंद व अभिमान वाटतो. प्रकृती स्वास्थासाठी म्हणून शिंदी पिणारे व मरेपर्यंत दुसऱ्यांना पाजणारे महात्मे देखील आपल्या देशात आहेत. हे आपण वृत्तपत्रातून वाचले असेलच.[१] बाबासाहेबांचा झंझावती दौरा आपल्या दलित बांधवासाठी पूर्वीच्या सांगली, मिरज संस्थानात त्यांच्या कारकीर्दीत झाला होता. चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून (१९२७) ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महानिर्वाण होईपर्यंत (१९५६) या भागातील अनेक कार्यकर्ते, अनुयायी नवयुवक यांच्याशी डॉ. आंबेडकरांचा संबंध आला. अनेक वेळा सांगली, मिरज, जत संस्थानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळी झाल्या व त्यांनी सभा घेतल्या व दलितांच्या

उद्धारासाठी मागासलेल्या समाजास मार्गदर्शन केले. ह्या सर्व दलित चळवळींचा जो परिणाम झाला. त्या सर्व घटकांचा ह्या प्रकरणात थोडक्यात अभ्यास केलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आढावा घेण्यापूर्वी त्यांच्या तीन गुरू पैकी एक गुरू महात्मा फुले होते. बाबासाहेबांच्या कार्यापूर्वी जातीव्यवस्थेवर व अस्पृश्यतेच्या प्रश्नावर पहिल्यांदा महात्मा फुलेनी प्रहार करून फार मौल्यवान कार्य केलेले आहे. म्हणून थोडक्यात ह्या ठिकाणी म. फुल्यांचे सामाजिक कार्याचा आढावा घेत आहे व नंतर डॉ. बाबासाहेबांच्या सांगली संस्थानातील कार्य घेणार आहे.

## सांगलीचा वेगळेपणा




सांगलीचे वेगळेपणा त्याच्यामधील असणाऱ्या पुरोगामी विचारांच्या लोकांमुळे दिसून येते.

दूसरे चिंतामणराव यांनी अस्पृश्य समाजाची परिस्थिती जवळून पाहिली, त्यांच्या हाल अपेष्टा तसेच वंचितांच्या जगण्यातील संवेदनशिलता जाणून त्यांनी अस्पृश्य समाजाला अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. गोलमेज परिषदेला डॉ. आंबेडकरांशी त्यांची भेट झाल्याचाच हा परिणाम होता. एखाद्या संस्थानिकांनेच अस्पृश्यांच्या समस्या आपल्या म्हणून त्या सोडविण्याचा प्रयत्न करणे हे सांगलीचे वेगळेपणाचा ठसा उमटविणारी घटना आहे.

तसेच सांगलीचे वेगळेपण पहात असताना डॉ. आंबेडकरांचा पदस्पर्शाने सुगंधीत झालेल्या सांगलीतील वातावरणामुळे डॉ. आंबेडकरांनी सामाजिक ज्वलंत प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले तसेच तळागाळातील लोकांच्या समस्येवर एकता बाळगून त्यांना शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र दिला. अनेक ठिकाणी चळवळी केल्या, सत्यागृह केला व आपल्या बांधवांना न्याय मिळवून दिला. शासन दरबारी मागण्या मान्य करून घेतल्या.

सांगलीला अनेक प्रसिद्ध व्यक्तिंचा सहवास लाभला यामध्ये डॉ. आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, पी. टी. मधाळे, शिवरूद्र बामणे, सोहानी ईश्वर, उमाजी समनडीकर, भगवानराव पवार, बी. सी. कांबळे, राजा ढाले, रामदास आठवले, अरूण कांबळे, शंकरराव खरात, बंधु माधव, वामण होवाळ, यांनी केलेल्या कार्यामुळे जिल्हा ढवळून निघाला होता. वास्तव जीवन जगताना होणाऱ्या अन्यायाविरूद्धाचा आवाज म्हणजे ह्या प्रसिद्ध व्यक्ती होय.

या अनेक बाबींच्या वेगळेपणामुळे सांगलीचा आत्मसन्मान जागृत झालेला दिसून येतो वास्तविक परिस्थितीची सांगड घालताना गरीबांच्या अस्पृश्यांच्या दिन बददलीत समाजाला एक नवी ओळख निर्माण करून दिल्यामुळेच सांगलीचे स्थान अनन्य साधारण असे आहे.

### १) म. फुले यांचे सामाजिक कार्य :–

म. फुल्यांना बाबासाहेबांनी गुरू मानले होते. जोतीरावांनी आयुष्यभर धर्मग्रंथाची कठोर चिकित्सा केली. जाती व्यवस्थेच्या मूळावरच घाव घातला स्त्री–पुरूष समतेची जीवन दृष्टी समाजाला देण्याचा प्रयत्न केला. म. फुले यांनी सर्वप्रथम १८५५ साली ''तृतीयरत्न'' हे नाटक लिहिले शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे'' हा संदेश त्यांनी या नाटकातून दिला. ज्ञानाची, विद्येची महती समाज मनावर बिंबवली ''स्त्रीशुद्राति शुद्र'' म्हणजे सर्व उपेक्षित समाज हा या देशाचा भाग्यविधाता आहे. शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे. ह्या ठोस भूमिकेतून त्यांनी ''शेतकऱ्याचा आसूड'' लिहिला. फुल्यांनी सावित्रीबाईंना शिकवून पहिली भारतीय शिक्षिका घडवली. भारतातील परंपरागत समाज संस्थाच्या विरूद्ध बंड करणारे पहिले पुरूष म्हणजे जोतीबा

फुले होत. जोतीरावांनी जातिसंस्था परंपरागत रूढी, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमता याविरूद्धच कार्य केले, असे नाही तर शिक्षणक्षेत्रातही त्यांनी मोलाचे कार्य केले.[२]

**महात्मा फुलेंचा प्रभाव –**

महात्मा फुले यांनी दलितांसाठी जे कार्य सुरू केले, ते आजपर्यंत कोणत्याही व्यक्तीला सुचलेही नव्हते. माणसामध्ये देव पाहणारा ते महान आत्मा होते. त्यांनी...

१) जाती व्यवस्थेला विरोध केला. २) स्त्री पुरुष समानता आणली. ३) ज्ञानाची, शिक्षणाची महती तळागाळापर्यंत पोहोचवली. ४) शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न. ५) मुलींच्या शिक्षणाची सुरुवात. ६) परंपरागत रुढी परंपरांना विरोध आदी कार्य केले.

याचाच प्रभाव या ठिकाणी सांगली जिल्ह्यातील अनेक व्यक्तीवर झाला. यामध्ये तिरमारे, कांबळे इत्यादी व्यक्ती होत्या.

याठिकाणी अस्पृश्य समाजातील जागृतीच्या प्रारंभच फुलेंमुळे झाल्याचे दिसते. शाळांमध्ये मुलांना घालण्यास सुरुवात झाली. शेतामध्ये योग्य भावासाठी चळवळी सुरू केल्या तसेच आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द अस्पृश्य समाज पेटून उठण्यास सुरुवात झाली.

**२) सारांश–**

जोतीराव हे महारमांगादी अस्पृश्य गणल्या गेलेल्या पददलितांचे पहिले उद्धारक, पाच हजार वर्षाच्या भारताच्या इतिहासात मुलींसाठी शांळा स्थापन करणारे पहिले भारतीय म्हणून भारतीय स्त्री शिक्षणाचे जनक स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे आणि हक्कांचे उदगाते, शेतकरी नि कामकरी यांच्या दुःखाचे नि दारिद्र्य यांचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे पहिले पुढारी आणि चातुर्वर्ण्य आणि जातीभेद या संस्थावर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारे पहिले लोकनेते होते. आधुनिक भारताचे ते पहिले महात्मा आणि सत्यमेव जयते. या दिव्य तेजाने भारलेले पहिले 'सत्यशोधक' होत. अशा या नररत्नाचा गौरव म. गांधीनी खरा महात्मा म्हणून करावा स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना समाजक्रांतीकारक म्हणून प्रशंसा आणि डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध नि कबीर यांच्या बरोबर त्यांना गुरूत्वाची पदवी अर्पण करावी यातच त्यांच्या थोरवीची भव्यता दिसून येते. भारतीय समाजक्रांतीचे जनक आणि भारतातील सामान्य जनतेच्या नवयुगाचा प्रेषित असा त्यांचा थोडक्यात पण सार्थ उल्लेख करता येईल.[३]

**३) अस्पृश्यता :–**

अस्पृश्यता हा मानवतेवरील कलंक आहे. अस्पृश्यतेमुळे कोट्यावधी लोक माणसासारखी माणसे असून देखील त्यांना कुत्र्यामांजरापेक्षाही नीच लेखले आहे. अस्पृश्यतेच्या भयंकर गुलामगिरीत जीवन जगल्याने 'अस्पृश्यांचे अखंड जीवनच मृतवत झाले आहे. शतकानुशतके या अस्पृश्यतेला हिंदू समाजाने जीवदान दिले. हाच भारतीय समाजाचा अधःपातन होय. म. जोतीबा फुले अस्पृश्यतेवर प्रहार करून – माणसाला माणूस म्हटले पाहिजे माणसाला माणसासारखे वागविले पाहिजे, या विचारसरणीला म. जोतिबा फुले यांनी प्रथम आपल्या विचार व कृतीने उजाळा दिला. अस्पृश्यतेवर प्रहार करावयास सुरवात केली. इ.स. १८५२ साली भोकरवाडी, नानापेठ, येथे प्रथम अस्पृश्य महारमांग मुलासाठी शाळेची स्थापना म. फुले यांनी केली आणि ही भारतात पहिलीच अस्पृश्यांच्यासाठी काढलेली शाळा होय. तसेच महारमांग अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पाण्याचा हौद त्यांनी इ. स. १८६८ साली खुला केला होता. म. फुले यांचे अस्पृश्यता निवारणाचे विचार व कार्य क्रांतीकारक होते. त्यांच्या विचारात नवी दृष्टी होती.

त्यानंतर शिवराम जा. कांबळे, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कोल्हापूरचे राजेशाहू महाराज, बडोदयाचे सर सयाजी महाराज म. गांधी आदींचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य आपापल्या परीने योग्यच घेते. यांच्या कार्याचा पाया भूतदयावादी, सुधारणावादी होता. तरी त्यांचे कार्य अस्पृश्यता निवारण्याच्या दृष्टीने मोलाचे होते.

इ. स. १९१७ साली मुंबईत काही दिवसांच्या अंतराने अस्पृश्यवर्गाच्या दोन स्वतंत्र सभा झाल्या. एका सभेचे अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर होते व दुसऱ्या सभेचे अध्यक्ष बापूजी नामदेव बागडे हे होते. या दोन्हीही सभात अस्पृश्यांच्या शिक्षणाची मोफत सोय करावी. कायदेमंडळात राखीव जागा दयाव्यात अशा स्वरूपाच्या मागण्या केल्या आहेत.

अस्पृश्यांच्या या मागण्यांचा परिणाम काँग्रेस पक्षावर झाला आणि काँग्रेस पक्षाने कलकत्ता येथे १९१७ साली झालेल्या वार्षिक अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव मान्य केला.

**४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात :-**

ता. ३१/१/१९२० रोजी अस्पृश्याच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी त्यांची दुःखे गाऱ्हाणी जगाच्या वेशीवर ठेवण्यासाठी 'मूक नायक' या नावाचे वृत्तपत्र सुरू केले, ता. २१ मार्च १९२० ला कोल्हापूर संस्थानातील कागल महालातील माणगावला कोल्हापूरचे राजे छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यांची परिषद भरली होती. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते.

**५) बहिकृत हितकारिणी सभा**

सेवकांच्या सहविचाराने डॉ. बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारणी सभा ही संस्था ता. २०/७/१९२४ रोजी स्थापन केली संस्थेचे ब्रीद वाक्य Educate, agitate and organize (शिकवा, चेतवा, संघटित करा) लोकांना सुशिक्षित करा, त्यांच्यात आपल्या हीन अवस्थेबद्दल चीड उत्पन्न करा आणि त्यांची संघटना निर्माण करा, असे सभेचे ब्रीदवाक्य साहेबांनी ठरविले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा सांगली जिल्ह्यातील संपर्क व त्यांच्या चळवळीचा परिणाम तसेच सांगली संस्थानातील दलितांना दिलेल्या सवलती

**६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण अतिशय हालाखीच्या परिस्थितीत झाले. त्यासाठी त्यांनी छ. शाहू महाराज, बडोदयाचे सभाजीराव गायकवाड यांची मदत घेतली. शिक्षण झाल्यानंतर त्यांनी ठिकठिकाणी नोकरी केली. पण शिक्षण आणि नोकरी करीत असताना त्यांना पावलोपावली अपमान सहन करावा लागला. अस्पृश्य म्हणून त्यांना अपमानीत वागणूक दिली.

त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे सुरुवात २१ व २२ मार्च १९२० च्या माणगाव परिषदेपासून झाली माणगावला राजर्षी शाहूच्या उपस्थितीत बहिष्कृताची परिषद भरली होती त्याचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले होते. त्या परिषदेत भाषण करताना छ. शाहू महाराजांनी असे उद्‌गार काढले होते की, अस्पृश्यांना आता स्वतःचा नेता डॉ. आंबेडकराच्या रूपाने मिळालेला आहे. येथून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य सुरू झाले.[३अ]

पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे हक्क त्यांना प्राप्त करून देण्यासाठी दलित पिढीत गोरगरीबांना संघटित करून अनेक चळवळी आंदोलने केली दलित अस्पृश्य लोकांना संघटित करण्यासाठी त्यांनी अनेक संस्था निर्माण केल्या त्यामध्ये २० मार्च १९२४ ला त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा ही संस्था स्थापन करून अनेक लढये उभारले. तसेच सप्टे. १९२७ ला त्यांनी समाज समता संघाची स्थापन केली, आणि पुढे अखिल भारतीय सेड्यूल्ड कास्ट फेडरेशन स्थापन केली तर या देशातील कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी १५ ऑगस्ट १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली, आणि याद्‌वारे भारतातील अस्पृश्यांना संघटित केली हे करत असताना आपले विचार जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी आणि त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रे काढली ती म्हणजे मुकनायक बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत समता यातून त्यांनी जनतेला सतत जागृत ठेवण्याचे कार्य केले आणि महाडचा सत्याग्रह, नाशिकच्या काळा राम मंदिर प्रवेश, आणि मनुस्मृती दहन, इ. आंदोलनाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या प्रश्नालावाचा फोडली. तसेच सनातनी कर्मठ लोकांनाही जागे करण्याचा प्रयत्न केला. हिंदुधर्मातील अनेक वाईट प्रथा हिंदूना दाखवून दिल्या. संपूर्ण देश विचारमंथनांनी ढवळून काढला.

### ७) **सांगली संस्थान व मागासलेल्या जाती –**

सांगली संस्थानात अनेक मागासलेल्या जाती जमाती राहत होत्या. त्यात महार, मांग, चांभार व इतर भटक्या जमातींचा समावेश होता. या वर्गाची आर्थिक स्थिती सुधारावी, या समाजाची उन्नती व्हावी म्हणून

संस्थानाने काही उपाय योजना केलेल्या होत्या. विशेषतः दुसऱ्या चिंतामणराव ह्यांच्या कारकिर्दीत अधिक लक्ष देण्यात आलेले होते.

दुर्बल घटकांची आर्थिक स्थिती सुधारावी त्यांच्यात शैक्षणिक प्रसार व्हावा म्हणून प्रयत्न केलेले होते. संस्थानात काही ठिकाणी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढलेल्या होत्या. अस्पृश्य मुलांना शैक्षणिक सवलती व स्कॉलरशिप देण्यात आलेल्या होत्या. एक हरिजन विद्यार्थी शिवराम कृष्णाजी तिरमारे यांनी आपले अनुभव कथन करताना 'चितांमणरावांचे हरिजन प्रेम' असा एक लेख लिहिलेला आहे त्यात ते म्हणतात चिंतामणराव आप्पासाहेब यांनी दलित समाजासबंधी वेळोवेळी दाखविलेले औदर्य मोठे होते. चिंतामणरावांनी राज्य कारभार हातात घेण्यापूर्वी बर्क साहेबांबरोबर संस्थानातून दौरे काढलेले होते, राज्याधिकार घेतल्या नंतरही (सन १९१० नंतर) वेळोवेळी संस्थानातून दौरे काढले होते त्यावेळी दलित समाजाची वाईट स्थिती त्यांच्या लक्षात आली होती. म्हणून ती सुधारण्यासाठी एकदा असाच दौरा त्यांनी मौजे दुधोंडी गावी काढला होता. शाळेत एकही अस्पृश्य समाजातील विद्यार्थी शिक्षण घेत नव्हता. त्याचे चिंतामणरावांना आश्चर्य वाटले. त्यांनी गाव कामगार पाटील व शाळा मास्तर यांना सक्त ताकीद दिली व सांगितले उद्यापासून महार, मांग आदी अस्पृश्य लोकांची मुले शाळेत आलीच पाहिजेत सर्व हरिजन पालकांना आपली मुले शाळेत पाठवाच असे सांगितले. पुढे थोडी थोडी मागासलेली मुले शाळा शिकू लागली. असाच एक मुलगा हा शिवराम तिरमारे होता. त्याची पुढे सांगली येथील महार मुलांच्या शाळेवर शिक्षक म्हणून तारीख १७/५/१९१७ रोजी नेमणूक केली.[४]

शाळेची भरभराट व्हावी व अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा अशा भावनेने चितांमणरावांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून सामाजिक चळवळीकडे व 'शैक्षणिक' कार्याकडे आस्थेने पाहून जरूर त्या अडचणी दूर केल्या. त्यावेळी मराठी शाळा, हायस्कूल वगैरे ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांना मज्जाव होता. तो चितांमणरावांनी दूर करून अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व फ्रीशिप देवून हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यात प्रोत्साहन दिले.

चिंतामणराव दुसरे हे गोलमेज परिषदेकरिता सन १९३१ मध्ये इंग्लंडला गेले. असता तेथून परत आल्यावर त्यांना मानपत्र देण्याचा समारंभ सांगली येथे नदीकडील महारवाड्यात करण्यात आला. सदर प्रसंगी मिरज प्रांत तालुक्यातील सर्व मागासलेले जमातीचे लोक हजार होते. त्यावेळी त्यांनी केलेले उतरा दाखल भाषण पुढील प्रमाणे आहे. आम्ही पंगू आहोत, आपला दलित समाज आमच्या राज्यांचे एक 'चाक' आहे तरी लक्षात ठेवा, आम्ही आपल्या अडचणींचा अवश्य विचार करू आपल्या शैक्षणिक सामाजिक आणि आर्थिक बाबींचा आमच्याकडून हवा तसा विचार होत नाही. हे आम्हास कबुल करणे भाग आहे. तरी यापुढे आपणास योग्य न्याय देवू. आपणावर होणारे अन्याय आमच्या नजरेसमोर आल्यास ते दूर करण्याकरिता आम्ही स्वतः व अधिकारी वर्ग तयार आहोत. हे त्यांचे औद्यार्यपूर्ण भाषण ऐकून जमलेला दलित समाज खडबडून जागा झाला. व आपणावरील होणाऱ्या अन्यायाच्या अडचणी चिंतामणरावांना सांगू लागला. ते सर्व ऐकून त्या काळचे दिवाण मे, आठवले साहेब यांना चिंतामणरावांनी या गरीब लोकांच्या तक्रारी नोंद करून घेण्यास तोंडी हुकूम दिला. याप्रमाणे दुसऱ्या दिवशी में आठवले साहेब यांनी लोकांना ऑफिसमध्ये बोलावून त्यांच्या सर्व अडचणी ऐकून त्या लिहून घेतल्या व त्यांचे पुढीलप्रमाणे निरसन केले.

१. मौजे दुधोंडी येथील महार लोकांच्या इनामी जमिनी हे अस्पृश्य लोक खाजगी कामे करीत नाहीत या सबबीवर जप्त करण्यात आल्या होत्या मे ओगले मामलेदार यांच्याकरवी ती जप्ती उठवली.

२. मौजे नागराळे व घोगांव या गावच्या लोकांची घरे कृष्णा नदीच्या पुराच्या पाण्यामुळे वाहून गेली होती. त्यांना दुसरीकडे विनामूल्य जागा देवून नवीन वसाहत स्थापन केली.

३. मौजे शिरगुप्पी येथील अस्पृश्य लोकांना पिण्यांच्या पाण्याची गैरसोय होती त्यामध्ये श्रीमंतांनी जातीने लक्ष घालून विहीर काढून त्यांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर केली. अशा अनेक गोष्टी चिंतामणरावांनी हरिजन समाजाकरिता केल्या आहेत.

४. सांगली शहर हे औद्योगिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सुधारलेले असताना त्यांत दुसरे चिंतामणरावांकडून समाजाला पोषक व चिरकाल टिकणारी अशी अनेक कामे झाली होती.

पण अस्पृश्य समाजासाठी शैक्षणिक क्षेत्र नव्हते व सोयी नव्हत्या. त्यावेळी सांगली येथे ''हरिजन शिक्षण प्रसारक मंडळ'' या नावाचे एक मंडळ निघाले होते. त्या मंडळाने १४ जानेवारी, १९२२ रोजी बहिष्कृत अस्पृश्य वसतीगृह काढले. ते श्रीमंतांच्या श्री गणपती संस्थानच्या जागेत उभारले होते. ती जागा अपुरी आहे. असे वाटून त्यांनी चिंतामणरावांकडे विनंती केली की, ही जागा अपुरी आहे. आम्हास वसतिगृहाकरिता दुसरी जागा पाहिजे. तेव्हा चिंतामणरावांनी उदार अंतःकरणाने या मंडळास २००, १०० फूट मोकळी जागा दिली. त्यांच्या उदार अंतःकरणातून डॉ. बापट विद्यार्थी वसतिगृह जन्मास आले आहे. त्याचेही चिंतामणराव यांनीच पालनपोषण केले. आजपर्यंत सदर संस्थेतून १००० च्यावर विद्यार्थी या संस्थेचा फायदा घेवून बाहेर पडले आहेत.[५]

तसेच सांगली संस्थानच्या इतिहासात महत्वाची घटना सन १९३३ ला घडून आली आणि ती म्हणजे दलितांचे उद्धारकर्ते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगलीला भेट दिली. कदाचित चिंतामणराव पटवर्धन हे गोलमेज परिषदेला लंडनला गेले असता डॉ. आंबेडकरही त्या परिषदेस लंडनला गेले होते. त्या ठिकाणी लंडनला गोलमेज परिषदेच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची झालेली विद्‌वतापूर्ण, भाषणे चिंतामणरावांनी ऐकली व या दलित पुढाऱ्यासंबंधी आदर वाढला. असे हे दलितांचे पुढारी डॉ. बा. आंबेडकर यांनी सांगली संस्थानाला भेट देवून तेथील मागासलेल्या समाजाची स्थिती कशी हलाखीची आहे. हे पाहून त्यांच्या अडीअडचणी त्यांनी समजावून घेतल्या. त्याचप्रमाणे सांगलीच्या महाराजांनी मागासलेल्या जाती–जमातीसाठी कायकाम केले, याची सविस्तर माहिती दलित स्थानिक पुढाऱ्यांकडून डॉ. बा. आंबेडकरांनी घेतली. या त्यांच्या भेटीमुळे दलित समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

### ८) हरिजन निवारण कायदा :– (सन १९४७)

अस्पृश्यता पाळणे ही हिंदू समाजातील एक वाईट चाल होती. त्याचे निर्मूलन व्हावे म्हणून सांगली हरिजन निवारण कायदा हा कायदा १९४७ ला सांगली संस्थान कायदेमंडळाने मंजूर केला व सर्व संस्थानभर त्याची अंमलबजावणी केली. या कायद्याने संस्थानातील काही हरिजनांना व मागासलेल्या लोकांना सवलती

मिळाल्या. सार्वजनिक तळे, विहिरी, पाणवठे येथे पाणी भरण्यास हक्क मिळाला. करमणुकीच्या ठिकाणी व इतर काही ठिाकणी जाण्यास प्रवेश मिळाला तरी पण या कायद्याने संस्थानातील मंदिरात प्रवेश देण्यात आलेला नव्हता.[६]

**९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सांगलीतील संपर्क :-**

**तुमची पवित्र मते विकू नका, ती सत्कारणी लावा :-**

गेल्या आठवड्यात बुधवार ता. २० एप्रिल १९३८ रोजी मु. इस्लामपूर व ओंड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या प्रचंड अशा जाहीर सभा झाल्या, या दोऱ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर बरोबर आमदार सावंत, ससाने मास्तर मे. उबाळे हे होते. इस्लामपूरच्या सभेस सुरुवात करताच श्री. डी. एस. पवार यांच्या भाषणानंतर आ. सावंत एम. एल. ए. यांचे प्रथम भाषण झाले. त्यात त्यांनी कॉंग्रेस व स्वतंत्र मजूर पक्ष यांच्या कामगिरीची तुलनात्मक दृष्ट्या कल्पना मोठ्या कुशलतेने मांडली नंतर सत्यशोधक (ब्राम्हणेतर) पक्ष कॉंग्रेसने कसा नष्ट केला हे सांगून याबाबत सातारा जिल्ह्यातील मराठा समाजास त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. तसेच येत्या जिल्हाबोर्डाच्या निवडणुकीसाठी आपल्या पक्षातर्फे वाळवे तालुका इस्लामपूर गटातर्फे श्री भाऊराव देवजी कांबळे हे उभे आहेत. तासगाव तर्फे श्री. खंडनाक राजनाक इनामदार हे उभे आहेत. त्यांना त्याच्या ठिकाणच्या मतदारांनी अवश्य निवडून द्यावे. त्यानंतर डॉ. आंबेडकर साहेब टाळ्यांच्या प्रचंड कडकडात भाषण करावयास उभे राहिले.[७]

ते आपल्या भाषणात म्हणाले, या जिल्ह्यात पुढील महिन्याच्या २४ तारखेस जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीकरिता स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने जे उमेदवार उभे राहिले आहेत. त्यांनाच आपण सर्व मतदारांनी मते देवून निवडून आणा. असे सांगण्यासाठी मी उभा आहे. या सभेत मराठे व अस्पृश्य यांचा एकत्रित जमाव आहे. त्यामुळे मराठे मंडळींना मला जे निराळे सांगावयाचे आहे. ते अशक्य दिसते. असो या देशातील हिंदू समाजाची रचनाच अशी आहे की सर्व लोकावर ब्राम्हण प्रभुत्व असणारच कोणताही विधी ब्राम्हण खेरीज होत नाही. तसेच इतर व्यवहारही त्यांच्या विना चालत नाही. हायकोर्टातील

वरिष्ठ जागापासून ते खेडे गावातील तलाठ्यांपर्यंत ब्राम्हणाशिवाय कुणीही दिसणार नाही. १९१९ पासून ते १९३८ पर्यंत कौन्सिलमध्ये अवघे चार पाच ब्राम्हण दिसत असत. पण आता या ब्राम्हण कौन्सिलरांची संख्या जवळजवळ २७ आहे. माझ्या समजुती प्रमाणे असेंब्लीमध्ये ज्या ११ जागा अधिकाराच्या आहेत. त्यापैकी ६ ब्राम्हणांनी पटकावल्या आहेत. त्यात पाटलांची किंमत आहे काय? १७५ सभासदात त्यांना कोणीही विचारीत नाही. खरे पाहिले असता. या देशातले राजकारण ब्राम्हण जातीशिवाय चालले पाहिजे. आज राजकारणात भटजी, शेटजी, गुजर व सावकारांचे कडबोळे झालेले आहे. त्यात गरीब शेतकरी वगैरे श्रमजिवी वर्गाला वाव नाही. आजच्या या परिस्थितीचा विचार केल्यानंतर गांधीजींच्या पश्चात या राजकारणात गोंधळ माजल्या शिवाय राहणार नाही. आज जो राजकारणात धुडगुस घालीत आहोत. त्याला गांधीच्या पश्चात कोणी किंमत देईल काय? याचा अजून कोणीही विचार केलेला नाही. म्हणून आपल्या हितासाठी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र चळवळ करा. मी माझ्या पक्षात येवून मिळा असेच म्हणत नाही. पण आपल्या न्याय हक्कांचे संरक्षण होईल. अशीच चळवळ करा. तुम्हा मराठे मंडळींना सांगावयाचे म्हणजे तुमच्या हितासाठी आमचे श्री. विचारे मास्तर यांनी एक शेतकरी पक्ष काढला आहे. त्याला तुम्ही मराठे मंडळींनी अवश्य मदत करावी. तसेच जेथे राखीव जागा नाहीत. तेथील अस्पृश्य लोकांनी या नवीन शेतकरी पक्षातर्फे जे उमेदवार उभे आहेत. त्यांना मदत करावी. या लोकलबोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी कोणी खोट्या थापा किवा अमिष दाखविल त्याला तुम्ही भुलु नका तुमची पवित्र मते विकू नका तर ती सत्कारणी लावा.

डॉ. बाबासाहेबांच्या भाषणानंतरची विचारे यांचे भाषण झाल्यावर पुष्पहार वगैरे अर्पणविधी झाला. नंतर डी. एस्. पवार यांनी पाहुणे मंडळींना थाटाची मेजवानी दिली.[८]

## १०) सातारा जिल्हा अस्पृश्य युवक परिषद :-

अंकलखोप १९६० नंतर म्हणजेच नवीन सांगली जिल्हा निर्माण झाल्यावर सांगली जिल्ह्यात आले. १९३९ पूर्वी अंकलखोप हे दक्षिण सातारा जिल्ह्यात होते. अंकलखोपला अस्पृश्य युवक परिषद भरली होती. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे अध्यक्षीय भाषण दलित युवकांना प्रेरणादायी झाले त्याचा थोडक्यात वृत्तांत पुढील

प्रमाणे – ता. २४/१२/३९ रोजी दुपारी वरील परिषद अंकलखोप येथे भरली होती. परिषदेचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुशोभित करण्याचे कबूल केले होते. सभेस अलोट जनसमुदाय हजर होता. अंकलखोप येथे जात असता वाटेत भिलवडी गावी डॉक्टर साहेबास स्थानिक स्त्रियांनी ओवाळून त्याबद्दल आपल्या ठायी वसत असलेली अलोट भक्ती व्यक्त केली. स्वागत मंडळाचे अध्यक्ष मि. पी. टी. मधाळे व इतर सभासद यांनी टोलेजंग मिरवणूक काढून डॉ. साहेबासह परिषदेच्या मंडपात प्रवेश केला. डॉक्टर साहेबांचे प्रचंड टाळ्यांच्या गजरात सभाजनांनी स्वागत केले.

परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. मधाळे यांनी स्वागतपर भाषण केले त्यात ते म्हणाले 'आपले ध्येय कसे साध्य करावे हे आज येथे जमलेल्या परिषदेतील बाबासाहेबांच्या भाषणाने आपणा सर्वांना कळून येईल. आपले परमपूज्य पुढारी बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृपा प्रसादाने आपण अस्पृश्यांत 'न भूतो न भविष्यति' अशी जागृति होवून आपण उन्नतीच्या मार्गाला लागलो आहोत. गेल्या आठवड्यापासून डॉ. साहेब दौऱ्यावर आहेत. त्यांना अतिशय श्रम झालेले आहेत. गेल्या आठवड्यात अहमदनगर जिल्ह्यात हरेगाव येथे महार वतनदार कामगारांची जी टोलेजंग परिषद भरली होती. त्यासभेचे बाबासाहेबच अध्यक्ष होते. आज अंकलखोप येथे येवून अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे त्यांनी कबूल केले आहे. येथून त्यांना बेळगाव कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील मेढे गावी निरनिराळ्या परिषदेसाठी जावयाचे आहे. येथे जमलेल्या सभाजनास त्यांची ओळख करून देण्याची मुळीच जरूरी नाही ते आपणा सर्वासाठी जीवापाड श्रम करतात. त्यांच्या दरबारी गरीब, श्रीमंत हा भेदभाव नाही. साध्या समाज सेवकावरही त्यांचे प्रेम असते. सर्व तरूणांनी समाज सेवा करून त्यांचा कृपाप्रसाद मिळवावा अशी माझी तरूणास प्रार्थना आहे.

आपणा अस्पृश्यांवर तर डॉ. बाबासाहेबांचे परमेश्वरापेक्षाही जास्त उपकार झालेले आहेत. सज्जनांचे संरक्षण करून दुर्जनांचे संहरण करण्यासाठी परमेश्वराने दहा अवतार घेतल्याची दंतकथा हिंदु धर्मात आहे. पण या दहा अवतारातील एका अवतारालाही आपणा अस्पृश्यांची व त्यांच्या वरील जुलमांची आठवण झाली नाही.

आजकाल आपणास हरिजन म्हणून गोंजारणाऱ्या महात्म्यानी ही आपल्या स्वाभिमानास पोषक असे कार्य मुळीच केलेले नाही.[९]

डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजास हलवून जागे केल्यानंतर त्यांनी हिंदूस्थानातील पिळून टाकलेल्या शेतकरी व कामकरी वर्गाच्या जागृतीचा प्रश्न हाती घेतला हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली हिंदी जनतेचा भाकरीचा प्रश्न सोडवू पहाणारा श्रमजिवी पक्षाचा स्वतंत्र मंजूर पक्ष हा एकच निर्भेळ राजकीय पक्ष आहे. व या पक्षाचे डॉ. आंबेडकर हे श्रमजीवी पक्षाच्या हाडामांसांचे प्रस्थापक आहेत. श्रमजीवीकांना कायदा करण्याचे अधिकार मिळवून देणे हेच त्यांच्या पक्षाचे ध्येय आहे. कायदा करण्याची सूत्रे एकदा आपल्या हाती आली की आपली पिळवणुक थांबविण्यास दिरंगाई लागणार नाही. स्पृश्य लोक दरघडी दिवसानू दिवस आज हजारो वर्षे आपणा अस्पृश्यांवर जुलुम जबरदस्ती करीत आहेत. आपणास साधे माणूसकीचे हक्कही पूर्ण स्वराज्याची तहान लागलेले स्पृश्य देत नाहीत हे ढोंगी लोक पाणीबंदी उठविल्याच्या सार्वजनिक जलाशयावर फलक फडकवितात. पण अस्पृश्यांना त्यातील पाण्याचा थेंबही स्पर्श करू देत नाहीत. कॉंग्रेस सरकारने पाणीबंदी उठविल्याचे हुकुम काढले पण त्या हुकूमाविरूद्ध वर्तन करणारास कोणत्याही रितीने शिक्षा केली नाही. अंमलबजावणी करावयाची नसेल तर कायदा न करणे हेच प्रामाणिकपणाचे होईल. सरकारने कायदा करून अस्पृश्यांना सवलती द्याव्या व या सवलतीचा फायदा घेवू पाहणाऱ्या अस्पृश्यावर गावातील स्पृश्यांनी बहिष्कार घालावा. सरकारने या गोष्टी, डोळे उघडे ठेवून हातजोडून पहात रहावे असे प्रकार सहसा चालू असल्याने अस्पृश्यांना त्याजवर जुलूम जबरदस्ती करणाऱ्या गांवच्या स्पृश्यांनाच शेवटी शरण जाऊन आपली बहिष्कारापासून नाईलाजाने सोडवणूक करून घ्यावी लागते. या सर्व प्रकारची खरे पाहू गेले तर लाज वाटवयास पाहिजे. अशा तऱ्हेचे अन्याय गावोगावी होत असल्याने सरकार गरिबांचे नाही ही गोष्ट पुरेपूर सिद्ध झाली आहे.[१०]

स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले ते आपल्या भाषणात म्हणाले – भगिनीनों, तरूण मित्र व बंधू जनहो, आजची सभा प्रामुख्याने करून तरूणांची आहे. माझे मित्र श्री मधाळे, आजच्या सभेचे स्वागताध्यक्ष हे तरूणच आहेत. या सभेत तरूणापुरतेच भाषण घेईल अशी आपली

अपेक्षा असणार पण सभेस तरूणाप्रमाणेच तरूणात न मोडणारे इतर लोकही हजर असल्याने त्यांना आपल्या समाजाच्या जिव्हाळ्याच्या निरनिराळ्या प्रश्नासंबंधी मी बोलावे असे वाटत असणारच, म्हणून प्रथमतः या लोकांना दोन शब्द सांगून नंतर मी तरूणांच्या प्रश्नाकडे वळतो येथे डॉ. साहेबांनी हरेगांवच्या महारवतनदार कामगारांच्या सभेत मांडलेल्या प्रश्नांची चर्चा करून ते प्रश्न सभाजनास समजावून दिले.

नंतर तरूणास उद्देशून ते म्हणाले, 'जनता' पत्रातून माझे विचार दर आठवडयास प्रसिद्ध होत असतात. ते पत्र वाचल्याने आपणास आपल्या जिव्हाळ्यांच्या प्रश्नाची माहिती होत जाईल आपणास स्वाभिमानाची अत्यंत जरूरी आहे. स्वाभिमान सोडून साधलेली उन्नती ही कुचकामाची आहे. इतराप्रमाणेच आपणही माणसेच आहोत ही गोष्ट प्रत्येक तरूणाने आपल्या मनात वागविली पाहिजे. महारांनी महारवाड्यातच राहिले पाहिजे हे परमेश्वरास कधीही मान्य होणार नाही. हजारो वर्षे चालू असलेल्या जुलुम जबरदस्तीने आपल्या समाजाच्या या भावना मारल्या गेल्या आहेत. ब्राम्हणी राज्यात आपण स्वाभिमानाने वागलो तर 'पायरी सोडल्याचा' आरोप ठेवून आपणास हतीच्या पायीही देण्यात आले असते.

आपण आपल्या उन्नतीचा मार्ग आखला पाहिजे अशिव व अमंगल अशा आपणातील चाली आपण सोडून दिल्या पाहिजेत. पण आता तुकडे मोडावयाचे दिवस उरले नाहीत. आपल्या लोकांना इतर लोकाप्रमाणे समाजातील अधिकाराच्या जागा मिळाल्या पाहिजेत. पोलिसात आपल्या लोकांची आता कोठे थोडी थोडी भरती होवू लागली आहे. अजून पोलीस खात्यात अधिकाराच्या जागा आपल्या सुशिक्षित तरूणासाठी मिळत नाहीत ही शोचनीय गोष्ट आहे. अस्पृश्य अधिकारी नेमला तर त्याच्या हाताखालील स्पृश्य नाराज होणार ही भीती सरकारची अजून सुटत नाही हे देशाचे दुर्दैव नाही काय?

आपण लोकांनी आपल्या अंगी निर्भयता बाणविली पाहिजे. आपल्या समाजास मानसन्मानाने जगात रहावयाचे असल्यास आपण सदैव मरावयास तयार असले पाहिजे. अशी आपली वृत्ति झाली की आपला अपमान करण्यास कोणीही धजणार नाही निर्भय व्हा व जगाचे राज्य मिळवा हेच माझे तुम्हा तरूणास सांगणे आहे.

आता आपल्या राजकारणाबाबत मी आपणास दोन शब्द सांगतो. आपणात झालेल्या जागृती बद्दल मी आपले अभिनंदन करतो. हिंदुस्थानात आपल्या राजकारणाचा मामला पुनः सुरू होणार असा रंग दिसू लागला आहे. काँग्रेस पक्ष व अस्पृश्य यामधील मतभेदांची सामदामाने तडजोड होईल असे वाटत नाही.

आपणास मिळालेले राजकीय हक्क पुरेसे नाहीत. काँग्रेस राजवटीतही आपल्या हक्कांचे संरक्षण होत नाही. काँग्रेसला अधिकार अधिक मिळाले की ते आपल्यावरील जुलमाचेही प्रमाण अधिक होते. आपआपल्या पुरतेच पहात राहणे हा अल्प संख्याकाचा दोष आहे. आपण ब्राम्हणेतर काँग्रेसमध्ये सामील झाले त्यांनी काय मिळविले असा माझा प्रश्न आहे. पुढील आकड्यावरून ब्राम्हणेतरांनी काँग्रेसच्या कच्छपी लागणे ही भुरळ आहे. हे आपल्या निदर्शनास येईल. ब्राम्हणेतर पक्षाची लोकसंख्या ७५% असून इतर सर्व पक्षांची लोकसंख्या फारतर २५% भरेल.

मुंबईच्या कायदेमंडळात २७ ब्राम्हण सभासद आहेत, मंत्रीमंडळात तीन ब्राम्हण मंत्री आहेत. प्रांतातील ७५% ब्राम्हणेतरांचा या मंत्री मंडळात एकच 'दृष्टमणि' आहे यावरून काँग्रेसला मिळाल्याने ब्राम्हणेतरांना काय साधले हे स्पष्ट होते.

रेव्हेन्यू खात्यातही हीच रड आहे. इलाख्याच्या उतर भागात चोवीस मामलेदारांपैकी दहा मामलेदार ब्राम्हण आहेत व इतरही भागातून विषमता नांदत आहे. यावरून हिंदी राज्यकारभाराला, मग तो इंग्रज चालवीत असोत की, काँग्रेस चालवित असो, ब्राम्हणबाधा झालेली आहे. हे उघड होते ब्राम्हण हे महाभयंकर विष आहे. ते हालाहालापेक्षाही भयंकर असल्याने शंकरास देखील पचविता येणार नाही. या विषाला उत्तर देण्यासाठी भगवान बुद्धाने अवतार घेतला व ब्राम्हण्यावर हल्ला केला, आजचे काँग्रेसवाले ब्राम्हणेतरास चकविण्यासाठी रे मार्केटाचे फुले मार्केट बनवितात तव्दतच बुद्ध कालीन ब्राम्हणांनी 'इंद्र, अग्नि, वरूण' वगैरे आपल्या वैदिक देवता झुगारून त्यांच्या जागी राम,कृष्णादि क्षत्रिय देवांची स्थापना केली व आपल्या काळच्या ब्राम्हण विरोधकास चकवून आपले आसन स्थिर केले. असो पुढील निवडणुकीत या भागातून आपला एक प्रतिनिधि निवडून दया व राजकीय सता हस्तगत करण्याच्या मार्गास लागा. दारिद्र्यामुळे आपल्या विदयार्थ्यांना अनेक

अडचणीस तोंड दयावे लागत असते. या अडचणीत सापडलेल्या विदयार्थ्यांना भुलवून स्वाभिमान शुन्य बनविण्यासाठी श्री. भाऊराव पाटील व हरिजन सेवा संघ यांनी ठिकठिकाणी सापळे निर्माण केले आहेत भिष्माचार्यासारख्या वीराला कौरवांचे अन्न खाल्याने पांडवांची न्याय बाजू घेता आली नाही. ही गोष्ट ध्यानात धरा व अर्थस्थ पुरूषो दास अशी आपली स्थिती करून घेवू नका आपल्या लोकांनी चालविलेल्या बोर्डिंगासच मदत करून त्याचा फायदा घ्या. सातारा जिल्ह्यात माझे मित्र रा. सावंत यांनी एक बोर्डिंग उघडले आहे. या संस्थेस आपल्या लोकांनी भरपूर मदत करावी व तिचा फायदा गरीब विद्यार्थ्यास करून द्यावा अशी माझी आपणास आग्रहाची विनंती आहे.

## ११) डॉ. बाबासाहेबांच्या भेटीने यशस्वी झालेला मिरजेचा सत्याग्रह :-

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मिरज भेट :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २ नोव्हें १९४१ रोजी मिरजेस भेट देवून तेथील महारवतनी जमिनी संदर्भातील सत्याग्रहांचे रणशिंग फुंकले होते. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण सर्व समाजाचे मार्गदर्शक आहे भाषण थोडक्यात पुढील प्रमाणे ता. २/११/१९४१ रोजी सायंकाळी ७ वाजता मिरज येथील महारवाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले ते आपल्या भाषणात म्हणाले बंधुनो आणि भगिनीनों निव्वळ महारवाड्यात भेट देण्याच्या उद्देशाने मला आज येथे बोलविण्यात आले होते. याठिकाणी भाषण करावे लागेल अशी माझी समजूत नव्हती. मराठी भाषेमध्ये मला भाषण करता येत नाही असेही काही नाही. परंतु ही सभा म्हणजे एक चिवडा झाला आहे या सभेत मुसलमान समाजाचे लोक दिसतोहत लिंगायत व मराठा समाजाचे लोकही दिसत आहेत त्याच प्रमाणे महार समाजाचे लोक तर आहेतच तेव्हा या सर्व समुदायाला मी एकाच मुद्यावर बोललो असताना रूचेल किंवा नाही याची मला शंका वाटते. मुसलमान समाजाला पाकिस्तान संबंधी व पुढारी बॅरिस्टर जिनासाहेब यांच्यासंबंधी बोलले असताना बरे वाटेल. आमच्या महार समाजातील लोकाना आपल्या सुख-दुःखाचा प्रश्न सोडविण्यासंबंधी बोलले असताना बरे वाटेल व कॉंग्रेससंबंधी आणि गांधी संबंधी माझी मतेकाय आहेत. हे ऐकावे अशी कॉंग्रेसवाल्या लोकांची इच्छा असेल. अशा निरनिराळया इच्छेचे

व संबंधाचे लोक या सभेत असल्यामुळे, काय सांगावे याच्या बद्दलही थोडी अडचणच पडलेली आहे. तरीपण बोलावयाला सुरू केल्या नंतर ही अडचण आपोआपच दूर होईल असे मला वाटते.

''ज्या महार लोकांच्यासाठी मी येथे आलो त्यांना उद्देशूनच प्रथम मला चार शब्द सांगावयाचे आहेत. मिरजेच्या सरकारकडून आपल्यावर अन्याय झाल्याबद्दल आपण माझ्याकडे सुमारे तीन वर्षापूर्वी गाऱ्हाणे मांडले होते. सदर गोष्टीबद्दल काही तरी करीन म्हणून मी तुम्हास आश्वासनही दिले होते. आपणा सर्वास ठाऊक आहे की, सुमारे दोन वर्षापूर्वी या बाबतीत भेटण्यासाठी मी मिरजेच्या राजेसाहेबांना एक पत्र पाठविले होते. परंतु आपण का भेटू इच्छिता याचे कारण कळविल्यानंतर आपणास काय ते कळवू असे मला राजे साहेबांच्याकडून उतर आले. याकारणामुळे मला राजेसाहेबांना भेटता आले नाही. भेटण्याच्या बाबतीत नकार मिळालेले हे माझ्या आयुष्यातील पहिलेच उदाहरण आहे. भेट घेण्यासंबंधी जर मी व्हाइसराय साहेबांना आज तारेने इच्छा दर्शविली तर मला खात्री वाटतेकी, उदयाच मला टाईम सकट उतरही मिळेल, असो! ते एक मिरजेचे राजे आहेत व मी एक महार गृहस्थ आहे ही गोष्ट घडून आल्यानंतर मी, आपल एक अर्ज कोल्हापूरचे रेसिडेंट साहेब यांच्या मार्फत पाठविला होता, परंतु संस्थानच्या अंतव्यवस्थेत आम्हास हात घालता येत नाही असे त्यांच्याकडून उतर आले. असे घडून आल्यामुळे आपले काम होणार नाही. म्हणून निराश होण्याचे बिलकुल कारण नाही आपण हताश होवून स्वस्थ बसता कामा नये. आपणास आपले काम आमच्या इच्छेनुसार करून घेता येईल असा मला पूर्णविश्वास वाटतो.

गाईचे व ब्राम्हणाचे रक्षण करणे हे राजाचे कर्तव्य कर्म आहे. असे पुराणात सांगितलेले आहे. परंतू प्रजेचे पालन व पोषण करणे हे राजाचे आद्य कर्तव्य आहे. असे मला वाटते आणि एखादा राजा हे कर्तव्य करावयास चुकत असेल तर त्याला ते करण्यास भाग पाडणे हे प्रजेचे कर्तव्य आहे व ते करण्यासाठीच मी तुम्हा सर्वास आज बजावून सांगतो काँग्रेसचे लोक आज ठिकठिकाणी सत्याग्रह करीत आहेत. त्याचप्रमाणे अलिकडे मुसलमान समाजाने देखील तोच धडा उचलेला आहे. व तुम्ही देखील तोच मार्ग स्वीकारावा असे मी सर्वास सांगतो. आपली मागणी न्यायाची आहे म्हणून सर्वजण तयार व्हा! या कामी आपणास वाटेल ती मदत करण्यास मी तयार आहे. आपण या ठिकाणची पाचच माणसे मला दिली तर मी, बाहेरून पाचहजार माणसे

पाठवू शकेन (टाळ्या) माझे मित्र वराळे हे आपणास लागेल ती मदत करू शकतील. प्रसंग पडल्यास आपल्या मदतीसाठी, मी मुंबईहून माणसे व स्वयंसेवकही पाठवून देईन. त्यांच्या जेवणखाण्याची देखील तुम्ही व्यवस्था करण्याची जरूरी नाही, तेव्हा आपण कोणत्याही दृष्टीने हताश न होता ''आजपासून धैर्याने सत्याग्रहाची तयारी करा.'' (टाळ्या) आता मुसलमान बंधूंना मला दोन शब्द सांगावयाचे आहेत. आपण अल्पसंख्याक समाजाशी फटकून न वागता त्यांच्याशी सहकार्य केले पाहिजे. त्यातच आपले व इतर अल्पसंख्यांक समाजाचे हीत आहे. नुसत्या पाकिस्तानाने आपल्या बऱ्यावाईटाचा प्रश्न सुटणार नाही. ज्या प्रांतात मुसलमान समाज बहुसंख्य आहे. त्या प्रातांतील मुसलमानांना पाकिस्तानामुळे फारसा फायदा होणार नाही. कोणताही कायदा पास करावयाचा झाल्यास त्यास बहुमताची जरूरी असते हे आपणास ठाऊक असेलच. आपण मुंबई प्रांताचेच उदाहरण घेवू या. या प्रांतात कायदे मंडळाच्या सभासदांची संख्या १७५ इतकी आहे व त्यात मुसलमान समाजाचे सभासद फक्त ३० च आहेत. तेव्हा १४५ सभासदांच्या विरूद्ध ३० सभासदांना एखादा कायदा पास करून घेता येणे शक्य नाही. अशा परिस्थितीत दलित समाज, मराठा समाज वगैरे इतर अल्पसंख्याकाशी सहकार्य केले पाहिजे. त्या शिवाय त्यांना काहीच करता येणार नाही. तसेच पाकिस्तान झाले म्हणून काही इकडचे मुसलमान घरेदारे व स्थावर इस्टेटी सोडून बंगालमध्ये जावू शकणार नाहीत. तेव्हा नुसत्या पाकिस्तानामुळे साराच प्रश्न सुटेल अशी मुसलमान समाजाने आपली कल्पना करून घेतली असेल तर ती सर्वस्वी चुकीची आहे. इतर सर्वच मुसलमानेतर समाजाशी गैरविश्वासाने व फटकून न वागता आपल्याशी ज्यांचे आर्थिक व शैक्षणिक बाबतीत जुळत असेल अशा लोकांशी निदान सहकार्याने वागल्यानेच त्यांचा फायदा होणार आहे. आता गांधी व काँग्रेस यांच्या संबंधाने थोडेसे सांगून मी माझे भाषण संपवितो. गांधी जिवंत असे पर्यंत तो कोणासही काही करू देणार नाही. कारण काँग्रेसच्या सर्वच लहान मोठ्या पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी आपली बुध्दी गांधीच्या ठिकाणी गहाण टाकलेली आहे. गांधीनी पुष्कळ जाहिर घोषणा केल्या पण एकही फळाला येवून देशाचे पाऊल प्रगती पथावर गेलेले नाही. एकदा तर एक वर्षाच्या आत स्वराज्य मिळवून देतो म्हणून गांधीनी घोषणा केली होती. तिचा काय निकाल लागला हे आपणास सांगण्याची जरूरी

नाही. स्वराज्य मलाही पाहिजे आहे. परंतू ज्या स्वराज्यामध्ये सर्व जातींना व समाजाना सारखा दर्जा व हक्क दिले जातील असे स्वराज्य मला हवे आहे.

माझ्या ज्या स्वराज्यात समान हक्क मिळणार नाहीत असे स्वराज्य जर काँग्रेस अगर गांधी मागत असेल तर ते स्वराज्य मी बुटाच्या ठोकरीने उडवून देईन. इतकेच नव्हेतर असे स्वराज्य इंग्रज सरकार देखील देत असेल तर तेही त्याच तऱ्हेने उडवून देईन. (टाळ्या व जयजयकार) गांधी असे पर्यंत देशाचे काहीच होणार नाही, अशी माझी समजूत झालेली आहे. ज्याप्रमाणे एखाद्या बाईच्या पोटात सल उत्पन्न झाल्यानंतर ती जशी बाळंतही होवू शकत नाही किंवा तिच्या पोटात नवीन गर्भधारणाही होवू शकत नाही अशीच परिस्थिती आपल्या देशाची झालेली आहे. गांधी हा आपल्या राष्ट्राच्या पोटातील एक सलच होवून बसला आहे व तो असे पर्यंत कोणत्याही दृष्टीने आपल्या राष्ट्राची उन्नति होईल असे मला वाटत नाही. (टाळ्या) व्यक्ती महत्वापेक्षा देशहीत हे कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे. व हे तत्व ज्या दिवसापासून आचरणात येईल त्या दिवसापासून देशाच्या उन्नतीला प्रारंभ होणार आहे. इंग्लंडमधील लोकांना दिसून आले, त्याचवेळी कोणताही विलंब न करता त्यांना मुख्य प्रधानाच्या जागेवरून ओढून काढण्यात आले. व त्यांच्या ठिकाणी चर्चिल सारख्या माणसाची निवड करण्यात आली. अशा प्रकारची परिस्थिती जोपर्यंत आपल्या देशात निर्माण होणार नाही व जोपर्यंत आपल्या देशातील पुढारी व जनता गांधीबुवाच्या बुवाबाजीस बळी पडतात तोपर्यंत या देशाला चांगले दिवस येतील असे मला वाटत नाही. असो.

## मूकनायक व सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ–

महाराष्ट्राने पत्रकारितेची एक उज्वल परंपरा निर्माण केलेली आहे. या परंपरेत टिळक, आगरकर, शिवरामपंत, परांजपे, न. चि. केळकर, खाडिलकर, कोल्हटकर, आचार्य अत्रे, नानासाहेब परुळेकर यासारखे अनेक दिग्गज या भूमीत अवतीर्ण झालेल्या पत्रकारांनी आपल्या लेखणीने महाराष्ट्राचे मन घडविले. समाजधारणे बरोबरच समाजनिर्मिती करण्याचे व्रत वृत्तपत्रांनी स्वीकारले. सत्यान्वेषण आणि सत्य प्रतिपादन ही तत्त्वे उराशी बाळगून अनेक पत्रकारांनी आपले आयुष्य वेचले. न्यायतत्त्वाचा पाठपुरावा करताना संघर्ष

अपरिहार्य असतो. त्यामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात झुंज देणारी निधड्या छातीची परंपराही मराठी वृत्तपत्र सृष्टीत आपणास पहायला मिळते.

समाज सुधारकाचे हे ब्रीद बाबासाहेब आंबेडकरांनीदेखील स्वीकारलेले होते. याकरिता वृत्तपत्र हे एक अमोघ अस्त्र आहे, याची त्यांना जाणीव होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० च्या जानेवारीत 'मूकनायक' पाक्षिक सुरू केले. परंतु त्यांना पुढील विद्याभ्यासाकरिता इंग्लंडला जावे लागल्यामुळे त्यांनी हे पत्र आपल्या सहकाऱ्यावर सोपवले. ज्या काळात दलित समाजात साक्षरतेचे प्रमाणे हजारी नऊदेखील नव्हते, त्यावेळी हे वृत्तपत्र काढले होते, हे महत्त्वाचे आहे.

मूकनायक हे पत्र १९२० मध्ये प्रसिध्द झाले. या खंडात समाविष्ट केलेल्या अंकातून अस्पृश्यांच्या कोल्हापूर आणि नागपूर येथील दोन परिषदांचे वृत्तांत दिलेले आहेत. या दोन्ही परिषदांना छत्रपती शाहू महाराज हे उपस्थित राहून त्यांनी दलितांच्या चळवळीला मोलाचे मार्गदर्शन केलेले आढळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल त्यांनी औरवपर उद्‌गार काढलेले आहेत. महात्मा फुले यांचेनंतर छत्रपती शाहू महाराज, गुरुवर्य विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री संत गाडगे महाराज, विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी बहुजन समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी जे अस्पृश्य योध्दाराचे कार्य केले ते महाराष्ट्राच्या सामाजिक समतेच्या लढ्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असून त्याचा आपणास विसर पडू नये.

'मूकनायक' हे डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेले पहिले साप्ताहिक. हे 'मूकनायक' १ जानेवारी १९२० ला सुरू केले. त्यावेळी कोल्हापूरचे राजर्षि शाहू महाराज यांनी मूकनायकास आर्थिक मदत केली. संपादक म्हणून घोलप होते. परंतु हे मूकनायक फार दिवस टिकले नाही, ते बंद पडले.

### १) अस्पृश्योन्नती मंडळ –

सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीसंबंधी मूकनायकात खालील बातमी येऊन गेली. त्या मूकनायकात कवलापूर, जि. सातारा (आता सांगली जिल्हा) अस्पृश्योन्नती मंडळ स्थापन झालेली बातमी प्रकाशित झाली.

त्यावरून खेड्यापाड्यातसुध्दा अस्पृश्यांना आपली उन्नती करणेसाठी जागृत झाले होते, त्याचा हा वृत्तांत पुढीलप्रमाणे–

''कवलापूर जि. सातारा येथे ता. १ जाने रोजी ''अस्पृश्योन्नति मंडळ'' या नावाची संस्था स्थापन झाली त्या दिवशी सकाळी नऊ वाजता महार, मांग, चांभार, गट्टी चोर, ढोर, रामोशी वगैरे जातीच्या सुमारे १५० मुलामुलींचे संमेलन भरविण्यात आले. सभेस सर्व जातींचा मिळून सुमारे ४००/५०० पर्यंत जनसमुदाय जमला होता. हेडमास्तर यांचे अस्पृश्यांबद्दल कळवळ्याचे भाषण झाले. अध्यक्षस्थान रा. परभोजी गणोजी पाटील यांनी स्वीकारले होते. अध्यक्षांनी मुलास खावू वाटून आम्ही शाळेस जावूच असे म्हणावयास लावले.[११]''

## बहिष्कृत भारत आणि सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ–

२० मार्च १९२७ रोजी घडलेला महाडचा धर्मसंगर हाच 'बहिष्कृत भारत' वृत्तपत्राच्या तातडीने प्रकाशनाला कारणीभूत ठरला यात शंका नाही. १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे ''कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद'' आयोजित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या परिषदेचे अध्यक्ष होते. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी २० मार्च रोजी परिषद स्थळाच्या शेजारीच असलेल्या चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा ठराव करण्यात आला.

बहिष्कृत वर्गात जागृति करून त्यांना हिंदू समाजातील इतर घटकांच्या समान दर्जा प्रस्थापित करून देणे व याकरिता इंग्रजांकडून भारतीयांकडे सत्तांतरण होत असताना दलितांना त्यात सहभागी करणे हा त्यांच्या चळवळीचा प्रमुख हेतू होता. हिंदू धर्माच्या सामाजिक व मानसिक गुलामगिरीतून दलितांना मुक्त करायचे म्हणजे त्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटे व या प्रबोधनाकरिता वृत्तपत्र असेण आवश्यक होते. ३ फेब्रुवारी १९२८ च्या अंकात बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे बहिष्कृत भारताच्या झंझावाताने महाराष्ट्रातील एक प्रकारचे तुफान आले होते असे दिसून येईल.

डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' व बहिष्कृत भारत व्यतिरिक्त जनता व प्रबुध्द भारत अशी आणखी दोन वृतपत्रे चालवलीत परंतु त्यांच्या मराठी लेखनाचा सर्वांगीण आविष्कार पाहण्याच्या दृष्टीने बहिष्कृत भारत हेच वृत्तपत्र महत्त्वाचे ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'बहिष्कृत भारत' हे दुसरे पाक्षिक वृत्तपत्र मूकनायक बंद पडून सहा वर्षांचा ालावधी लोटला होता. दि. ३ एप्रिल १९२७ ला जमा झालेल्या थोड्याफार फंडातून त्यांनी 'बहिष्कृत भारत' या नावाने पाक्षिक पत्राचा पहिला अंक प्रकाशित केला आणि १५ नोव्हेंबर १९२९ ला या पत्राचा शेवटचा अंक प्रकाशित केला. २ ते २।। वर्षांच्या कालावधीत एकूण ३४ अंक निघाले. त्यापैकी ३३ अंकामध्ये वैचारिक निबंध होते. यापैकी बरेच अंक जोड अंक होते. बहिष्कृत भारतासाठी डॉ. आंबेडकरांनी निबंधाप्रमाणेच १४२ स्फूट लेख लिहिले. ते आजकालचे प्रश्न, प्रासंगिक विचार या सदरातून प्रसिध्द केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूकनायक पासून सुरू झालेला वृत्तपत्रीय लेखनाचा प्रवास बहिष्कृत भारत मध्ये विशालकाय रूपधारण करतो. ३ एप्रिल १९२७ पासून या बहिष्कृत भारतास सुरुवात झाली. हे बहिष्कृत भारत म्हणजे आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र होय.

**२) बहिष्कृत भारत :-**

बहिष्कृत भारतातील पुढील बातमी मागासवर्गीय मुला-मुलींच्यात शिक्षणाची ओढ निर्माण होण्यासाठीची आहे. यावरून 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सांगली जिल्ह्यातील दलित नेते वाचत होते हे स्पष्ट होते.

''आभार प्रदर्शन - कळंबी ता. तासगांव येथील शाळेचे तरूण, उत्साही, शिक्षण प्रेमी स्कूलपंच मे. रामगोंडा बाबगोंडा पाटील यांनी आपल्या मुलाच्या 'जावळ' काढण्याच्या समारंभाप्रित्यर्थ येथील शाळेतील मुलांना खावू व पेन्सिली वाटल्या आणि गरीब अस्पृश्य मुलांना टोप्या वाटल्या त्याबद्दल आम्ही मे. पाटील यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.[१२]''

आपला नम्र,

कृष्णा नायकू सुतार, मास्तर कळंबी.

**३) बहिष्कृत भारत –**

बहिष्कृत भारतातील दुसरी बातमी ही महार वतन खालसा होण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी विधानपरिषदेत बिल आणले. जनतेने पाठिंबा दिला, त्याची बातमी पुढीलप्रमाणे–

''**डॉ. आंबेडकर यांच्या बिलास पाठिंबा**

श्रीयुत डॉ. बी. आर. आंबेडकरसाहेब संपादक बहिष्कृत भारत यांचे सेवेशी

आम्ही खाली सह्या करणार मुक्काम तासगांव पो रहिमतपूर ता. व जि. सातारा यांचा कृ. सा.न. वि.वि. आपला ता. ४–११–२७ चा अंक वाचून पाहिला. त्यात महार वतन खालसा करण्याबद्दल जो ठराव साहेबांनी हाती धरला त्याच्या विरूद्ध महार वतनास चिकटून रहावे अशा विषयावर मुंबई शहरात ज्या गुप्त सभा भरत आहेत व भरल्या ते सभा भरविणारे व अध्यक्ष साहेब हे मुळीच वतनदार नसावेत अशी आमची मनो देवता आम्हास सांगते ते वतनदार असल्यास त्यांनी खेडेगावात जावून स्वतः हातात काठी घेवून एक महिना वतनी काम चालवून अनुभव घ्यावा. म्हणजे त्यांना सोक्षमोक्ष काय आहे ते कळेल सह्या घेणारे तुळशीराम येसूजी फुलपगारे हे दौऱ्यावर खेडेगावाला न निघता मुंबईतच भटकत हिंडणाऱ्या लोकांच्या सह्या घेतात. तरी तसे त्यांनी न करिता सातारा जिल्ह्यातील रहिमतपुरास अथवा तासगांव किंवा इतर ठिकाणी सह्या घेण्यास यावे म्हणजे सह्या बरोबर पानसुपारीही चांगली होईल असो. डॉ. बाबासाहेबांनी सर्व मतभेद एका बाजूस ठेवून होता होईतो लवकरच महारवतन खालसा होईल अेस नेटाने प्रयत्न करावे अशी आमची त्यांना नम्र विनंती आहे. मेहरबानास जाहिर व्हावे ता. १४–११–२७ आ.न. १) तानाजी गणेश भिसे फ्री. स्कू. मास्तर २) शिवराम परशराम कांबळे ३) चोखू बायू कांबळे ४) बयाजी बाबाजी कांबळे ५) मारूती पिराजी कांबळे ६) शंकर परशराम कांबळे ७) संतराम सावळा कांबळे ८) सखाराम तुकाराम कांबळे, पंच रा. रा. फुलपगारे यांच्या संबंधाने झालेला गैर समज त्यांनी केलेला खुलासावाचून दूर होईल अशी आम्हाला आशा आहे. [१३]''

सं. ब. भा.

**५) बहिष्कृत भारत –**

पुढील बातमीत स्पृश्य लोकांच्या जाचातून मुक्त करणाऱ्या विचारांना अस्पृश्यांचा मनापासन पाठिंबा दर्शविला आहे. सदर कळंबी व तासगाव तालुका हा १९६० पासून सांगली जिल्ह्यात सामील आहे.

''तारीख ११–१२–२८ रोजी तालुके तासगाव पैकी कळंबी येथे मे. खंडनाक राजनाक इनामदार लो. बोर्डमेंबर सातारा यांचे अध्यक्षतेखाली सभा भरून खालील ठराव पास झाले.

अस्पृश्य समाज स्पृश्य लोकांच्या त्रासातून मुक्त व्हावा ह्या सदहेतूने अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्य वर्गाचा हिंदूत समावेश न करिता तो वर्ग हिंदू समाजापासून अलग व स्वतंत्र मानण्यात यावा. अशा प्रकारची सुविचार सरणी जगापुढे मांडली आहे आणि ती अस्पृश्यांना स्पृश्य लोकांच्या त्रासातून खरोखरच मुक्त करणारी आहे. असे असता परवा पलूस येथे भरलेल्या अस्पृश्य शिक्षकांच्या सभेत मे. सरदार पंडीतराव यांनी अध्यक्ष या नात्याने भाषण करताना वरील विचारसरणी घातक आहे. तिचा निषेध करणे जरूर आहे असे सांगितले. त्यांचे सांगणे अस्पृश्यांना नापसंत आहे. या करिता मे. सरदार पंडीतराव यांच्या सांगण्याचा ही सभा निषेध करते. या नंतर मेसर्स आनंदराव रावजी कदम गुंडू तात्या पाटील, तरूण वक्ते रा. रामगोंडा शांता पाटील, मास्तर कळंबी यांनी असे सांगितले की, जोपर्यंत अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी येण्यास स्पृश्य लोकांकडून मज्जाव होत आहे, तोपर्यंत खरी अस्पृश्यता नष्ट होत नाही. अस्पृश्यांना आपला मानवी हक्क बजावण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीचाच अवलंब केला पाहिजे. जे लोक डॉ. आंबेडकरांच्या सुविचारसरणीचा निषेध करावयास सांगतात त्याचाच अशा अनेक सभा भरवून निषेध करणे अत्यावश्यक आहे.[१४]''

**बहिष्कृत भारत –**

अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी मदतीचे आव्हान सरकारला व दानशूरांना करणारी बातमी–

''सातारा जिल्हा बहिष्कृत शिक्षण मंडळ – अस्पृश्य वर्गाच्या शिक्षण प्रसारास नाना प्रकारच्या अनुल्लंघनीय अडचणी असल्यामुळे शिक्षणाची प्रगती व्हावी तशी होत नाही हे सर्वश्रूत आहे.

सर्वश्री निराधार व निराश्रित अशा बहिष्कृत वर्गाचे शिक्षण स्पृश्यतेच्या अभावी स्वावलंबनाने होणे अशक्य प्राय असल्यामुळे निरपराधी बहिष्कृतांच्या शिक्षण कुचंबणेची सर्व जबाबदारी स्पृश्य हिंदूवर आहे. अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. हिंदूलोक जोवर अस्पृश्यता पाळतील तोवर अस्पृश्य वर्गास दयाळू सरकारांनी शिक्षण विषयक भरपूर स्कॉलरशिप व सवलती देवून शिक्षणास चालना द्यावी. तसेच अस्पृश्यांना नोकरीच्या बाबतीत स्पृश्य हिंदूच्या बरोबरीने नोकरीची पात्रता व लायकी दाखवण्याची गरज भासू नये. अस्पृश्य समाजावर सरकारच्या कृपेची पाखर असल्याखेरीज त्या समाजास शिक्षणाच्या बाबतीत प्रगती करून दाखविता येणार नाही. इतकेच नव्हे, तर अस्पृश्य वर्गाच्या सुखाचे व प्रगतीचे कोठे चिन्ह दिसत असल्यास त्याचे सर्वश्रेय ब्रिटिश सरकारानांच आहे.[१५]

बहिष्कृत शिक्षण परिषदेपुढे मुख्यतः शैक्षणिक अडचणींचा व गाऱ्हाण्यांचा सांगोपांग विचार होवून परिषद योग्य ते उपाय सुचविणार आहे. अशा अनेक दृष्टीने सदरची परिषद अत्यंत महत्वाची होणार असल्यामुळे अस्पृश्य वर्गाच्या कळवळ्यांनी हितचिंतकांनी व सदगृहस्थानी परिषदेस द्रव्याव्दारा शक्तीनुसार अवश्य मदत करावी. अशी आशा आहे. सभेचे ठिकाण अध्यक्ष व तारीख लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल. मदत पाठवायची ती खालील पत्यावर सेक्रेटरीच्या नावे पाठवावी.

आपले नम्र.

मे. खंडनाक राजनाक इनामदार

ता. लो. बो. मेंबर

श्री. गुंडू तात्या पाटील रा. कृष्णा नायकू सुतार, रा. गणपती बाळकृष्ण पोतदार, रा. आनंदारावजी कदम, रा. आप्पा विठू चांभार''

से. ब. शि. परिषद मु. कळंबी पो. मिरज

v) जनता – ३१ ऑक्टों १९३१ अंक १, पान नं. ३२

**६) जनता आणि सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ–**

अस्पृश्य आणि ब्राह्मणेत्तरम्हणजेच सर्व मागासवर्गी यांचे राजकीय हक्क, अस्पृश्यांना लोकसंख्यपेक्षा जास्तपरिणामकारक राखीव जागा स्वतंत्र मतदार संघ, नोकऱ्यांमध्ये आरक्षण, कायद्यापुढे समानता, अस्पृश्यतेचा नायनाट आणि अस्पृश्यांचे सर्वंकष कल्याण यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेला कैफियत सादर केली. त्यांची भाषणे व गोलमेज परिषदेतील इत्यंभूत माहिती जनता वृत्तपत्रासाठी प्रसिध्द केली.

डॉ. भीमराव आंबेडकर एम. ए. पीएच. डी., एस. सी. बार ॲट–लॉ यांच्या नेतृत्वाखाली निघणारे जनहिता प्रवर्तक पाक्षिक पत्र 'जनता' 'The People' या नावाने हे वृतपत्र प्रसिध्द होत असे. या पाक्षिक वृत्तपत्राचे पहिल्या वर्षी २४ नोव्हेंबर १९३० ते १९ ऑक्टोबर १९३१ या कालखंडात एकूण २४ अंक प्रसिध्द झाले.

**७) जाहीर सभा –**

कसबेडिग्रज जिल्हा सांगली येथील अस्पृश्याची जाहीर सभेची माहिती देणारे वार्तापत्र पुढे देत आहे. दलित चळवळीच्या पार्श्वभूमीवर प्राश टाकणारी माहिती–

''ता. १०.१०.३१ रोजी कसबे डिग्रज येथे सांगली संस्थानातील बहिष्कृत बांधवाची जाहीर सभा रहिमतपूर श्री. दादासाहेब कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. पुढील ठराव पास करण्यात आले. १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आमचे खरे पुढारी आहेत. त्यांच्या विलायतीमधील राऊंड टेबल परिषदेमधील कामगिरीला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. २. सांगली संस्थानात बहिष्कृत वर्गाच्या शिक्षणाच्या सोयीकडे विशेष लक्ष घालण्यासाठी संस्थानिकास विनंती. याशिवाय अनिष्ट चालिरिती नष्ट करण्या विषयीचे ठराव ही पास

झाले. श्री. चंद्राप्पा जुगाजी कांबळे, मारूती आनंदा बाबाजी व एम.एन. कांबळे वगैरे मंडळीची भाषणे झाली. पहिला ठराव विलायतेला तारेने पाठवविण्यात आला.

दुसरी सभा विजयादशमीच्या दिवशी भरली. या सभेच्या अध्यक्ष स्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो ठेवण्यात आला. रा. कृष्णा मारूती कांबळे यांनी डॉ. आंबेडकर साहेबांच्या विलायतेमधील कामगिरीची माहिती करून दिली व सभेने त्यांच्या कामगिरीला पाठिंबा दिला आणि डॉ. आंबेडकरांच्या न्याय्य मागणीला विरोध केल्या बद्दल म. गांधीचा तीव्र निषेध करण्यात आला.[१६]''

**८) जनता –**

'जनता' हे तिसरे पाक्षिक डॉ. आंबेडकरांनी सुरू केले. 'जनता'चा वाचक वर्ग सांगली जिल्ह्यात होता. 'जनता'मध्ये सुध्दा सांगलीच्या दलित चळवळीच्या काही बातम्या येत होत्या, त्यापुढील प्रमाणे–

''सातारा जिल्ह्यातील जाहीर सभा – ता. २०–१०–३१ रोजी मु. नेर्ली ता. वाळवे जि. सातारा येथे सर्व बहिष्कृत बांधवांची जाहीर सभा मे. एम. एम. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या जंगी जाहीर सभेला कासेगांव, दुधारी, पलूस, अंकलखोप, मसुर दुधोंडी पेठ, तांबवे, पाचुंब्री, वऱ्हाड, गोटखिंडी, शिराळा, इस्लामपूर, चिकुर्डे, बिळांशी, कामेरी, कोल्हापूर, कौलापूर, कापील, सवंधे, दुधगांव वगैरे ठिकाणाहून अस्पृश्य बांधव हजर राहिले होते. प्रथम ईशस्तवने झाल्यावर पुढील ठराव मांडण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे खरे पुढारी आहेत.[१७]''

**९) जनता** –

पुढील जनता वृत्तपत्रातील बातमीत डॉ. आंबेडकर व श्रीनिवास ह्यांना दलित समाजाने खरे पुढारी मानले, त्यांची ही बातमी–

''विलायतेमधील राऊंड टेबल परिषदेच्या त्यांच्या व रा. ब. श्रीनिवासन यांच्या कामगिरीला पूर्ण पाठिंबा आणि म. गांधीच्या विरोधीवृत्तीचा तीव्र निषेध ठरावावर मे. टी. जी. कांबळे, बी. ए. कांबळे, के. डी. कांबळे, के. जी. बंदसोडे, बी. पोतलेकर, मोहिते, जी मांग, दुधोंडी, एम. बी. मांग, के. एल. बसवत, बी. के. बंदसोडे, बसवत एम्म वगैरे मंडळींची भाषणे झाली.

दुसरी एक सभा श्री. डी.एम. पवार यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्यातही वरीलप्रमाणे ठराव पास करण्यात आला.[१८]''

**१०) जनता –**

वेगवेगळ्या मान्यवरांना निमंत्रित करून बहिष्कृतांच्या समस्या प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न दुधगाव (आता सांगली जिल्हा) येथे झाली. त्याची बातमी 'जनता' वृत्तपत्रात खालीलप्रमाणे आली.

''जाहिर निमंत्रण – सातारा जिल्हा बहिष्कृत परिषद मु.पो. दुधगांव ता. वाळवे येथे ता. १२–१२–३१ रोजी शनिवार दुपारी २ वाजता श्रीमत श्री क्षात्र जगद्गुरू पीठ करवीर यांचे अध्यक्षतेखाली भरणार आहे. तरी सर्वबंधू भगिनींनी सदरहू कार्यास येवून आपल्या ज्ञानाचा अलाभ्य लाभ देण्याची कृपा व्हावी अशी नम्र विनंती आहे.

सातारा जिल्ह्यातील बहिष्कृत बंधू भगीनींनी आपणास होत असलेला जाच जुलूम, अन्याय व धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक वगैरे विषयावर ठराव कोणास पाठवावयाचे असतील तर ते वरील पत्यावर पाठविण्याची कृपा करावी.[१९]''

**११) जनता –**

पुढील जनता वृत्तपत्रातील बातमी डॉ. आंबेडकर व श्रीनिवास यांनाच दलित समाजाने खरे पुढारी मानले, त्याची ही बातमी –

''डॉ. आंबेडकर व रा. ब. श्रीनिवासन हेच आमचे खरे पुढारी असून त्यांच्या कामगिरीला आमचा पूर्ण पाठींबा आहे. अध्यक्ष सातारा जिल्हा मागासलेल्या वर्गाची परिषद रहिमतपूर सातारा.[२०]''

**१२) जनता** –

कामेरी गावात अस्पृश्य समाजात पानसुपारी देण्याचा कार्यक्रम झाला. त्याची 'जनता'मध्ये आलेली बातमी . ह्यामुळे जाती व्यवस्था काही अंशी कमी होण्यास मदत होत होती हे दिसते.

''ता. २५–१२–३१ रोजी मे. शामराव गोविंदराव देसाई संपादक –

'राष्ट्रवीर' यांना पेठ नेर्ले –कामेरी येथील अस्पृश्य समाजातर्फे पान सुपारी देण्याचा समारंभ करण्यात आला. या प्रसंगी देसाई यांनी अस्पृश्य बंधु भगिनींना डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानाने व स्वावलंबनाच्या मार्गाने आपली सर्वांगिण उन्नती करून घेण्याविषयी कळकळीचा उपदेश केला.[२१]''

**१४) जनता** –

डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत समाजासाठी केलेल्या कार्याबद्दल वाळवे, वतनदार महार यांचेकडून अभिनंदनपर तारेची बातमी जनता वृत्तपत्रात आली.

''बोरगावची तार – रा. टे. परिषदेमध्ये अखिल बहिष्कृत समाजाच्या हितसंबंधाची जी बहुमोल कामगिरी डॉ. आंबेडकर यांनी बजावली तिच्या सन्मानार्थ वाळवे ता. वतनदार महार सेवा संघ बोरगांव (सातारा) यांनी डॉक्टर साहेबांना अभिनंदनाची तार पाठविली होती.[२२]''

**१५) नेर्ले येथील अभिनंदन** –

नेर्ले गावातूनही डॉ. आंबेडकरांचे अभिनंदन प्रत्येक घरासमोर गुढ्या उभारून केले, त्याची 'जनता'मधील बातमी–

''रा. टे. परिषदेमध्ये अस्पृश्य समाजाच्या हितसंबंधाची जी कामगिरी केली त्याबद्दल त्यांच्या आगमनाचा दिन ता. २९-१-३२ रोजी नेर्ले (सातारा) येथे पाळण्यात आला. येथे घरोघर गुढ्या उभारल्या होत्या व एक अभिनंदनाची तार पाठविण्यात आली.[२३]''

**१६) वाळवे येथील अभिनंदन –**

वाळवे गावातूनही डॉ. आंबेडकरांचे अभिनंदन प्रत्येक घरासमोर गुढ्या उभारून केले, त्याची 'जनता'मधील आलेली बातमी–

''ता. २९-१-३२ रोजी मु. वाळवे (सातारा) येथे प्रत्येकांनी आपापल्या घरी गुढ्या उभारल्या होत्या. पेठेतर्फे एक अभिनंदनाची जाहीर सभा भरवून डॉ. आंबेडकरांना तार पाठविण्यात आली.[२४]''

**१७) जनता –**

मुलींच्या शिक्षणाबद्दल चांगली कामगिरी केली म्हणून 'जनता'मधील पुढील बातमी–

''गुंडो पांडुरंग कांबळे यांना एक थाटाची पानसुपारी समारंभ करण्यात आला होता. श्री. कांबळे मास्तर यांनी मुलींच्या शिक्षणासबंधी येथे पुष्कळ खटपट करून मुलींच्या फ्री स्कूलची स्थापना करविली. तसेच अस्पृश्य समाजाच्या सामाजिक व धार्मिक बाबतीच्या चळवळी यशस्वी रीतीने पार पाडल्या आणि सर्वतोपरी ते सर्वांचे चहाते झाले होते. त्यांच्या सर्व प्रकारच्या उत्तम कामगिरीमुळे त्यांचा पेठ गावातर्फे जाहिर थाटाची पानसुपारी समारंभ करून सन्मान केला.[२५]''

**१८) जनता –**

डिग्रजमध्ये अस्पृश्यांची जाहीर सभा झाली. त्याची 'जनता' वृत्तपत्रातील बातमी.

''मु. क. डिग्रज सं. सांगली येथे ता. २०–३–३२ रोजी अस्पृश्यांची जाहिर सभाची जुगाप्पा मसू कांबळे यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेत पुढील ठराव पास झाले. १. डॉ. आंबेडकर व रा. ब. श्रीनिवासन यांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीला पाठींबा २) डॉ. मुंजे व रा. ब. राजा यांच्या समाजघातकी कराराचा तीव्र निषेध ३) हिंदी मतदान कमिटीने अस्पृश्य समाजाचा स्वतंत्र मतदार संघ द्यावा अशी विनंती ४) सामाजिक अनिष्ट चालीरितीचा नायनाट करणे. या ठरावावर श्री कृष्णा मारूती कांबळे, भरगुबुवा, आनंदा कांबळे वगैरे मंडळींची भाषणे झाली.[२६]''

**१९) जनता –**

स्वतंत्र मतदार संघाच्या स्थापनेची मागणी मागासांच्या उन्नतीसाठी केली, त्याचा 'जनता' वार्तापत्रातील बातमी.

''सेवादलाची स्थापना – मु. नेर्ले या वाळवे जि. सातारा येथे ता. २४–३–३२ रोजी पुण्याचे मे. आर. एस्. सुभेदार घाडगे ऑ. मॅजिस्ट्रेट यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत सेवादलाच्या स्थापनेचा विचार होवून स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीकरिता खेड्यापाड्यातून दौरे काढण्याचे ठरले व हे कार्य शिस्तीने पार पाडण्यासाठी ता. २७–३–३२ रोजी सेवादलाची स्थापना करण्यात आली.[२७]''

**२०) जनता –**

सतत जागृती घडवून आणण्यासाठी वतनदार महार सेवा संघातर्फे अस्पृश्यांची जाहीर सभा आयोजित केली, त्याचा 'जनता' वृत्तपत्रातील मजकूर.

''नेर्ले येथील जाहीर सभा – मु. ता. वाळवे जि. सातारा येथे वतनदार महारसेवा संघातर्फे अस्पृश्यांची जाहिर सभा मे. तुकाराम ज्ञानदेव कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली ता. २०–३–३२ रोजी भरली होती. विटू डोंगनी, एम. भाऊ देवजी कांबळे, श्रीपती पठाणे वगैरे मंडळीची पुढील ठरावावर भाषणे झाली.

१) बॅकवर्ड क्लासेस ऑफिसर बाम्बे प्रसिडेन्सी यांनी प्रत्येक जि. सबकमिटी नेमण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे आमच्या तालुक्यातून ज्यांची निवड करावयाची आहे.  त्याबद्दल आमचा संघ ज्यांची निवड करील त्यांचीच करावी. २) आमच्या तालुक्यातर्फे स्टार्ट कमिटी पुढे साक्ष देण्यासाठी श्री. परिसा आण्णाजी कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. ३. डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्याकरिता स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली आहे. तिला मान्यता व राजा मुंजे कराराचा तीव्र निषेध.[२८] ''

**२१) जनता –**

नेर्ले येथील अस्पृश्यांच्या सभेचा वृत्तांत पेठ, नेर्ले, वाळवा, कामेरी ही गावे आता सांगली जिल्ह्यात आहेत. पूर्वी ह्या गावांचा समावेश दै. सातारा जिल्ह्यात होता. १९६० पासून ही सर्व गावे सांगली जिल्ह्यात आली. त्याचा वृत्तांत.

''नेर्ले सातारा येथील सभा मु. नेर्ले ता. वाळवे येथील अस्पृश्यांची सभा भरून पुढील प्रमाणे चेअरमन लॉर्ड लोथियन फ्रॅंचाईज कमिटी यांना तार करण्यात आली आहे, ''डॉ. आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली आहे. तिला अखिल अस्पृश्य जनतेचा पाठींबा असून रा.ब. राजा व मुंजे यांच्या कराराचा निषेध[२९]''

**२२) जनता –**

एम. के. जाधव यांना थाटाची सुपारी दिली, त्याचा वृत्तांत 'जनता'मधील पुढीलप्रमाणे–

''मे. एम. के जाधव. असि. बॅंकवर्ड क्लास ऑफिसर हे सातारा जिल्ह्यात दौऱ्यावर आले असता त्यांना नेर्ले, पेठ ता. वाळवे (सातारा) येथील बहिष्कृत लोकांतर्फे थाटाची पान सुपारी करण्यात आली. दोन्ही ठिकाणच्या लोकांनी आपआपल्या अडचणी मे. जाधव यांच्या पुढे मांडून त्यांचे निवारण करण्याबद्दल मे. जाधव यांना विनंती करण्यात आली. दोन्ही ठिकाणच्या सभेत मे. के. आर. इनामदार डि.लो.बो.मेंबर मे. तुकाराम ज्ञानदेव कांबळे, दमाजी आप्पा पवार, गुंडो पांडुरंग कांबळे, शिवराम चोळाप्पा कांबळे यांची भाषणे

झाली. व मे. जाधव यांना हारतुरे अर्पण केले. तसेच मु. लोणंद ता. कोरेगाव येथेही मे. सुभाजी जयराम स्वराज डि. लो. बो. मेंबर यांचे नेतृत्वाखाली मे. जाधव यांना पानसुपारी करण्यात आली.[३०]''

**२३) जनता –**

आष्टा, जि. सांगली येथील जनतामधील बातमी

''मु. अष्टे (सातारा) मे. खंडेराव राजेराव इनामदार डि. लो बोर्ड व स्कूल बोर्ड मेंबर यांना सातारा जि. बँकवर्ड क्लास कमिटीचे चेअरमन निवडल्या बद्दल त्यांना ता. ४–७–३२ रोजी मे. भिमराव बाळासाहेब पाटील प्रेसिडेंट ॲक्ट म्युनिसीपालटी यांच्या अध्यक्षतेखाली पानसुपारी देण्याचा जाहीर समारंभ करण्यात आला.[३१]''

**२४) जनता –**

बागणी, जिल्हा सांगली येथे बहिष्कृतांची सभा झाली, त्याचा वृत्तांत

''बागणी येथील बहिष्कृतांची सभा– तसेच याच महिन्यात मु. बागणी (सातारा) येथे मे. चंद्रसेन भुजंगराव शेळके यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत समाजाची सभा होवून पुढील ठराव पास झाले. १. रा. टे. परिषदेमधील डॉ. आंबेडकर व रा.ब. श्रीनिवासन यांच्या कामगिरीला पाठिंबा आणि अल्प संख्याकांच्या मागणीला मान्यता २. राजा मुंजे कराराचा धिक्कार ३. जनता पत्राच्या प्रसारार्थ कार्यकरणे या ठरावावर मे. भाकंद मल्हार कांबळे, डी. के. कांबळे, अण्णाजी भाले, पांडुरंग शेळके, गणपतराव भाळे वगैरे मंडळीची भाषणे झाली.[३२]''

**२५) जनता –**

कासेगाव (आता सांगली जिल्हा) अस्पृश्य वस्तीत झाले. सामाजिक किर्तनाचा वृत्तांत जनतामध्ये प्रसिध्द झाला.

''मु. पो. कासेगाव (सातारा ) येथे अस्पृश्य वस्तीत स्व. म. पक्षाचे प्रचारक श्री. भडकनाथ मोरे (महिमान गडकर ) यांचे सामाजिक किर्तन ता. ३०.९.३९ ते ता. १–२ असे तीन दिवस लोकावर फारच परिणाम झाले. त्यामुळे येथील मंडळींनी त्यांना आर्थिक मदत चांगलीच केली. स्व. म. पक्षाचे सभासदही करण्याचे काम त्यांनी उत्तम तऱ्हेने चालविले आहे हे त्यांना भूषणावह आहे.[३३]

मु. पो. कासेगांव (सातारा) येथे ता. १०–१०–३९ रोजी. रात्री ८ वाजता अस्पृश्य वस्तीत मे. यादव राणोजी कांबळे, मेंबर ग्रामपंचायत यांचे अध्यक्षतेखाली मे. चंद्राबाळा कांबळे पेन्शनर मास्तर यांचे सद्यस्थितीत अस्पृश्य वर्गाने कसे वागावे या विषयावर उत्तम भाषण झाले.''

**२६) प्रबुध्द भारत आणि सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ–**

जनतेच्या ७ जानेवारी १९५६ च्या अंकात 'जनता' साप्ताहिकाचे नाव बदलणार असे वृत्त प्रकाशित झाले.

प्रबुध्द भारताचा पहिला अंक शनिवार, दि. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी प्रसिध्द झाला. संपादक मंडळाचे सदस्य मा. बी. सी. कांबळे यांनी 'प्रबुध्द भारत' व त्याचे कार्य या शीर्षकाने संपादकीय अग्रलेख लिहिला. मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता समता या प्रवासाचा ओझरता समाचार घेत प्रबुध्द भारताचा उद्देश पत्रिका त्यांनी सादर केली. 'जनता' ही ज्ञानसंपन्न म्हणजे प्रबुध्द भारत असे निवेदन त्यांनी केले. भारतीय जनता केवळ बुध्दीमान नव्हे तर प्रकाशन व्हावी हे प्रबुध्द भारताचे लक्ष्य असल्याचे त्यांनी कथन केले.

**२७) प्रबुध्द भारत** –

प्रबुध्द भारतातही सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीसंबंधी पुढील बातमी आल्या आहेत. बुध्द जयंतीचा कार्यक्रम झाला, त्याचे वार्तापत्र प्रसिध्द झाले आहे ते पुढीलप्रमाणे–

''भारतात ठिकठिकाणी साजरी झालेली बुध्द जयंती शिराळा–वैशाख पौर्णिमा गुरूवार ता. २४–५–५६ रोजी २५०० वी. बुध्द जयंती शिराळा (आंबाड) येथे मोठ्या थाटाने साजरी करण्यात आली. गौतम बुध्दाचा संदेश अडाणी जनतेच्या कानावर जावा उपदेशाच्या चार गोष्टी त्यांना सांगाव्या या उद्देशाने ही जयंती घेतली.

सकाळी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. गौतम बुध्दाचा विजय असो. अशा गर्जनेत फेरी पार पडली. दुपारी सर्व महार मंडळीने सामुदायिकरित्या केलेले पुरणपोळीचे जेवण केले. जेवणाच्या वेळी शिराळच्या आसपासचे लोक मुद्दाम हा सोहळा पाहण्यासाठी आले होते. एकंदरीत कार्यक्रम चांगला झाला.[३४]

दुपारी चार वाजता लता पल्लवांनी सुशोभित केलेल्या गाडीतून गौतम बुध्दांच्या व डॉ. आंबेडकरांच्या फोटोची मिरवणूक काढली. मिरवणुकी पुढे लेझीमचा नाच करीत करीत मिरवणूक शांततेने चालली होती. लोकांचे आनंदी चेहरे शांततेचे वातावरण व मिरवणुकीपुढे असलेले बेंडाचे सुस्वर वादन उत्साहात भर घालीत होते. मिरवणुकीनंतर सभेचा कार्यक्रम ठेवला होता. येथील अस्पृश्य समाजाशी अत्यंत आस्था असणारे लोकप्रिय पाटील श्री. भगवानराव रंगनाथ पाटील यांचे अध्यक्षतेखाली सभा घेतली. निरनिराळ्या वक्त्यांची बुध्द चरित्रावर भाषणे झाली. शेवटी अध्यक्ष श्री. पाटीलांनी आपले विचार मांडले. बुध्दाची तत्वे आमलात आणून त्याप्रमाणे आचरण केल्यास खरोखर आपला भारत देश जगामध्ये लवकर अग्रेसर होईल. तेव्हा प्रत्येक मानवाने आपले आचार विचार बुध्द तत्त्वाप्रमाणे आचरणात आणण्याचे प्रयत्न करावे असा दिव्य संदेश दिला. सभेस सुमारे ५०० – ६०० जनसमुदाय जमला होता.

रात्री करमणुकीच्या कार्यक्रमात बुध्दावरील पदे संवाद व डॉ. आंबेडकरावरील गाणी म्हटली. अशा रितीने हा जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला. हा कार्यक्रम पार पाडण्यास वयोवृध्द श्री. नानू तुका पांडगळे, श्री सखाराम सावळा सर्वदे, श्री बाबू बंडू पांडगळे यांनी अत्यंत परिश्रम घेवून मदत केली. पुढील वर्षीही जयंती मोठ्या उत्साहाने करण्याचे ठरवून हा कार्यक्रम संपला.[३५]''

### २८) प्रबुध्द भारत

वाळवा (आता सांगली जिल्हा) बुध्दजयंती मोठ्या प्रमाणात साजऱ्या झाल्या. त्याचा 'प्रबुध्द भारतातील वार्तापत्र पुढीलप्रमाणे–

''वाळवे (द. सातारा) ता. ५ जून १९५६ रोजी मु. वाळवा ता. वाळवे जि. द. सातारा येथे मोठ्या सोहळ्यात २५०० बी बुध्द जयंती साजरी. सभेचे अध्यक्ष स्थान महार वतनदारी करीता शिक्षा भोगून आलेले

क्रांतीकारक व शे. का. फे. चे कार्यकर्ते श्री. आर.डी. धनवडे यांनी स्वीकारले होते. प्रातःकाली बँड, लेझीम वगैरे मंगलवाद्याच्या निनादात बुध्द जयंतीस सुरवात झाली. सभेत पुष्कळ स्पृश्य वर्गीय लोकही जमले होते.

सभे मध्ये श्री. बी. आय्. धनवडे, ए.टी. शेळके, एन. डी. सावंत, बाबू आ. शेळके इ. वक्त्यांनी बुध्द धर्मावर बोधप्रद भाषणे केली. शेवटी अध्यक्ष महाशयांनी बुध्दाची माहिती सांगून हिंदू धर्मापेक्षा बौध्द धर्म कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे हे पटवून दिले व बौध्द धर्म स्वीकारा असा आदेश देवून आपले भाषण संपविले. शेवटी सभा भ. बुध्दाच्या जयघोषात बरखास्त झाली.[३६]''

**२९) प्रबुध्द भारत** –

दलितावर झालेला अन्याय पुढील बातमीत प्रसिध्द झाला.

''अन्याय – विहीरीचे पाणी बाटविले म्हणून भर रस्त्यावर स्त्रीस मारले. मु. वाळवे (द. सातारा) श्री. शंकरराव इनामदार यांची स्वतःचे मालकीची विहीर असून विहिरीमध्ये सर्वच लोकपाणी भरतात. तसे मालकांची पाणी भरण्यास सर्वांना परवानगी दिलेली आहे. त्याप्रमाणे श्री. आण्णा कृष्णा प्रकाशे (मांग) यांची पत्नी सौ. वालु आण्णा प्रकाशे (मांग) हिने विहिरीतून पाणी ता. ४–६–५६ रोजी सकाळी आणले. हे कृत्य अतिशय वाईट केले, त्या विहीरीस मांगाने शिवले म्हणून शंकर बाळू रामोशी व आकाराम बाळू रामोशी या दोघांनी त्या बाईस घरातून बोलावून नेवून भर रस्त्यामध्ये बेदम मारले. सदर घटना पोलीस वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितली असता अजून तिची दाद लागली नाही. तरी वरील गरीबाची कल्याणकर्ते राज्यामध्ये दाद लागेल काय?[३७]''

आपला नम्र,

**आर. डी. धनवडे**

### ३०) प्रबुध्द भारत –

बौध्द धर्मप्रचार सभा झाली. त्याचा प्रबुध्द भारतातील वृत्तांत खालीलप्रमाणे–

''बौध्द धर्म प्रचार सभा– मु. वाळवे जि. द. सातारा परमपूज्य नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर मुक्कामी ता. १४–१०–५६ रोजी सुमारे ५ लक्ष जनता समवेत हिंदू धर्माचा त्याग केला व सर्वश्रेष्ठ असा बौध्द धर्माचा स्वीकार केला. या घटनेला पाठींबा देण्यासाठी ता. ३–११–५६ रोजी दलित फेडरशेनचे कार्यकर्ते श्री. आर. डी. धनवडे यांचे अध्यक्षतेखाली फार मोठी सभा पार पडली.

सभेमध्ये १. श्री. आर. सो. कांबळे (बी. ए.) २. बी. आय. धनवडे. ३. ए. टी. शेळके ४. श्री. एन. डी. सावंत (पारे), ५. श्री. बी. बी. कांबळे (दुधगावकर) ६. श्री. बी. ए. शेळके ७. श्री. एस. डी. कांबळे वगैरे वक्त्यांनी बौध्द धर्माची माहिती सांगून सर्व धर्मपेक्षा बौध्द धर्मच आपणाला कसा पोषक आहे. हे जनतेस पटवून दिले. शेवटी अध्यक्ष महाशयांनी बौध्द धर्माची सर्व तऱ्हेची माहिती सांगून बौध्द धर्म स्वीकारण्या बाबतीत स्वतः पुढाकार घेवून एक समिती स्थापन केली.[३८]''

## समारोप

मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत ह्या पाक्षिकातून आलेल्या सांगली जिल्ह्यातील बातम्या म्हणजेच सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीची पार्श्वभूमी आपणास दिसते. १९६० नंतरही दलित चळवळ मोठ्या प्रमाणात पसरली, त्याची माहिती पुढीलप्रमाणे देत आहे.

दा. म. शिर्के कोल्हापूर संस्थान व दलित प्रजा परिषद (१९३९) बाबासाहेबांच्या विषयी लिहितात ''डॉ. आंबेडकर दीर्घ विद्याव्यासंग, जाज्वल्य, स्वभिस्त व निधडे मनोधैर्य, राजकारण पटुत्व, निगर्वी स्वभाव आणि निर्व्यसनी शील इत्यादी गुणामुळे ते बहुजानांचे चहाते बनलले आहेत. त्यांच्या सारखा प्रेमळ मुनष्य फारच विरळा.

पुढे दा. म. शिर्के दलित प्रजा परिषदेस जमलेल्या दलित समाजास उद्देशून पुढील उद्‌गार काढतात, ''माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उध्दार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हेतर अशी एकवेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानाचे पुढीरी होतील.

तर निपाणीचे आमदार व बाबासाहेबांचे निष्ठावंत कार्यकर्ते व सहकारी आमदार बी.एच. वराळे एके ठिकाणी बाबासाहेबांचे वर्णन खालील प्रमाणे करतात. ''थोडक्यात व एकाच वाक्यात बाबासाहेबांचे वर्णन करावयाचे म्हणजे ते पूर्ण निर्मळ व निर्व्यसनी, दलित वर्गाचे कनवाळू पट्टीच कायदे पंडीत, उत्तम अर्थशास्त्री नामांकित विव्दान, आजन्म विद्याव्यासंगी, कळकळीचे प्रामाणिक पुढारी विख्यात ग्रंथलेखक, अस्सखलित इंग्रजी व मराठे वक्ते, बेडरवृत्तीचे टीकाकार, चतुर राजकारणी व समतेचे भोक्ते आहेत हे उघड होते. असे सर्व गुणांनी संपन्न व शिलवान पुढारी हिंदुस्थानात क्वचितच असतील असा मला विश्वास वाटतो.[३९]''

अशारितीने डॉ. बा. आंबेडकरांनी सांगली, मिरज, जत संस्थानात व अंकलखोप, पेठ, कासेगांव, इस्लामपूर इत्यादी भागात दौरा करून दलित व मागासलेल्या समाजामध्ये जनजागृती केली व स्वाभिमानाच्या ज्योतीचे स्फुलिंग पेटवले. आताच्या सांगली जिल्ह्यातील दलित नवयुवकांच्यामध्ये त्यांच्या दौऱ्यामुळे, कार्यामुळे, शिकवणीमुळे स्वाभिमान जागृत – १९६० नंतर सांगली जिल्ह्यात अनेक नेते, कार्यकर्ते, राष्ट्रीय व राज्य पातळीवर पुढारी तयार झाले आणि मागासलेल्या, दलित समाजाची प्रगती–सामाजिक राजकीय, आर्थिक, शैक्षणिक प्रगती करणेसाठी जी दलित चळवळ जोमाने सुरू केली त्याचा आढावा पुढील नंतरच्या प्रकरणात सविस्तर केला आहे.

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगली जिल्ह्यात चळवळीच्या माध्यमातून संपर्क वाढवला. कार्यकर्ते तयार केले. याशिवाय सांगली संस्थानाने सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीला व दलित बांधवांना सवलतीच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक यांच्या विकास प्रवाहात आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २ नोव्हेंबर १९४१ रोजी मिरजेला भेट दिली आणि महारवतनी जमीन संदर्भात त्यांनी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले व दलित बांधवांसमोर प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. मूकनायक, बहिष्कृत भारत, जाहीर सभा,

जनता, प्रबुध्द भारत आदी वर्तमानपत्रे व नियतकालिकांच्या माध्यमातून दलित चळवळीला योग्य दिशा देण्याचे काम केले. १९६० नंतर सांगली जिल्ह्यात अनेक युवक नेते, कार्यकर्ते, राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनेक पुढारी तयार झाले. खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाची प्रगती, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक तसेच सांस्कृतिक घडवून आणली. यादृष्टीने दलित चळवळीने केलेल्या कार्याचे हे फलित आहे.

## प्रकरण संदर्भ –


१) सहस्त्रबुध्दे गंगाधर निळकंठ (संपा), जनता अंक, ६ जानेवारी १९४०, अंक ४५, पृष्ठ १.

२) फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङमय (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई) चौथी आवृत्ती, १४ एप्रिल १९९१, पृष्ठ ३०.

३) कित्ता

३ अ) कोल्हापूर संस्थानाचा प्रशासकीय अहवाल, १९१९–२०, पृ. २–३

४ पॉलिटिकल विभागीय फाईल नं. २३३–४६ (१९४८) सी. के. देसाई विभागीय आयुक्त, कोल्हापूर व दलित संस्थान यांचा दि. १२ फेब्रुवारी १९४८, हुकूम, पृ. ७५.

५ पॉलिटिक विभाग फाईल नं. २३२५/४६ (१९४८), १३ मार्च १९४८ चा एम. डी. भट, मुख्य सचिव, मुंबई सरकार यांचा दिनांक १३ मार्च १९४८ आदेश पृ. २६३.

६) उदगावकर मेघना दीपक, सांगली संस्थानचा राजकीय, आर्थिक, सामाजिक इतिहास, (१८८० ते १९४८) प्रकाशक प्रा. डॉ. मेघना दीपक उदगावकर, आद्यश्री अपार्टमेंट, गावभाग, सांगली. पृ. १६१

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन २००२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग २, १९३७–१९४५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८,भाग २, पृष्ठ २८७ ते २९०.

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन २००२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग २, १९३७–१९४५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८,भाग २, पृष्ठ १३८–१३९.

९) गरुड, मिरज महार सत्याग्रह खास अंक, वर्ष १६ वे, ता. १ जानेवारी १९४२, पृष्ठ. ३–४

१०) कित्ता

११) मून वसंत, (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेकरांचे बहिष्कृत भारत, (१९२७–१९२९) आणि मूकनायक (१९२०), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, १९९०. मूकनायक, १४–२–१९२०, अंक २, पा नं. ३५०,(१)

१२) मून वसंत, (संपा.) :, डॉ. बाबासाहेब आंबेकरांचे बहिष्कृत भारत, (१९२७–१९२९) आणि मूकनायक (१९२०), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, १९९०. बहिष्कृत भारत, ४–११–१९२७, अंक १४, १५, १६, पान नं. १२२ (१२)

१३) बहिष्कृत भारत, २५–११–१९२७, अंक १७, १८, पान नं. १३४ (८)

१४) बहिष्कृत भारत, २१–१२–१९२८, अंक ३ रा, पान नं. २०५(३)

१५) बहिष्कृत भारत, २३–१२–१९२८, अंक १९–२०–२१ पान नं. १५५ (१५)(१६)

१६) गायकवाड प्रदीप (संपा.) : जनता, वर्ष २ रे, ३१ ऑक्टो. १९३१ ते ३ डिसेंबर १९३२, (अंक १ ते ४८), द्वितीय आवृत्ती, दीक्षा भूमी संतोष, समता प्रकाशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल लष्करी बाग, नागपूर ४४००१७, २०११. जनता, ३१ ऑक्टोबर १९३१, अंक ११, पान ३२ (६)

१७) कित्ता

१८) गायकवाड प्रदीप (संपा.) : जनता, वर्ष २ रे, ३१ ऑक्टो. १९३१ ते ३ डिसेंबर १९३२, (अंक १ ते ४८), द्वितीय आवृत्ती, दीक्षा भूमी संतोष, समता प्रकाशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल लष्करी बाग, नागपूर, ४४००१७, २०११,. २८ नोव्हें. १९३१, अंक ४ था, पान नं. ५६(६)

१९) जनता, २६ डिसेंबर १९३१ अंक ८ पान ८५(७)

२०) जनता, २३ जाने. १९३२ अंक ११ पान नं. १०५ (३)

२१) जनता, ६ फेब्रुवारी १९३२, अंक १३ पान नं. १२६ (८)

२२) कित्ता

२३) कित्ता

२४) कित्ता

२५) जनता, १३ फेब्रुवारी १९३२, अंक़ १४, पानं. १३२(६)

२६) जनता, २ एप्रिल १९३२, अंक १९, पान नं. १७७(३)

२७) कित्ता

२८) कित्ता

२९) कित्ता

३०) जनता, ३० एप्रिल १९३२, अंक २४, पान नं. २१३(७)

३१) जनता, २५ जून १९३२, अंक २८, पान नं. २४१(३)

३२) जनता, १६ जुलै १९३२, अंक २९, पान नं. २५१(५)

३३) जनता, २३ जुलै १९३२, अंक ३०, पान नं. २५७ (३)

३४) जनता, ६ जानेवारी १९३२, अंक ४५, पान नं. ६

३५) कित्ता

३६) प्रबुध्द भारत, दि. १६-६-१९५६, अंक १७, पानं नं. ७

३७) कित्ता

३८) प्रबुध्द भारत, दि. २३-६-१९५६, अंक १८, पान नं. ७

३९) प्रबुध्द भारत, दि. १७ नोव्हें. १९५६, अंक ३७ वा पान नं. ६

**प्रकरण तिसरे**

# दलित चळवळ १९६०-ते २०००

सदर प्रकरणात सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीने १९६० ते २००० या कालखंडात कशा प्रकारे कार्य केले आणि दलितांच्या कोणकोणत्या समस्या शासनापुढे व समाजापुढे मांडल्या, याची सविस्तर माहिती दिली आहे. या प्रकरणाचा प्रमुख माहिती स्त्रोत म्हणजे समकालीन वर्तमानपत्रात आलेली दलित चळवळीसंबंधीची वर्तमानपत्रे होत. सुदैवाने 'सत्यवादी' वृत्तपत्रात 'सांगली विभाग' या सदराखाली प्रकाशित झालेली दलितांची स्थिती, त्यांच्यावर झालेले अन्याय, त्याविरोधी दलित चळवळीने वेळोवेळी काढलेले मोर्चे, घेतलेल्या निषेधाच्या सभा इ. घटकावर प्रकाश टाकलेला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांचे दैवत व प्रेरणास्थान होते व आजही आहे. काही वार्तापत्रे डॉ. बाबासाहेबांच्या सांगलीत व जिल्ह्यात जयंतीसंबंधी त्यांच्या स्मारक (पुतळा) उभा करणेसंबंधी आहेत. त्यामुळे दलित समाजाला प्रेरणा मिळत राहते. याचा उहापोह या प्रकरणात केला आहे. आज इतिहासलेखन शास्त्राप्रमाणे इतर साधनांप्रमाणे, वर्तमानपत्रातील वार्तापत्रे समकालीन साधन असल्याने या ठिकाणी देत आहे. सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीचा इतिहास व मागोवा घेणेस ह्या बातम्या अतिशय महत्त्वपूर्ण आहेत.

## १) सत्यवादीकार बाळासाहेब पाटील जीवन व कार्य -

दैनिक सत्यवादीचे संपादक बाळासाहेब पाटील हे सांगली शहरापासून पश्चिमेला सहा मैलावर असणाऱ्या जयसिंगपूर जवळील कोथळी गावचे रहिवाशी होते. त्यांचा सांगली, मिरजेशी अतिशय जवळचा संपर्क होता. १९२७ ला त्यांनी सत्यवादी हे दैनिक कोल्हापुरातून प्रकाशित करण्यास सुरुवात केली. आजही सत्यवादी कोल्हापुरातून प्रकाशित होतो.

सत्यवादी जरी कोल्हापुरातून प्रकाशित होत असला तरी त्या वर्तमानपत्रात पहिल्यापासून ''सांगली विभाग'' नावाने एक वार्तापत्र येत होते आणि त्या सांगली विभागात सांगली जिल्ह्यातील बातम्या मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत होत्या.

संपादक बाळासाहेब पाटील हे सांगली कोल्हापूर भागातील एक समाज सुधारक म्हणून प्रसिध्द होते. तसेच त्यांचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जवळचा संबंध व पत्र व्यवहार होता. जाती व्यवस्था निर्मूलनासाठी त्यांनी प्रत्यक्ष कोल्हापूर सांगली भागात बाबासाहेबांच्याबरोबर सभा व सहभोजन कार्यक्रम घडवून आणले होते. त्यामुळे ते पुरोगामी विचाराचे असल्याने सांगली जिल्ह्यातील होणाऱ्या दलितांच्या अन्यायाला त्यांनी आपल्या सत्यवादी पत्रातून वाचा फोडलेली आहे व प्रसिध्दीही आपल्या वर्तमानपत्रात दिली आहे. संपादक बाळासाहेब पाटील हे पुरोगामी विचारांचे असल्यामुळे सांगली हे पटवर्धनांचे संस्थान असल्याने सुरुवातीच्या काळात प्रगिामी विचाराचे होते. त्यामुळे सत्यवादीत जशा सविस्तर बातम्या प्रकाशित झाल्या तशा इतर वर्तमानपत्रात दिसल्या नाहीत.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे १९२७ पासून ते आज अखेर सत्यवादीच्या सर्व फाईल्स अतिशय सुव्यवस्थित त्यांच्या वारसांनी (मुलांनी) जतन करून कोल्हापूरमधील सत्यवादी भवनमध्ये ठेवल्या आहेत. त्या फाईल्सचा अभ्यास मी तेथे जावून एक वर्ष केलेला आहे. म्हणून मी त्यांच्या सत्यवादीतील बातम्यांचा उपयोग माहिती जास्तीत जास्त मिळाल्याने माझ्या प्रबंधामध्ये केलेला आहे. तसेच इतर वर्तमानपत्रांच्या फायलीही मी अभ्यासल्या परंतु त्यात माझ्या विषयाची काही माहिती मिळाली नाही किंबहुना अत्यल्प अशी माहिती होती (कृपया इकडे लक्ष द्यावे).

१९६० ला महाराष्ट्रात नवीन सांगली जिल्ह्याची निर्मिती झाली. आज सांगली जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रागतिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. सांगली जिल्ह्याचा पश्चिम भाग कृष्णा, वारणा नदीमुळे सुजलाम आहे. तर पूर्वेकडील जत, कवठेमहांकाळ, खानापूर हे भाग कायमपणे दुष्काळी म्हणून प्रसिध्द आहेत. सहकार शिक्षण, औद्योगिक राजकीय क्षेत्रात सांगली जिल्ह्याचा वरचा नंबर लागतो. तरी पण १९६० पूर्वी जसा दलित मागासलेला समाज होता त्याच्यामध्ये फारशी प्रगती झालेली नव्हती. १९६० नंतर सुध्दा भारताच्या व

महाराष्ट्राच्या इतर भागात जसा दलित चळवळीने संघर्ष केला व आपले हक्क अधिकार मिळवून घेतले त्याप्रमाणेच सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ दलित कार्यकर्त्यांनी फार मोठ्या जोमाने व ताकतीने १९६० नंतर चळवळ सुरू केलेली दिसते. त्या दलित चळवळीचा वृत्तांत त्या काळच्या समकालीन वृतपत्रात उदा. दै. सत्यवादी, पुढारी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, तरूण भारत दै. सम्राट यामध्ये प्रसिध्द झालेला आहे. त्यावरून सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीचा इतिहासच एक प्रकारे आपल्या नजरेसमोर दिसतो. ह्या वृत्तांताचा अभ्यास करत असताना नवीन दलित नेते व त्यांनी केलेले दलित चळवळीतील योगदान यावर नवीन प्रकाश पडतो. म्हणून या चळवळीचा १९६० ते २००० पर्यंतचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे देता येईल. त्या पुढीलप्रमाणे–

**प्रमुख घटनांचा आढावा –**

**अ) अत्याचारविरोधी लढा**

**१. नव बौध्दांचा मोर्चा :–**

१४ डिसेंबर १९५६ साली नागपूरला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायासह बौध्द धर्म स्वीकारला. त्यावेळी व नंतर सांगली जिल्ह्यातील दलित युवकांनी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. त्यांनी नवबौध्दास सवलतीसाठी सांगलीत मोर्चा काढला व वेळोवेळी सरकारकडे अर्ज केले. दलित वर्गीयाप्रमाणे सवलती, मिळाव्यात म्हणून महाराष्ट्र प्रशासन, मुख्यमंत्री इतरांना अर्ज, मोर्चाद्वारे सादर केले, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

''भारतीय रिपब्लिकन पार्टीच्या वतीने संघटित केलेला नव बौध्दांचा एक प्रचंड मोर्चा आज कौन्सिल हॉलवर गेला होता. हा मोर्चा पोलिसांनी अडविल्यावर त्यांच्या प्रतिनिधींनी रिपब्लिकन आमदारामार्फत विधान सभेचे सभापति, विधान परिषदेचे अध्यक्ष व मुख्य मंत्र्यांना अर्ज सादर केले. दलित वर्गियांना दिलेल्या खास

सवलती नव बौध्दांनाही द्याव्यात अशी मागणी या अर्जाव्दारे करण्यात आली आहे. राज्यपालांनाही अर्ज सादर करण्यात आला.[१]''

**२) रिपब्लिकन कार्यकर्ते श्री. पी. टी. मधाळे यांचेवर हल्ला –**

माजी आमदार पी. टी. मधाळे यांच्यावर झालेला चाकूहल्ला संबंधी बातमी वर्तमानपत्रात पुढीलप्रमाणे आली– एका दलित चळवळीच्या नेत्यावर झालेल्या हल्ल्याने दलित समाज पेटून उठला व नंतर मोर्चे काढून ह्या घटनेचा निषेध केला, त्याचा वृत्तांत–

''**चाकूने वार झाल्याने जखमी –** माजी आमदार सांगली जि.प. सदस्य व रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते श्री. पी. टी. मधाळे यांचेवर शिगांव येथे चाकू हल्ला झाल्याने त्यांच्या डोकीवर बराच मार लागला असून त्यांना सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे.

श्री. मधाळे हॉटेलमधून बाहेर पडत असताना हा हल्ला झाला. ता. १ ऑगस्ट रोजी हा प्रकार घडला.[२]''

**अ) जातीभेद नष्ट करण्यावर खासदार भाऊराव गायकवाड यांचा जळजळीत लेख –**

खासदार भाऊराव गायकवाड (नाशिक) हे डॉ. आंबेडकरांचे सच्चे अनुयायी व रिपब्लिकन नेते होते. त्यांनी जातीभेद नष्ट करण्यासंबंधी एक लेख व व्याख्यान सांगलीत दिले. ते सविस्तर सत्यवादीमध्ये प्रसिध्द झाले. दलित चळवळीत प्रेरणादायी असे त्यांचे विचार होते, तो लेख पुढीलप्रमाणे–

''सत्यवादीने ता. २–९–१९६८ च्या अंकात जातीभेद नष्ट करण्याची जरूरी हिरीरीने प्रतिपादन केलेली होती. त्यावर अनेक विचारवतांनी आपली मते आम्हाला कळविली आहेत. दलितांचे उध्दारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उजवे हात भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष नाशिकचे खासदार भाऊराव उर्फ दादासाहेब गायकवाड यांनी या विषयावरील आपले जळजळीत विचार या लेखात व्यक्त केले.

भारतात जातीभेदाच्या रोगाने लोकांना पछाडलेले आहे. त्या बाबींचा विचार करता जातीभेद पाळणे हे एक धार्मिक अंग समजून ती मानतात असे प्रतिपादन करतात. काहीजण म्हणतात की, जातीभेद शतकानूशतके चालत आलेली रूढी असल्याने ती एकदम नष्ट होणार नाही.

याबाबत फार मागे आपण न गेलो तरी या महाराष्ट्रात लो. टिळक व आगरकर होवून गेलेत. टिळक म्हणतात की, राजकीय सता हातात आली तर जातीभेद निर्मुलन करण्याचे कार्य चुटकी सरशी होईल म्हणून आपण सर्वांनी राजकीय सत्ता प्रथम हस्तगत करण्याची चळवळ केली पाहिजे. या उलट आगरकर म्हणतात की, जातीभेद नष्ट करण्याची मोहिम म्हणावी तितकी सोपी नाही. एकवेळ राजकीय सत्ता मिळविणे सहज सुलभ आहे. पण जातीभेद नष्ट करण्याचे कार्य फार महाकठीण आहे. आतापर्यंत शेकडो समाज सुधारकांची फटफजिती बहाल करून देशातील धर्ममार्तंडांनी त्यांना जगणे मुश्कील केलेले होते. तेव्हा असा हा जातीभेद नष्ट करण्याचा अवघड प्रश्न आपण प्रथम स्वराज्या अगोदर सोडवला नाही तर स्वराज्य मिळाल्यानंतर आपण हे सहज सुलभतेने करू या म्हणण्यात अर्थ नाही.

याबाबत वृतपत्रातून अनुकूल प्रतिकूल आलेले यावेळचे वर्तमान पत्रातील लेख साक्ष देतील. जातीभेदाचे पाठपुरावे करणारे आधार धर्मग्रंथात सुध्दा नाहीत असे काही पंडीत म्हणतात. मग आता असा प्रश्न उद्‌भवतो की, हा जातीभेद आहे तरी काय ? की ज्याच्यामुळे त्याच्या निर्मूलनासाठी अनेक लोकांनी अनेक तऱ्हेने प्रयत्न केले तरी त्याचा बालवाकडा झाला नाही. माझ्या मते जातीभेद मानणाऱ्या लोकांची ही एक लहर आहे, वेड आहे. याबाबतीत माझा स्वतःचा अनुभव मी आपणास सांगतो. प्रवासात अनेक प्रसंगी मोठ मोठया महामहिमापासून तो सर्वसाधारण स्पृश्य मानलेल्या माणसाबरोबर संबंध आला.

प्रवासात अगर बोलण्यात असे काहीही त्यांना आढळले नाही. पण एकदा एक सनातनी मी नागपूरहून येताना त्याच गाडीत बसलो. तो माझ्याच तालुक्यातील होता. बराच वेळ चर्चा करीत आल्यानंतर अत्यंत आदराने वागवून बोलताना बहूबालार्थी भाषा वापरत होता. चर्चेनंतर आपण कुठले? कोणाचे म्हणून चौकशीला सुरवात झाली. त्यात मी माझे गाव नाव सांगितल्या नंतर मी कोणत्या जातीचा विचारण्यात आले. म्हणून मी

‘महार’ म्हणताच सर्प पाहिल्यानंतर माणूस जसा बिचकतो तसा बिचकून तुझ्या बापाचे नाव काय? वगैरे उर्मट शब्दात बोलणे सुरू केले. मी त्यांना सांगितले, महाशय आता पर्यंत बोलताना आपली जीभ लोण्याहून मऊ होती. ती एकाएकी वाताचा झटका आल्यासारखा अशी ताठ का झाली? असे एकदम अऱ्याकाऱ्यावर येवून का बोलू लागला? सदर इसम चिडला व तुम्हा म्हारड्याच्या आम्ही काय गळ्यात मिठ्या माराव्यात? वगैरे अतर्क शब्द बरळू लागला. अर्थात आम्ही पहिले बोलत असताना एकमेकांच्या भांड्यात पाणी प्यायलो होतो. ही गोष्ट त्याला बोचली असावी. सांगण्याचे तात्पर्य असे की, सदर माणसाच्या मेंदूत मी अमक्या जातीचा आहे. हे कळल्यानंतर शांत असलेला अस्पृश्यतेची वळवळ करू लागला असे दिसले. तव्दतच जोपर्यंत माणूस अमक्या जातीचा आहे. हे कळत नाही तोपर्यंत जातीभेद मानणारे लोक शांत राहतात. परंतु ज्या क्षणाला अमक्या तमक्या जातीचा आहे हे कळते, त्यावेळेस त्यांच्या मेंदूतील किडा वळवळतो व वर सांगितल्याप्रमाणे वेडे चाळे करण्यास भाग पाडतो.

ज्या ज्या ठिकाणी जे. जे. लोक एकमेकांच्या जाती ओळखतात तेथेच हा जातीभेद मानला जातो. अन्यत्र तो मानला जात नाही. गुजरातचे अस्पृश्य मानलेल्या जातीचे यात्रेकरू कोणत्याही भागात गुजरात सोडून गेले तर बडव्याच्या नामावलीत यात्रेकरूची नावे आढळतील. लाखो अस्पृश्य मानलेले पुरमेये उतर प्रदेश सोडून मुंबईला येवून सर्रास दुधाचा धंदा करताना चालतील. हजारो अस्पृश्य मानलेले पंजाबी सरदार भारतभर राजरोसपणे सर्वात मिसळतील. एवढेच नव्हे तर रोटीबेटी व्यवहार ही करतील अशी या संबंध देशाची परिस्थिती आहे. म्हणजेच या बाबतीत स्पृश्य मानलेल्या लोकांना अस्पृश्य म्हणून ओळखण्याचे अगर जाणण्याचे कोणतेही नैसर्गिक साधन नाही.

जाती प्रांत परत्वे आणि विशेषतः खेडी विचारात घेतली तर तेथील लोकांना या भागातील लोकाकडून अस्पृश्य म्हणून मानले जाते. या नियमाची निकड अगर महत्व यामुळे की, हे सर्वलोक (स्पृश्य व अस्पृश्य ) आपआपल्या भागात राहतात. तो सोडण्यास ते तयात नसतात. आणि त्यामुळे देशात त्या त्या भागातील लोक आपल्या लहरीप्रमाणे त्यांना अस्पृश्य मानतात. त्यामुळे त्यांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय या सर्वच क्षेत्रात कोंडमारा झालेला दिसतो. या तऱ्हेने अस्पृश्यता निवारण्याचे सरकारी प्रयत्न तुंटपुंजे ठरलेले आहेत.’’

**ब) हरघडी जुलूम –**

१९५५ साली सरकारने अस्पृश्यता निवारण कायदा पास केला. तरी देशात महाराष्ट्रात व सांगली जिल्ह्यात हरिजन व दलित वर्गावर वेळोवेळी अत्याचार होत होते, त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे बातमीत दिले आहे.

''आपल्या देशातून अस्पृश्यता निवारण झाली आहे. असे भारतीय घटनेने जाहीर केले. त्या तऱ्हेने सरकारने १९५५ साली अस्पृश्यता निवारण कायदा पास केला. परंतु अंमलबजावणी मात्र ताज्य असल्याचे दिसून आले आहे. कारण जी अवलाद जातीभेद मानते त्याच अवलादीचे अंमलबजावणी अधिकारी असल्याने ते त्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करू इच्छित नाहीत. दुसरे असे की, स्वराज्य आल्यानंतर लोकप्रतिनिधीच्या हातात सत्ता बाकी आहे. हे लोकप्रतिनिधी उठल्या सुटल्या आपल्या मतदारांना खुश करण्यासाठी व पुढच्या अंमलबजावणीत हस्तक्षेप करीत आहेत. जरी अनेकांना स्वराज्य आल्या नंतर देशाचा कारभार सुधारावा असे वाटत असले तरी अल्पसंख्य असाह्य दरिद्री अशा अस्पृश्य मानलेल्या लोकांना हा कारभार मोगलाईच्या कारभाराची आठवण करून देतो. देशभर या लोकावर विविध जुलूम, वस्त्यांची जाळपोळ बायकांना नग्ग करून मिरवणूक काढणे, वस्त्या लुटणे, शेतातील उभे पिके गुरे घालून नष्ट करणे, लग्नाच्या मिरवणुकी रस्त्याने जावू न देणे व अन्य जुलूम हरघडी चालू आहेत. याबाबत अधिकारी वर्ग बेफिकीर आहे. त्याची कारणे वर नमूद केलेली आहेत.

अशा अवस्थेत या वर्गाना जीवन कंठावे लागत आहे. अस्पृश्यतेची रूढी अनिष्ठ असल्याने तिला परंपरा लावता येत नाही. पण अनेक उंटावरचे शहाणे ही फार काळाची रूढी असल्याने तिच्या विच्छेदनास बराच काळ लागेल असा बेजबाबदार युक्तीवाद करताना दिसतात. काही तर असेही म्हणतात की, हा आमच्या भावनेचा प्रश्न आहे. जणूकाही भावनेचा ज्या वेळेस लिलाव झाला त्यावेळेस या मंडळीनींच त्याची ठेकेदारी घेतली होती. भावना अभयपक्षी असतात. म्हणून उभयपक्षी त्याचा विचार होणे जरूर आहे.''

### क) भर चौकात फटके मारले पाहिजेत –

दलित समाजावर होणारे अन्याय, कायद्याने कमी होत नाहीत तर अन्याय करणाऱ्या सवर्ण गुंडास भर चौकात फटके मारले पाहिजेत असा निर्वाणीचा सल्ला पत्रकात दिला, तो पुढीलप्रमाणे –

''मतपरिवर्तनानेच हा प्रश्न सुटेल असा बऱ्याच जणांचा समज दिसतो, परंतु हा प्रश्न मत परिवर्तनाने सुटणार नाही कारण ज्याचे मतपरिवर्तन करावयाचे तेच हा विचार आपल्या घरात शिरू नये म्हणून खिडक्या दारे बंद करून बसलेले आहेत. सरकारने हा प्रश्न मतपरिवर्तनावर सोडवू नये. बऱ्याच विचाराअंती मी तर या थराला आलो आहे की, असे करणारा जो तो आढळेल त्याला भर चौकात फटक्याची सजा दिली पाहिजे. जो तो अधिकारी या कामात पक्षपाताने वागेल आणि आपले काम करण्यास अंग चुकारपणा करील त्याला बडतर्फ ही सजा दिली पाहिजे. जे जे कोणी धर्ममार्तंड जातीभेदाच्या रूढीला प्रोत्साहन देतील अगर पुरस्कार करतील त्यांच्यावर दया माया न दाखवता त्यांच्या वर्तनाचा कडक विचार केला पाहिजे.

लोकशाहीच्या बुरख्याखाली नांदत असलेल्या आजच्या राजवटीत या गोष्टी होतील असे वाटत नाही त्यासाठी देशातील विचारवंतांनी व ज्यांना जातीभेदाचे चटके बसले आहेत अशा लोकांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरूध्द बंद पुकारावयास हवा. गोडी गुलाबीने किंवा दयेचा हात पसरून हा प्रश्न सुटणार नाही तर त्यासाठी बंडच हवे.''

### ड) हरिजनांची सहनशीलता संपल्याचा इशारा –

अनेक वर्षे हरिजन, नवबौध्द व मागासलेल्या जमातीच्या मागण्या मान्य होत नाहीत. अन्याय सहन करण्याची दलितांची सहनशीलता संपली, त्यांचा उद्रेक होईल, असा इशारा दलित चळवळीने दिलेला दिसतो, तो खालीलप्रमाणे–

''हरिजन, नवबौध्द व इतर मागासवर्गीय जमातीच्या मागण्या येत्या आंबेडकर जयंती म्हणजे १४ एप्रिल पर्यंत भारत सरकारने मान्य केल्या नाहीत तर त्या दिवसापासून देशव्यापी आंदोलन चालू करण्यात येईल

असा इशारा भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी नुकताच दिला आहे. औरंगाबाद नजीक बिऊर येथे भाषण करताना मागण्यांचा त्यांनी पुन्नरउच्चार केला आणि ''आमची सहनशीलता आता संपली आहे.'' असे निक्षून बजावले. देशातील दलित समाजाला सर्वक्षेत्रात समान हक्क व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. हा या सर्व मागण्यांचा आत्मा आहे. निरनिराळ्या राज्यात हरिजनावर वाढत्या प्रमाणावर होत असलेल्या अत्याचाराचा उल्लेख करून कर्मवीर गायकवाड यांनी हा गंभीर इशारा दिला आहे. हरिजन, मुसलमान, ख्रिश्चन आदि समाजांना गोवर्धन पीठाच्या शंकराचार्यानी कुत्र्या मांजरा प्रमाणे लेखण्याचा प्रकार उघडकीस आल्याने दलित वर्गासह एकंदर बहुजन समाजात त्याची तीव्र प्रतिक्रिया सुरू झाली आहे. तशात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरूजी यांची जी मुलाखत नवाकाळमध्ये प्रसिध्द झाली आहे त्यामुळे ही प्रतिक्रिया आणखी तद्रातर होत आहे. हिंदू समाजातील चातुर्वर्ण्य व अस्पृश्यता याबद्दलची गोळवलकरांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते इतके घातक आहेत की, त्याचा काय परिणाम होईल याची त्यांनाही कल्पना आलेली नसेल. त्याच्या या विषारी विचाराला जळजळीत निषेध पुण्यात भरलेल्या जाहीर सभेत झालाच आहे. चातुर्वर्ण्य हे मनुस्मृतिप्रमाणे ईश्वरनिर्मित आहे. आपापल्या जन्मा प्रमाणे प्रत्येकाने कामे करण्याची जबाबदारी ईश्वरानेच टाकली आहे. म्हणून फळाची आशा न धरता कर्म करीत रहावे. अस्पृश्यता निवारण करणे अवघड नाही. हिंदूधर्माप्रमाणे त्याचे शुध्दीकरण केले की, झाले.'' असे विचार श्री. गोळवलकर यांनी या मुलाखतीत व्यक्त केले आहेत. हिंदूसमाजातील जातीपातीचे उच्चाटन करण्याची वेळ केव्हाच आलेली असताना त्या कायम स्वरूपात टिकाव्या असे अट्टाहासाने म्हणणारे काही धर्म मार्तंड आहेत, याची आम्हास जाणीव आहे. त्याचा आम्ही वेळोवेळी समाचार घेत असतोच पण आर.एस. एस. या हिंदूच्या देशभर पसरलेल्या शिस्तबध्द निमलष्करी संघटनेचे प्रमुख असलेने श्री. गोळवलकर यांनी हे विचार इतक्या स्पष्टपणे मांडले यांचा आम्हाला धक्काच बसला. हिंदूचे सांस्कृतिक पुनरूरत्थान आणि हिंदू राष्ट्रवाद यांचे प्रतिपादन करणारी ही संघटना कोणत्या दिशने जात आहे. याचे त्यामुळे कसलाही आडपडदा न ठेवता दर्शन घडले आहे. आर. एस. एस. वर संकुचित जातीयवादाचा जे आरोप करतात याचीच बाजू श्री. गोळवलकर यांनी आता पुराव्यानिशी बळकट केली आहे. एकपटीने हा आडपडदा नाहिसा झाला हे बरेच झाले

कारण त्यामुळे निव्वळ एक सांस्कृतिक संघटना आहे अशी ज्याची समजूत करून देण्यात आली होती त्याचे डोळे उघडणार आहेत. कर्मवीर दादासाहेब गायकवाड दलित समाजाच्या सहनशीलतेची मर्यादा संपली असल्याची व सामाजिक बंडाची भाषा करीत आहेत. ती त्यांची भाषा किती योग्य आहे यांचे सम्यक दर्शन श्री. गोळवलकरांच्या विचारांनी झाली आहे. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली याचे आकलन ज्यांना झाले नव्हते. त्यांना आता सामाजिक अन्यायाच्या व विषमतेच्या भयानकतेची स्पष्ट जाणीव होईल. चातुर्वण्य हे ईश्वरनिर्मित आहेत आणि ही एक प्रकारची सहकारी व्यवस्थाच आहे. या श्री गोळवलकरांच्या विधानावर पुण्याच्या सभेत कडाडून हल्ला चढविण्यात आला. हरिजनांचे एक प्रमुख विचारवंत नेते ॲड. शंकरराव खरात 'गोळवलकरांना आपल्या ब्राम्हण्याचा डंका पुन्हा पेटवलेला आहे.' असे जळजळीत उद्‌गार काढले. प्रा. बापट तर म्हणाले की, फळाची आशा न करता कर्म करीत रहावे असे गोळवलकर म्हणतात. म्हणजे त्यांनी बुंदीचे लाडू खावे आणि त्याचा जो सकाळी मैला होईल तो हरिजनांनी डोक्यावरून वहावयाचा आहे. तसेच श्री. गोळवलकर म्हणतात त्याप्रमाणे अस्पृश्यांना अगदी साध्या विधिने शुध्द करून घेतले तरी त्यातही त्यांचा स्वयंभू श्रेष्ठत्वाचा अहंकार आहेच. त्यांचे हे सर्वच विचार कोणत्याही निकषाने पाहिले तरी अत्यंत राष्ट्रघातकी टाकाऊ व विषारी आहेत. भारताच्या जाती धर्मातील राज्याच्या व लोकशाहीच्या दृष्टीने तर ते देशद्रोहीपणाचेच ठरतात. पण ज्या अर्थी त्यांनी ते बोलून दाखविले आहेत त्या अर्थी फ्यॉसिस्ट संघटनेच्या जोरावर ते लोकावर लादण्याचा ही त्यांचा हेतू असावा असे दिसते. देशांतर्गत फाटाफुटीला आणि चालू झगड्यांना त्यामुळे खतपाणीच मिळणार आहे. तथाकथित उच्चवर्णियांचे अंतरंग इतके उघड झाल्यावर त्यांच्या वर्चस्वाखाली हजारो वर्षे पिचत राहिलेल्या दलितवर्ग आणि इतर बहूजन वर्ग समाज स्वस्त राहणार नाही. हाच गंभीर इशारा कर्मवीर गायकवाड यांनी आणि पुण्याच्या सभेतील वक्त्यांनी दिला आहे. त्यांची सर्व जबाबदारी श्री. गोळवलकर त्यांची संघटना आणि त्यांचे पाठीराखे यांच्यावरच राहिलं. कालचक्र जातीधर्मातीत लोकशाहीच्या व विज्ञानाच्या दिशेने जोराने फिरत आहे. ते उलटे करण्याची किंवा थांबविण्याची शक्ती आता कोणातच राहिली नाही. कारण राष्ट्रपुरूष आता जागा झाला आहे.[3]''

**५) हरिजनास मारहाण –**

मिरज, तानंग गावात पिण्याच्या पाण्यावरून एका हरिजनास मारहाण केली. त्यावरून शासनाने कितीही प्रयत्न केले तरी काही ठिकाणी जाती व्यवस्था हरिजनांना सवलती देण्यास नकार देत होती, हे या बातमीवरून लक्षात येते.

''तानंग (ता. मिरज) येथील पिण्याच्या पाण्याच्या हौदास का स्पर्श केलास अशी विचारणा करून हणमंत तुकाराम मोहिते यास चप्पल व लाथाबुक्क्यांनी मारहाण होण्याचा प्रकार घडला. या मारहाणीचा आरोप बजरंग ज्ञानू व लक्ष्मण दादू चौगुले यांच्यावर असून अधिक तपासासाठी मिरज फौजदार श्री. अष्टेकर सदर गावी रवाना झाले आहेत.[४]''

**ब) पुतळा व स्मारकासंबंधी वार्ता**

**१) डॉ. आंबेडकर पुतळा –**

दलितांचे दैवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर! या महापुरुषामुळे भारतातील सर्व दलित मागासलेल्या समाजाला मानवतेची वागणूक मिळू लागली. त्यांचे स्मरण व प्रेरणास्थान निर्माण करण्यासाठी सांगलीत पुतळा उभा करणेची बातमी पुढीलप्रमाणे –

''डॉ. आंबेडकर पुतळा समिती तर्फे येथील डॉ. बापट विद्यार्थी वसतिगृहाच्या आवारात के. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात येणार असून त्याचा अनावरण समारंभ भाई माधवराव बागल यांच्या हस्ते ता. १४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता होणार आहे. तत्पूर्वी सकाळी मिरवणूक, पूजाविधी डॉ. मा. प. मगुंडकर पुणे यांचे भाषण वगैरे इतर कार्यक्रम होणार आहेत.[५]''

### २) सांगलीत शाहू महाराजांच्या पुतळ्यास चालना –

राजर्षि शाहू महाराज हे दलितांचे कैवारी. थोर क्रांतीकारी, समाज सुधारक डॉ. आंबेडकरांना शिक्षणासाठी मूकनायक पत्रासाठी आर्थिक मदत १९२० ला माणगाव परिषदेत डॉ. आंबेडकरांचा भव्य सत्कार केला. त्यामुळे भारतातील सर्व दलित समाज त्यांना आपला उध्दारकर्ता मानत होते. सांगली त्याला अपवाद नव्हती.

भारतात अनेक ठिकाणी त्यांचे पुतळे उभे केले. सांगलीतही शाहूंचा पुतळा उभा करणे दलित नेत्यांनी चालना दिली. त्याची बातमी–

''सांगली ता. २२ – सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांनी बहुजन समाजाचे शिल्पकार राजर्षी छ. शाहू महाराज यांचा एक पुतळा सांगलीत उभारण्यात यावा या त्याच्या पुढाकार सांगलीचे थोर कायदेपंडित ॲड. केशवराव चौगुले यांनी घ्यावा असे सुचित करणारा संपादकीय लेख ता. १२ डिसेंबरच्या अंकात लिहला होता. सत्यवादीकरांची ही तळमळ लक्षात घेऊन श्री. केशवराव चौगुले यांनी सांगलीत हा पुतळा उभा करण्यासाठी पुढाकार घेतला असून त्याला सांगली जिल्ह्याचे प्रसिध्द नेते पद्मभूषण वसंतराव दादा पाटील यांनी सक्रिय पाठिंबा दर्शविला आहे. ता. २८ डिसे. रोजी मुंबईहून श्री. चौगुले यांनी लिहिलेल्या पत्रात पद्मभूषण वसंतराव दादा पाटील म्हणतात, ''राजर्षि छ. शाहू महाराज यांचा सांगलीत पुतळा उभारणीच्या आपण हाती घेतलेल्या कार्यास धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. आपण हाती घेतलेल्या कार्याच्या पूर्ततेच्या दृष्टीने वाटचाल करावी. आवश्यक तेथे मी आपल्याबरोबरच आहे.'' पद्मभूषण वसंतरावदादा यांच्या पत्रामुळे या पुतळा उभारणीच्या कार्यास जोरदार चालना मिळाली आहे.[६]''

### ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची घोषणा –

मिरज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्याची घोषणा या कार्यक्रमात झाली, त्याचा वृत्तांत देणारी बातमी–

''सभेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब चिवटे शेवटी समयोचित भाषण करून म्हणाले ''मिरजेला डॉ. आंबेडकर यांचा भव्य पुतळा उभारण्यात यावा. त्यापुतळ्यासाठी मी माझी सर्व शक्ति पणास लावावयास तयार आहे. आणि त्या पुतळ्यासाठी तुम्ही जेवढा पैसा जमवाल तेवढाच पैसा गावातून ताबडतोब देण्याची माझी तयारी आहे.'' या घोषणेच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गगनभेदी जयजयकार झाला.

या पुतळ्याचा प्रश्न गेले दोन तीन वर्षे घोळत पडला आहे. बेळगावचे सुप्रसिध्द उद्योगपती श्री. गोगटे यांनी या पुतळ्यासाठी १ हजार रूपये देणगी दिलेली आहे. आणि ती माझ्या कडे जमा आहे, असेही त्यांनी सांगितले. श्री. बाळासाहेब चिवटे यांच्या या आवाहनाचा फार मोठा परिणाम होवून श्री. कांबळे यांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी अनेक लोकांच्या देणग्या येथेच उत्स्फूर्तपणे जाहीर केल्या आता एक वर्षाच्या आत हा पुतळा तयार होईल यात शंकाच नाही. शेवटी डॉ. चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर राष्ट्रगीत होवून अडीच तास चाललेला हा जयंतीचा सोहळा समाप्त झाला. या समारंभात फार मोठ्या संख्येने स्त्री पुरूष उपस्थित होते. सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांच्या समवेत कोल्हापूरहून सत्यवादी गिल्डचे कार्याध्यक्ष श्री. रामभाऊ शिंदे व सोशल एक्झि. मॅजिस्ट्रेट. श्री. एम.डी.पवार हे मुद्दाम आले होते.

**चिवटे यांचे अभिनंदन –** श्री. बाळासाहेब चिवटे यांची मिरज पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांनी श्री. बाळासाहेब चिवटे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.''

### ४) सांगलीत आंबेडकर पुतळ्याचे भूमिपूजन –

सांगलीच्या एस. टी. स्टँडजवळ डॉ. आंबेडकरांचा भव्य पुतळा सर्वांना प्रेरणा देत उभा आहे. त्या पुतळ्याचे भूमिपूजन झाले तसेच हरिजन पंधरवड्यात त्यांच्या उन्नतीसाठी झालेले कार्यक्रमाचा वृत्तांत पुढीलप्रमाणे–

''एस.टी. स्टँड जवळील लाल बहादूर शास्त्री चौकात सांगली पालिकेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७।। फूट उंचीचा पूर्णाकृति पुतळा उभारण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन सुप्रसिध्द ॲड. केशवरावजी चौगुले यांच्या शुभ हस्ते, आज सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. याचवेळी सांगली पालिकेतर्फे डॉ. आंबेडकर जयंतीही साजरी करण्यात आली. या संयुक्त समारंभाच्या अध्यक्षस्थानी सांगलीचे सिव्हील जज्ञ आणि ज्यु. मॅजि. श्री. बी. बी. वराळे हे होते.

हाती भारतीय राज्यघटना असलेला हा ७।। फुटी पूर्णाकृति पुतळा मुंबईचे सुप्रसिध्द शिल्पकार श्री वाघ हे तयार करीत असून त्याचे अनावरण येत्या १५ ऑगस्ट पर्यंत मुख्यमंत्री श्री. वसंतराव दादा पाटील यांचे हस्ते करण्याचा पालिकेचा मनोदय आहे, असे या समारंभाच्या वेळी सांगण्यात आले.[७]

**हरिजन पंधरवडा–** हरिजन पंधरवड्यानिमित्त मिरज तालुक्यातील सोनी या गावी १९ एप्रिल रोजी आमदार दाजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हरिजन वाड्यातील समाज मंदिरात खास कार्यक्रम झाला. मिरज विभागाचे प्रांताधिकारी के.एस. गायकवाड यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.[८]''

**५) सांगली जि.प. ची आंबेडकर पुतळ्यास १० हजारची देणगी –**

सांगली जिल्हा परिषदेने डॉ. आंबेडकर पुतळ्यास १० हजार रुपये देणगी दिली व दलित चळवळीस सहकार्य केले विशेष.

''सांगली जिल्हा परिषदेची आज सर्वसाधारण सभा घेवून त्यात सांगली येथे उभारण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास १० हजार रू. व सेनामंदिराच्या इमारतीस ५ हजार रू. देणगी जाहीर करण्यात आली.[९]''

**क) जयंती, कार्यक्रमाच्या वार्ता**

**१) आंबेडकर जयंती –**

सांगली जिल्ह्यातील सांगली शहरानंतर मिरज हे दोन नंबरचे शहर. तेथेही दलित समाज मोठ्या प्रमाणात होता व आहे. मिरज येथे दलित बांधवांनी मोठ्या प्रमाणात डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी केली, व्याख्यान ठेवले. यावेळी दलित व इतर समाज बहुसंख्येने हजर होता. त्याचे वार्तापत्र खालीलप्रमाणे –

''मिरज येथे सदर्न रेल्वे कामगारातर्फे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त बॅ. बी. डी. कांबळे यांचे व्याख्यान झाले. मिरज तालुक्यातील लिंगनूर येथे डॉ. आंबेडकर जयंति मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. भजन, व्याख्यान वगैरे कार्यक्रम झाले.[१०]''

**२) आंबेडकर जयंती –**

सांगली, मिरज शहराप्रमाणे इतर खेडेगावात सुध्दा नांद्रे, खानापूर, तडसर आदी खेडेगावात दलित युवकांनी तसेच नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. सभा व इतर कार्यक्रम साजरे करून डॉ. आंबेडकरांचे जीवन चरित्र सांगितलेले व आपल्यावर होणारे अन्याय कमी करावयाचे असतील तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे दलित मुलांनी संघटित, समाज सुधारण्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे, असा संदेश सर्व दलित बांधवांना जयंतीदिनी दिला. म्हणून डॉ. आंबेडकर जयंतीस विशेष महत्त्व आहे. त्याचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे –

''द. सातारा जिल्ह्यात अनेक ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या थाटाने साजरी करण्यात आली. सांगली येथे निरनिराळ्या संघटनेच्या वतीने कार्यक्रम पार पाडण्यात आले. शिवाय नांद्रे येथे झेंडा वंदन, हळदी कुंकू, फोटोची मिरवणूक व जाहिर सभा आदींचे कार्यक्रम पार पडले, खानापूर तालुक्यातील तडसर या गावी गिजरे यांचे हस्ते गावकऱ्यांनी खरेदी केलेल्या रेडिओचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटाने पार पडला.[११]''

### ३) वायफळ येथील आंबेडकर जयंति –

१९६२ ची मिरज लोकसभा उमेदवार विजयसिंहराजे डफळे हे जत संस्थानचे माजी संस्थानिक होते. काँग्रेसचे उमेदवार असले तरी काँग्रेस रिपब्लिकन युती असलेने दलित समाजाने भरपूर मते दिली. खासदारांनीसुध्दा लोकसभेत दलितांच्या सवलती व समस्यांसाठी काम केले, हे विसरता येणार नाही.

''तासगांव तालुक्यातील वायफळे या गावी तेथील नवबौध्द समाजातील लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली. सायंकाळी तेथील हरिजन वसाहतीत श्री. पी. एम. पाटील यांचे अध्यक्षते खाली सभा झाली. याप्रसंगी श्री. आर. जी. पाटील, श्री. पी. के. पाटील, श्री. भी. ज्ञा. घार्गे व श्री. शिवाजीराव पाटील यांची भाषणे झाली.[१२]''

### ४) डॉ. आंबेडकरांचा आदर्श पदवीधरांनी पुढे ठेवावा –

सांगली जिल्हा हा मा. वसंतराव दादा पाटील यांच्या हयातीत काँग्रेसचा बालेकिल्ला होता. त्यास दलित समाजाचा नेहमीच पाठिंबा होता. नेहमी वसंतरावदादा सांगतील ती पूर्वदिशा असायची– ती ही बातमी–

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः बॅरिस्टर होवूनही कोणत्याही मानाच्या जागेची अपेक्षा न करता किंवा उच्च पगाराच्या नोकरीच्या मागे न लागता मागासलेल्या समाजाच्या उन्नतीस स्वतःस वाहून घेतले व आपल्या हयातीत हे कार्य पुष्कळसे यशस्वी करून दाखविले. शिक्षणाचा प्रसार करून शिक्षणाची संधी गरीब जनतेस मिळवून दिली. त्यामुळे आज मागासलेल्या समाजातील बहुसंख्य मुले शिक्षण घेत असलेली दिसत आहेत. डॉ. आंबेडकर यांचे वेळी मुंबई इलाख्यात मागासलेल्या जमातीतील फक्त एकच बॅरिस्टर होता. पाच पदवीधर होते. व अगदी थोडे म्हणजे हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच लोक मॅट्रीक पर्यंत पोहचलेले होते. परंतु आज हरिजन समाजातील शेकडो, हजारो लोक पदवीधर होवून समाजाची सेवा करीत आहेत. याचे सर्व श्रेय डॉ. आंबेडकर यांना आहे. त्यांचा आदर्श या समाजातील पदवीधरांनी आपणापुढे ठेवला पाहिजे. व इतर बांधवांना संधी मिळवून देवून त्यांनाही पुढे आणले पाहिजे. असे विचार अमेरिकेतून भारतात

अभ्यासासाठी आलेल्या श्रीमती एलिना जेलिएट या युवतीने येथील डॉ. बापट विद्यार्थी वसतिगृहास भेट दिली असताना तेथील विद्यार्थ्यांसमोर बोलताना काढले.[१३]''

### ५) दलितांचे उध्दारक डॉ. आंबेडकर –

दलित उध्दारक डॉ. आंबेडकर या शीर्षकाखाली सत्यवादीत बातमी त्यांच्या जयंतीदिवशी आली. ती दलित वर्गाला प्रेरणादायी ठरावी म्हणून संपादकांनी छापली, त्याचा सारांश पुढीलप्रमाणे–

''भारताचे एक महान सुपुत्र व दलितांचे उध्दारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आज अखिल भारतात साजरी होत आहे. डॉ. आंबेडकर हे शतकानुशतके अस्पृश्य ठरविलेल्या समाजात जन्मास आले आणि अनन्वित मानहाणीचे चटके काय असतात हे त्यांनी स्वतः पाहिले व अनुभवले. धर्म व जातीच्या नावाखाली निर्माण झालेल्या विषमता व अन्यायाविरूध्द झगडणारे थोर महात्मे प्राचीन काळात होवून गेले. जगदवंद्य राष्ट्रपिता म. गांधीजी, महात्मा फुले व राजर्षि शाहू महाराज यांनी ही हेच कार्य केले, पण धर्म, जात व रूढीच्या बंधनांनी साध्या माणुसकीसही पारखा केल्या गेलेल्या दलित समाजातच तेजस्वी महापुरूषाचा अवतार व्हावयास पाहिजे होता. हा अवतार म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी दलित समाजात अन्यायाची चीड निर्माण केली, स्वाभिमान जागृत केला आणि माणुसकीच्या हक्कासाठी झगडण्यास प्रवृत्त केले. झगड्याचे त्यांचे मार्ग कोणास पसंत पडले नसतील, पण तथाकथित सवर्णीयांनी आपले नशीब समजले पाहिजे की दलित समाजाने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हिंसात्मक क्रांतीचा अवलंब केला नाही. पशूपेक्षाही हीन प्रकारे वागणूक मिळालेला व संख्येने लहान नसलेला समाज असा खवळून उठला नाही याचे कारण डॉ. आंबेडकर यांचे नेतृत्व होय. डॉ. आंबेडकर लढवय्ये होते. तसेच ते अत्यंत सुसंस्कृत, विद्याविभूषित आणि लोकशाहीचे उपासक होते. मंदिर प्रवेश, सत्याग्रह या मार्गानंतर दलित समाजातील असंतोषाचा लढा सनदशीर राजकारणाकडे, लोकशाही निवडणुकीकडे वळविला आणि दलित जनतेचा स्वाभिमान संरक्षण करण्यासाठी त्यांनी मानवतावादी असलेल्या बुध्द धर्माचा जाहीररित्या स्वीकार केला, बुध्द धर्म स्वीकारताना नागपूरच्या दीक्षा मैदानावर केलेले भाषण अब्राहम लिंकन यांच्या भाषणापेक्षाही तेजस्वी असे भाषण होते. अमेरिके

सारख्या अत्यंत पुढारलेल्या व समृध्द देशात निग्रोची आजहि काय अवस्था आहे आणि त्यांच्या उध्दारासाठी आंदोलन करणारे नीग्रो व गोरे कार्यकर्ते यांचे प्राण कसे धोक्यात आहेत हे पाहिले असता डॉ. आंबेडकर यांनी दलित समाजाच्या चळवळीला जे लोकशाहीचे वळण लावले ते ऐतिहासिक महत्वाचे आहे. त्यांच्या ह्या मुलभूत विचारसरणीमुळे देशाच्या स्वातंत्र्य प्राप्ती नंतर त्यांना पहिल्या मध्यवर्ती मंत्रीमंडळात मानाचे स्थान मिळाले. स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक भारताच्या घटनेचे ते प्रमुख शिल्पकार झाले आणि हिंदुकोडाचे जनक ठरले. डॉ. आंबेडकर यांचे विचार व भावना प्रक्षुब्ध वाटत पण त्यामागे विशाल बुध्दिमत्तेची, दृष्टीची आणि कोमल अंतकरणाची बैठक असे म्हणूनच ते दलित जनतेचे नुसते लढवय्ये नेते ठरले नाहीत तर भारताचे एक अत्यंत थोर सुपुत्र झाले. दलितांचे ते दैवतच आहेत आणि सर्वभारतीयांनाही ते अत्यंत आदरशील आहेत. त्याची जयंती साजरी करताना भारतीयांनी त्यांचे हे ऐतिहासिक स्थान व महत्व लक्षात ठेवले पाहिजे. त्याशिवाय दलितांच्या उध्दाराचे अपुरे राहिलेले कार्य लवकरात लवकर पुरे होणार नाही. सार्वजनिक क्षेत्रातील अस्पृश्यता कायद्याने नाहीशी झालेली असली तरी व्यवहारातून ती पूर्णपणे नाहीशी व्हावयाची आहे. तसेच देशातील अज्ञानी व दरिद्री जनतेत हाच वर्ग मोठा असल्याने त्याची परिस्थिती सुधारण्याच्या प्रश्नास फार मोठे सामाजिक व राजकीय महत्व आहे. नुसत्या कायद्यानी व नियोजनानी हे काम अपेक्षेप्रमाणे होणार नाही. त्यासाठी देशाला निकडीची जाणीव झाली पाहिजे. तशी जाणीव होत असल्याचे दिसत आहे. पण ती अपुरी आहे. दिल्लीत संसद गृहात देशाच्या प्रमुख घटनाकारांचे तैलचित्र आज लावण्यात येणार आहे. हे अत्यंत स्वागतार्ह आहे. पण त्यासाठी दलित जनतेला आंदोलन करण्याची वेळ आली आहे. हे विसरून चालणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आज सर्वांना ही जाणीव तीव्रतेने होवो आणि देशातील दलित जनतेचा उध्दार लवकरात लवकर होवून खऱ्या अर्थाने भारतात समता नांदावी हाच आंबेडकर जयंतीचा संदेश आहे.[१४]''

### ६) डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीचा भव्य सोहळा –

नेहमीप्रमाणे १४ एप्रिलला डॉ. आंबेडकर जयंती सांगली मिरज जिल्ह्यात भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी व्याख्याने, प्रभातफेरी इ. कार्यक्रम झाले, त्याचा हा वृत्तांत–

''भारतीय घटनेचे शिल्पकार एवढीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची योग्यता नाही, तर त्यांची खरी योग्यता समजून घेण्यासाठी डॉ. आंबेडकर सगळे चरित्र संपूर्ण वाचले पाहिजे आणि हे चरित्र वाचल्यावाचून भारत देशाला प्रौढ मतदानाचे हक्क आणि स्त्रियांना समान संधी व समान हक्क का दिले हे कळणार नाही.'' असे उद्‌गार बुधवार ता. १४ रोजी रात्री ९ वा. येथील बौध्द नगरात डॉ. आंबेडकर यांची ८० वी जयंती ही अत्यंत थाटाने साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी मुख्य पाहुणे म्हणून सत्यवादीकार श्री. बाळासो पाटील यांनी काढले.

या जयंती समारंभात विद्यार्थ्यांचा पुढाकार होता. समारंभासाठी भव्य व्यासपीठ उभारण्यात आले होते. नेत्रदिपक रोषणाई करण्यात आली होती. अशा प्रसन्न वातावरणात समारंभाला सुरवात झाली. प्रास्ताविक भाषण श्री. श्रीपतराव कुदळे यांनी केले. समारंभाचे अध्यक्षस्थानी सांगलीचे उत्साही कार्यकर्ते श्री. माधवराव माने बी. ए. एल. एल. बी. हे होते.

सत्यवादीकारांनी आपल्या पाऊण तासाच्या भाषणात डॉ. बाबासो आंबेडकरांच्या जीवनातील अनेक (समर) प्रसंग सांगितले. डॉ. आंबेडकराच्या असामान्य बुध्दिचे व दलितांच्या उध्दारासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे अनेक पैलू त्यांनी दाखविले. आपल्या भाषणाचा समारोप करताना ते म्हणाले भारतातील लोकशाही स्थिर ठेवण्याचे मूलभूत कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले. त्यांनी आपले अनुयायी असलेल्या सर्व दलित समाजाला लोकशाहीवर निष्ठा राखण्याची आज्ञा दिली. लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधी यांना जे नेत्रदीपक यश मिळाले त्या यशाचे श्रेय डॉ. आंबेडकर यांच्या लोकशाहीवादी शिकवणुकीलाही द्यावे लागेल.[१५]

नंतर सांगलीचे प्रमुख कार्यकर्ते कांबळे गुरूजी यांचे प्रसंगोचित भाषण झाल्यावर सांगलीतील हरिजनांचे एक वयोवृध्द कार्यकर्ते श्री. तिरमारे गुरूजी यांची नात कु. मालिनी हिने हिंदीत सुरेख भाषण करून डॉ. आंबेडकरांना आपली श्रध्दाजंली वाहिली. शेवटी आभार प्रदर्शन हारतुरे व राष्ट्रगीत होवून डॉ. आंबेडकरांच्या जयजयकारात जयंतीचा सोहळा समाप्त झाला.

नंतर बौध्द नगरातील एका चौकाला ''डॉ. बाबासो आंबेडकर चौक '' असे नामकरण करण्याचा समारंभ सत्यवादीकार श्री. बाळासो पाटील यांच्या शुभहस्ते पार पडला. या समारंभाला स्त्री पुरूषांचा व विद्यार्थी विद्यार्थीनीचा मोठा समुदाय उपस्थित होता. या समारंभाला कोल्हापूरहून तेथील बौध्द कार्यकर्ते श्री. गणपतराव लिंगाडे, श्री. बनगे व कोल्हापूरचे ज्योतिषाचार्य श्री. नाथ माधव पाटगांवकर हे उपस्थित होते. विद्यार्थी मंडळातर्फे हा समारंभ यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष श्री. रावसो कांबळे सेक्रेटरी श्री. अविनाश सनदेव त्यांचे सर्व सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.[१६]''

**७) कासेगांव येथे आज आंबेडकर जयंती –**

कासेगाव ही महाराष्ट्राचे हक शिल्पकार व नेते राजारामबापू पाटील यांची जन्मभूमी. ते नेहमीच दलित वर्गास पाठिंबा देत होते. त्यांच्य गावी दलित समाजपण मोठ्या प्रमाणात होता व आहे. त्या कासेगावात डॉ. आंबेडकर जयंती व्याख्याने, ह्यांचा वृत्तांत पुढीलप्रमाणे–

''सालाबादाप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंति ता. १४ रोजी रात्री ८ वा. बौध्दवाडा येथे भव्य प्रमाणात साजरी केली जाणार आहे. मुख्य पाहुणे म्हणून आम. राजारामबापू हे उपस्थित राहणार आहेत.[१७]

**ठिकठिकाणी साजरी झालेली डॉ. आंबेडकर जयंती –** येथील नदीवेशीत डॉ. आंबेडकर जयंती अत्यंत उत्साहाने साजरी करण्यात येवून सुभाष राणा, राम गायकवाड व वसंत मनोहर कांबळे, शेखर कृष्णा कांबळे, स्नेहलता राजाराम कांबळे या लहान मुलांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांचे फोटोस हार घालून नारळ फोडण्यात आला.

या जयंतीनिमित्त अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. हा समारंभ जे. के. फुटबॉल क्लबच्या वतीने घेण्यात आला.[१८]''

## ८) हिंगण गावातील भ. बुध्द व डॉ. आंबेडकर संयुक्त जयंती –

दादासाहेब रुपवते हे एक मागासवर्गीयांचे नेते होते. डा. आंबेडकरांचे अनुयायी आणि राज्य कल्याण खात्याचे मंत्री होते. त्यांनी हिंगणगाव ता. कवठेमहांकाळ येथे भगवान बुध्द व डॉ. आंबेडकर जयंतीस हजर राहून दलित, बांधव नेते यांना उद्‌बोधन करून दलित चळवळीस मार्गदर्शन केले, त्याचा वृत्तांत.

''महापुरूषांची जयंति साजरी करावयाची तर त्यांचे सिध्दांत व विचार अनुसरले पाहिजेत असा सल्ला महाराष्ट्र राज्याचे राज्यकल्याण खात्याचे राज्यमंत्री श्री. दादासाहेब रूपवते यांनी कवठेमहांकाळ तालुक्यातील हिंगणगाव येथे भगवान गौतम बुध्द व डॉ. आंबेडकर यांच्या संयुक्त जयंति समारंभात बोलताना दिला.

बौध्द सेवा संघ हिंगणगाव, मुंबई शाखा व गांवशाखा यांच्या वतीने ता. १४ रोजी रात्री हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा झाला. श्री. रामू रूगाप्पा लोंढे हे या समारंभाचे अध्यक्षस्थानी होते.

गरिबांच्या दुःखाचा विचार करणारा जगातील मूळ थोर पुरूष असे गौतम बुध्दाचे वर्णन करून श्री. दादासाहेब म्हणाले की, दुःख विमोचनाची ही चळवळ आजही चालू असून भाषा बदलली असली तरी संघर्ष तोच चालू आहे. बुध्द समतावादी होते. माणूसकी मानणारे होते त्यांची जयंति करताना माणूसपण वाढेल अशी खटपट हवी. डॉ. आंबेडकरांनी दलितांना माणसात आणले म्हणून ते मोठे होत. मोठ्या माणसांच्या विचारांना व तत्त्वांना देव्हाऱ्याच्या तुरूंगात टाकून यापुढे चालणार नाही.

प्रारंभी श्री. रामू अंकुश लोंढे यांनी प्रास्ताविक भाषण केले. समाज कल्याण सभापती श्री. बाजीराव गोंधळे यांनी जिल्ह्यातर्फे मंत्री महोदयाचे स्वागत केले.[१९]

**सांगली जि. प. तर्फे मागास विद्यार्थ्यांना पुस्तके –** सांगली जिल्हा परिषदेने इयत्ता ५ वी ते ७ दरम्यान शिकणाऱ्या ६ हजार मागास वर्गीय विद्यार्थ्यांना १ लाख रू. ची क्रमिक पुस्तके मोफत पुरवण्याचा निर्णय घेतला आहे.[२०]''

### ९) बौध्द दलित कार्यालयाचे उद्घाटन –

सांगलीत बौध्द दलित कार्यालयाचे उद्घाटन झाले व त्या ठिकाणी दलितांच्या समस्या, अडचणी सोडविण्याचे कार्य सुरू झाले, त्याची बातमी–

''महाराष्ट्र राज्य बौध्द व दलित कार्यालयाचे उद्घाटन आंबेडकर जयंती दिवशी राम जाधव यांचे अध्यक्षतेखाली श्री. दीनानाथ बोरगांवकर यांचे हस्ते खणभाग पॉवर हौससमोरील जागेत करण्यात आले.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दलित बौध्द यांच्यावर अद्यापही अन्याय व अत्याचार होतात त्यासाठी कार्यकर्त्यांनी संघटना मजबूत करण्याची आवश्यकता यावेळी प्रतिपादन करण्यात आली. यावेळी श्री. तिरमारे गुरूजी श्री. बापूसाहेब धनवडे, श्री. मधाळे, श्री. बी. व्ही. चंदनशिवे यांची भाषणे झाली.[२१]''

### १०) वायफळे येथे डॉ. आंबेडकर जयंती –

दलित क्रांती दलाची स्थापना व (बेधडक) हे मुखपत्र डॉ. आंबेडकर जयंती दिवशी सुरू झाले, त्याची बातमी

''डॉ. नितीन लवंगारे यांच्या अध्यक्षतेखाली येथे दलित क्रांती दलाची स्थापना झाली असून मुखपत्र 'बेधडक' प्रसिध्द करण्यात आले आहे. कार्यकारी मंडळात सर्वश्री. शंकर सारडा, आप्पासाहेब तारळेकर, अरूण सावंत, देवदत्त हंकारे, शिवाजी सोनवणे, प्रा. माधव रणदिवे ॲड. आर.पी. कांबळे, यशवंत तपासे, प्रेमचंद्र साबळे व भारत बेडकर यांचा समावेश आहे.[२२]''

### ११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श, थोर राष्ट्रपुरूष म्हणूनच आपल्यासमोर ठेवला पाहिजे –

पुरोगामी विचाराचे सत्यवादीकार बाळासाहेब पाटील नेहमीच दलित चळवळीच्या पाठिशी ठाम उभे होते. डॉ. आंबेडकरांशी जवळचा स्नेह होता. सहभोजन आयोजित केले होते. त्यातील मिरजेतील एका कार्यक्रमात

डॉ. आंबेडकरांचा आदर्श थोर राष्ट्रपुरुष म्हणून सर्वांसमोर ठेवला पाहिजे असे सांगितले व तशी बातमी आपल्या वर्तमानपत्रात छापली.

''सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांचे मिरज येथील आंबेडकर जयंती सोहळ्यात ओजस्वी उद्‌गार, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान राष्ट्रपुरूष होते. डॉ. आंबेडकर यांच्या महान राष्ट्रीय कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना ते नुसते दलित वर्गाचे उध्दारक होते असे सांगून थांबता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे उध्दारक तर होतेच परंतु ते भारतीय लोकशाहीचे आणि घटनेचे शिल्पकार होते आणि मानवतावादाचे महान पुजारी होते. म्हणून त्यांचा आदर्श थोर राष्ट्रपुरूष म्हणूनच आपल्या समोर ठेवला पाहिजे.'' (प्रचंड टाळ्या ) असे ओजस्वी उद्‌गार सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांनी येथील डॉ. आंबेडकर नगरातील भव्य चौकात आयोजित करण्यात आलेल्या डॉ. आंबेडकर यांच्या ८७ व्या जयंतीप्रसंगी महनीय प्रवक्ते म्हणून बोलताना काढले.

काल सायंकाळी ७ वा. ही संस्मरणीय सभा झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी मिरजेचे एक थोर नेते व पत्रकार श्री. बाळासाहेब चिवटे हे होते.[२३]''

**१२) मानवतावादी बुध्दधर्म –**

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सत्यवादीकार बाळासाहेब यांनी आपल्या भाषणात 'मानवतावादी बुध्द धर्म' केला होता, यावर विचार व्यक्त केले ते पुढीलप्रमाणे–

''यानंतर या सभेचे महनिय प्रवक्ते सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांनी बुध्द स्तोत्राने आपल्या भाषणास सुरूवात करून नंतर त्यांनी सुरूवातीस दिलेले विचार मांडले ते पुढे म्हणाले ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान ऋषी होते. दलित वर्गाला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी सतत ४० वर्षे खडतर तपश्या केली आणि त्या तपस्येतूनच त्यांनी शेवटी महान मानवतावादी असलेल्या बुध्दधर्माचा स्विकार केला. भगवान बुध्द हे राजपुत्र होते. परंतु त्यांनी बुध्द धर्माची स्थापना करून लोकांना समान संधी व समान

हक्क मिळवून दिले. जातीवादाचा बीमोड करून टाकला आणि सर्व श्रेष्ठ असणारा मानवतावाद लोकांना समजावून सांगितला. भगवान गौतम बुध्दाचे हे महान तत्वज्ञान वाचून डॉ. आंबेडकर भारावून गेले होते. त्यातूनच त्यांनी आपल्या लक्षावधी अनुयायासह नागपूर येथे बुध्दधर्माचा स्विकार केला असे सांगून ते पुढे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी तुम्हाला बुध्दर्माची दिक्षा दिलेली आहे. तुम्ही आता कोणाचेही गुलाम नाही. तुमच्या वर आता कोणाचे धार्मिक वर्चस्व नाही. तुम्ही स्वतंत्र्य बुध्दधर्मीय बनला आहात तेव्हा बुध्द धर्माचे खरे तत्व प्रतिपादन करण्याची तुमच्यावर आलेली जबाबदारी पार पाडणे म्हणजेच डॉ. आंबेडकर यांची खरी जयंती होय.[२४]''

**ड) आर्थिक सवलतीसंबंधी / शैक्षणिक संबंधी वार्ता**

**१) मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी भरण्याबाबत सवलत :-**

शिक्षणाशिवाय आपली प्रगती होणार नाही. म. फुले, शाहू महाराज व डॉ. आंबेडकर व इतर समाज सुधारकांनी शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. डॉ. आंबेडकर भरपूर शिकले. विदेशातील सर्व महत्त्वाच्या पदव्या घेतल्या व ते भारतीय घटनेचे शिल्पकार झाले. त्यांचे जीवन चारित्र्य सर्व दलित व मागासलेल्या मुलांना माहित होते. म्हणून सर्व भारतभर दलित युवक शिक्षण घेण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत होते. त्यात सांगली जिल्ह्यातील दलित युवक मागे राहिला नाही.

पण आर्थिक प्रश्न दलित मुलां-मुलींना भेडसावत होता म्हणून दलितांना शैक्षणिक सवलती, फी माफी मिळावी यासाठीची माहिती खालील वार्तापत्रात देण्यात आली होती ती पुढीलप्रमाणे -

''आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थी म्हणजे ज्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न १२,००० रू पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सुरू होण्यापूर्वी फी भरण्यास भाग पाडू नये असे सरकारने शाळा व कॉलेज यांच्या व्यवस्थापकांना संबंधित विद्यार्थ्यांना नादारी देता येईल व त्यांच्या फीचे बील पाठवून

ते जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्याकडून वसूल करता येईल. एखाद्या विद्यार्थ्यांने आपण आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील आहे. असे कळविल्यास व नंतर ते खोटे असल्याचे आढळून आल्यास त्या विद्यार्थ्याला सवलतीनुसार झालेल्या फीच्या दुप्पट रक्कम द्यावी लागेल. तसेच ह्या रक्कमेची वसुली शाळा अथवा कॉलेजच्या व्यवस्थापकाकडून न करता त्या विद्यार्थ्याकडून अथवा पालकाकडून करण्यात येईल. एखाद्या विद्यार्थ्याने चालू शैक्षणिक वर्षात मध्येच शिक्षण बंद केल्यास त्यामुळे होणारे संस्थेचे नुकसानही सरकार भरून देईल. तेव्हा शैक्षणिक संस्थांनी वरील प्रकारच्या विद्यार्थ्यांना त्यांनी फी न भरता प्रवेश दिला तरी त्यामुळे त्या संस्थेचे कोणत्याही प्रकारे नुकसान होण्याची भीति राहणार नाही. निमंत्रक श्री. एस.डी. पाटील हे होते. सभेत तालुक्यातील सर्व शिक्षण संस्थेचे प्रमुख व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. श्री. एस. डी. पाटील यांनी आपली कल्पना मांडली की, तालुक्यातील सर्व शिक्षण संस्थांनी एकत्रित येवून फेडरेशन करावे. त्यामार्फत कॉलेज काढण्याच्या परवानगीचा अर्ज विद्यापीठाकडे करावा. सभेत वक्त्यांनी आपआपली मते मांडली.[२५]''

### २) नव बौध्दांना सवलती –

पुढील वार्तापत्र हे दैनिक सत्यवादीच्या वृत्तपत्रात प्रकाशित झाले होते. यामध्ये सांगलीतील नवबौध्दांनी मोर्चे काढून सवलती मिळाव्यात म्हणून आदेश केला, तो पुढीलप्रमाणे –

''महाराष्ट्र राज्याच्या उद्‌घाटन प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी जाहिर केलेल्या महत्वाच्या धोरणापैकी एक धोरण बौध्द धर्म स्वीकारलेल्या पूर्वीच्या वर्गीकृत जातींना द्यावयाच्या सवलती संबंधी होते. या धोरणा नुसार वर्गीकृत जातींना मिळणाऱ्या सर्व सवलती आणि फायदे नवबौध्दांना देण्यासंबंधी आदेश देण्यात आले आहेत. मात्र भारतीय घटनेखाली अस्पृश्यता निवारण करण्यासाठी असलेल्या खास योजना खालील, तसेच इतर कायदेशीर सवलती नवबौध्दांना मिळणार नाहीत. कारण त्या फक्त हिंदु पुरत्याच मर्यादित आहेत. त्याप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रात या लोकांना शिक्षण फी आणि परिक्षा फी यांची माफी देण्यात आली असून शैक्षणिक संस्था वर्गीकृत जातींसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागावर त्यांना प्रवेश देण्यात येईल.[२६]''

### ३) सांगलीत सिध्दार्थ को. ऑप, हौसिंग सोसायटीची स्थापना –

दलित वर्गातील लोकांना चांगली घरे मिळावीत म्हणून हौसिंग सोसायटीची स्थापना सांगलीत केली. त्यास नगरपालिका शासकीय अधिकाऱ्यांनी मान्यता दिली. दलित नेत्यांच्या चळवळीचे हे एक यशच म्हणावे लागेल.

''दलित वर्गातील लोकांना चांगली घरे मिळविण्याचा हेतू –शिवाजी नगर येथील बालाजी मिल्स नजीकच्या दलित समाजाच्या वस्तीमध्ये सिध्दार्थ को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी सांगली या नावाची संस्था स्थापन करण्यात आली आहे. दलित वर्गातील लोकांच्या राहण्याच्या गैरसोयी दूर व्हाव्यात व त्यांना स्वच्छ व नीटनेटकी घरे मिळावी या उद्देशाने प्रेरित होवून सहकारी तत्वावर वरील संस्थेची स्थापना केली आहे. व त्याप्रमाणे शेअर भांडवल जमा करून डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँकेत भरलेले आहे. डेप्युटी रजिस्टार को. ऑपरेटिव्ह सोसायटीज सांगल यांचेकडे रजिस्ट्रेशनसाठी अर्जही दिलेला आहे. सदर संस्था स्थापनेचे कामी भांडवल उभारणेचे कामी सहकारी तत्वावर एकजूट करणेचे कामी दलितांचे तरूण नेते कायदेपंडीत बॅ. बापूसाहेब ज्ञानदेवराव कांबळे, सांगली यांचे मार्गदर्शन व सहाय्य झालेले आहे व त्यांच्याच प्रयत्नामुळे सदर संस्था प्रस्थापित झालेली आहे. सदर संस्थेला जागेसाठी ते ज्या जागेवर गेली तीन वर्षे रहात आहेत तो रि. स. नं. २६९/२ चा प्लॉट घरबांधणीसाठी मिळावा म्हणून सांगली नगरपालिकेकडे अर्ज दिलेला आहे. समितीच्या वतीने जिल्ह्यात स्त्रियांच्यासाठी एक जागा लढविण्याचे ठरविण्यात येत असून सदरच्या जागेसाठी आ. नारायणराव पाटील (ढवळी) यांच्या पत्नी उभ्या राहतील असा अंदाज आहे.

जनसंघाच्यावतीने सांगली शहरात आणि मिरज शहरात उमेदवार उभे करण्याचे अद्यापि निश्चित नाही. असे कळते प्रजासमाजवादी पक्षाचेवतीने तासगांव येथे आ. गणपतराव कोळी यांचे नाव ऐकू येत आहे. याशिवाय स्वतंत्रहि अनेक उमेदवार जिल्ह्यात उभे राहतील असे दिसत आहे. एकदंरित येत्या निवडणुका चुरशीच्या होणार असा रंग दिसत आहे.[२७]''

**४) धनिक वर्गाने शैक्षणिक क्षेत्रातील वाटा उचलावा –**

मा. वसंतराव पाटील हे सांगली जिल्ह्याचे नेते व दलित समाजाचे आश्रयदाते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली १९६२ ची सांगली जिल्हा परिषदेची निवडणूक झाली. त्यात काँग्रेसला बहुमत मिळाले. त्यामध्ये काही दलित कार्यकर्तेही निवडून आले, त्याचाच वृत्तांत पुढे दिला आहे–

''अलिकडच्या काळात शैक्षणिक क्षेत्राची प्रगति होण्याच्या दृष्टीने सरकारने बरेच प्रयत्न केले. सरकारच्या काही सवलतीमुळे देशात शिकणाऱ्या मुलांची संख्या दिवसे दिवस वाढू लागली आहे. त्यासाठी सरकारतर्फे केलेला खर्चहि अपूरा पडू लागला आहे. अशावेळी समाजातील धनिक वर्गाने पुढे येवून आपला शैक्षणिक क्षेत्रातील वाटा उचलण्यासाची जरूरी आज भासू लागली आहे. यामुळे सामाजिक समानता व आर्थिक समानताही निर्माण होण्यास मदत होईल. नुकत्याच झालेल्या भुवनेश्वर येथील ऑल इंडिया काँग्रेस कमेटिच्या अधिवेशनामध्ये काही बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. यामध्ये येत्या १२ वर्षात प्रत्येकाला पुरेसे धान्य, वस्त्र, शिक्षण, घरे व औषधपाणी या गोष्टी मिळाल्याच पाहिजेत, केवळ गरीबीमुळे शिकता येत नाही ही परिस्थिती यापुढील काळात राहून चालणार नाही. असे उद्‌गार महाराष्ट्र प्रदेश काँग्रसचे उपाध्यक्ष आम. वसंतराव पाटील यांनी डिग्रज येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या स्नेहसंमेलन प्रसंगी अध्यक्ष पदावरून बोलताना काढले.[२८] श्री. तिरमारे गुरूजींचा सत्कार सांगली शहरातील जुन्या पिढीतील एक निष्ठावान आणि दलित समाजाचे कार्यकर्ते शिवराम कृष्णाजी तिरमारे (उर्फ तीरमारे गुरूजी ) यांचा ७१ वा वाढदिवस २२ एप्रिल १९६४ रोजी भव्य स्वरूपात होणार असून एक छोटासा गौरव ग्रंथही त्याच सुमारास प्रसिध्द करण्यात येणार आहे. शिवाय त्यांना गौरवनिधी अर्पण करण्यात येणार आहे. हा गौरव होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व पक्षीय नेत्यांनी एक पत्रक काढले असून त्यात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री. वसंतराव पाटील, चारूभाई शहा, केशवराव चौगुले, बाळासाहेब कोरे, श्री. राजाभाऊ जगदाळे, श्री. माधवराव गोडबोले, पंडितराव दांडेकर आदी वेगवेगळ्या थरातील कार्यकर्ते आहेत.[२९]''

### ५) मागास वर्गाच्या योजना कार्याचा आढावा घेणार –

महाराष्ट्र शासनामार्फत मागास वर्गाच्या योजना जाहीर केल्या. सांगली जिल्ह्यात या योजनेच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. एक उपसमिती नेमण्यात आली, त्या समितीने मागासवर्गीयांनी या योजनेचा फायदा घ्यावा म्हणून प्रयत्न केले, त्याची बातमी पुढीलप्रमाणे–

''**श्री. भिंगारदिवे यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती नियुक्त –** महाराष्ट्र राज्य समाजकल्याण संचलनालया तर्फे जिल्हा परिषदांनी हातकलेच्या मागास वर्गाच्या कल्याणकारी योजनाच्या कामकाजासंबंधी चौकशी करण्याकरिता तसेच याबाबत कार्य करणाऱ्या संस्था वसतिगृहे, नागरिक व कार्यकर्ते यांची मते तक्रारी व अडचणी वगैरे कार्याची पाहणी करण्यासाठी व जिल्हापरिषदेकडे हे समाजकल्याण सोपविल्यापासून जि. परिषदेने केलेल्या कार्याचा आढावा घेवून या कार्याची यशस्वीता कितपत झाली व काही तक्रारी झाल्या अशा सर्व स्थितीची चौकशी करण्याकरिता एक सबकमिटी नेमण्यात आली आहे. सदर सबकमिटीचे चेअरमन श्री. बी. सी. भिंगारदिवे हे असून सभासद सहचिटणीस म्हणून श्री.अनंतराव बोधनकर हे काम पहात आहेत. इतर सभासदांत श्री. डी. एल. खडसे, श्री. ए. बी. निले, श्री. पी.डी. जाधव, श्री. सुरजमल नारायण चौधरी अशी समितीत आहेत. या सबकमिटीने बॅकवर्ड क्लास मधील आदिवासी, हरिजन, मागासलेला वर्ग यांच्यासंबंधी झालेल्या कार्याचा आढावा घेवून १५ मार्च पर्यंत सरकारला रिपोर्ट सादर करावयाचा आहे.

समितीचे सभासद जिल्हावार व तालुकावार माहिती घेत असून सांगली जिल्ह्यात दि. १९,२०,२१ अखेर फिरून माहिती जमा करत आहेत. आपल्या दौऱ्यात त्यांनी तुंग, दुधगांव, कवठेपिरान, इनामधामणी, इस्लामपूर, कासेगाव या ठिकाणास भेटी देवून बॅकवर्ड क्लासच्या कार्यासंबंधी व जिल्हा परिषदेकडून झालेल्या कार्याची पाहणी केली आहे. सदर समितीचा दौरा कोल्हापूरला २५ ते २९ ऑगस्ट ६५ ला होणार आहे. वरील सबकमिटीने एक छापील प्रश्नपत्रिका तयार केली असून त्यात समाज कल्याणासंबंधी केलेल्या कार्याच्या माहितीचे प्रश्न आहेत. ही माहिती जि. प. पंचायत समित्या सामाजिक कार्यकर्ते, संस्था, वसतिगृह संचालक यांनी भरून सबकमिटीकडे देणेची आहे. या प्रश्न मालिकेत मागासलेल्या वर्गासंबंधीचे सर्व विषय अंतर्भूत

आहेत. सदर सबकमिटी ॲड. भिंगारदिवे यांचे अध्यक्षतेखाली नेमली असून तिचे कार्य सांगली जिल्ह्यापासून सुरवात झाले आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यात ही सर्व कमिटी फिरून माहिती घेणार आहे. व त्याचा रिपोर्ट सादर करणार आहे. विधान सभा मेंबर्स व विधान परिषद मेंबर्स यांनीही वरील प्रश्नावलीत अंतर्भूत केलेली माहिती देण्याकरिता आज सकाळी ९।। वा. येथील पत्रकारांची प्रेस कॉन्फरन्स येथील सरकारी रेस्ट हौसवर बोलविण्यात आली होती.[३०]''

**६) जामवाडीचे शिष्टमंडळ (कलेक्टर) जिल्हा अधिकाऱ्यांना भेटणार –**

मा. वसंतराव पाटील, महाराष्ट्राचे एक खंदे कॉंग्रेस नेते व सांगलीचे सर्वेसर्वा होते. त्यांची चेहमीच दलित चळवळीबद्दल सहानुभूती होती. दलित वर्ग आर्थिकदृष्ट्या मागासलेला व गरीब होता. म्हणून त्यांनी एका भाषणात धनिक वर्गानी (श्रीमंतांनी) शैक्षणिक क्षेत्रातील वाटा उचलावा व दलित मुला–मुलींच्या शिक्षणास हातभार लावावा असा उपदेश दिला. सांगलीचे प्रसिध्द दलित नेते तिरमारे गुरुजी यांचाही त्यांनी उल्लेख केला, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे–

''सांगली शहरातील गेले कित्येक वर्षे अत्यंत मागासलेला आणि स्वतःची घरे नसलेला व नगरपालिकेला सतत ३० वर्षाहून अधिक वर्षे भुईभाडे देवून त्या ठिकाणी वसाहत करून राहिलेल्या जामवाडी व टांगा अड्डा अशा ह्या दोन वसाहतीसाठी नगरपालिकेने तेथे वसाहत करून राहिलेल्या नागरिकांना जागेची अल्पशी किंमत घेवूनही जागा द्यावी असे ठराव वेळोवेळी होवूनही आणि कॉंग्रेस पक्षाचे उमेदवारांनी निवडणुकीपूर्वी व नंतर जागा ताब्यात देण्याचे जाहिर आश्वासन देवूनही अद्याप या जागा वसाहती मधील गरीब जनतेला मिळाल्या नाहीत. एवढेच नव्हे तर अनेकदा मोजणी होवून सिटी सर्व्हेकडे तशा प्रकारची नोंद होवूनही जागा तेथील नागरिकांना मिळत नसल्याने त्या भागातील नागरिक लवकरच संघटितरित्या श्री. बाबूराव सूर्यवंशी चितोडी लोहार समाजाचे ह्या भागातील थोर कार्यकर्ते श्री विठोबा आण्णा शेलार, श्री. गणपतराव सुतार, श्री. बाबुराव शिंदे, श्री. बी. ए. कुलकर्णी, श्री. मारूती राव सुतार, श्री. गणी हवालदार, श्री. ज्ञानबा कदम, श्री. हनीफ मुजावर, श्री. बाबूराव ताटे, श्री. काशीरामसाहेब पकाली, श्री. सिकंदर कबल आदिच्या नेतृत्वाखाली एक शिष्ट

मंडळ जिल्हाधिकारी श्री. शिंदे महाराष्ट्र प्रदेशचे काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री आमदार वसंतराव पाटील आणि नगराध्यक्ष श्री. राजाभाऊ जगदाळे यांना भेटून आपली बाजू मांडणार आहेत. यापूर्वीही अनेक वेळा जामवाडी येथील जागेच्या संबंधी लेखी निवेदने सादर केली होती.[३१]''

**७) हरिजन वसाहतीच्या पुनर्वसन योजनेचे भूमिपूजन –**

दलित चळवळीतून प्रेरणा घेऊन व दलित नेत्याच्या मार्गदर्शनाखाली जामवाडीचे शिष्टमंडळ सांगली जिल्हाधिकारी यांना भेटून आपल्या व्यथा व राहण्यासंबंधी अडचणी सांगितल्या, त्याची माहिती पुढे दिली आहे.

''**आ. वसंतदादा पाटील यांच्या हस्ते साजरा झालेला समारंभ –** सांगली मिरज ही शहरे एक करण्याच्या दृष्टीने सध्या प्रयत्न सुरू असून सांगली शहरवाढीच्या दृष्टीने वरील दोन्ही नगरच्या मधल्या टापूचा नगरपालिकेला अधिक विचार करावा लागेल असे मत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष व सांगली जिल्ह्याचे नेते आम. वसंतराव पाटील यांनी आज येथे व्यक्त केले. येथील शिवाजीनगर मध्ये जळीतग्रस्त झालेल्या हरिजन वसाहतीच्या पुनर्वसनाची योजना सांगली न.पा. ने हाती घेतली असून तिचे भूमिपूजन आ. वसंतराव पाटील यांच्या हस्ते आज सायंकाळी झाले. १८० झोपड्या भस्मसात होवून सुमारे ४०० कुटूंबे बेघर झाली आहेत. परंतु नगरपालिकेच्या या नवीन योजनेमुळे ३०२ कुटूंबाची सोय होणार आहे असे सांगून श्री जगदाळे म्हणाले, प्रत्येक जळीत ग्रस्तासाठी १२ x १० ची एक खोली व १२ x ५ चा एक व्हरांडा वजा अशा एकूण दोन खोल्यांची सोय होणार असून प्रत्येक घरापुढे ३०० x १०० अशी मोकळी जागा ठेवण्यात येईल, याशिवाय प्रत्येक कुटूंबासाठी संडास मुतारीची सोय होणार असून येत्या पावसाळ्यापूर्वी ही योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने नगरपालिकेचे प्रयत्न चालू आहेत.

नगरपालिकेने शहरवाढीचा विचार करतानाच त्या त्या वसाहतीमध्ये पाणी, वीज व रस्त्यांची सोय करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे असेही आ. वसंतराव पाटील यांनी सांगितले.

सांगली नगरपालिकेचे एक सदस्य श्री. अंबाजी माळी यांनी पाहुण्यांना पुष्पहार अर्पण केल्यावर नगराध्यक्ष जगदाळे यांनी आभार मानले.

या समारंभाच्या वेळी आ. धुळाप्पा अण्णा नवले तासगांव पंचायत समितीचे श्री. बाबासो पाटील उपस्थित होते.[३२]''

**८) श्री. देवधर यांनी सत्कार थैली हरिजन कार्यासाठी दिली –**

सांगलीतील कार्यकर्ते श्री. देवधर यांचा सत्कार झाला. त्याप्रसंगी त्यांना जी थैली दिली होती ती त्यांनी हरिजन कार्यासाठी दिली. त्यावरून हरिजनांवरील त्यांचे मोठे प्रेम दिसून येते, ती बातमी पुढीलप्रमाणे –

''यापुढेही सांगलीत राहून येथील जनतेची मी सेवा करीन, असे उद्‌गार तरूण भारत व्यायाम मंडळाचे संस्थापक श्री. नाना देवधर यांचा जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. धोंडीराम नाना पाटील यांचे अध्यक्षतेखाली या सभागृहात सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बोलताना श्री. देवधर यांनी काढले.

सत्कार समितीच्या वतीने त्यांना ३९०० रू. ची थैली ही अर्पण करण्यात आली. त्यात त्यांनी स्वतःचे १०० रूपये घालून हा निधी हरिजनांच्या कार्यासाठी खर्च करण्याचे जाहीर केले व हा निधी श्री. बाबूभाई पारीख यांचेकडे सुपूर्द केला.

प्रारंभी श्री. बाजीराव गोंधळे यांनी प्रास्ताविक भाषण केले. नंतर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष श्री. अण्णासो गोटखिंडे, जिवबा सूर्यवंशी, श्री. मधाळे, कुदळे, शंभू इनामदार यांची भाषणे झाली. शेवटी श्री. राजाभाऊ जगदाळे यांनी आभार मानले. [३३]''

**९) पेठ येथे हरिजनांसाठी मोठी सामुदायिक विहीर बांधणार –**

पेठ हे पुणे–बेंगलोर महामार्गावर (सांगली–इस्लामपूर) रस्तापेठ जवळ हायवेला जोडलेला जातो. बऱ्याच गावात हरिजनांचा पाण्याचा प्रश्न बिकट होता. अशा या पेठ गावात एक सामुदायिक विहीर हरिजनांसाठी

बांधली. त्यात पुरोगामी सवर्णांचाही सहभाग होता, या विशेष चित्राचा ह्यावरूण सवर्णांचा दृष्टीकोन हरिजनांसंबंधी थोडा थोडा बदलत होता हे दिसून येते तो वृत्तांत –

''इस्लामपूर येथून दोन मैलावर असणाऱ्या ९ हजार वस्तीच्या पेठ गावात जिल्हा परिषदेतर्फे दहा हजार रूपये खर्चून हरिजन बांधवासाठी श्री. खंडोबाचे देवालयानजीक एक सामुदायिक विहीर बांधली जाणार असून तिचा शुभारंभ जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. धोंडीराम नाना पाटील यांचे हस्ते मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.

ओढ्यात बांधल्या जाणाऱ्या या विहीरीस भरपूर पाणी लागले तर गावात सार्वजनिक पाण्याची टाकी बांधून नळाने पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात यावी. अशी मागणी प्रास्ताविक भाषणात परिषद सदस्य श्री. नारायणकाका पाटील यांनी केली.

श्री. धोंडीराम नाना पाटील यांनी यावेळी बोलताना जिल्ह्यात पिण्याच्या पाणी पुरवठ्याची समस्या कशी आहे, याचे विवरण करून परिषद करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

पेठेचे कार्यकर्ते श्री. हंसाजीराव पाटील हे समारंभाचे अध्यक्ष स्थानी होते. हरीजनांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या या विहीरीमुळे निश्चित दूर होईल, असे त्यांनी सांगितले. शेवटी सरपंचानी आभार प्रदर्शन व हारतुरे अर्पण केल्यानंतर हा सोहळा संपला.[३४]''

**१०) मागास समाजाच्या सवलतीचा फेर विचार होणार**

मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे सांगलीत भाषण झाले. त्याप्रसंगी त्यांनी मागास समाजाच्या सवलतीचा फेरविचार करून जादा सवलती दिल्या जातील व त्यांची प्रगती करता येईल, असे आश्वासन दलित नेत्यांनी व समाजास दिली, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

''भोई समाज सेवा संमेलनाचे उद्‌घाटन प्रसंगी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांचे भाषण सांगली ता. ९ काही मागासल्या समाजाच्या काही सवलती शासनाने १९५८ साली कमी केल्या होत्या याचा फेरविचार करून

त्या सवलतीपैकी काही पुन्हा सुरू करण्यासबंधी शासन विचार करत आहे. अशी माहिती मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी येथे दिली. अखिल महाराष्ट्राला भोई सेवासंघाच्या दुसऱ्या अधिवेशनाचे उद्‌घाटन समारंभात अध्यक्षस्थानावरून बोलताना ते म्हणाले १९५८ साली समाजाच्या विकासासाठी विचार करताना केवळ जमातनिहाय विचार न करता आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाचा सर्वकष विचार करण्यात आला. त्या अन्वये वार्षिक नऊशे रू. उत्पन्न असणाऱ्या साऱ्यांची एक जमात धरून त्यांना शैक्षणिक सवलती देण्यात आल्या. समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या वर्गाला देण्यात येणाऱ्या या सवलतीची मर्यादा पुढे २४०० रू. वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लोकापर्यंत वाढविण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्रातील गावागावातून शिक्षणाचा प्रसार होवून आज शासन शिक्षणावर ११० कोटी रू. खर्च करित आहे.

काही समाजातील लोकांना १९५८ पूर्वी शैक्षणिक सवलती मिळत होत्याच पुन्हा सुरू करण्याच्या धोरणाचा शासनाने तत्त्वतः स्वीकार केला असून त्या विषयीच्या तपशीलाचा शासन विचार करीत आहे.

या अधिवेशनाचे उद्‌घाटन वीज व पाटबंधारे मंत्री श्री. वसंतरावदादा पाटील यांनी केले. सुरूवातीला स्वागताध्यक्ष श्री. विश्वनाथ जोती शिंदे यांनी पाहुण्याचे स्वागत केले.

संघटनेचे अध्यक्ष श्री. बबनराव परदेशी यांनी आपल्या भाषणात समाजातील विविध अडचणींची व समाजाच्या मागण्याची माहिती दिली. दोन दिवस चाललेल्या या अधिवेशनात संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ५००० प्रतिनिधी उपस्थित होते.[३५]''

**१० अ) सांगली जि. प. तर्फे मागास विद्यार्थ्यांना पुस्तके –** सांगली जिल्हा परिषदेने इयत्ता ५ वी ते ७ वी दरम्यान शिकणाऱ्या सहा हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एक लाख रुपयांची क्रमिक पुस्तके मोफत पुरविण्याचा निर्णय घेतला आहे.[३६]

## ११) मिरज येथे उपेक्षित मागासवर्गीय सेवा संघाची स्थापना –

सांगली जिल्ह्यातील मिरज हे दोन नंबरचे मोठे शहर. वॉनलेस हॉस्पिटल व रेल्वे जंक्शनमुळे त्या ठिकाणी बरेच मागासवर्गीय कर्मचारी होते. त्यांने सेवा संघाची स्थापना केली, त्याची बातमी पुढीलप्रमाणे आहे.

''**लघुउद्योगासाठी पतपुरवठा संस्था काढणार–**

मागासवर्गीय समाजातील बांधवांचा विकास व्हावा लोकशाही तत्वाने मिळणारे फायदे घेवून त्यांची गरीबी, बेकारी नाहीशी करून त्यांची सर्वांगिण उन्नती व्हावी यासाठी मिरजेत उपेक्षित मागासवर्गीय सेवा संघ स्थापन करण्यात आला असून नुकतीच संघाच्या कार्यकारिणीची निवड झाली.

आकाराम कृष्णा मोहिते अध्यक्ष रामचंद्र आठवले उपाध्यक्ष प्रकाश लोखंडे, सेक्रेटरी गणेश होळकर, सेक्रटरी सुदाम यशवंत होळकर खजीनदार, विश्वस्त कमिटी अध्यक्ष मनोहर बाळा लोखंडे आणि उपाध्यक्ष बंडोजी कांबळे.

मागासवर्गीयांना छोट्या छोट्या लघुउद्योगासाठी भांडवल पुरवठा करता यावा म्हणून सांगली जिल्हा मागासवर्गीय सहकारी पतसंस्था स्थापन करण्याचा निर्णय संघाने घेतला असून जुलै ७४ मध्ये केंद्रिय अर्थमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण याचे हस्ते शेअर्स विक्रीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

बेघर व जमीनहीन लोकांना जमिन मिळवून देणे. मोफत दवाखाना, वृध्दाश्रम चालविणे, कायदेशीर मोफत सल्ला देणे आदी ध्येय सेवा संघाने निवडले असून एकत्रित येवून सर्वांचा विकास साधला जाण्यासाठी संघाची स्थापना झाली आहे.[३७]

श्रीदत्ता बाळ मिशनच्या मिरज शाखेतर्फे दलित सहाय्य चळवळीतील हा समारंभ उत्साही वातावरणात पार पडला. शंभर दलित विद्यार्थ्यांना पुस्तके, पेन्स, वह्या व इतर अनेक शालोपयोगी वस्तू वाटण्यात आल्या.''

**१२) परीक्षा फी बाबत बौध्द वा दलित युवक संघाची मागणी –**

बौध्द दलित जनता गरीब असल्याने त्यांच्या मुलांना १०, ११ वी परीक्षेत फी सवलत मिळावी म्हणून समाजकल्याण विभागाकडे मागणी केली, त्याची ही बातमी–

''इ. १० वीची परीक्षा एस. एस. सी बोर्ड घेणार आहे. आजपर्यंत ११ वी ची फी बौध्द व मागास वर्गीय विद्यार्थ्यांना समाज कल्याण खात्याकडून मिळत असे. त्याचप्रमाणे इयत्ता १० वीची ही एस. एस. सी. बोर्डाची फी महाराष्ट्रातील बौध्द व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळावी अशी मागणी बौध्द व दलित युवक संघाचे अध्यक्ष श्री. धोंडीराम थोरात यांची महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री सौ. प्रतिभा पाटील यांचेकडे केली आहे. या प्रश्नासाठी लोक मुंबईला एक शिष्टमंडळ पाठवणार आहे.[३८]''

**१३) श्रीदत्ता बाळ मिशनतर्फे–**

काही संस्था सामाजिक कार्य करतात, कोल्हापुरातील श्री दताबाळ मिकानतर्फे दलित विद्यार्थ्यांत शालोपयोगी वस्तूंची भेट देवून इतर संस्थांनी आदर्श घालून दिला, ती बातमी–

''**दलित विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंची भेट –** तत्त्वज्ञान हे केवळ बौध्दीक चर्चेच्या पातळीवर राहते. तेव्हा ते कधीच क्रांती करू शकत नाही. ते कृतीत यायला हवे, असे उद्‌गार विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य हातकणंगलेकर यांनी मिरज येथे दलित विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंची भेट देण्याच्या समारंभात काढले. प्राचार्यांच्या हस्ते हा समारंभ मराठे हायस्कूलमध्ये पार पडला.[३९]''

**१४) अस्पृश्यता निर्मूलन करणाऱ्या गावांना बक्षिसे –**

गावागावातून अस्पृश्यता निवारण करणाऱ्या गावांना शासनाने बक्षीस योजना जाहीर केली. त्याप्रमाणे काही गावातून प्रयत्न सुरू झाले. ह्या स्तुत्य योजनेची बातमी पुढीलप्रमाणे –

''अस्पृश्यता निर्मूलन करणाऱ्या गावांकरिता शासनाने पहिले बक्षीस रूपये एक हजार व दुसरे बक्षीस रूपये पाचशे जाहीर केले आहे. ता. २५ फेब्रु. ७५ पूर्वी जिल्ह्यातील अस्पृश्यता निर्मूलन दक्षता समितीने गावांची नावे शासनाला सुचवावयाची आहेत. या गावाच्या निवडीसाठी १२ निकष लावले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत– १) गावातील पिण्याच्या पाण्याच्या सर्व विहिरी अस्पृश्यांना खुल्या असाव्यात २) सर्व देवालये, वसतिगृहे व खाजगी शाळा अस्पृश्यांना खुल्या असाव्यात ३) हरिजन वस्ती स्वच्छ असावी व जब अप्रोच रोड असावेत. ४) प्रौढ शिक्षणाची व बालवाडीची सोय हरिजनाकरिता असावी ५) हरिजनांना रोजगाराची सोय असावी ६) हरिजनांच्या आर्थिक उन्नतीसाठी गावकऱ्यांनी प्रयत्न केलेले असावेत. ७) गावात आंतरजातीय विवाह झालेले असावेत. ८) गावचे सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमात हरिजनांनी प्रामुख्याने भाग घेतलेला असावा. ९) वीज, पिण्यासाठी पाणी व गटार योजना हरिजन वस्त्यासाठी असावी १०) सवर्ण वस्तीमध्ये हरिजनांना घरे असावीत ११) सहभोजने वारंवार घडलेली असावीत ही माहिती अस्पृश्यता निवारण दक्षता समितीच्या बैठकीत सांगण्यात आली.[४०]''

**१५) मागास वर्गीयासाठी सांगली जिल्हा परिषद १० मार्च अखेर ४५ घरे बांधून पूर्ण करणार –**

सांगली जिल्हा परिषदेमार्फत ४५ घरे मागासवर्गीयांना बांधून दिली, त्याचे अनुकरण इतर जिल्हा परिषदेने करावे, त्याची बातमी–

''सांगली, ता. २५ – अस्पृश्य व मागासवर्गीय समाजासाठी भारत सरकारची घरे बांधून देण्याची योजना आहे. तर १० मार्च १९७५ पूर्वी सांगली जिल्हा परिषद २२० चौरस फूट क्षेत्रांची एकूण ४५ घरे पूर्ण करणार आहे.

या प्रत्येक घरासाठी तीन हजार रूपये खर्च येणार असून यापैकी दोन हजार रूपये भारत सरकार व एक हजार रूपये जिल्हा परिषदेने खर्च केले आहेत. काल जत तालुक्यातील बनाळी या गावी तीन घरांचे व माडग्याळ या गावी दोन घरांचे उद्‌घाट्न झाले. ही भारत सरकारची योजना फक्त सांगली जिल्हा परिषद देते. काटेकोरपणे राबविली आहे. याचे सर्व श्रेय समाजकल्याण समितीचे सभापती श्री. बाजीराव गोंधळे यांना आहे.

श्री. गोंधळे, आमदार श्री. एस.पी. बामणे, जत पंचायत समितीचे सभापती श्री. शिंदे यांनी काल बनाळी व माडग्याळ या दोन्ही गावांना भेटी देवून घरांचे उद्‌घाटन केले.[४१]''

**१६) सांगली जिल्हा परिषदेची मागासवर्गीय विद्यार्थी समाज कल्याण योजना –**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सांगली जिल्हा परिषदेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण योजना लागू केली. त्यामुळे बरीच दलित मुले–मुली शिकू लागली. दलित चळवळीला एक प्रकारे यश मिळाले, त्यासंदर्भातील ही माहिती –

''सांगली जिल्हा परिषदेने चालू वर्षी सन १९७५–७६ करिता जिल्हा परिषद वाढीव सेल मधून मिळणाऱ्या उत्पन्नातून मागासवर्गीयांचे कल्याणासाठी एक नवीन योजना हाती घेतली असून ती योजना म्हणजे पब्लिक स्कूल, सैनिक स्कूल मध्ये निवड होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक खर्चासाठी मदत ही होय.

या योजनेखाली सांगली जिल्ह्यातील ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पब्लिक स्कूल सैनिक स्कूलमध्ये निवड होईल व जे त्या शाळेत प्रवेश करतील अशा गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कपडे (युनिफॉर्म) व त्या बरोबर लागणाऱ्या प्राथमिक आवश्यक वस्तूंच्या खर्चासाठी मदत देणेत येईल. ज्या गरजू गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड झाली असेल त्या पब्लिक स्कूल, सैनिक स्कूल प्रमुखामार्फत, समाजकल्याण खाते, जिल्हा परिषद सांगलीकडे अर्ज करावा अर्जासोबत जातीबाबतचा दाखला व संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांची शिफारस जोडण्यात यावी म्हणजे अशा मागासवर्गी विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद समाज कल्याण खात्याकडून मदत यावर्षी मंजूर करण्यात येईल.[४२]''

**१७) मागासवर्गीयांना सवलतीने वीज–पुरवठा –**

मागासवर्गीय समाजातील दलित लोकांना सवलतीच्या दरात वीज कनेक्शन देण्याचे जाहीर केले. त्या धोरणानुसार इस्लामपूर वाळवा भागातील २६२ लोकांना सवलतीने वीजपुरवठा केला. त्याची प्रसिध्द झालेली बातमी–

''(बातमीदाराकडून) इस्लामपूर ता. ११ : वाळवा तालुक्यातील मागास वर्गीय समाजातील व्यक्तिंना वीज खर्चामध्ये सवलत देऊन वीज देण्याचे योजनेनुसार एकूण १७५२ अर्ज आले होते. त्यापैकी ७४२ लोकांनी रक्कम भरलेली आहे व २६२ लोकांनी विजेची कनेक्शन देण्यात आलेली आहेत. अशी माहिती महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे इस्लामपूर येथील असि. इंजिनियर श्री. परभणे यांनी वाळवा तालुका समन्वय व पूनर्वीलोकन समितीच्या सभेत दिली. अध्यक्षस्थानी आमदार राजारामबापू पाटील होते. तसेच वाळवा तालुक्यातील नूतन शिधा पत्रिका वाटप हक्क नोंदणी व खातेपुस्तिका वाटपाचे व २० कलमी आर्थिक कार्यक्रमाचे कार्यवाहीचे काम समाधानकारक असल्याची माहिती वाळवा तालुक्याचे तहसिलदार श्री. बी. एम. शेरकर यांनी दिली.[४३]''

### १८) मिरजेत मागास समाजाच्या विकासासाठी संस्था स्थापन –

मागास दलित चळवळीमुळे दलित समाज आपल्या हक्कांसाठी जागृत झाला होता. शासनाकडे त्यांच्या बऱ्याच मागण्या होत्या. त्याचा परिणाम होवून मिरजेत मागास दलित समाजाच्या विकासासाठी संस्था स्थापन झाली, त्याचा वृत्तांत–

''मिरज येथे दलित व आर्थिक दृष्टया मागास समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करण्याकरिता इन्स्टिट्युट ऑफ सेल्फ डेव्हलपमेंट ॲड सोशल ॲक्शन्स ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

या संस्थेच्या वतीने अवघ्या तीन चार महिन्यात शिक्षण देवून तयार करण्यात आलेल्या महिलांनी व विद्यार्थ्यांनी हस्त कौशल्याच्या वस्तू बनवल्या आहेत. त्यांचे प्रदर्शन डॉ. बायसिंगर वाचनालयाचे परिसरात भरविण्यात आले आहे.

समारंभाचे अध्यक्ष स्थान डॉ. एस. जी. चोपडे यांनी स्वीकारले होते. जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी श्री. सुरेश जोशी यांचे हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

विणकाम, भरतकाम, चर्मवस्तू वगैरे आकर्षक आहेत. त्या वस्तू अवघ्या तीन महिन्यात सुमारे पस्तीस हजार रूपये किंमतीच्या हातांनी तयार करण्यात आल्या असल्याची माहिती संस्थेचे प्रमुख संचालक श्री. अशोक साळवी यांनी सांगितले.[४४]''

**१९) मिरजेत चर्मकार सहकारी संघ नावाची संघटना स्थापन –**

मिरजेत व चर्मकार (मागासवर्गीय) लोकांची संख्या मोठी होती. त्यांनी आपल्या प्रगतीसाठी चर्मकार सहकारी संघ स्थापन केला. त्याचा हा वृतांत–

''मिरज हे चर्मोद्योगाचे बाबतीत महत्वाचे केंद्र आहे. मिरजेत पंचवीस चर्मोद्यागाचे छोटे कारखाने आहेत. पाचशे चर्मकार काम करतात. महिन्याला एक लाख चप्पल जोड (कोल्हापुरी) येथे तयार होवू शकतात. या छोट्या कारखानदारांनी मिरज चर्मकार सहकारी संघ नावाची संघटना स्थापन केली असून, त्यात सर्वश्री दाजी मराठे (कार्याध्यक्ष) सुधीर मकवान (कार्यवाह), दतोबा अमगे (सहकार्यवाह) सीताराम सातपुते (खजिनदार), श्रीपती भंडारे (तांत्रिक सल्लागार) असे अधिकारी आहेत. मिरज भागात सुमारे पाच हजार चर्मकार कोल्हापुरी चपला तयार करतात व हा सर्व माल दलाला मार्फत अमेरिका, जर्मनी, स्पेन, फ्रान्स आदी राष्ट्रात जात असतो. महाराष्ट्र राज्याच्या चर्मोद्योग विकासमंडळाचे खरेदी –विक्री विभागाचे प्रमुख व्यवस्थापक श्री. जे. एम. परमार यांनी मिरज भागातील चर्मकारांच्या अडचणी समजून घेतल्या व मार्गदर्शन करताना ते म्हणाले, सर्वांनी कोल्हापूरी चप्पल तयार न करता, कातड्याच्या ऐंशी प्रकारच्या वस्तू तयार करता येतात. त्यापैकी काही वस्तू कराव्यात त्याबाबत जरूर ते साह्य चर्मोद्योग मंडळ देवू शकेल, मिरज भागातील चर्मकारांच्या हातात कौशल्य आहे. तसे इतरत्र फारसे दिसत नाही. प्रयत्न केला तर मिरज चर्मोद्योगाचे बाबतीत कानपूरसारखे प्रसिध्द केंद्र होवू शकेल.[४५]''

### २०) भटक्या समाजातील महिलांना शिवण-शिक्षण -

भटका समाज सांगली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात होता व आजही तो मागासलेला असून त्याच्या उन्नतीसाठी, उपजीविकेचे साधन म्हणून महिलांना शिवण व शिक्षण देण्याचा उपक्रम शासनाने मिरजेत राबविला, त्याचा वृत्तांत-

''मिरज ता. ३ - महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागातर्फे जिल्हा परिषद व तालुका पंचायत समितीच्या सहकार्याने येथे भटक्या व निमभटक्या समाजातील महिलांना शिवण शिक्षण देण्याची अभ्यास सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. दीड वर्षाचा हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यास वीस महिलांना प्रमाणपत्रे व शिवणयंत्रे देण्याचा कार्यक्रम जि.प. अध्यक्ष श्री. आप्पासाहेब बिरनाळे यांच्या हस्ते संपन्न झाला. मिरज ता. पंचायत समितीच्या सभागृहात पार पडलेल्या या समारंभाचे अध्यक्षस्थानी आम. श्री. मोहनराव शिंदे होते. जुने कपडे घेवून भांडी विकणाऱ्या समाजातील या महिलांना हे कपडे पुन्हा विकताना या शिवण शिक्षणाचा व शिवण यंत्राचा फार मोठा लाभ होणार आहे. असे प्रास्ताविक भाषणात समाज कल्याण अधिकारी श्री. कुलकर्णी यांनी सांगितले. प्रत्येक यंत्रासाठी शासनातर्फे सहाशे रूपयाची मदत दिली आहे. असेही ते म्हणाले. जिल्हात आतापर्यंत असे चार अभ्यासक्रम पूर्ण झाले असून सध्या मिरजेस पाचवे सत्र सुरू आहे. अशीही त्यांनी माहिती दिली.[४६]''

### २१) मागासवर्गीयासाठी वाळवा ता. पंचायत समितीच्या विविध योजना -

वाळवा तालुका हा कै. राजारामबापू पाटील व त्यांचा मुलगा आमदार जयंतराव पाटील यांचा राजकीय बालेकिल्ला. त्या दोघांनी आमदार म्हणून वाळवे तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले व आजही करत आहेत. मागासवर्गीयांच्यासाठी शासकीय, निमशासकीय व स्वतः काही योजना अर्थमंत्री (दहा वर्षे) मा. जयंतराव पाटील यांनी राबविल्या. त्या विविध योजनांची माहिती पुढे दिली आहे.

''वाळवा तालुका पंचायत समितीने मागासवर्गीयांसाठी विविध योजना हाती घेतल्या असून सन ७७–७८ या वार्षिक वर्षात या योजनावर १ लाख पाच हजार ४९० रू. खर्च केले आहेत. आणि या योजना चालू सालीही सुरू ठेवल्या आहेत असे सभापती श्री. नारायण काका पाटील यांनी सांगितले.

मागासवर्गीय व त्यामध्येही गरीब असणाऱ्यांना दुय्यम व्यवसाय द्यावा यासाठी मोफत शेळ्या वाटण्याची योजना हाती घेण्यात आली आहे असे, सांगून सभापती म्हणाले की, गेल्या वर्षी यासाठी चौदा हजार रूपये खर्ची पडले आहेत. या समाजातील दुर्बल घटकांना म्हैशी खरेदी करण्यासाठी प्रत्येक म्हैशीमागे पंचाहत्तर टक्के किंमत अगर जास्तीत जास्त सातशे पन्नास रूपये देण्याचा कार्यक्रम हि पंचायत समितीने सुरू केला असून या योजनेवर मे अखेर ५९ हजार रूपये खर्च केले आहेत, असे सांगितले.

इतर योजनांचा तपशील सांगताना गट विकास अधिकारी श्री. महाजनी म्हणाले की, पिण्याच्या पाण्याची सोय करणे बियाणे पुरविणे, समाज मंदिरे बांधण्यासाठी व दुरूस्तीसाठी अनुदान देणे, हरिजन विद्यार्थ्यांना गणवेश करून देणे वगैरे कार्यक्रम पंचायत समितीने आखले असून ते राबविण्यात येणार आहेत.[४७]''

**२२) जिल्हा परिषदांनी मागासवर्गीयांवर ५ टक्के खर्च करावा –**

शासनाच्या धोरणानुसार ५% खर्च मागासवर्गीयावर करावा असे सांगली जिल्हा परिषदेने जाहीर केले. त्यानुसार काही काही योजना मागास दलित वर्गाच्या उन्नतीसाठी राबवल्या हे विशेष. दलित चळवळीच्या आंदोलनाला थोडे थोडे यश मिळत होते.

''नगरपरिषद आपल्या अंदाज पत्रकात मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी पाच टक्के रक्कमेची तरतूद करतात. परंतु प्रत्यक्ष असा खर्च होती की नाही याची पाहणी मा.जिल्हाधिकारी यांनी करावी. जर नगरपरिषदांकडून असा खर्च होत नसेल तर त्यांनी त्याबाबत योग्य ती कारवाई करावी अशी शिफारस वजा ठराव जिल्हा अस्पृश्यता निर्मूलन दक्षता समितीच्या सभेत सर्वांनुमते करण्यात आला. समाजकल्याण सभापती श्री. बाजीराव गोंधळे यांनी मांडलेल्या या ठरावास सर्वश्री देवीदास पोखर्णीकर, बी. एल. पवार, रंगराव बनसोडे

आदि. समिती सदस्यांनी अनुमोदन दिले. ज्या नगरपरिषदा भाड्याने देण्यासाठी दुकान गाळे बांधतात त्यापैकी पाचटक्के दुकाने मागासवर्गीयासाठी राखीव ठेवण्यात यावीत. तसेच त्यांना अनामत रक्कमेत सवलत मिळावी अशीही नगरपरिषदांना शिफारस करण्यात यावी असा निर्णय या सभेत घेण्यात आला.[४८]''

## २३) मागासवर्गीय सुशिक्षित बेकारांना कर्ज –

बेकारीचा प्रश्न सर्व समाजातील मुलांना भेडसावत होता. उच्चवर्गीय मुले काही उद्योगधंदा काढत होते. त्यांना थोडा आर्थिक स्त्रोत होता पण मागासवर्गीय सुशिक्षित बेकारांना आर्थिक समस्या भेडसावत असल्याने छोट्या मोठ्या धंद्यासाठी कर्ज द्यावी ही मागणी दलित चळवळीची होती. त्यामुळे मागासवर्गीय सुशिक्षित बेकारांना कर्जे मिळू लागले, त्याचा हा वृतांत–

''सांगली जिल्ह्यातील मागासवर्गीय सुशिक्षित बेरोजगार नवउद्योजक कोल्हापूर विभाग, कोल्हापूरचे विभागीय व्यवस्थापक श्री. शिवाजीराव कवठेकर हे आठवड्यातून प्रत्येक शनिवारी एक दिवस सांगली जिल्हा परिषद समाजकल्याण विभागात हजर राहून या समाजाच्या सुशिक्षित व कल्पक नवउद्योजकांनी त्यांचे उद्योग सुरू करणेबाबत म. फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे कर्ज मागणी अर्ज स्वीकारतील असे महामंडळातर्फे एका पत्रकाव्दारे जाहीर करण्यात आले आहे.

समितीचे अध्यक्ष श्री. आर. सी. अय्यर जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज दुपारी भरलेल्या सभेत प्रारंभी मागील सभेच्या कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली. नंतर समितीचे सचिव श्री. भा. ना. कुलकर्णी समाज कल्याण अधिकारी यांनी मागील सभेतील निर्णयावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा सभेत सादर केला.

सांगली जिल्हा पोलिस विभागात १३% ऐवजी १९% मागासवर्गीय – जिल्ह्यातील शासकीय व सहकारी संस्थामध्ये शासनाच्या धोरणाप्रमाणे किमान तेरा टक्के हरिजन मागासवर्गीयांचे प्रमाण रहावे या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असून रिकाम्या झालेल्या पोलीस पाटलांच्या जागी हरिजन पोलीस पाटील नेमण्याचा प्रयत्न

आहे असे सांगली जिल्हाधिकारी श्री. आर. सी. अय्यर यांनी स्पष्ट केले. जिल्हा अस्पृश्यता निर्मूलन दक्षता समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात श्री. अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

काही गावातून रिक्त झालेल्या पोलीस पाटलांच्या जागा मागासवर्गीय लोक पुढे येत असल्याने भरता आल्या नाहीत. तेव्हा या कामी मंडळींनी पुढे आले पाहिजे असे श्री. अय्यर म्हणाले. ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने नोकर आहेत. अशा सरकारी व सहकारी संस्थांची माहिती समिती जमा करत आहे. सांगली जिल्हा पोलीस विभागात मागास वर्गीयांचे प्रमाण एकोणीस टक्के आहे. अशी माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. व.न. देशमुख यांनी दिली.[८८] तेरा टक्के ऐवजी हे प्रमाण एकोणीस टक्के असल्याने समितीने समाधान व्यक्त केले.

सहकारी संस्थामध्ये मागासवर्गीय यांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी ज्या संस्थानी अद्याप उपनियम दुरूस्त केले नाहीत त्यांनी ते त्वरीत दुरूस्त करून घेवून मागासवर्गीय प्रतिनिधी को. ऑफ्ट करावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत असे सभेत सांगण्यात आले. जिल्ह्यातील १५४० सहकारी संस्थापैकी ७९३ संस्थांना ही तरतूद लागू होते. यापैकी ५५२ संस्थांनी मागासवर्गीय प्रतिनिधींना स्वीकृत करून घेतले आहे. अशीही माहिती यावेळी देण्यात आली.

मागासवर्गीयांना सवलतीच्या दरात विजेचे कनेक्शन देण्याच्या योजनेची मुदत शासनाने आणखी २ वर्षे वाढवून दिली आहे. अशी ही माहिती सभेत दिली गेली. प्रारंभी समाजकल्याण अधिकारी यांनी मागील सभेचा कार्यवृतांत वाचला व तो कायम केला.[४९],,

**२४) मागासवर्गीयांना धंद्यासाठी रू. ८७७८७ कर्ज वाटप –**

सांगली जिल्ह्यातील मागासवर्गीयांना ८७,७२७ रु. कर्ज मिळाले. त्यातून काही उद्योगधंदे उभे राहिले.

''सांगली जिल्ह्यातील सांगली, सांगलीवाडी, नेर्ले, रेवणगाव, तडसर, किल्लेमच्छिंद्र गड व भिलवडी यागावी म.फुले मागास वर्ग विकास महामंडळ (मर्या) सांगली जिल्हा कार्यालयामार्फत बँकेकडे पाठविलेली ३५

कर्जे प्रकरणे मंजूर होवून बँकेचे रूपये ७८६०५ व महामंडळाचे बीज भांडवल रू. ९१८२ असे मिळून एकूण रू. ८७७८७ रूपयांचे कर्जवाटप झाले. यापैकी २६ कर्ज प्रकरणे मातंग समाजाची आहेत.[५०]''

**२५) मागासवर्ग बेकारांना नोकरीचे मार्गदर्शन –**

दलित चळवळीने मागासवर्गीय बेकार उमेदवारांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून पहिल्यापासून आंदोलन सुरू केले होते. त्याचा परिणाम त्यांना नोकरीचे मार्गर्शन जिल्हा सेवा योजना कार्यालयामार्फत सुरू केले, त्याचा हा वृत्तांत–

''जिल्हा सेवा योजना कार्यालया तर्फे ता. १७–९–८० रोजी दुपारी १ वाजता उमदी तालुका, जत जि. सांगली येथे मागासवर्गीय बेकार उमेदवारांना नोकरी व स्वउद्योग याबाबत मार्गदर्शन करणेसाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यावेळी उमेदवारांना नोकरीचे मदतीसाठी नाव नोंदणी करणेसाठी ग्राम कार्यालय उमदी येथे व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी सदर ठिकाणी इच्छुक अशा मागासवर्गीय बेकार उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे दाखला कमी उत्पन्न गट विषयक आणि डी फॉर्म मधील प्रमाणपत्र खऱ्या नकला घेऊन हजर रहावे.[५१]''

**२६) अभियांत्रिकी वैद्यकीय शिक्षणात मागासवर्गीयांना सवलती–**

शिक्षणाचे महत्व कळल्यामुळे दलित मागासलेली मुले–मुली शिक्षण घेऊ लागली. त्यांना अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षण जास्त फीमुळे घेणे परवडत नव्हते. म्हणून बऱ्याच वेळा दलित चळवळीने फीविरुध्द आंदोलन केली. त्याचा परिणाम म्हणून शासनाने मागासवर्गीयांना सवलती दिल्या, त्याचा वृत्तांत–

''एप्रिल व मे म्हणजे वार्षिक परीक्षा व सुट्टयांचा मोसम. जूनपासून प्रवेशासाठी धावपळ सुरू होते. विशेषतः अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालये व तंत्रनिकेतनात प्रवेश मिळविण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थी पहात असतात.

याबाबतीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाने खास सोयी सवलती दिल्या आहेत. या संदर्भात हे मार्गदर्शन –इतर मागास उमेदवारांच्या बाबतीत गुणवत्तेवर आलेले उमेदवार विचारात घेवून १०% राखीव जागा असतात. गुणवत्तेत १०% पेक्षा जास्त उमेदवार असतील तर पुन्हा राखीव जागा असत नाहीत.

अनुसूचित जमाती, विमुक्त जमती व भटक्या जमातीच्या बाबतीत एखाद्या विद्यापीठ क्षेत्रात असे उमेदवार राखीव जागा भरण्यासाठी पुरेसे नसतील तर अतिरिक्त राखीव जागा इतर विद्यापीठ क्षेत्रात त्याच वर्गाचे जास्त उमेदवार असतील तर त्यांच्याकडून गुणवत्तेनुसार भरल्या जातात.

अभियांत्रिकी महाविद्यालयात असलेल्या होस्टेलमध्ये इतराबरोबरच मागासवर्गीय उमेदवारांनाही प्रवेश मिळू शकतो. जेथे मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी वसतिगृहे आहेत तेथे त्याठिकाणी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्थातच प्रवेश मिळतो.

याशिवाय पुस्तकपेढी, सवलतीची फी आकारणी या सवलतीचाही लाभ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळतो.

प्रवेशासाठी अर्ज करताना कोणकोणत्या गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या सर्व अर्जदारांना अर्जासोबत पुढीलप्रमाणे दाखले जोडावे लागतात–

१) ठराविक फॉर्ममध्ये वैद्यकीय दाखला

२) एस.एस. सी. अथवा समक्ष परिक्षेत मिळालेल्या मार्कशीटची खरी प्रत

३) प्रवेशपात्र परिक्षेत मिळालेल्या मार्कशीटची खरी प्रत

४) प्रवेश पात्र परिक्षानंतर शाळा संस्था सोडल्याचा दाखल्याची खरी प्रत

वरील दाखल्याशिवाय मागासवर्गीय उमेदवारांना अर्जासोबत पुढील दाखले जोडण्याची आवश्यकता आहे.

१) शाळा सोडल्याचा दाखला. (एस. एस. सी. अथवा समकक्ष परिक्षानंतर)

२) जातीसंबंधीच्या अधिक पुरावा बसणारा इतर कोणता दाखला.

उमेदवार एस. एस. सी अथवा प्रवेश पात्र परिक्षा महाराष्ट्रातील संस्थेतून पास नसतील तर त्यांना आई, वडील महाराष्ट्रातील स्थायिक आहेत यासंबंधी डोमासाईल असल्याची खरी प्रत पाठवावी लागते.

मागासवर्गीय उमेदवारांनी परिपूर्ण भरलेल्या दाखल्याच्या प्रतिसह अर्जाच्या दोन प्रती सादर करणे आवश्यक आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद येथे प्रवेश मिळण्यासाठी संबंधित विद्यार्थी १० वी १२ वी ची परिक्षा मराठवाडा विद्यापीठ क्षेत्रातून पास झाला असण्याची आवश्यकता आहे.[५२]''

**२७) राज्यातील तंत्रनिकेतन –**

अभियांत्रिकीपेक्षा तंत्रनिकेतन विद्यालयाचे महत्त्व ओळखून शासनाने राज्यात तंत्रनिकेतने सुरू केली. त्यात गरीब, मागासलेल्या दलित विद्यार्थी शिक्षण घेऊन नंतर त्यांना नोकऱ्या मिळाल्या. १० टक्के जागा ओबीसींसाठी राखीव ठेवण्यात आल्या.

''अभियांत्रिकी महाविद्यालयाखेरीज सध्या राज्यात पूर्णवेळ अभ्यासक्रम असलेली १८ शासकीय व २० अशासकीय तंत्रनिकेतन अशी एकूण ३८ तंत्रनिकेतने आहेत. त्यापैकी पाच तंत्रनिकेतनात अर्धवेळ अभ्यासक्रमही शिकविण्यात येतो. यापैकी दोन तंत्रनिकेतने येत्या जून महिन्यात सुरू होतील.

| | |
|---|---|
| १. वर्गीकृत जाती | १३% |
| २. वर्गीकृत जमाती | ७% |
| ३. विमुक्त व भटक्या जाती | ४% |
| ४. इतर मागासवर्गीय | १०% |

एकूण ३४ %

पहिल्या ३ संदर्भात राखीव जागा २४% असल्यातरी गुणवत्ताधारक यादित त्या संदर्भातील विद्यार्थी असल्यास त्यांना २४% पेक्षा अधिक जागा मिळू शकतात. या २४% राखीव जागा व सदर गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या जागा यांचे एकत्रित प्रमाण ४० % पर्यंतच मर्यादित ठेवले जाते. तसेच जर एखाद्या संदर्भात राखीव जागा शिल्लक असतील तर त्या इतर दोन संदर्भातील (विद्यार्थी अधिक असतील तर) विद्यार्थ्यांकडून भरण्यात येतात.

**इतर मागासवर्गीय विद्यार्थी –** गुणवत्तेवर राखीव असलेल्या १०% पेक्षाही अधिक जागा मिळवू शकतात. मात्र अशावेळी त्यांचे १०% जागांचे आरक्षण राहत नाही.

तंत्रनिकेतनात शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही पुस्तक पेढी, सवलतीची फी आकारणी यांचा लाभ मिळतो. तंत्रनिकेतनात प्रवेश मिळवण्यासाठी अर्जासोबत पुढील दाखले जोडावे लागतात.

१. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य अथवा तत्सम मंडळाचे (विद्यार्थी जर महाराष्ट्राबाहेरील असेल तर) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (अथवा तत्सम परीक्षा) उत्तीर्ण असल्याच्या दाखल्याची खरी प्रत.

२. आदिवासी प्रमाणपत्राची खरी प्रत (आदिवासी प्रमाणपत्र पित्याचे नावे असावे व पिता हयात नसल्यास मातेचे नाव असलेले आदिवासी प्रमाणपत्र सादर करावे.)[५३]''

**२८) मागासवर्गीय व नवबौध्दांना कर्ज पुरवठा –**

होतकरू व उद्योगी मागासवर्गीय व नवबौध्दांना शासनामार्फत अल्प व्याजदरात कर्जपुरवठा होऊ लागला, त्यासाठी काही वेळा दलित चळवळीने आंदोलने केली होती. त्याचा परिणाम म्हणून दलित युवकांना

कर्जपुरवठा मिळू लागला. त्यामुळे छोटे मोठे उद्योग सुरू झाले आणि आर्थिक प्रगती केली हे पुढील वार्ताकंनावरून दिसून येते.

''महाराष्ट्र शासनाच्या म. फुले मागासवर्ग विकास महामंडळातंर्गत, सांगली जिल्हा कार्यालयातर्फे जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजापैकी गरजू लोकांना विविध धंद्यासाठी कायम स्वरूपी गुंतवणुकीकरीता ५ हजार ते १२ हजार रूपयांपर्यत कमाल मर्यादा असलेली कर्ज प्रकरणे व याशिवाय खेळत्या भांडवलाकरिताही बँकेमार्फत अर्थ सहाय्य मंजूर करून देण्याची योजना राबविली जाते. याकरिता रिक्षा व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, दवाखाना,किराणा दुकान, कापड दुकान अशा प्रकारच्या प्रकल्पांना बीज भांडवल योजनेमार्फत अर्थसहाय्य केले जाते. एकूण प्रकल्प रक्कमेच्या ७५ % पर्यंतची रक्कम बँकेकडून कर्ज रूपाने व उर्वरित २५ % पर्यंतची रक्कम बीज भांडवल म्हणून महामंडळाकडून ४ % व्याज दराने कर्ज म्हणून दिले जाते. या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी जातीचा दाखला, तहशीलदाराकडून घेतलेला उत्पन्नाचा दाखला, कर्ज प्रकरण करणारी व्यक्ती, दारिद्र्य रेषेखालील असल्यास ग्रामसेवकाचा दाखला, शिधा पत्रिकेच्या पहिल्या व शेवटच्या पानाच्या प्रत्येकी दोन झेरॉक्स प्रति, स्वतःच्या छायाचित्राच्या पासपोर्ट आकाराच्या दोन प्रती, व्यवसायासंबंधी संपूर्ण माहिती दरपत्रकासह कार्यालयाकडे देणे आवश्यक आहे.[५४]

या योजनेचा लाभ मागासवर्गीय अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींनी घ्यावा. अधिक माहितीसाठी म. फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय सांगली 'पंचवटी' राजमाने बिल्डिंग क्र. १३, दक्षिण शिवाजीनगर, सांगली (अर्बन लॅन्ड सर्व्हिग कार्यालयाच्यावर) या पत्त्यावर संपर्क साधावा, असे प्रभारी जिल्हाधिकारी व्यवस्थापक कळवितात.''

इ) मेळावे, परिषदा / लोकदरबार / सभा

१) आज दक्षिण महाराष्ट्र मातंग परिषद :–

सांगली जिल्ह्यातील आष्टा हे समृध्द व महत्त्वाचे गाव आहे. माजी मंत्री व आधुनिक महाराष्ट्राचे एक शिल्पकार कासेगाव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. मा. राजारामबापू पाटील यांचे आष्टा गावात मातंग परिषद भरवली होती. त्यास दलित वर्गाने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावा, त्याचे अध्यक्षस्थान देशभक्त राजारामबापू पाटील हे भूषविणार आहेत, हे सर्व सांगली जिल्ह्यात महाराष्ट्रात माहिती व्हावे, मातंग समाजातील बांधवही मोठ्या प्रमाणात हजर रहावेत म्हणून पुढील वार्तापत्र, वर्तमानपत्रात प्रसिध्द केले. (मा. राजारामबापू पाटील हे मा. वसंतदादा पाटील यांचे सहकारी व सध्याचे महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माजी मंत्री, अर्थमंत्री आ. जयंतराव पाटील यांचे ते वडील होत.)

''आष्टा येथे शुक्र ता. १० रोजी द. महाराष्ट्र मातंग परिषद भरणार आहे. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी पू. स्वामी परमानंद भारती हे राहणार असून महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष – दे. भ. राजाराम बापू पाटील हे उद्‌घाटन करणार आहेत. ही परिषद यशस्वी करण्याच्या दृष्टीने कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने काम करीत आहेत.[५५]''

२) मागासलेल्या जमातींचा शिराळ्यात मेळावा :–

शिराळा तालुका हा सांगली जिल्ह्यातील सर्वात पश्चिम भागात विस्तारला होता. कोकण भाग असल्याने तेथे पाऊस भरपूर पडत असे. तसेच येथे जंगली भाग असल्यामुळे जमीन मध्यम व हलक्या प्रतीची होती. बरीचशी माणसे मुंबईला गिरणी मजूर म्हणून कामाला असत. त्यामुळे मुंबईत चालणाऱ्या दलित चळवळीचा परिणाम शिराळा तालुक्यातील दलित युवकावर होत असे. त्यामुळे आपल्या हक्कासाठी शिराळा तालुक्यातील दलित जनता नेहमी जागृत होती. म्हणून शिराळा पेट्यातील महार, नवबौध्द, मातंग, रामोशी, चांभार जमातीचा प्रचंड मेळावा आयोजित करून दलित व मागासलेल्या जनतेत जागृती केली. त्याचाच हा वृत्तांत–

''येथे ता. २७ रोजी शिराळा पेट्यातील महार नवबौध्द मातंग, रामोशी, चांभार या सर्व मागासलेल्या जमातीचा प्रचंड मेळावा श्री. डी. एन. पाटील अध्यक्ष द. सातारा जिल्हा काँग्रेस कमेटी यांचे अध्यक्ष ते खाली झाला. मेळाव्यास मागास वर्गातील सुमारे तीन हजार लोक हजर होते. मेळाव्याचे काम सायंकाळी चार ते रात्री ७ वा. पर्यंत चालले होते. मेळाव्याचे उद्घाटन ता. डी. झेड. पळसगावकर मंत्री नगरविकास महाराष्ट्र राज्य, यांचे हस्ते झाले. सर्व जातींच्या मागासलेल्या वर्गातील जमातींनी आपआपल्या मागण्या निवेदन केल्या व परिषदेत काही ठराव संमत झाले. सुरवातीस मातंग समाजातील कार्यकर्ते श्री. नरसु घाडगे व श्री. पांढरे गुरूजी यांनी स्वागत केले आणि काही मागण्या मांडल्या. श्री. डी. डी. पोटे चिटणीस शिराळा पेटा काँग्रेस कमिटी, श्री. बी. जी. कदम यांनी काही निवेदन केली. मेळव्यासाठी भव्य असा शामियाना उभारला होता. मेळाव्यासाठी आनंदराव नाईक, वि. ना. गायकवाड वगैरे कार्यकर्ते उपस्थित होते.

दुपारी चार वाजता प्रथम ना. डी. झेड, पळसपगार यांचे हस्ते शिराळा पेटा काँग्रेस कमेटीतील विजेच्या कनेक्शनचे उद्घाटन झाले.[५६]''

### ३) आ. भंडारे यांचा सत्कार –

आमदार भंडारे व आमदार मधाळे (अंकलखोप–सांगली) यांचा जाहीर सत्कार विटा रिपब्लिकन पार्टीने केला. त्या दोन आमदारांची सभा झाली. त्यांनी दलित बांधवांनी उद्बोधन केले.

''विटे येथील गांधी चौकात रिपब्लिकन पाटीतर्फे आम. आर. डी. भंडारे यांचा जाहिर सत्कार करणेत आला. याप्रसंगी आम. भगवानराव मोरे, आम. पी. टी. मधाळे, श्री. ए. ए. पवार श्री. के. एल. कांबळे यांची भाषणे झाली.[५७]''

### ४) जत तालुका हरिजनांची सभा –

सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ फक्त शहरात न राहता खेडोपाडीसुध्दा सुरू झाली. त्याचे उदाहरण म्हणजे दरीबडची, ता. जत येथे झालेली हरिजनांची सभा. या सभेत सुशिक्षित दलित वक्तयांनी ग्रामीण

भागातील दलित बांधवांचे प्रबोधन केले व आपले हक्क मिळविण्यासाठी चळवळ करणे क्रमप्राप्त आहे, असे संबोधले. नवीन कार्यकर्ते खेड्यापाड्यातून दलित चळवळीत भाग घेऊ लागले.

''सांगली जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे वतीने जत तालुक्यातील दरीबडी या गावी हरिजनांची सभा श्री. एन. वाय. कांबळे यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. यावेळी बी. डी. कांबळे, श्री. सुतळे वकिल व सांगलीकर आदि वक्त्यांची प्रचलित सरकार आणि काँग्रेस पक्ष यांच्या धोरणाविषयी भाषणे झाली. त्यानंतर ६ ठराव मंजूर करण्यात आले.[१३] त्यात हरिजनांना व गिरीजनांना खेड्यातील जमिनी कष्टासाठी मिळाव्यात, धान्याचे भाव खाली आणावेत, खेड्यातून हरीजनांना घरे बांधण्यासाठी सरकारकडून सहाय्य मिळावे हे महत्वाचे ठराव आहेत.[५८]''

## ५) मांग–गारूडी समाजाची सभा –

सांगली जिल्ह्यात मांग, गारुडी समाज मोठ्या प्रमाणात होता पण त्यांना स्वतःचे घर नसल्याने त्यांनी हौसिंग सोसायटी काढली. दलित नेत्यांनी त्यांना मार्गदर्शन केले, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे–

''सांगली जिल्ह्यातील मांग–गारूडी समाजाची जाहीर सभा येथील आंबराई बागेत श्री. शंकरराव निकम यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. यावेळी मांग–गारूडी समाजाच्या वतीने एक हौसिंग सोसायटी सुरू करण्याचे ठरले. सभेत श्री. शंकर सिदू चौगुले, रघुनाथ चौगुले, बाळासाहेब लोंढे आदी कार्यकर्त्यांची भाषणे झाली.[५९]''

## ६) मिरजेत एप्रिलमध्ये हरिजन परिषद –

महाराष्ट्र शासनाचे समाज कल्याण मंत्री व दलित नेते नामदार डॉ. टी. आर. नरवणे हे एक प्रभावी नेते होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली मिरजेत हरिजन परिषद झाली व त्यांनी आपल्या भाषणात दलितांचे हक्क व शासकीय सवलतीसंबंधी माहिती दिली, त्याचा हा वृत्तांत –

''मिरज तालुक्यातील हरिजन बंधूची परिषद मिरज येथे एप्रिलमध्ये भरणार आहे. या परिषदेचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण खात्याचे मंत्री ना. डॉ. टी.आर. नरवणे यांचे हस्ते होणार आहे. परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून मिरज तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब बिरोजे यांची निवड झाली असून कार्याध्यक्ष म्हणून श्री. भिकाजी दाजी सातपुते यांना निवडण्यात आले आहे. श्री. ग. द. कुंभार हे सरचिटणीस म्हणून काम पहाणार आहेत.[६०]''

**७) सांगलीत आज नवबौध्द व हरिजनांचा मेळावा –**

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू ह्यांची कॉंग्रेस पक्षाच्या वतीने सांगलीत प्रथमच १९६२ ला सभा आयोजित केली होत.पंडीत जवाहरलाल नेहरू हे एक आंतरराष्ट्रीय किर्तीचे नेते व बहुजन समाजाचे उध्दारकर्ते, समाजवादी विचाराचे नेते होते. त्यांच्या सभेला प्रचंड गर्दी होती. इतर समाजाप्रमाणे दलित वर्गानेही गर्दी केली होती. समाजातील कमकुवत व दलित वर्गाकडे पाहण्याचा पंडीत नेहरू यांचा दृष्टीकोन दयाळू व उदार होता, त्याचा हा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

''ना. पळसपंगार मेळाव्याचे अध्यक्ष पं. नेहरूच्या आगमनप्रसंगी रविवार ता. ११ रोजी सकाळी ११ ते ३ पर्यंत सांगली जिल्ह्यातील बौध्द पूर्वास्पृश्य समाजाचा सयुंक्त समाजोध्दारक मेळावा भरणार असून या मेळाव्यासाठी रत्नाकर पोहे कारखाना पटांगण विश्रामबाग ही जागा निवडण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ना. बाळासो पळसपगार हे असून उद्‌घाटक ना. वि.स. पागे आहेत. स्वागताध्यक्ष बौध्द सेवक डी. के. उर्फ दादासो पोखर्णीकर असून समारोप श्री. बी. एल. पवार करणार आहेत. या मेळाव्याचे मार्गदर्शक आम. वसंतराव पाटील, ॲड. पी. एन. पेंढारकर वकील (धुळे), श्री. माधवराव बागल, श्री. विठ्ठलराव गाडे (कराड), श्री. राजाराम बापू पाटील, ॲड. बी.बी.एन. शेलार वकील (पुणे), ॲड. एन. बी. निकुंभ वकील (मुंबई) आदि प्रमुख मंडळी आहेत.[६१]''

## ८) माझा रोख ब्राम्हण जातीवर नसून वर्ण व्यवस्थेच्या धर्मावर आहे!

नामदार यशवंतराव मोहिते हे पुरोगामी विचाराचे महाराष्ट्रात एक नेते होते. त्यांची सांगलीत सभा झाली. त्यांची चातुवर्ण्यावर व जाती व्यवस्थेवर टीका केली. बरेचसे दलित कार्यकर्ते या व्याख्यानास उपस्थित होते, त्याची बातमी–

''ना. मोहिते यांचे सांगलीतील शिबीरात ठाम प्रतिपादन – ''शाहू जयंति निमित्त मुंबईत मी जे बोललो तोच विचार या देशातील ही आजची परिस्थिती बदलायची असेल तर मी बोललेल्या विचारानेच ती बदलेले अन्यथा नाही. बुध्दीवादाने कुणीही माझा विचार चुकीचा आहे असे सिध्द करून पटविले तर तो मी चूकीचा समजेन. या देशात जो धर्म आहे, त्या हिंदू धर्मात चातुर्वर्ण्य समाज व्यवस्था सांगितली, त्यात माणसा माणसात जो भेदाभेद उच्चनीचता राहिली, त्यामुळे आम्ही खूप मागे पडलो याला केवळ ब्राम्हण वा मराठा हे उच्च वर्णीय जबाबदार आहेत. माझ्या भाषणातील टीकेचा रोख केवळ ब्राम्हण जातीवर नसून वर्णव्यवस्थेच्या धर्मावर आहे, असे उद्‌गार महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण खात्याचे मंत्री मा. यशवंतराव मोहिते यांनी काल सायंकाळी येथे भरलेल्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबीरात बोलताना काढले.[६२]''

## ९) बौध्द, मागासवर्गीय, भटक्या जमातींचा मेळावा–

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुका तसा नेहमीच दुष्काळी व मागासलेला. त्या ठिकाणी जनजागृतीसाठी बौध्द मागासवर्गीय भटक्या जमातींचा मेळावा आयोजित केला. त्याचे नेतृत्व दलित चळवळींनी केले त्यासंदर्भातील बातमी पुढीलप्रमाणे–

''कवठेमहांकाळ तालुक्यातील बौध्द, मागासवर्गीय व भटक्या जमाती व त्यातील कार्यकर्त्यांचा एक मेळावा कवठेमहांकाळ येथे ता. ३ रोजी झाला. सुमारे पाच हजार स्त्रीपुरूष त्यासाठी जमले होते. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या २० कलमी कार्यक्रमावर मार्गदर्शन व त्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींचा या मेळाव्यात विचार करण्यात आला.

समाज कल्याण खात्याचे सभापती श्री. बाजीराव गोंधळे व पंचायत समितीचे सभापती श्री. गणपतराव ओलेकर यांनी सदर मेळावा आयोजित केला होता.[६३]''

**१०) मागासवर्गीय शिक्षक परिषदेस सांगलीचे शिक्षक जाणार –**

शिक्षण घेऊन काही दलित नवयुवक शिक्षक झाले होते. त्यांचे काही प्रश्न समस्या होत्या. त्यासाठी मागासवर्गीय शिक्षक परिषदेस सांगली जिल्ह्यातील शिक्षकाने जावून भाग घेतला, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे–

''महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक परिषद शाखा सांगलीच्या वतीने तालुका पंचायत समिती सभागृहात ४०० मागासवर्गीय शिक्षकांचा मेळावा भरला होता. सभेच्या अध्यक्ष स्थानी कोल्हापूर येथे ता. २८.८.७७ रोजी भरणाऱ्या राज्यव्यापी दलित शिक्षक परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. दिनकरराव यादव हे होते. मेळाव्यात मागासवर्गीय शिक्षकांच्या बदल्या, बढत्या, नेमणुका व इतर सामाजिक अन्याय प्रकरणावर चर्चा झाली. या सर्व समस्या जिल्हा स्तरावर पदाधिकारी व अधिकारी यांना भेटून समक्ष चर्चा करून सोडवून घेण्याचे ठरले. राज्य संघटक श्री. गो. आ. थोरात यांनी सर्वांचे आभार मानले व परिषदेस सांगली जिल्ह्यातून १००० प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याची घोषणा केली.[६४]''

**११) सांगली जि. प. भरलेल्या एका सभेत उपाध्यक्ष श्री. विलासराव शिंदे यांची ग्वाही –**

विलासराव शिंदे हे जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना सांगलीत शिक्षक भवन बांधून देण्यासाठी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली. मागासवर्गीय शिक्षकांना आनंद झाला ती बातमी पुढीलप्रमाणे–

''सांगलीत शिक्षक भवन बांधण्यासाठी जागेची उपलब्धता निर्माण झाली असून ५० हजार रू. ची तरतूदही झाली असल्याने या कार्याचा शुभारंभ लवकरच करू अशी माहिती जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. विलासराव शिंदे यांनी शिक्षक दिनाचे कार्यक्रम ठरवणेसाठी बोलविलेल्या सभेत दिली. ही सभा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. आप्पासाहेब बिरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या वसंतराव दादा पाटील सभागृहात झाली.

जिल्हा परिषदेने नाटकाचे कार्यक्रम करून दोन वर्षापूर्वी खर्च वजा जाता रू. ३० हजार जमा केले असून या वर्षात असाच प्रयत्न केला जाईल असेही श्री. शिंदे यांनी सांगितले. शिक्षक दिनाचे दिवशी ज्या गुणी शिक्षकांचा सत्कार सांगलीत करण्यात येईल त्यांना येण्या–जाण्याचा खर्च देण्याची तरतूद जिल्हा परिषदेने केली असल्याचे त्यांनी सांगितले.[६५]''

### १२) मागासवर्गीय शिक्षकांच्या बदल्या सोईच्या होणार –

मागासवर्गीय शिक्षकांच्याबदल्या सोयीच्या ठिकाणी होणार, त्यांच्यावर अन्याय होणार नाही, म्हणून शिक्षण सभापती विलासराव शिंदे यांनी जाहीर केली, त्याची बातमी

''मागास वर्गीय शिक्षक परिषद सांगली शाखेच्या वतीने सांगली शहर शाखेचे अध्यक्ष श्री. गो. आ. थोरात यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे शिष्टमंडळ श्री. विलासराव शिंदे, शिक्षण समिती सभापती जि. प. सांगली यांना भेटले.

जवळ जवळ एक तास मागासवर्गीय शिक्षकांच्या बदल्या, बढत्या, नेमणुका व इतर अडीअडचणीवर मनमोकळेपणाने चर्चा झाली. या चर्चेत मागास वर्गीय शिक्षक परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. दिनकरराव यादव यांनी प्रत्येक प्रकरण श्री. विलासराव शिंदे यांना समजावून दिले. चर्चेत श्री. विलासराव शिंदे यांनी सर्व अडीअडचणी अत्यंत आपुलकीने समजावून घेतल्या व ते म्हणाले मागासवर्गीय शिक्षक हा कामसू शिक्षक आहे. त्यांच्या रास्त तक्रारी मी सहानभुतीने सोडविण्याचा प्रयत्न केला आहे व यापुढेही करीन.[६६]''

### १३) दलित शिक्षक परिषदेचे सुस्वागत –

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मागासवर्गीय दलित शिक्षक परिषद भरली होती. सांगली जिल्हा हा शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात समाविष्ट होता. या परिषदेसाठी सांगली जिल्ह्यातील दलित शिक्षकसुध्दा हजर होते, त्याचा हा वृत्तांत–

''आजपासून कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या प्रशस्त 'शाहू सभागृहा'मध्ये महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक परिषदेच्या वतीने राज्य दलित शिक्षक परिषद संपन्न होत आहे. या परिषदेला महाराष्ट्रातील २० जिल्ह्यातून ३००० प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. कोल्हापूरमध्ये भरणारे दलित शिक्षक परिषदेचे हे तिसरे अधिवेशन असून पहिले अधिवेशन भरविण्याचा बहुमान कोल्हापूर शहरालाच मिळाला होता. आज सुरू होणाऱ्या या अधिवेशनाला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री ना. दादासाहेब रूपवते लाभले आहेत. ना. रूपवते हे दलितांचे एक पुरोगामी आणि झुंजार नेतृत्व आहे. दलित युवकांना आणि शिक्षक कार्यकर्त्यांनी ते अत्यंत वस्तूनिष्ठ मार्गदर्शन करतील यात शंका नाही. या अधिवेशनाच्या उद्घाटनाची जबाबदारी आमच्याकडे सोपवण्यात आली आहे. या स्तंभामधून आम्ही दलितांच्या दुःखांना आणि गाऱ्हाण्यांना वेळोवेळी वाचा फोडली आहे. या परिषदेच्या निमित्ताने दलित बांधवांच्या सहवासात काही क्षण घालविण्याची आणि त्यांच्याशी मोकळेपणाने बोलण्याची संधी आम्हाला लाभत आहे. हे आम्ही आमचे भाग्यच समजतो. या परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून श्री. दिनकरराव यादव यांची नियुक्ती केली आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून श्री. दिनकरराव यादव यांची नियुक्ती केली आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द अत्यंत नेत्रदीपक ठरलेली आहे. श्री. यादव हे बहूजनसमाजातील अत्यंत तळमळीचे कार्यकर्ते असून दलितांच्या उत्कर्षासाठी काम करण्यात ते नेहमीच आघाडीवरच असतात. या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबा आढव आणि पुण्याचे माजी महापौर श्री. भाऊसाहेब चव्हाण उपस्थित राहत आहेत. डॉ. बाबा आढाव यांनीही एक गाव एक पाणवठा यासारखा एकतेचा अभिनव कार्यक्रम हाती घेऊन खेड्यापाड्यामध्ये त्यांनी दलित बांधवासाठी सार्वजनिक विहिरी खुल्या करून एक क्रांतिकारक पाऊल उचलले आहे. श्री. भाऊसाहेब चव्हाण हेही दलितांचे दमदार नेते आहेत. असे उत्कृष्ट मार्गदर्शक या परिषदेला लाभत असल्यामुळे ही दलित शिक्षक परिषद स्मरणीय ठरेल यात शंका नाही. दलित शिक्षक परिषदेला कोल्हापूर हे स्थान निवडण्यात संयोजकांनी मोठे औचित्य दाखवले आहे. कारण महाराष्ट्रामध्ये अस्पृश्योध्दाराचा झेंडा अग्रभागी फडकवणाऱ्या धुरिणामध्ये कोल्हापूरच्या राजर्षि शाहू महाराजांचे नाव प्रथम घ्यावे लागेल. किंबहुना कोल्हापूर आणि दलित अधिवेशन ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. ज्या काळात

अस्पृश्य जमातील समाज गावकुसाबाहेर ठेवत होता. अशा काळात राजर्षि शाहू महाराजांनी अस्पृश्योध्दाराचे कार्य हाती घेतले. दलितांच्या उध्दाराची घोषणा त्यांनी कार्यवाहीत आणली. स्वतःच्या संस्थानामध्ये त्यांनी दलितांना शासकीय कारभारामध्ये सामावून घेतले. त्यांना माणुसकीचे हक्क बहाल केले. राजर्षि शाहू महाराज केवळ बोलघेवडे सुधारक नव्हते तर त्यांनी दलितांचा उध्दार कृतीने सिध्द केला होता. अशा या शाहू रायांच्या क्रांतिभूमीमध्ये भरणाऱ्या दलित शिक्षक परिषदेला एक ऐतिहासिक महत्व आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये सुमारे १७००० दलित शिक्षक असून त्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक महाविद्यालयीन आणि कला शिक्षकांचाही अंतर्भाव आहे. दलितांचे नेते. स्व.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक स्वप्न होते की प्रत्येक दलित बांधव केवळ साक्षरच नव्हे सुशिक्षितच नव्हे तर उच्चशिक्षित व्हावा आणि त्याने शासनामधील उच्च पदे विभूषित करावीत. आज समाजामधील एकंदर चित्र पालटलेले दिसते. दलित समाजामधील बहुसंख्य तरूण शिक्षण घेत आहेत. पदवीधर होत आहेत. शासनानेही दलित समाजाला आर्थिक सवलती दिलेल्या असल्यामुळे डॉ. आंबेडकरांचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरत आहे. तथापि अजूनही या दलितासमोर अनेक सामाजिक समस्या उभ्या आहेत, अजूनही समाज दलितांना आपल्यामध्ये सामावून घेत नाही. शिक्षक म्हणून दलित समाजातील तरूण खेड्यापाड्यात काम करीत असतात. परंतू त्यांना अत्यंत खडतर परिस्थितीमध्ये काम करावे लागते. केवळ हे शिक्षक पददलित समाजातील आहेत. म्हणूनच त्यांच्या समोर ज्या अनेक समस्या उभ्या असतात, त्यांना या परिषदेमध्ये वाचा फुटेलच, परंतु समाजातील इतर घटकांनाही दलितांचे दुःख समजावून घेतले पाहिजे. अजूनही हरिजनावरील अत्याचारांच्या कथा आपल्याला पदोपदी घडताना आढळून येतात. ही गोष्ट काही समाधानकारक नाही. तसेच भारतीय राज्यघटनेप्रमाणे दलित समाजाला जी शैक्षणिक आर्थिक व नोकऱ्यांची हमी देण्यात आली आहे, त्यासंबंधी अजूनही योग्य ती कार्यवाही होत नाही, अशी त्यांची तक्रार आहे. नवबौध्दांना अन्य पददलिता प्रमाणे मध्यवर्ती सरकारच्या खात्यातील सर्व प्रकारच्या व श्रेणीच्या नोकऱ्या बढत्या व सवलती मिळाव्यात अशी या परिषदेची मागणी आहे.[६७]

**फ) जिल्ह्यातील निवडणुका व राखीव जागासंबंधी**

**१) मिरज न. पा. च्या कार्य समित्यांची एकमताने निवड :–**

मिरज नगरपालिकेत काही समितीमध्ये दलित समाजाला प्रतिनिधीत्व दिले होते. त्याची माहिती पुढील वार्तापत्रात नमूद केली आहे. त्यावरून दलित समाजातील मिरजेतील कार्यकर्ते सक्रीय होत व ते दलित चळवळीच्या वाटचालीत महत्त्वाचे काम करीत होते.

''मिरज नगरपालिकेची सर्वसाधारण सभा भरून निरनिराळ्या कार्य समित्यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे सर्व समित्या एकमताने निवडल्या गेल्या. श्री. शिवाजीराव धुळूबुळू अध्यक्ष स्थानी होते. पुढीलप्रमाणे समित्या एक वर्षाच्या मुदतीत काम करतील.

**अ) स्थायी समिती –**

१. शि. कृ. धुळूबुळू (कार्याध्यक्ष) २. दे. धो. खाडीलकर ३. सौ. कृष्णाबाई वाघमोडे ४. शमसूदिन इनामदार ५. डी. एन. मकवान ६. एच. ए. के पटेल ७. कासीमसाहेब मेस्त्री ८. स. स. पोळ. ९. शं. गु. गाडवे

**ब) शिवण समिती –**

१. डी. एन. मकवान (कार्याध्यक्ष) २. सौ. सुशीलबाई एरंडोले ३. शं.रा. कोरे ४. कृ. वि. गोखले ५. दा. रा. जामदार ६. रा. गो. फडके ७. सौ. सुशिला पाटील ८. डी. यू. बारगीर ९. नबीसाहेब मुश्रीफ.

**क) सार्वजनिक बांधकाम खाते –**

१. देवराव खाडीलकर (कार्याध्यक्ष) २. एम. एस. कलगुटगी ३. डी. यू. बारगीर ४. एन. ए. माने ५. ग. कृ. माळवदे ६. पा .के. मंडलीक ७. ग. द. शिंदे ८. बी. एम. पाटील व मो. आ. रजपूत

**ड) पाणी पुरवठा व जलविस्तरण –**

१. एच. ए. के. पटेल (कार्याध्यक्ष) २. वि.सं. कासीद ३. कृ. वि. गोखले ४. एम.बी. पाटील ५. म.वि. चिवटे ६. मो. रजपूत. ७. एच. ए. माने ८. ग.द. शिंदे ९. स.स. पोळ

**इ) आरोग्य व वैद्यक –**

१. एस. आर. इनामदार (कार्याध्यक्ष) २. आर. बी. आग्रवाल ३. सौ. सुशीलाबाई एरंडोले ४. का.ल. कांबळे ५. शं. रा. कोरे ६. शं. गु. गाडवे ७. बी. एम. पाटील ८. डॉ. गो. अ. साठे ९. ल. रा. भोसले

**फ) नियोजन व विकास खाते –**

१. सौ. कृष्णाबाई वाघमोडे २. आर. बी. आग्रवाल ३. ल. ब. कुरणे ४. दा. रा. जामदार ५. ल. रा. भोसले ६. न. म. मुश्रीफ ७. के. एच. मेस्त्री ८. डॉ. गो. अ. साठ्ये ९. का. ल. कांबळे[६८]''

**२) येत्या निवडणुकीतील विरोधी पक्षांचे संभाव्य उमेदवार –**

हरिजन जागेसाठी सांगली जिल्ह्यातून एका राखीव जागेवर पी. टी. मधाळे हे विधानसभेची निवडणूक लढविली, त्याचा वृत्तांत–

''जिल्ह्यातील येत्या सार्वत्रिक निवडणुकीत विरोधी पक्षाचे वतीने प्रजा समाजवादी पक्ष, संयुक्त महाराष्ट्र समिती आणि जनसंघ हे आपआपले उमेदवार जिल्ह्यात उभे करण्याच्या तयारीस लागले आहेत. शिराळा भागात श्री. वाय. सी. पाटील, तासगांव पूर्वभागात श्री. भगवानराव पाटील, तासगांव पश्चिम भागात श्री. जी. डी.लाड सांगली विभागात श्री. भगवानराव सूर्यवंशी याशिवाय हरिजनांच्या जागेसाठी श्री. पी.टी. मधाळे हे उभे राहणार.[६९]''

### ३) सांगली जिल्हा प्र. स. पक्ष कार्य कारिणीची बैठक :–

सांगली जिल्ह्यातून आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी झाली. त्यावेळी सांगली जिल्ह्यातील (कांबळे गट) रिपब्लिकन पक्षाशी विचारविनिमय तिकिट वाटपासाठी काही पक्षांनी चर्चा केली. कारण सांगली जिल्ह्यात दलित मतदार मोठ्या प्रमाणात होते. म्हणून इतर राजकीय पक्षांना त्या दलित नेत्यांची गरज वाटू लागली असे दिसते.

''**आगामी सार्वत्रिक निवडणुकीवर विचार विनिमय –**

सांगली जिल्हा प्र. समाजवादी पक्षाच्या कार्यकारणीची व निमंत्रिताची बैठक महाराष्ट्र प्रजासमाजवादी पक्षाचे सरचिटणीस आ. शिवाजीराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवार अर्ज व जिल्ह्यातील परिस्थिती याची पहाणी करण्याकरिता आ. शिवाजीराव पाटील हे आले होते. या जिल्ह्यातील एकूण सर्वमतदार संघाचा विचार करून पक्षाने सांगली मिरज, तासगांव पश्चिम व तासगांव पूर्व व आटपाडी मतदार संघाची लोकसभेची जागा लढविण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत प्र.स. पक्षाचे ध्येय व धोरणाला अनुकूल अशा कांबळे गट रिपब्लिकन पक्षाची अधिक पातळीवर आम्ही वाटाघाटी करू इतरांशी आम्ही कोणत्याही परिस्थितीत निवडणूक करार करणार नाही. असे आ. पाटील यांनी सविस्तर सांगितले.

**सल्लागार समिती –** सांगली प्रजासमाजवादी पक्षाची निवडणुक यंत्रणा उभी करण्याबाबत विचार होवून पुढील कार्यकर्त्याची जिल्हा सल्लागार समिती निवडण्यात आली. १. जिल्हा चिटणीस श्री. धोंडीराम माळी, गणपतराव कोळी २. श्री. बाबुराव पेठकर ३. डॉ. खोत. ४. श्री. गणपतराव कोळी. ४. काका पाटील हातनुर

उमेदवारीसाठी पक्षाकडील अर्ज या जिल्ह्यातून पक्षाकडे पुढीलप्रमाणे अर्ज मागविण्यात आले आहेत. सांगली मतदारसंघ १. डॉ. भ. आ. खोत २. श्री. आण्णासाहेब देवर्षी ३. श्री. मलिंद्र दडगे व ४. नगरपिते गणपतराव काळे, मिरज संघ १. श्री. गणपतराव माळवदे मिरज संघ २. नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. रामभाऊ गुरव ३. नगरपिते श्री. काशिम मेस्त्री व ४. नगरपिते श्री. शंकरराव चिकोडी पश्चिम सोया. तासगांव,

तासगांव पश्चिम आ. गणपतराव कोळी, श्री. काका पाटील, श्री. माधवराव माने तासगांवपूर्व व आटपाडीची बाबूराव केळकर २. काका पाटील  ३. हरिभाऊ खुजट

करीता – १. आ. गणपतराव कोळी २. बाबुराव पेड

इ. अर्ज आले आहेत. येत्या १९ व ३० रोजी महाराष्ट्र प्र.स. पक्षाची कार्यकारणी, जिल्हा चिटणीस प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक होणार आहे. त्यात या अर्जाची छाननी होवून एक यादी तयार करण्यात येईल व ती राष्ट्रीय कार्यकारिणी, पार्लमेंटरी बोर्ड व नॅशनल सारनाथ येथे ता. ७ अखेरीला भरणाऱ्या बैठकीपुढे करण्यात येईल.

मिरज नगरपालिकेच्या निवडणुका येत्या ४ डिसेंबर रोजी होणार आहेत. त्या निवडणुकीच्या दृष्टीने कार्यकारणीने विचार करून नवीन नेमलेल्या सल्लागार समितीला याबाबत स्थानिक कार्यकर्त्यांशी विचार विनिमय करून निर्णय घेण्याचा अधिकार दिले.[७०]''

**४) सांगली जिल्ह्यातील काही काँग्रेस उमेदवार :–**

तीन लाखापेक्षा जास्त जनता सांगलीतील पं. नेहरूंच्या सभेसाठी जमा झाली. नेहरूंनी आपल्या भाषणात आर्थिक क्रांती यशस्वी करून दीनदुबळ्या दलित समाजाची उन्नती करू असा स्फूर्तिदायक संदेश जनसमुदायास दिला, त्याचा वृत्तांत–

''**शिराळा मतदारसंघ – श्री. वसंतराव आनंदराव नाईक**  – शिराळा पेट्यातील चिखली गावचे तरूण नेते. अवघ्या २४ वर्षाच्या या तरूणाला काँग्रेसने आपला शिराळा मतदारसंघाचा उमेदवार म्हणून उभे केले आहे. याचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण कासेगाव येथील श्री. राजारामबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या आझाद विद्यालयात झाले आहे. इतिहास आणि राज्यशास्त्र हे विषय घेवून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी पदवी परीक्षा दिली आणि बी. ए. झाले.

विद्यार्थी दशेतच पाच वर्षे तालुका युवक कॉंग्रेसचे संघटक म्हणून त्यांनी काम केले आहे. भारतीय कृषक समाजाचे आजीव सदस्य शिराळे येथील स्वामी विवेकानंद सेवा आश्रम या शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून तेथे ते काम करतात. या संस्थेचे ते पेट्रन सभासदही आहेत.

शिराळा पेटा हा भौतिकदृष्ट्या मागासलेला असला तरी राजकीयदृष्ट्या पुरोगामी आहे. म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्य लढ्यात या भागाने आपला उज्वल इतिहास चिरंतन राहील अशी कामे केली आहेत. सामाजिक आणि सार्वजनिक, तसेच राजकीय कार्याचे संस्कार तरूण नव्या युगातील शिराळा पेट्याचा नवा विधायक इतिहास निर्माण करण्यात यशस्वी होईल याची खात्री पटते.[७१]''

### ५) विटा मतदारसंघ (राखीव)

सांगली जिल्ह्यातील शिराळा मतदार संघाच्या उमेदवाराची माहिती दिली आहे. दलित नेत्यांनी पाठिंबा दिला होता.

''श्री. भगवानराव लालासाहेब पवार – १९३२ साली पेठ ता. वाळवे येथे श्री. भगवानराव यांचा जन्म झाला. वडील श्री. लालासाहेब तुळशीराम पवार हे प्राथमिक शिक्षक आणि त्याचप्रमाणे सत्यशोधक चळवळीतही काम करीत होते. प्राथमिक शिक्षण वडिलांच्या नोकरीमुळे वडगाव हवेली जि. सातारा येथे झाले. स्वातंत्र्याच्या चळवळीने सारा सातारा जिल्हाच भारलेला होता. बालपणीच कॉंग्रेसचे संघटनात्मक संस्कार मनावर घेवून श्री. भगवानराव यांनी आपले दुय्यम शिक्षण इस्लामपूर येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी पुण्यास वडिया कॉलेजमध्ये गेले. तेथेच त्यांनी बी.ए. ची पदवी संपादन केली.

कॉलेज शिक्षण चालू असताना त्यांनी सार्वजनिक कामात भाग घेण्यास सुरवात केली, १९५५ साली आपल्या विद्यार्थी दशेतच त्यांनी ''मुंबई राज्यमागास वर्ग विद्यार्थी संघटना'' स्थापन केली. ते त्या संघटनेचे अध्यक्षही होते. १९५७ साली पुणे येथेच लॉ कॉलेज मध्ये त्यांनी शिक्षण घेण्यास सुरूवात केली. विद्यार्थी

दशेतील बराचसा काळ मागास वर्गातील विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी निरनिराळ्या संघटनामार्फत फार प्रयत्न केले.

कायद्याची परीक्षा उत्तीर्ण होताच पुढील उच्च अभ्यासक्रम चालू ठेवून निरनिराळ्या विद्वान लोकांशी राजकारणावर चर्चा करीत करीत श्री. पवार हे शेवटी या निष्कर्षावर आले की, आपण नोकरी केली तर आपल्या कुटूंबाचे कल्याण होईल पण म. गांधीजी आण कै. बाबासाहेब आंबेडकर यांनी कालच्या हरिजन आणि आजच्या नवबुध्द समाजाच्या उध्दारासाठी सतत कष्ट घेतले. या समाजाच्या उध्दारासाठी सतत कष्ट घेतले. या समाजाच्या सवेचे काम जास्त मोलाचे. मनाचा हा निर्णय झाल्यावर श्री. पवार यांनी सरकारी नोकरीचा मोह सोडला आणि महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी काँग्रेस प्रवेश केला. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी नेतृत्वावर गाढ विश्वास आणि दलित समाजाबद्दलची खरी कळकळ हा श्री. पवार यांचा निकष आहे.

दलित समाजातील या नव्या विचाराच्या, नव्या दृष्टीकोनाच्या तरूण आणि तडफदार नेत्याला काँग्रेस पक्षाने सांगली जिल्ह्यातील विटे या राखीव मतदार संघात काँग्रेस उमेदवार म्हणून उभे केले आहे. या तरूणाचा विजय निश्चित आहे.[७२]''

**६) मिरज लोकसभा मतदार संघ : श्री. विजयसिंहराव डफळे –**

१९६२ च्या विधानसभा निवडणुकीसाठी सांगली जिल्ह्यातील विटा हा मतदार संघ राखीव होता. भगवानराव पवार हे राखीव उमेदवार निवडून आले व त्यांनी दलित चळवळीस प्रथमपासूनच सहकार्य व प्रोत्साहन दिले होते, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

''माजी जत संस्थानाचे राजेसाहेब आमदार बी विजयसिंह डफळे हे सांगली जिल्ह्यातील मिरज लोकसभा मतदार संघातून काँग्रेस उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत आहेत. संस्थानी कारकीर्दीत ते पुरोगामी राजे म्हणून प्रसिध्द होते.

माजी जत संस्थानमध्ये त्यांनी घटना तयार करून पूर्ण जबाबदारीचे सरकार प्रस्थापित केले होते. तसेच संस्थानी जनतेला मोफत वैद्यकीय मदतही मिळत असे. प्रख्यात क्रिकेटपटू, टेनिस खेळाडू अश्वरोहण पटू, तसेच सर्वतोपरी खेळाडू म्हणून त्यांना सर्वजण ओळखतात. रणजी ट्रॉफी मॅचेसमध्ये, तसेच परदेशी टीम्सच्या विरूध्द योजिलेल्या क्रिकेट मॅचेसमध्ये ते महाराष्ट्रात क्रिकेट टीमचे कर्णधार होते. महाराष्ट्रात व इतर ठिकाणी शारीरिक सुधारणा आणि खेळाची प्रगती याबाबत त्यांनी बरीचशी भरीव कामगिरी केली आहे. १९५२ व १९५७ मध्येही विधानसभेत स्वतंत्र उमेदवार म्हणून ते निवडून आले. १९५९ साली ते काँग्रेस पक्षामध्ये सामील झाले.[७३]''

**७) सांगली जिल्हा परिषदेत काँग्रेसला प्रचंड बहुमत –**

डॉ. आंबेडकर हे दलित वर्गाचे व बहुजन वर्गाचे प्रेरणास्थान, मार्गदर्शक व स्फूर्तिस्थान असलेने संपूर्ण भारतात, त्यांचा जन्मदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जात होता. सांगली जिल्हा त्याला अपवाद नव्हता. उलट सांगली जिल्ह्यातील प्रत्येक शहरात व खेडेगावात मोठ्या उत्साहाने आंबेडकर जयंती दरवर्षी साजरी केली जात होती. त्याप्रमाणे वायफळ, ता. तासगावमधील डॉ. आंबेडकर जयंतीचा वृत्तांत–

''४९ पैकी ३८ जागा जिंकल्या – सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची अंतिम मतदान फेरी काल संपली होती. आज सकाळी मतमोजणीस सुरवात होवून रात्रीपर्यंत एकूण ४९ जागापैकी ४६ जागांचे निकालही जाहीर झाले. त्यापैकी ३८ जागा काँग्रेसने जिंकल्या आहेत. (काँग्रेसने बिनविरोध जिंकलेल्या जागांचाही यातच समावेश आहे) ३ समित्याने, २ जनता आघाडीने, ३ स्वतंत्रानी जिंकल्या असून जत तालुक्यातील तीन जागांच मतमोजणी अजूनही चालू आहे. या तिन्ही जागा काँग्रेसच जिंकेल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेची ही निवडणुक अत्यंत चुरशीने लढविण्यात आली होती. विशेषतः रेठरे हरणाक्ष, डिग्रज, पलूस इ. गटातील जागांमध्ये विशेष स्पर्धा होती. पण त्या सर्वहि जागा काँग्रेसनेच जिंकल्या आहेत.[२८] विजयी उमेदवारांची तालुकावार नावे आणि त्यांना झालेले मतदान खालीलप्रमाणे आहे –

**वाळवा तालुका एकूण जागा –** १) थोरात संपतराव धनाजीराव (काँ) ४५७१ २) पोकर्णीकर देवीदास केदारी (काँ. राखीव) २६३८ ३) राजे शिर्के शिवाजी संभाजी (काँ.) ५५९५ ४) शिंदे विलासराव भाऊसो (काँ.) ३९४१ ५) पाटील निवृत्ती आकाराम (काँ) ३१८० ६) बरडे दादा आप्पाजी ( काँ) ३०७१ याशिवाय पाटील सदाशिव दाजी आणि पाटील बाबुराव कृष्णराव या दोघाही काँग्रेस सदस्यांची बिनविरोध निवड झालेलीच आहे.

**खानापूर तालुका एकूण जागा १० –** १) पाटील बळी मारूती (काँ) २८९९ २) यादव बबनराव बाबूराव (समिती ) ३६३५ ३) साळुंखे शहाजी गणपतराव (काँ) २८९१ ४) मोरे विलास दतू (काँ) ३८९५ ५) सावंत विठोबा नाना (काँ) २०४५ ६) निंबाळकर दत्ताजीराव रामचंद्र (स्व) ३४५२ ७) ठोंबरे पांडूरंग लक्ष्मण (काँ) ३१५७ ८) लेंगरे आण्णा उध्दव (काँ) २२०२ ९) देशमुख सस्तुमराव चिमाजीराव (काँ) २५०७ १०) होनराव गंगाधर भीमाशंकर (काँ) ३०७५ आटपाडीचाही यात समावेश आहे.

**मिरज तालुका एकूण जागा – ११** १) पाटील रामराव महादेव (काँ) ४३६६ २) बिरनाळे आप्पासा बळवंत (काँ) ४१७९ ३) मगदूम आण्णा आप्पा (काँ) ३४११ ४) पाटील व्यकंटराव रामराव (काँ) ४७२३ ५) नागरगोजे रघुनाथराव गणपतराव (काँ) ३७४३ ६) पाटील विठ्ठल बुवाजी (स्वतंत्र) ३५०१ ७) शिंदे महादेवराव पर्वतराव (काँ) २७८५ ८) पोळ शंकर सिद्राम १२६१ (काँ) राखीव ९) कोलेकर गणपतराव कृष्णाजी (काँ) ३७०७ बिनविरोध – कोरे बळवंत शिवलिंग (काँ) बिरोजे भाऊसो सत्यप्पा.

**शिराळा तालुका एकूण जागा – ५** १) नायकवडी विष्णू केरू (काँ) २३८४ २) सावंत चंद्राप्पा नारायण (काँ) २२१९ ३) सावंत श्रीहरी हरी (काँ) २७८५ ४) पाटील शामराव नामदेव (जनता आघाडी) ३२५५ ५) पाटील राजाराम यशवंत (जनता आघाडी) ४१७९

**तासगाव तालुका एकूण जागा ९** १) पवार आकाराम ज्ञानू (समिती ) ३१२६ २) पाटील ज्ञानदेव विठोबा (काँ) ३७२६ ३) पाटील वसंत गोविंद (काँ) ३८१९ ४) पाटील बाबासो गोपाळराव (काँ) ५) माने

सुबराव एकनाथ समिती २८३९ ६) तुपे कोडींबा नातू (काँ) १७४४ ७) पाटील धरगोंडा रघुनाथ (काँ) ३८३१ ८) पाटील दिनकर कृष्णाजी (काँ) ३८७७ ९) पवार बाबासो आबासो (काँ) ३७२७

**जत तालुका एकूण जागा ६ –** १) पाटील मलकाप्पा गोंडाप्पा (स्व) २) सावंत यशवंतराव माधवराव (काँ) ३) देवकर बाबासो रामहरी (काँ) उरलेल्या ३ जागांची मतमोजणी चालू आहे.[७४]''

**८) सांगली जिल्ह्यात काँग्रेसचा जोरदार प्रचार –**

काही हरिजन वसाहतीचे सांगली जिल्ह्यात पुनर्वसन करणे गरजेचे होते. शासनाची तशी योजना होती. आमदार व भावी मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील यांच्या शुभहस्ते या योजनेचे सांगलीत भूमिपूजन झाले, त्याचा हा वृत्तांत–

''सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या विद्यमान आता जिल्ह्यात सर्वत्र प्रचाराचा धुमधडाका सुरू झाला असून प्रामुख्याने आ. वसंतराव पाटील, ना. बॅ. जी.डी. पाटील, श्री. धोंडीराम पाटील ह्यांच्या सांगली, मिरज आणि तासगांव मतदार संघातून विरोधकांचे तोंडचे पाणीच पळाले आहे. तसेच वाळवा, खानापूर, तासगांव पूर्वभाग, शिराळा व जत आदी भागातील उमेदवार श्री. राजाराम बापू पाटील, श्री. संपतराव माने, श्री. वसंतराव नाईक व बॅ. शेंडगे ह्याच्या जिद्दीच्या प्रचारामुळे विरोधकांत आता काहीच दम राहिला नसल्याने ह्याही भागात सर्वत्र काँग्रेस विजयी होणार असे स्पष्ट दिसू लागले आहे.[७५]''

**९) नगरपालिका निवडणुकीसाठी शहराचे ३४ विभाग – आगामी निवडणुकीचे वेध सुरू**

सांगली नगरपालिका निवडणुकीसाठी एकंदर ३४ विभाग तयार केले व त्यातील काही भाग राखीव करण्यात आले. त्यामध्ये दलित नेते निवडणूक लढविण्यास तयार झाले. राखीव जागेमुळे दलितांच्यात उत्साह निर्माण झाला, त्याची बातमी –

''सांगली नगरपालिकेच्या नवीन निवडणुका ३/४ महिन्यात होतील व नवीन योजना सरकारने संमत केल्याप्रमाणे एकसदस्य मतदार संघ निवडण्याच्या स्कीमप्रमाणे येत्या निवडणुका व त्यांचे उमेदवार याबाबत नवा दृष्टीकोन निर्माण होणार आहे. सांप्रत सांगली शहराची लोकसंख्या ८० ते ९० हजार असून मतदारांची संख्या १४ हजारापर्यंत जाईल. प्रत्येक विभाग हा लोकसंख्येच्या विशिष्ट प्रमाणात ठरविणेत आला आहे. दर एक हजार मतदार विभागास १ सीट याप्रमाणे शहरात ३४ जागा निर्माण होणार आहेत. त्या दृष्टीने ३४ नगरपिते निवडावे लागतील. एका विभागात एकच उमेदवार निवडावयाचा आहे.

विभागाचे नकाशे तयार करण्यात आले असून त्यास मंजुरी मिळाली आहे. नवीन नकाशाप्रमाणे पूर्वीची वॉर्ड रचना बदलली असून शहराचे एकंदर ३४ भाग वॉर्ड तयार झाले आहेत. शहराची मुळ रचना विचारात घेता सांगलीचा जुनाभाग व नवी वसाहत, शिवाजी नगर व सांगली ते मिरज रस्त्यावर नवीन झालेल्या कॉलनी व विश्रामबागपर्यंत त्यांची झालेली वाढ याचा विचार करून नवीन वॉर्डस्‌ची रचना करण्यात आली आहे.[७६]''

## १०) सांगलीत ६७०४८४ मतदार व ७०२ मतदान केंद्रे –

सांगली जिल्ह्यातील मतदार व मतदान केंद्रे यांची संख्या, त्यात मागासलेले मतदार होते. तसेच हरिजन सप्ताहाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली, ती पुढीलप्रमाणे –

''सांगली जिल्ह्याची एकूण मतदार संख्या ६,७०,४०४ असून मतदार केंद्राची संख्या ७०२ आहे. तालुकावार मतदार संख्या व केंद्रे पुढीलप्रमाणे आहेत. वाळवा मतदार संख्या ८०३९६ मतदान केंद्रे ८७, शिराळा ८५,४०६, मतदार असून केंद्र ९५ आहेत. खानापूर मतदार संख्या ८०,५५९, मतदान केंद्रे ८४, तासगांव मतदार संख्या ८९,७०५ असून मतदान केंद्रे ९० आहेत. आटपाडी कवठेमहांकाळ मतदार संख्या ८६,८१५ असून मतदान केंद्रे १०२ आहेत. मिरज मतदार संख्या ८१,६१३ असून मतदान केंद्रे ७६ आहेत.[७७]

**हरिजन सप्ताह** – हरिजन सप्ताह निमित्त सकाळी हरिजन वस्तीत साफसफाई होवून प्रभात फेरी काढण्यात आली व नंतर हरिजन वस्तीत आदर्श संगीत विद्यालयासमोर श्री. दळवी याचे हस्ते झेंडावंदन झाले.

तसेच नेहरूंना लहान मुले फार आवडत म्हणून बालदिन साजरा केला. दुपारी ५ वाजता हरिजन वस्तीत श्री. कांबळे गट विकास अधिकारी शिराळा पंचायत समिती शिराळा यांचे समवेत श्री. नरसू धोंडी घाटगे हरीजन काँग्रेस कार्यकर्ते यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली.[७८]''

**११) दलित नेत्यांना जाहीर आवाहन –**

बॅ. एस. एम. माने एक दलित नेते होते. त्यांनी दलित नेत्यांना जाहीर आवाहन करून इंदिरा गांधींना पाठिंबा द्यावा. कारण त्यांचा दलिताविषयी दृष्टीकोन उदार, सहानुभूतीपूर्वक आहे, म्हणूनच सदरची बातमी पुढीलप्रमाणे –

''भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी लोकसभेची मुदतपूर्व निवडणूक जाहीर केल्याने देशात नव विचाराची एक प्रभाबळ निर्माण झाली आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांचा विचार म्हणजे देशातील दलितांच्या उध्दाराचा विचार आहे. यावेळी दलित नेत्याने व दलित समाजाचे राष्ट्रीय कर्तव्य कोणते हे सांगण्यासाठी, दलित समाजाचे राष्ट्रीय कर्तव्य कोणते हे सांगण्यासाठी, दलित समाजातील एक तळमळीचे नेते व भारतीय घटना समितीच्या सुकाणू कमिटीचे एक सदस्य बॅ. एस. एन. माने यांनी एक पत्रक काढले आहे.[७९]''

**१२) कार्यकर्त्यांचा नव काँग्रेसला पाठींबा –**

सांगली जिल्ह्यातील डिग्रज येथील रिपब्लिकन पक्षाने काँग्रेसला पाठिंबा दिला. कारण काँग्रेस पक्ष हा दलितांचा उध्दार करण्यास कटीबध्द होता असे त्यांना वाटते, ती बातमी पुढीलप्रमाणे–

''डिग्रज येथे रिपब्लिकन पक्ष कार्यकर्त्यांची बैठक घेवून आगामी लोकसभा निवडणुकीसंबंधी विचार विनीमय झाला. सदर चर्चेच्या शेवटी निवडणुकीत नवकाँग्रेसचे उमेदवार श्री. आण्णासाहेब गोटखिंडे यांनाच आपली मते देवून निवडून आणावे असा निर्णय घेण्यात आला. यासंबंधीचे पत्रकावर कृ. म. कांबळे, स.बा. कांबळे, ज. तु. कांबळे व भा. जि. कांबळे यांच्या सह्या आहेत.[८०]''

## १३) लोकसभा निवडणूक

१९६२ व १९६७ सालच्या लोकसभा निवडणुकांची आकडेवारी वर्तमानपत्रात जाहीर झाली. मागासवर्गीय उमेदवारसुध्दा या दोन्ही निवडणुकीत विजयी झाले. काँग्रेसचा पाठिंबा मागासवर्गीयांना होता. मा. वसंतरावदादा हे मागासवर्गीयांचे सांगली जिल्ह्यातील एक मोठे आश्रयदाते होते. वसंतरावदादा असेपर्यंत सांगली जिल्ह्यातील दलित मागासवर्गीय जनता त्यांचे ऐकत होते. त्यांनीही शासकीय योजना व स्वतः सांगलीतील दलितांच्या उध्दारासाठी कार्य केले होते. ही आकडेवारी सर्व उमेदवार किती होते हे स्पष्ट होते. तसेच ह्या बातमीत मागासवर्गीयांच काय समस्या आहेत, आपण त्या राजकीय पक्षांनी सोडवाव्या असे पत्रकात मागणी केली आहे, त्यासंबंधी–

''**सन १९६२ आणि १९६७ सालच्या निवडणुकीतील आकडेवारी –**

भारतीय लोकसभेची मुदतपूर्व निवडणूक आता जाहीर झाली आहे. या निवडणुकीच्या संदर्भात वाचकांना मार्गदर्शक व मनोरंजक होईल अशी माहिती व तक्ते येथे दिले आहेत.

मतदार संघ किती असावेत याबाबतीत विभागाच्या मर्यादा आखून दिल्यामुळे अस १९६७ साली लोकसभेच्या मतदार संघाची संख्या ५२० पर्यंत वाढली. १९६२ साली ती ४९४ होती. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत या ५२० मतदार संघातून मतदान होईल आणि प्रत्येक मतदार संघ आपला उमेदवार निवडून देईल.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या संख्येतही १९६७ साली खूप वाढ झाली. लोकसभेच्या जागासाठी पूर्वी १९८५ उमेदवार उभे राहिले. तर १९६७ साली निवडणुक लढविण्यासाठी २१६९ उमेदवार पुढे सरसावले.

खालील तक्ता मतदार संघ व उमेदवार विषयक तपशील दर्शवितो :

| | मतदार संघ | | उमेदवाराची संख्या | | उमेदवारी नामंजूर | | उमेदवारी मागे घेतली | | प्रत्यक्ष लढत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९६७–६२ | | १९६७–६२ | | १९६७–६२ | | १९६७–६२ | | १९६७–६२ | |
| सर्वसाधारण | ४०६ | १८७ | २६३७ | २२८३ | १५ | २६ | ७१७ | ६३१ | १८८५ | १६०७ |
| अनुसूचित जाती राखीव | ७७ | ७६ | ४१७ | ३७१ | १ | ६ | ७३ | ८७ | ३४३ | २७७ |
| अनुसूचित जमाती राखीव | ३७ | ३१ | १९० | १२९ | २ | ३ | ४६ | २५ | १४१ | १०१ |
| एकूण | ५२० | ४९४ | ३२४४ | २७६३ | ३९ | ३५ | ८३६ | ७४३ | २१६९ | १९८५ |

सन १९६७ साली लोकसभेच्या ६१ जागासाठी सार्वत्रिक निवडणूक सरळ लढत झाली. तर १९६२ साली ६९ जागासाठी सरळ लढत झाली.

एकाच जागेसाठी ३ उमेदवार लढत असलेल्या मतदार संघाची संख्या १९६७ साली ११५ तर १९६२ साली १४ होती.

दोन्ही निवडणुकीत लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे १९६७ साली प्रत्येकी चार उमेदवार लढवीत असलेल्या मतदारसंघाची संख्या सर्वात जास्त होती. १९६७ साली ८ जागा अशा होत्या की, त्यात १२ किंवा १२ पेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरले होते.[८१]

**उमेदवारांच्या संख्येचा जागांच्या संदर्भात तपशील खालीलप्रमाणे**

| उमेदवार | लढविलेल्या जागाचा<br>१९६७ | संख्या<br>१९६२ |
|---|---|---|
| प्रत्येक २ | ६३ | ६९ |
| ʻʻ ३ | ११५ | १४१ |
| ʻʻ ४ | १२५ | १२६ |
| ʻʻ ५ | १४० | १७८ |
| ʻʻ ६ | ५४ | ४५ |
| ʻʻ ७ | २५ | १४ |
| ʻʻ ८ | ३० | १७ |
| ʻʻ ९ | ९ | ८ |
| ʻʻ १० | ६ | २ |
| ʻʻ ११ | १ | १ |
| ʻʻ १२<br>आणि अधिक | ८ | – |

१९६७ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अपक्ष उमेदवारांची संख्या सर्वात अधिक होती. तर १९६२ च्या निवडणुकीत काँग्रसने सर्वात अधिक उमेदवार उभे केले होते. परंतू दोन्ही वेळेस अनामत रक्कम जप्त झालेले सर्वात अधिक उमेदवार अपक्षच होते.

सन १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे म. सो. पा. न. कम्युनिस्ट, मार्कसिस्ट ह्या दोन नव्या राजकीय पक्षांनी प्रथमच निवडणूक लढविली.

दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे सन १९६७ मध्ये कम्युनिस्ट व समाजवादी ह्या दोन पक्षांनी १९६२ च्या मानाने लोकसभेचे मतदार संघ वाढले असतानाही पूर्वीपेक्षा कमी जागा लढविल्या.

निवडणुकीत उतरलेल्याची जिंकलेल्या व अनामत रक्कम गमाहून बसलेल्या उमेदवारांची संख्यावार येणेप्रमाणे –

**(तक्ता) उमेदवारांची संख्या**

| पक्ष | रिंगणात उतरलेले उमेदवार | | निवडून आलेले उमेदवार | | अनामत रक्कम | गमावलेले उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९६७ | १९६२ | १९६७ | १९६२ | १९६७ | १९६२ |
| | ८६५ | ४८० | ३२ | २० | ५४७ | ३८९ |
| | ५११ | ४८९ | २७९ | ३५८ | ७ | ३ |
| | १०९ | ५७३ | ४४ | ९८ | ८८ | ७५ |
| | २५१ | १९६ | ३५ | १४ | ११३ | ११४ |
| समाजवादी | १२२ | – | २३ | – | ५५ | – |
| | ११० | १३० | २३ | २९ | ४१ | २६ |
| मार्क्सिस्ट | ५८ | – | १९ | – | १३ | – |
| | १०९ | १६८ | १२ | १२ | ७५ | ६९ |
| रिपब्लिकन पक्ष | ७४ | ६८ | ६ | ३ | ४२ | ३५ |
| | ७४ | ६५ | ३७ | २० | १६ | ७ |

| पक्ष | १५ | २४ | ६ | ८ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|
| समाजवादी | – | १०७ | – | ६ | – | २५ |
| हिंदूमहासत्ता | – | ३८ | – | १ | – | ११ |
| धर्मराज्य परिषद | – | ४१ | – | २ | – | ३४ |

| | | |
|---|---|---|
| लोकसभेच्या १९६७ सार्वत्रिक निवडणुकीत ४% हून अधिक मते अवैध मते म्हणून घोषित करण्यात आली परंतू | १९६२ च्या निवडणुकीत ४%हून कमी मते अवैध ठरविण्यात आली पडलेल्या मतातील वैध मते | आणि अवैध मतांची % वारी दर्शविणारा तक्ता खाली देण्यात येत आहे. |

| मतदार संघ | वैधमते | | अवैध मते | | अवैध मतांची % वारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९६७ | १९६२ | १९६७ | १९६२ | १९६७ | १९६२ |
| | ११,६३,९०.१२६ | ९,३०,८१,४३१ | ५३,५४,५९६ | ३,७२,१२४ | ४.४० | ३.८४ |
| | २,२१,४७.३६१ | १,६९,७७.७१२ | १०,२८,०५६ | ७,०३,८८१ | ४.३९ | ३.९८ |
| | ७१,२८,१२३ | ५१,०९,७४० | ४,४७.८०६ | २,९८,६४३ | ६.२४ | ५.५२ |
| | १४,५८,९६,५१० | ११,५१,६८,८९० | ६,८३,०४.४६० | ४५,२२,५४८ | ४.६८ | ३.९४ |

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला लोक सभेच्या सन १९६७ व १९६२ च्या दोन्ही सार्वत्रिक निवडणुकीत सर्वात जास्त वैधमते मिळाली. अपेक्ष उमेदवारांचा वैधमते मिळविणारा दुसरा क्रमांक लागतो. पक्षवार वैध मताचा तपशील

| छक्ष | मिळालेली वैधमते | टक्केवारी |
|---|---|---|

| | १९६७ | १९६२ | १९६७ | १९६२ |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस | ५९४०२,७५४ | ५१,५०९,०८४ | ४००३ | ४४.७२ |
| अपक्ष | २०.०५११,२०० | १२,७४९,८१३ | १३,७५ | ११.०८ |
| स्वतंत्र | १२,६५९,५४० | ९,०८५,२५३ | ८,६८ | ७.८९ |
| जनसंघ | १३०७९,९२१ | ७,४१५,१७० | ९.४१ | ६.४४ |
| – | ७१७१६२७ | – | ४९२ | – |
| कम्युनिस्ट | ७,५६४,१८० | ११.४५०,०३७ | ५१९ | ९.९४ |
| – | ६,१४०,७३८ | – | ४२१ | – |
| असमत पक्ष | १,५२४,१९८ | १,७९६,८९४ | १०५ | १५६ |
| प्र.सो. प. | ४,४५,६५८७ | ७,८४८,३४८ | ३.०६ | ७८१ |
| भा.रिपब्लिक | १६०७७११ | १२५५९८५ | २४८ | २८३ |
| अन्य | ९,५०२,१४४ | ५५२२०६२ | ६.५७ | ४७९ |
| हिंदूमहासभा | – | ७४७८६१ | – | ०.६५ |
| रामराज्य परिषद | – | ६८८.९९. | – | ०.६० |

### १४) सांगली जिल्ह्यात ८ जागासाठी २२ उमेदवारात लढत

सांगली जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी दिली आहे. त्यात रिपब्लिकन व मागासवर्गीय उमेदवारांनीसुध्दा निवडणूक लढविली व ते राखीव जागेवर निवडून आले आणि दलितांच्या समस्या शासकीय पातळीवर सोडवण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी कोण उमेदवार होते हे कळावे, ती यादी पुढीलप्रमाणे–

''सांगली ता. १६ महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी या जिल्ह्यातील ८ मतदार संघातून एकूण २२ उमेदवार उभे राहिले असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| शिराळा – भगवानराव भाऊसाहेब पाटील | (नवकाँग्रेस) |
| यशवंत चंद्रोजी पाटील – | (शे. का.प.) |
| रंगराव भिमा बनसोडे – | (रिपब्लिकन ) |
| वाळवा – राजाराम गणपती जोशी – | (जनसंघ) |
| राजाराम अनंत पाटील – | (नवकाँग्रेस) |
| वसंत शंकर शिंदे – | (शे. का. पक्ष) |
| संपतराव सिताराम माने – | (नवकाँग्रेस) |
| तासगांव – बाबासाहेब गोपाळराव पाटील | (काँग्रेस ) |
| वसंत हिंदुराव पाटील | (अपक्ष) |
| जयसिंग महादेव माने देशमुख | (शे.का. पक्ष) |
| सांगली –पंडित शिवाजी पवार | (जनसंघ) |
| पांडुरंग बापूराव पाटील | (काँग्रेस) |
| शिवाजी रामचंद्र राऊबाले | (शे. का.पक्ष) |
| मिरज –दादासाहेब रामचंद्र जामदार | (काँग्रेस) |

| | |
|---|---|
| नरसिंह रामचंद्र पाठक | (अपक्ष) |
| शंकर कृष्णा शिगाण्णा | (अपक्ष) |
| आटपाडी–कवठेमहांकाळ हरीभाऊ नाना खुजट | (अपक्ष) |
| आण्णासाहेब उध्दव लेंगरे | (काँग्रेस) |
| जत – राखीव विष्णू हरी अंबवडे | (जनसंघ) |
| आण्णा कृष्णा कांबळे | (रिपब्लिकन ) |
| शिवरूद्र ढबानी बामणे | (काँग्रेस )[८२]'' |

**१५) सांगली जिल्हा मतदार याद्यांचे काम पूर्ण –**

सांगली जिल्हा मतदार याद्यांचे काम पूर्ण होवून सर्व मागासवर्गीय मतदारांचा त्यात समावेश होता.

''सांगली जिल्हात १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीवेळी एकूण ८ लाख ९४ हजार १८४ मतदार होते. मतदारांच्या याद्या अद्यावत करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यातील पात्र मतदारांची संख्या १० लाख ६३ हजार ४७१एवढी झाली आहे. म्हणजे जिल्ह्यात एकूण १ लाख ६९ हजार २८७ मतदार संख्या वाढली आहे, अशी माहिती सांगली जिल्हाधिकारी श्री. विजयकुमार अगरवाल यांनी दिली.

सांगली जिल्ह्यातील मागास वर्गीय नवउद्योजकांचे व्यवसाय उभे करण्याचे कामी बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी श्री. कुलकर्णी, श्री. मुजावर, श्री. फडके, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा भिलवडीचे शाखाधिकारी श्री. देशपांडे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शेणोलीचे शाखाधिकारी श्री. मुंगळे त्याचप्रमाणे म. फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे सांगली जिल्हा कार्यालयाचे क्षेत्र अधिकारी श्री .सावंत यांनी प्रयत्न केले.[८३]''

### ग) महत्त्वाच्या नेत्यांची सांगली जिल्ह्यातील महत्त्वाची दौरे व त्यांची भाषणे

### १) प. नेहरूंच्या जाहीर सभेसाठी खास विविध सोयी :-

१९६२ ला विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक होणार म्हणून जाहीर सूचना प्रसिध्द झाली. सांगली जिल्ह्यातील विटा व जत मतदार संघ राखीव ठेवण्यात आले होते म्हणून त्यांची प्रसिध्दी वर्तमानपत्रात दिली. म्हणून या ठिकाणी देत आहे, 'जत मतदार' राखीव संबंधी माहिती आहे.

**सांगलीत पंडितजींचे प्रथमच जाहीर भाषण –**

''भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे पूर्वीचे कार्यक्रमात आताबदल होवून ता. ११ फेब्रुवारी रोजी दुपारी जाहीर सभेचा कार्यक्रम निश्चित करणेत आला आहे. या जाहीर सभेच्या कार्यक्रमाची व्यवस्थित आखणी करणेत येत असून सांगली– मिरज रस्त्यावरील राजसाहेबांचे रेस्ट हाऊसचे पूर्वेकडील खुले प्रशस्त मैदान सभेसाठी मुक्रर करणेत आले आहे. व्यासपीठाचे छोटेसे मॉडेल तयार करणेत आले असून मैदानावर श्रोत्यासाठी बसणेसाठी करण्याच्या योजनेचा प्लॅनही तयार करणेत आला आहे. सांगलीहून व मिरजेकडून येणाऱ्या स्त्री–पुरूष नागरिकांसाठी कोणतेही व्यत्यय न येता सभेत बसणेसाठी स्वतंत्र योजना करणेत आली आहे. ता. ११ चे जाहीर सभेसाठी आदले दिवशीचे संध्याकाळ पासूनच बाहेर गावची मंडळी येणार हे गृहीत धरून व प्रत्यक्ष कार्यक्रमाचे दिवशीच व्यवस्था करणेचे दृष्टीने त्याजागी हॉटेल्स व पिण्याचे पाणी वगैरेचे सोय तात्पुरत्या स्टॉल मधून करणेत येणार असून त्यासाठी नगपालिकेने अर्ज मागविले आहेत.[८४]''

### २) पंडितजींच्या स्वागतासाठी सांगलीत अपूर्व उत्साह :-

पंडीत नेहरूंच्या सांगलीतील आगमनावेळी नवबौध्द व हरिजनांनी मेळावा आयोजित करून या राष्ट्रीय नेत्याचे भव्य स्वागत केले, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

**शहर खेडूतांनी गजबजले**

''पंतप्रधान पं. नेहरूंच्या उदयाच्या येथील कार्यक्रमाची सर्व तयारी पूर्ण झाली असून आज पोलिस खात्याकडून व स्वयंसेवकांकडून आपल्या कार्याची रंगीत तालीम घेण्यात आली. पंडितजींच्या सभेसाठी भव्य व्यासपीठ उभारण्यात आले असून त्याची सुंदर सजावट करण्यात आली आहे. सांगलीच्या परिसरातील तीसपस्तीस खेड्यांतून आपल्या पंतप्रधानांच्या दर्शनासाठी लोकांची रीघ लागली असून सांगली शहर माणसांनी गजबजून गेले आहे.[८५]''

**३) सांगलीत ३ लाखाच्या सभेत नेहरूंचा स्फूर्तिदायक संदेश –**

पंडित नेहरूंच्या स्वागतासाठी सांगली जिल्ह्यातील सर्व खेडूत दलित सांगली शहरात आले, त्याची बातमी पुढीलप्रमाणे प्रकाशित केली आहे–

**आर्थिक क्रांतीच्या यशासाठी परिश्रम करा व काँग्रेसला निवडून द्या –**

''भारतात पूर्वी कधीही झाली नव्हती अशी जनतेची क्रांती सध्या घडत आहे. युरोपात १००–१२५ वर्षात जी प्रगति झाली ती ह्या क्रांतीमुळे भारतात ३०–३५ वर्षात होणार आहे. ह्या संपन्नतेचा लाभ समाजातील सर्वांनाच होणार आहे. हे स्वप्न नव्हे, देशाचे स्वातंत्र्य हे हि पूर्वी स्वप्न वाटत होते. परंतू स्वातंत्र्य लढ्याने व लोकांच्या बलिदानाने हे स्वातंत्र्याचे स्वप्न सत्य ठरले ही क्रांतिसुध्दा जनतेच्या अविरत परिश्रमाने ठरेल,'' असा स्फूर्तिदायक संदेश पंतप्रधान पं.नेहरूंनी आज सायंकाळी सांगली येथे भरलेल्या ३ लाख लोकांच्या विराट सभेत बोलताना केला.

काँग्रेसच्या निवडणूक दौऱ्याच्या निमित्ताने आपण प्रथमच सांगलीला येत आहोत याचा पं. नेहरूंनी सुरूवातीला आनंद व्यक्त केला. यापूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना भाषण करण्याची विनंती केली व पुष्पहार अर्पण केला.[८६]''

**४) मौजे बिऊर येथील हरिजन विकास कार्य –**

शिराळा तालुका हा सांगली जिल्हह्यातील एक मागासलेला पश्चिमेकडील तालुका. येथे बिऊर या गावी काही विकास कार्य केले, त्याची बातमी प्रसिध्द झाली ती पुढीलप्रमाणे–

''शिराळा तालुक्यातील मौजे बिऊर येथील हरिजन ग्रामस्थातर्फे महाराष्ट्र राज्य बौध्द व दलित युवक संघ शाखा शिराळा तालुक्याचे अध्यक्ष बाबालाल बादशहा मुलाणी (मुजावर) यांच्या अध्यक्षतेखाली नूतन बौध्द मंदिराचे आवारात परिसंवाद झाला. त्यावेळी हरिजन विकासासाठी बिऊर हरिजन व बौध्द विकास संघाची स्थापना झाली. बौध्द मंदिराचे निम्मे बांधकाम झाले आहे. त्याचे पुढील कामाबद्दल तसेच बालवाडी, सार्वजनिक विहीर वैगरे कामाबाबत चर्चा झाली. श्री. तानाजीराव दत्ताजी निर्मळे यांनी याकामी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. बिऊर हरिजन व बौध्द विकास संघाची कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे. अध्यक्ष तानाजीराव निर्मळे, उपाध्यक्ष – बाळकू दौलू निर्मळे, चिटणीस – दत्तात्रय लक्ष्मण निर्मळे, सहाय्यक चिटणीस – सर्जेराव मारूती निर्मळे, खजिनदार – तुकाराम लक्ष्मण निर्मळे, सदस्य बंडू रामा निर्मळे, केशव आबा निर्मळे, बाबूराव संभाजी कांबळे, शंकर अप्पा निर्मळे, सखाराम लक्ष्मण निर्मळे, सौ. तोलाबाई रामचंद्र कांबळे, श्रीमती पारूबाई शंकर निर्मळे शेवटी तुकाराम लक्ष्मण निर्मळे यांनी आभार मानले.[८७]''

**५) २० कलमी कार्यक्रम अमंलात आणणार –**

२० कलमी कार्यक्रम अंमलात आणून दलित वर्गांना काही सवलती दिलेल्या दिसतात ती बातमी–

''जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. अप्पासाहेब बिरनाळे मेळाव्यात बोलताना म्हणाले, समाजविरोधी व्यक्तिंना आवर घालण्यासाठी इंदिरा गांधीनी आणीबाणी जाहीर केली व २० कलमी योजना कणखरपणे अंमलात आणण्याचे ठरविले आहे. भूविकास बँकेचे अध्यक्ष श्री. संपतराव पाटील, बांधकाम समितीचे सभापती श्री. शिवाजीराव पाटील ह्यांनीही ह्या मेळाव्यास मार्गदर्शन केले. मेळाव्याचे अध्यक्षस्थानी खासदार श्री. आण्णासाहेब गोटखिंडे हे होते.[८८]''

६) **निरनिराळ्या वक्त्यांची भाषणे –**

गौतमबुध्द व डॉ. आंबेडकर हेच खरे दलितांचे उध्दारकर्ते म्हणून काही कार्यकर्त्यांनी भाषणे दिली, त्यांची नावे पुढीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात आली आहेत–

''प्रास्ताविक भाषण येथील दलितांचे व बुध्दाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. कांबळे यांनी केल्यानंतर श्री. कांबळे गुरूजी मिरज कॉलेजचे प्रा. अभय कुमार साळुंखे, प्रा. स. गो. यादव, मिरज येथील जनता पक्षाचे नेते श्री. माळवदे इ. वक्त्यांनी माहितीपूर्ण व भावपूर्ण भाषणे करून डॉ. आंबेडकरांची थोरवी प्रतिपादन केली.[८९]''

**आंतरजातीय विवाह –** सांगली जिल्हा इंटरकास्ट मॅरेज ब्युरोतर्फे औदुंबर येथे दोन आंतरजातीय विवाह साधेपणाने पार पडला.''

**हरिजन पंधरवडा –** हरिजन पंधरवड्यानिमित्त मिरज तालुक्यातील सोनी या गावी १९ एप्रिल रोजी आमदार दाजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हरिजन वाड्यातील समाज मंदिरात खास कार्यक्रम झाला. मिरज विभागाचे प्रांताधिकारी के. एस. गायकवाड यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.[९०]

७) **बौध्द धर्माची दीक्षा –**

दलित समाजात धर्मांतर करणेसाठी चळवळी झाल्या. डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्म स्विकारलेनंतर खेड्या पाड्यातील त्यांचे अनुयायी सुध्दा बौध्द धर्माची दीक्षा घेऊ लागले. बेणापूर या खेडेगावात दीक्षा कार्यक्रम झाला, त्याचा हा वृतांत–

''तालुक्यातील बेणापूर येथे बौध्द धर्माची दीक्षा देण्याचा समारंभ ता. ३ रोजी झाला. याप्रसंगी महाराष्ट्र विधान सभेचे विरोधी पक्षाचे नेते आम. आर. डी. भंडारे, आम. पी. टी. मधाळे यांची भाषणे झाली. दीक्षा घेणेसाठी सुमारे २०० लोक हजर होते.[९१]''

### ह) दलित चळवळीसंबंधी इतर वार्ता

### १) वाळवे ता. रिपब्लिकन पक्ष सेक्रेटरीचा राजीनामा

वाळवा तालुका पहिल्यापासूनच राजकीय व सामाजिकदृष्ट्या अतिशय जागरुक होता. दलित चळवळही ह्या तालुक्यात पहिल्यापासून जोरात होती. रिपब्लिकन पार्टीचे काम जोरात चालू होते. दलित कार्यकर्त्यांत थोडे मतभेद झाल्याने तालुका चिटणीसांनी राजीनामा दिला, त्याचा हा वृत्तांत–

''वाळवे तालुका रिपब्लिकन पक्षाचे चिटणीस श्री. शामराव उध्दव कांबळे यांनी आपल्या चिटणीस पदाचा राजिनामा दिला आहे. पक्षातील गटबाजीला कंटाळून हा राजिनामा दिल्याचे त्यांनी सांगितले.[९२]''

### २) सातारा जिल्ह्याची लोकसंख्या १४ लाखावर –

''सातारा जिल्ह्याची जनगणना पुरी झाली असून त्यामध्ये एकूण लोकसंख्या १४,२७,०२० नोंदली आहे. त्यापैकी पुरूष ६,९६,०६४ व स्त्रिया ७,३०,९५६ आहेत. एकूण साक्षरांची संख्या ४,८३,२८१ असून त्यापैकी पुरूष ३,२८,८८७ व स्त्रिया १,५४,४९४ आहेत. जनगणनेत पुरूषापेक्षा स्त्रियांची संख्या ३४, ८९२ नी अधिक आहे. तालुकावार लोकसंख्या पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडे वाढ किती टक्यांनी झाली हे दर्शविणारे आहेत. खंडाळा ६३१५६ (१३१३) फलटण १४००१४ (१४.०३) वाई १०३६९२ (११.७८) महाबळेश्वर २४३५९ (११९०) जावळी ८००६२ (११.२६) कोरेगांव १३८५७४ (११.९०) खटाव १५५७१५ (११.८५) माण ९९४४८ (११.८९) सातारा १९६३६३ (११.८०) पाटण १८०४१६ (१४.२९) कराड[९३]''

### ३) स्वातंत्र्य दिनानिमित्त गणेश दुर्गावर झेंडावंदन –

भारताच्या १८ व्या स्वातंत्र्यादिनादिवशी गणेश दुर्गावर झेंडावंदन झाले. त्या दिवशी इतरांप्रमाणे दलित समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला, त्याची बातमी –

''भारताच्या १८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त येथील गणेश दुर्गवर झेंडा वंदनाचा कार्यक्रम आज सकाळी ८।। वाजता मोठ्या थाटाने जिल्हाधिकारी कृष्णराव देसाई यांच्या हस्ते पार पडला. ह्यावेळी पोलिस होगगार्डस् आदींनी मानवंदना दिली ह्या प्रसंगी कृष्णराव देसाई ह्यांनी राष्ट्रीय ड्रेस परिधान केला होता. ह्या प्रसंगी महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे अध्यक्ष ना. वि.स. पागे, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष श्री. बी. एस. कोरे, जिल्हा होमगार्ड कमांडर श्री. वसंतराव पाटील, दि. से. ज. श्री. शिपी, जिल्हा पोलिस प्रमुख श्री. बालचंदन ह्याशिवाय शहरातील निमंत्रित म्हणून व्यापारी डॉक्टर, शिक्षण संस्थेमधील अनेक पदाधिकारी शिवाय विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी ८ वाजल्यापासून शहरातील निरनिराळ्या भागातून विद्यार्थी आणि नागरीक झेंडावंदनाच्या कार्यक्रमासाठी राजवाड्यामधील मैदानाकडे येत होते. बरोबर ८।। वाजता जिल्हाधिकारी कृष्णराव दसाई गणेश दुर्गावर पोहचले. व तेथे त्यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आल्यावर पोलिसांनी बॅडच्या निनादात राष्ट्रगीत गायिले. यानंतर कार्यक्रम संपला.[९४]''

**४) महार रेजिमेंटचा गौरव –**

इतिहासात महार रेजिमेंटने शौरवशाली कामगिरी केलेली होती. त्याचा दलित चळवळीतील नेत्यांना अभिमान होता. महार व दलित समाज लढवय्ये आहेत, स्वतंत्र भारतात आता अन्याय सहन करणार नाहीत, असा इशारा ह्या बातमीने मिळतो. राष्ट्रपती ना. व्ही. व्ही. गिरी यांचे हस्ते महार रेजिमेंटला मानचिन्हांकित दिलेल्या त्या प्रसंगाची महत्त्वाची बातमी वर्तमानपत्रात पुढीलप्रमाणे –

''भारताचे राष्ट्रपती ना. व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते उदया महार रेजिमेंटला मानचिन्हांकीत नवे निशान देण्याचा समारंभ होणार आहे. महार रेजिमेंटच्या जीवनातील हा अपूर्व आनंदाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. महार रेजिमेंटचे वय अवघे २९ वर्षाचे आहे. त्यामुळे उद्या होत असलेल्या तिच्या गौरवाला एक आगळे महत्व आहे.

अलिकडच्या काळात एवढ्याच अवधीत निर्माण झालेल्या रेजिमेंटमध्ये महार रेजिमेंटलाच सर्व प्रथम हा भव्य सन्मान लाभत आहे. महार रेजिमेंट ही केवळ महार समाजाच्या किंवा महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या अभिमानाचे केंद्र आहे. कारण तिचा दरारा मोठा शौर्यशाली आणि दैदिप्यमान आहे. प. महायुध्दातही या रेजिमेंटच्या जवानांनी मोठा पराक्रम गाजविला होता. पुढे ही रेजिमेंट पंजाब रेजिमेंट मध्ये समाविष्ट करण्यात आली आणि पुन्हा दु. महायुध्दाच्या काळात बेळगाव येथे ता. १ ऑक्टोबंर १९४१ रोजी तिची स्थापना करण्यात आली. त्यावेळी ब्रिटिशांना आपली संरक्षण फळी मजबूत व जबरदस्त करावयाची होती. लढवय्या महावीरांची अस्मिता जागृत करून त्यांच्या पराक्रमाला योग्य तो वाव मिळावा व त्याची नोंद व्हावी अशी हमी त्यांच्यात निर्माण व्हावी हा एक त्यामागील हेतू होता. अशी वेगळी रेजिमेंट अस्तित्वात आल्याने गुरखा, मराठा, पंजाब इ. रेजिमेंट प्रमाणे महावीरांनाही आपले कर्तृत्व गाजवण्यास संधी प्राप्त झाली. स्वातंत्र्योत्तर काळातही या रेजिमेंटने चोख कामगिरी बजावली. पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला चढवला असतानाही या रेजिमेंटने गौरवास्पद कामगिरी बजावली. शूर महावीरांनी त्यावेळी केलेल्या पराक्रमाच्या रोमांचकारक कथा ऐकल्या की कोणाही भारतीयांचे अंतःकरण उचंबळून आल्या खेरीज राहणार नाही म्हणून त्या त्या पराक्रमाच्या वीरगाथा इतिहासात आणि साहित्यात कायमच्या नमूद झाल्या पाहिजेत. चिनी आक्रमणाच्या वेळीही लडाख नेफा भागात या सैनिकांनी शर्थीची लढत दिली. गोव्याच्या कारवाईच्या वेळीही फलटण आघाडीवर होती. असे सांगण्यात येत ‘यशसिध्द ’ हे या रेजिमेंटचे बोधवाक्य त्यांनी सार्थ करून दाखविलेले आहे.

महार जमात ही मूळचीच लढवय्या जमात आहे. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेने त्यांच्यावर अस्पृश्यता लादून त्यांच्यावर हजारो वर्षे अमानुष्य अन्याय करण्याचा प्रयत्न केला. तरी तिने आपला लढावू बाणा सोडला नाही. शिवाजी महाराजांच्या सैन्यात व मराठे शाहीच्या अखेरच्या काळातही या जमातीतील वीर पुरूषांनी अतुल पराक्रम गाजवल्याची इतिहासात नोंद आहे. वंशशास्त्र आणि समाजशास्त्रही महार समाजाची पूर्वपिठीका अभिमानास्पद असल्याची ग्वाही देतात. समाजिक जीवनात आपली आर्थिक व सामाजिक कुचंबना होत असली तरी रणांगणावरचे आपले ध्येय आणि शौर्य कोणी रोखू शकणार नाही हे त्यांनी ओळखले होते. ही

जमात शूर तसेच स्वाभिमानी आहे. त्यामुळे त्यांना त्याकाळात ते क्षेत्र गाजवण्यास वाव नव्हता. या सर्व परिस्थितीतून त्यांनी चांगला मार्ग काढला. रणागंणावर बलिदान करावे लागले तरी बेहतर पण नागरी जीवनात कुजत पडणार नाही. ही जणू त्यांनी प्रतिज्ञाच केली होती. भारतीय घटनेचे महान शिल्पकार बुध्दवादी डॉ. आंबेडकर यांच्या घराण्याचीही लष्करी परंपराच होती. त्यांचे आंबेडकर यांच्या घराण्याचीही लष्करी परंपराच होती. त्यांचे वडीलही लष्करातील सुभेदारच होते. त्यामुळेच डॉ. आंबेडकर यांच्या प्राथमिक शिक्षणाची त्रिस्थळी यात्रा झाली होती. तरीही डॉ. आंबेडकरांनी बौध्दिक क्षेत्रातही असामान्य पराक्रम व कर्तृत्व गाजवून या समाजाची (सन्वासाची) परंपरा सिध्द केली.

महाडच्या चवदार तळ्यापासून आयुष्यभर डॉ. आंबेडकर यांनी ज्या विविध चळवळी केल्या त्यातही हा समाज सदैव अग्रभागी राहिला होता. आजही राजकीय क्षेत्रात त्यांची अनेक मंडळी जिद्दीने काम करीत आहेत. लष्करातील फलटणींना वेगवेगळी जातीवाचक किंवा प्रादेशिक नावे असावी काय किंवा त्यांची रचना तशी असावी काय असा एक स्वातंत्र्योत्तर काळात वादाचा विषय झाला आहे. लष्काराच्या एकजिनसीपणाला त्यामुळे बाधा येईल असे लोकांना वाटते तथापि तसे काही घडल्याचा आजतरी अनुभव नाही. शिवाय जोपर्यंत नागरी जीवनात ही अलगपणाची भावना आहे तोपर्यंत लष्करही संपूर्णतः त्यापासून अलग ठेवता येणे शक्य नाही. आज महार रेजिमेंटमध्ये महार समाजातील लोक सुमारे ७०%आहेत. याच क्रमाने हळूहळू देशातील वेगवेगळ्या फलटणीचे पुढेमागे एकत्रिकरण होवू शकेल. निवृत्त सैनिकाला काही व्यवसाय करता यावा नागरी समाजात त्याला समरस होता यावे, यादृष्टीने या रेजिमेंटचे उपक्रम सुरू केले आहेत. या रेजिमेंटचा असाच गौरव राहो आणि त्यांच्या हातून स्वतंत्र भारताच्या महान कामगिरी सतत घडो अशी सदिच्छा या आनंदायी प्रसंगी व्यक्त करतो.[९५]''

### ५) हरिजन मुलगी केंद्रात पहिली –

शिक्षण घेण्याची (educate) हा मंत्र डॉ. आंबेडकरांनी दलित बांधवांना दिला. त्याचा परिणाम होवून दलित मुले–मुली शिकू लागल्या. हरिजन मुलगी कु. छबुताई काळे प्राथमिक शालांत परीक्षेत (इ. ७ वी) पहिली आली म्हणून वर्तमान पत्रात खालील माहिती प्रसिध्द झाली.

''गेल्या एप्रिलमध्ये झालेल्या प्राथमिक शालांत परीक्षेत येथील कु. छबुताई गणपत काळे या हरिजन मुलीचा केंद्रात पहिला नंबर आला. याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.[१६]''

### ६) मागासवर्गीयांच्या समस्या –

देशातील परिशिष्टात जाती–जमातीच्या उन्नतीच्या हेतूने भारतीय घटनेनेच शेड्यूल्ड कास्ट व शेड्यूल्ड ट्राइल्ब कमिशनरची जागा निर्माण केलेली आहे. त्या जागेवर कोल्हापूरचे माजी आमदार श्री. शंकरराव माने यांची नुकतीच नेमणुक करण्यात आली आहे. अखिल भारतीय पातळीवरच्या या जबाबदारीच्या जागेवर श्री. माने यांची निवड झाल्याबद्दल आम्ही त्यांचे प्रथम अभिनंदन करतो. बहुजन समाजोध्दारक राजर्षि शाहू महाराज आणि छ. राजाराम महाराज यांनी मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी मोठे कार्य करून देशात एक आदर्श निर्माण करून ठेवलेला आहे. मागास व अस्पृश्य समाजातील मुलांना मोफत शिक्षण मिळावे व त्याचबरोबर सामाजिक न्यायाची दृष्टी ठेवून त्यांना नोकऱ्या मिळाव्या असेही पाऊल संबंध भारतात सर्वप्रथम कोल्हापूरनेच उचलेले सार्वजनिक क्षेत्रातील अस्पृश्यता मोडून काढण्याचा आदर्श शाहू छत्रपतींनी स्वतःच घालून दिला. महार समाजाला वतनाच्या मोहातून आणि वेठबिगारीतून मुक्त केले. भारतीय घटनेने नजरेपुढे ठेवलेले व आज भारत सरकार वाटचाल करीत असलेले मार्ग अर्ध शतकापूर्वी कोल्हापूरनेच चोखळले होते. या सर्व परंपरा व कार्य शासनालाही मार्गदर्शक होईल असेच आहे. भारतीय घटनेने मागास वर्गासाठी पहिल्या दहा वर्षासाठी खास सवलती दिल्या होत्या. पण त्या १० वर्षातही मागास वर्गाची अपेक्षित प्रगति न झाल्यामुळे आणखी दहा वर्षांनी ही मुदत वाढविण्यात भारतीय घटनेने अस्पृश्यतेला कायद्यानेच बंदी केली आहे. या सर्व बाबतीत वेळोवेळी परिस्थितीची पहाणी करून आवश्यक त्या उपाययोजना व अमंलबजावणीच्या सूचनासंबंधी

कमिशनरकडून अहवाल सादर केला जातो. पण एवढे करून मागास समाज पुढारलेल्या वर्गाच्या बरोबर येण्याची तर राहोच पण अजूनही तो फारसा जवळपासही येवू शकलेला नाही. आर्थिक व सामाजिक या दोन्हीही क्षेत्रातही परिस्थिती आहे. त्यामुळे जागृत होवू लागलेल्या अस्पृश्य वर्गाच्या मनात एक प्रकारच्या उव्देगाची व असंतोषाची भावना आहे. मागासवर्गाच्या कल्याणाच्या अनेक योजना प्रत्यक्ष त्या वर्गापर्यंत जावून पोहोचतही नाहीत. ज्या तरतूदी जाऊन पोहोचतात, त्याही अनेक चाळणीतून व त्या अपुऱ्याही असतात. श्री. माने यांचा परवा नगरपालिकेत दलित विद्यार्थी संघातर्फे सत्कार झाला तेव्हा त्यातील काही बाबी त्यांच्यापुढे मांडण्यातही आल्या. अस्पृश्य वर्ग अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि औषधोपचार या सर्वच प्राथमिक गरजाबाबत शतकानुशतके वंचित राहिला आहे. त्यांना घरे बांधण्यासाठी कर्ज व मदत म्हणून शासन सहाय्य करते. पण त्यांना स्वतःला घालावी लागणारी रक्कमही त्यांना झेपण्यासारखी आहे काय, याचा विचार करण्याची गरज आहे. भूमिहिन अस्पृश्यांना जमिनी देण्याचे धोरण आहे. पण बऱ्याच राज्यात वाटप करण्यासाठी अपुरी जमिन व त्यातही अनेक अग्रक्रम! शिवाय अशा जमिनी अस्पृश्यांना मिळण्यात ग्रामीण भागातून अनेक अडथळे निर्माण केले जात असतात. नोकऱ्यामध्ये राखीव जागा ठेवूनही गुणवत्तेच्या व पात्रतेच्या नावाखाली त्या रिकाम्याच ठेवल्या जातात. नोकऱ्या मधील बढत्याबाबतही पक्षपाताची वागणूक दिली जाते. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचा कायदा असला तरी त्याची कडक व काटेकोर अंमलबजावणी होण्याची गरज आहे. त्यासाठी कायद्यात जरूर तर दुरूस्तीही केली पाहिजे. अस्पृश्य विदयार्थ्याचे तर अनेक प्रश्न आहेत. त्यांना सर्व शिक्षण मोफत मिळाले पाहिजे. त्यांना स्कॉलरशीपही दिल्या जातात. पणया स्कॉलरशीप १९५० साली ठरलेल्या दरानेच दिल्या जातात. वास्तविक गेल्या २० वर्षात जीवनमानात कितीतरी फरक पडला आहे व महागाई वाढली आहे. आता या रकमेत वाढ होणार आहे आणि असली तरी तिला मार्काची अट घातली जाणार आहे असे कळते. पुढारलेल्या वर्गाबरोबरची समानतापूर्ण परिस्थिती व वातावरण जोपर्यंत या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जात नाही तोपर्यंत ही अट विषमतेचेच द्योतक ठरेल. गेल्या वर्षी केंद्रीय समाजकल्याण खात्याने वय आणि मार्कांच्या अटी संबंधाचा असा एक निबंध आणला होता. त्यावेळी याच स्तरातून आम्ही त्याचा परामर्ष घेतला होता व त्यानंतर १०० मागास वर्गीय

खासदारांनी इंदीराजींना भेटून त्यास तह मिळविला होता. मागास व अस्पृश्य वर्गाबद्दल इंदिराजींच्या मनात खास आस्था आहे. भारताचे सध्याचे सरंक्षणमंत्री श्री. जगजीवनराम व सत्तारूढ काँग्रेसचे विद्यमान अध्यक्ष बी. डी. संजोवय्या हे दलितवर्गातीलच आहेत त्यावरूनही हे दिसून येते. सरकारी वसतिगृहात मागास विद्यार्थ्यांवर मासिक सुमारे ९५ रू. खर्च केला जातो व संस्थांच्या वसतिगृहात मात्र निम्म्या रकमेवर भागवावे लागते ही विसंगतीही दूर झाली पाहिजे. मागास किंवा अस्पृश्य वर्गासाठी ज्या अनेक सवलती आहेत.[१७]''

**७) सांगली नगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम –**

सांगली नगरपालिकेने दलित व मागासवर्गीयांची स्तुत्य उपक्रम केले. वसंतरावदादा नेहमी दलित वर्गीयांविषयी सहानुभूती होती. त्यामुळे सांगली जिल्हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. सर्व समाजाप्रमाणे दलित वर्गसुध्दा दादांच्या पाठीमागे होता. त्यामुळे दलित चळवळीस वसंतदादांनी व त्यांच्या कार्यकत्यांनीसुध्दा सहकार्य केलेले दिसते. बरीच दलित मुले सांगली नगरपालिकेत तसेच शिक्षण संस्थेत नोकरीस होती, त्याची बातमी पुढीलप्रमाणे –

''सांगली जिल्हा हा नवकाँग्रेस पक्षाच्या दृष्टीने अत्यंत संघटित असलेला असा जिल्हा आहे. भूतपूर्व सांगली संस्थानातून हा सांगली जिल्हा तयार झाला. त्यात सांगली, मिरज, जत, बुधगावही भूतपूर्व छोटी छोटी संस्थाने सामील झाली. सत्यवादी पत्राची सुरूवात जी झाली, ती भूतपूर्व सांगली संस्थानातच १९२६ साली सत्यवादी पत्राचा जन्म झाला. तेव्हा पासून सतत ४८ वर्षे सत्यवादी पत्राचा सांगली लोकजीवनाशी आत्मीयतेचा संबंध राहिलेला आहे. सांगली जिल्हा अस्तित्वात येण्यापूर्वी तेथे प्रशासकीय कारभार सुरू होता. नंतर सांगली जिल्ह्याचा जन्म दक्षिण सातारा जिल्हा म्हणून झाला. १९४९ साली सांगलीत सत्यवादीवर एक अब्रुनुकसानीचा खटला दाखल करण्यात आला. या खटल्याचे स्वरूप काँग्रेस विरूध्द कम्युनिस्ट असे होते. सातारा जिल्ह्यातील प्रसिध्द वकील श्री. सोमण यांचे चिरंजीव कॉम्रेड जंबू सोमण यांचे वास्तव्य सांगली शहरात होते व त्यांच्यावर सत्यवादीतून प्रखर टीका आली होती. या टिकेने चिडून जावून जंबू सोमण याने सत्यवादीवर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला. हा खटला २ वर्षे चालला. या खटल्यात सत्यवादीच्या वतीने

२ प्रसिद्ध कायदेपंडित काम पहात होते. एक ॲड. केशवराव चौगुले व दुसरे ॲड. जगन्नाथराव पाटणकर! या खटल्यात आमचा प्रचंड विजय झाला. तेव्हापासून तेथे जिल्ह्याची विकासकामे करणारे जे जिद्दीचे तरूण कार्यकर्ते होते. त्या सर्वांना सत्यवादी पत्रातून आम्ही जबरदस्त पाठींबा देत होतो. इतकेच नव्हे तर १९४९ साली आम्ही सत्यवादीचा सांगली जिल्हा विकास अंकही काढला होता.

श्री. वसंतराव दादा पाटील, डॉ. देशपांडे, श्री. पागे वकील, श्री. कुते वकील, श्री. रामानंद भारती, बॅ. जी. डी. पाटील हे त्यावेळचे काँग्रेसचे जिद्दीचे कार्यकर्ते. श्री. वसंत दादा पाटील यांच्या अंगची तडफ त्यांची लोकसंग्रह करण्याची वृत्ती व संघटनेवरील निष्ठा या गोष्टी विचारात घेवून श्री. रामानंद भारती यांनी सांगली जिल्ह्याचे नेते म्हणून श्री. वसंतराव दादा पाटील यांनी सांगली जिल्ह्याचा कायापालटच करून टाकला. त्यांच्या या सर्व कार्याला प्रभावी पाठींबा देण्याचे काम महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते ना. यशवंतराव चव्हाण यांनी सातत्याने केले. श्री. वसंतदादा पाटील यांनी आपल्या संघटना कौशल्याने सर्व जिल्ह्यात काँग्रेस कार्यकर्त्यांचे एक मोहोळच निर्माण केले. १९५७ साली त्यावेळच्या मुंबई राज्याची सार्वत्रिक निवडणुक झाली. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला विलक्षण जोर असल्याने त्या निवडणुकीत काँग्रेसचे अनेक ठिकाणचे उमेदवार पडले. या निवडणुकीत फक्त एका सांगली जिल्ह्याने जास्तीत जास्त काँग्रेस उमेदवार निवडून आणले. सांगली जिह्यातील महत्वाची नगरपालिका म्हणजे सांगली नगरपालिका ही काँग्रेसच्याच हातात ठेवण्याचा श्री. वसंतदादा पाटील यांनी यशस्वी विक्रम केला आहे. असे म्हणावयास हरकत नाही. प्रबळ विरोधी पक्ष असतानाही त्यांनी सांगली नगरपालिका काँग्रेस पक्षाच्या हातून जाऊ दिली नाही. सांगली नगरपालिकेने आपली अलिशान इमारत उभारली. पाणीपुरवठ्याची प्रचंड योजना यशस्वी केली. स्वतःचे जनता नाट्यगृह बांधून काढले. अंडर ग्राऊंड ड्रेनेजचे काम चालू आहे. सांगलीचा औद्योगिक विकास झपाट्याने होत असून त्याचा फायदा प्रामुख्याने शेतकरी वर्गालाच मिळत आहे. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. नवाब अलि यावर जंग यांच्या शुभ हस्ते सांगली नगरपालिकेने बांधलेल्या भव्य अतिथी गृहाचे उद्घाटन ता. १४ रोजी पद्मभूषण वसंतराव दादा पाटील यांचे अध्यक्षतेखाली थाटाने झाले.

सांगलीला मिळालेले नगराध्यक्ष हे सर्व उत्साही आणि नेत्याला मान देणारे नगराध्यक्ष लाभले. सध्याचे नगराध्यक्ष श्री. सुरेश पाटील हे असेच उत्हासी व तरूण आहेत. त्यांना सार्वजनिक कामाची मनापासून तळमळ आहे. आणि नेतृत्वाचा आदर राखण्याची त्यांच्या ठिकाणी विनम्र भावही आहे. म्हणूनच नगराध्यक्ष पदाची मुदत संपली असतानाही श्री. सुरेश पाटील यांना वन्समोअर देण्यात आला. सांगली नगरपालिकेने बांधलेल्या अतिथीगृहाला पावणे चार लाख रू. खर्च आला असून, वार्षिक साडेतीन कोट रू उत्पन्न असलेल्या कोल्हापूर महानगरपालिकेने सुध्दा ही गोष्ट केलेली नाही. याची वेगळी जाणीव झाल्याखेरीज राहत नाही. वसंतदादा पाटील हे आज महाराष्ट्र राज्याचे मंत्री असले तरी आपल्या जिल्ह्याकडे त्यांचे सतत लक्ष आहे. व हा मनुष्य स्वभावच आहे. त्यांना मानपत्र देण्याचा महत्वाचा कार्यक्रम झाला.[१८]''

### ८) रिपब्लिकन पक्षाची स्वतंत्र कामगार युनियन –

रिपब्लिकन पक्षाची एक शाखा सांगली जिल्ह्यात दलितांचे प्रश्न, समस्या, अडचणी सडविण्याचे काम करीत होते. या पक्षाची कामगार युनियन स्थापन करून जोरात कार्य सुरू केले, त्याची वार्ता पुढीलप्रमाणे–

''चार दिवसापूर्वी मुंबई येथे रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी निरनिराळ्या कारखान्यातून काम करणाऱ्या रिपब्लिकन कामगारांची एक स्वतंत्र युनियन निर्माण करण्याचा निर्णय घेतला, ही स्वागतार्ह घटना आहे. रिपब्लिकन पक्ष हा भारतीय घटनेचे महान शिल्पकार आणि दलितांचे उध्दारक डॉ. बाबासाो आंबेडकर यांनी स्थापन केलेला लोकशाहीवादी पक्ष आहे. डॉ. आंबेडकर यांनी अत्यंत दूरदृष्टीने दलित वर्गामध्ये शिक्षणाचा जो ठाम पुरस्कार केला त्या पुरस्कारामुळे आज रिपब्लिकन पक्षात अनेक मान्यवर नेते निर्माण झाले आहेत, कायदे पंडित तयार झाले आहेत. मान्यवर अर्थशास्त्रज्ञ तयार झाले आहेत. शिक्षण देणारे मान्यवर प्राध्यापक तयार होत आहेत. अनेक डॉक्टर इंजिनिअर्स तयार झाले आहेत. लष्करात ज्येष्ठ पदावरील अधिकारी बनले आहेत. राज्ययंत्रणेत उच्च प्रशासन अधिकारीही तयार झाले आहेत आणि ही उच्चशिक्षित लोकांची संख्या सतत झपाट्याने वाढत आहे. इतकेच नव्हे तर रिपब्लिकन पक्षातील स्त्रियाही शिक्षणाच्या आघाडीवर अग्रभागी तळपत आहेत. रिपब्लिकन पक्षात बहुसंख्य लोक बौध्दधर्मीय आहेत. आजपर्यंत जीवनाच्या सर्वक्षेत्रात

दलितांचे जे शोषण करण्यात आले, ते शोषण थांबवण्याचा रिपब्लिकन पक्षाने निर्धार केला असून, त्याचसाठी आपल्या कामगारांची स्वतंत्र युनियन निर्माण करण्याचे त्यांनी ठरविले आहे. एका मुंबई शहरात दलित वर्गांतील कामगारांची संख्या दोन लाखावर जाईल. या दोन लाख दलित कामगारांचा उपयोग मुंबईतले निरनिराळ्या युनियन्सचे पुढारी आपल्या स्वार्थासाठी आणि सामर्थ्यासाठी करून घेत आहेत. कामगार युनियनच्या नावाखाली दलित वर्गाचे हे एक प्रकारचे शोषणच आहे हे शोषण थांबवून मुंबईतील २ लाख दलित कामगारांची रिपब्लिकन पक्षाने ठरविलेली युनियन जर निर्माण झाली तर ती एक सामर्थ्यशाली युनियन बनेल व त्या युनियनचा फायदा दलित कामगारांना तर मिळेलच परंतु त्याने मुंबई शहरातील रिपब्लिकन पक्षाची शक्तीही वाढून जाईल.

मुंबई महापालिकेच्या गेल्या निवडणुकीच्या वेळी रिपब्लिकन पक्षाने तेथील एका स्थानिक संघटनेशी युती केली. डॉ. आंबेडकर यांचे जे अनुयायी आहेत, ते एकनिष्ठ अनुयायी असून आपला दिलेला शब्द खरा करण्यासाठी ते जिवाचे रान करतात. रिपब्लिकन पक्षाने दिलेल्या आदेशास जागून मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत ज्या संघटनेशी रिपब्लिकन पक्षाने युती केली होती, त्या संघटनेच्या उमेदवाराला त्यांना आपली सर्व मते प्रामाणिकपणे दिली, परंतु हा सर्व व्यवहार एकतर्फीच झाला. ज्या संघटनेबरोबर रिपब्लिकन पक्षाने युति केली होती. त्या संघटनेने रिपब्लिकन पक्षाच्या सर्व उमेदवारांना ठरल्याप्रमाणे मते देणे हे त्यांचे कर्तव्य होते. परंतु त्या संघटनेने रिपब्लिकन पक्षाचा विश्वासघात करून आपली मते त्या पक्षाला दिली नाही, त्याचा परिणाम असा झाला की, मुंबई महापालिका निवडणुकीत हाताच्या बोटावर मोजण्याइकेच रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार निवडून आले. हा कटु अनुभव विचारात घेवून मुंबईच्या रिपब्लिकन पक्षाने यापुढे शहाणपणाने व स्वपक्षाच्या हिताच्या दृष्टीने पाऊल टाकण्याचे ठरविले आहे. सुदैवाने रिपब्लिकन पक्षात व्यक्तिगत स्वार्थासाठी जे तट पडले होते ते सर्व तटही मोडून रिपब्लिकन पक्षात आता एकजूट निर्माण झाली आहे. आणि रिपब्लिकन पक्षाचे नेते ही खंबीर विचाराचे आहेत. राजकारणात कसे डावपेच खेळावेत, त्या डावपेचातही ते निष्णात बनले आहेत. तेव्हा मुंबई शहरात त्यांनी दलित वर्गाच्या हक्कासाठी रिपब्लिकन कामगारांची स्वतंत्र

युनियन निर्माण करण्याची जी घोषणा केली तीची ताबडतोब कार्यवाही व्हावी, अशी रिपब्लिकन पक्षाविषयी आत्मियता असणाऱ्या महाराष्ट्रीय जनतेची सदिच्छा आहे.[९९]''

**९) सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीयांना दिलेला न्याय –**

सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीयांना सरकारीसेवेत प्राधान्य द्यावे असा ऐतिहासिक निवाडा दिला. त्यानुसार सांगली जिल्ह्यात बरीच दलित मुले सरारी सेवेत आली. त्यांनी दलित चळवळीस नेहमीच सहकार्य केले व आपल्या बांधवांना प्रगतीचा मार्ग दाखविला ती बातमी –

''भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ता. २१ रोजी एक अत्यंत महत्वाचा निवाडा देवून मागासवर्गीयांना सरकारी सेवेत प्राधान्य मिळणे हे घटनेला धरून असल्याचे या निवाड्यात स्पष्टपणे म्हटलेले आहे. मागासवर्गीयांच्या उध्दारासाठी घटनेने जी मूलभूत चौकट तयार केली आहे. त्यातील तत्वानुसार मागासवर्गीयांना विशेष सवलती मिळण्याची व्यवस्था असून या उद्दिष्टानुसार प्रशासकीय कार्यक्षमतेला बाधा न आणता सरकारी नोकरीत हरिजन व अन्य मागासवर्गीय जाती–जमातीच्या उमेदवारांना प्राधान्य देण्याचे घटनेतील समतेचे जे तत्व आहे. या तत्त्वांचा भंग होत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यात म्हटले आहे. या खटल्याची संपूर्ण माहिती अशी की, केरळ राज्य सरकारने सरकारी सेवेत असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना बढत्या देता याव्यात यासाठी त्यांना ज्या चाचणी परिक्षा द्याव्या लागणार होत्या त्या चाचणी परीक्षेची अट २ वर्षासाठी शिथील केली. एका आदेशान्वये ता. १२ जाने १९७२ रोजी केरळ सरकारने हा नवा नियम लागू केला. परंतु संबंधिताकडून या आदेशाविरूध्द केरळच्या हायकोर्टात आव्हान देण्यात आले. श्री. एच. एम. थामस व इतरांनी हा अर्ज केला होता. केरळ हायकोर्टाने थामस व इतरांचा दावा मान्य करून, सरकारचा नियम भेदाभेद करणारा व घटनेतील समानतेच्या तत्त्वाशी विसंगत असणारा आहे. असा निकाल दिला होता. त्यानंतर केरळ सरकारने त्यावर सुप्रीम कोर्टात अपील दाखल केले. या अपीलाचे काम सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. अजितनाथ रे याच्या अध्यक्षतेखाली सात जणांच्या काऊंस्टीट्युशन बेंचपुढे चालले या सात जणापैकी पाच जणांनी केरळ सरकारने प्रतिपादन घटनेतील तत्त्वांना धरूनच आहे.

असे म्हटले असून, इतर दोन न्यायमूर्तींनी आपले मत भिन्न नोंदवले आहे. तथापि त्यांनीही घटनेतील तरतुदीनुसार खास नियम करून मागासवर्गीयांसाठी जागा राखून ठेवता येतात हे मान्य केले आहे. म्हणजेच या दोघा सन्माननीय न्यायमूर्तींनीही या खटल्यामागे जी सात्विक भूमिका आहे तिला अप्रत्यक्षरित्या आपला पाठिंबाच व्यक्त केला आहे असे म्हटले तर चूक ठरू नये. सन्माननीय न्यायमूर्तींनी केरळ सरकारचा दावा मान्य करताना जे निकालपत्र दिले आहे. ते मुळातुनच पाहण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे भारताच्या राज्यघटनेत मागासवर्गीयासाठी विचारपूर्वक आणि जाणीवपूर्वक ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत त्याचेही दर्शन त्यात पडते. सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती आपल्या निकालपत्रात म्हणतात, ''भारतीय घटनेने मागासवर्गीय आणि अनुसूचित जाती–जमाती यांचे वर्गीकरण मान्य केले आहे. सरकारी नोकऱ्यांच्या संदर्भात या वर्गातील उमेदवारांबाबत वेगळ्या –कसोट्या लावणे हे उमेदवारीसाठी समान संधी असणे ही अधिक असमानताच म्हटली पाहिजे. समान संधीमध्ये सकारण भेदभाव ग्राह्य मानला जातो पण अकारण भेदभाव मात्र अग्राह्य मानला जातो. सकारण भेदभाव ही वाजवी वर्गवारी होऊ शकते व त्यासाठी वेगळे निष्कर्ष लावणे हे घटनाबाह्य होऊ शकत नाही. अर्थात प्रशासकीय कार्यक्षमता ही आवश्यक गोष्ट आहे. परंतु त्यासाठी मागासवर्गीयांना काही सवलती दिल्यास त्यात काहीही गैर नाही.'' सन्माननीय न्यायमूर्तींनी आपल्या निकालपत्रातून हे जे प्रतिपादन केले आहे ते इतके बोलके आहेत की त्यावर आणखी स्वतंत्र भाष्य करण्याची जरूरीच नाही. या निकालाकडे देशातील समाजधुरिणांचे व राष्ट्रनेत्यांचे लक्ष लागून राहिले होते. बाहेर पडलेल्या निकालात मागासवर्गीयांच्या हिताचे रक्षण झाल्याने हा निकाल महत्वाचा निकाल मानावा लागेल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे सेनापती महात्मा गांधी यांनी घटना बनवण्याचे जबाबदारीचे काम डॉ. आंबेडकर यांच्यावर सोपवले, त्यामागे मागासवर्गीय पददलित आणि उपेक्षित बहुसंख्य जनतेला खरा न्याय मिळावा ही त्यांची तळमळीची भावना होती. मागासवर्गाला पुरेपुर न्याय देण्याच्या कसोटीला भारतीय राज्यघटना पूर्णपणे उतरली असून जगप्रसिध्द राज्य शास्त्रज्ञ अर्नेस्ट बाल्कन यांनी आपल्या ग्रंथातून या संदर्भात भारतीय घटनेचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. भारतीय घटनेतील ही मुलभूत तत्वे प्रत्यक्षात आणण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधींनी आतापर्यंत जातीने लक्ष दिले असून या वंचित वर्गाचा

संपूर्ण कायापालट कसा होईल याची त्यांना सतत तळमळ लागून राहिलेली आहे. यासाठी सरकारी नोकऱ्यातून मागासवर्गीयासाठी राखीव जागा ठेवण्याच्या प्रमाणात त्यांनी ४०% पर्यंत वाढ केली असून शिवाय वयोमर्यादितही सवलती जाहिर केल्या आहेत. मागासवर्गीयासाठी सर्व तऱ्हेच्या शैक्षणिक सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शेती, उद्योग धंदे, व्यापार इ. क्षेत्रात मागासवर्गीयांना आर्थिक सहाय्याची गरज पूर्ण करण्यासाठी सरकार अनेक योजनाही अंमलात आणत आहे. सरकारच्या कोणत्याही कार्यक्रमात मागासवर्गीयांच्या हिताला प्राधान्य देण्यात येत असते. व ते योग्यच आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशाच्या सर्वकष आर्थिक विकासासाठी जो सर्वकष आर्थिक कार्यक्रम जाहीर केला आहे त्यातही हेच महत्वाचे आहे.[१००]''

## १०) दलित मित्र तिरमारे गुरूजींचे निधन –

तिरमारे गुरुजी हे सांगली जिल्ह्यातील पहिल्या दलित पिढीतील थोर नेते व समाज सुधारक डॉ. आंबेडकरांचे सहकारी व समकालीन. त्यांचे ९० व्या वर्षी निधन झाले. दलित चळवळीचे मार्गदर्शक त्यांच्या निधनाची बातमी.

''दलित मित्र श्री. शिवराम कुशाबा तिरमारे उर्फ तिरमारे गुरूजी यांचे काल पहाटे ५।। वा. हृदय विकाराने निधन झाले. निधन समयी ते ९० वर्षाचे होते. दुपारी निघालेल्या त्यांच्या अंत्ययात्रेत दलित आणि इतर समाजातील लहानथोर मंडळी मोठ्या संख्येने सामिल झाली होती. कृष्णातिरी 'अमरधाम' स्मशान भूमित त्यांच्या पार्थिव देहावर बौध्द पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अनेकांनी त्यांना साश्रुनयनांनी श्रध्दाजंली वाहिली. त्यांच्या पश्चात ५ मुले आणि २ मुली नातवंडे असा परिवार आहे.[१०१]''

## ११) मराठवाडा विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर –

मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन पेटले होते. त्यावेळी सांगली जिल्ह्यातील दलित नेते त्या आंदोलनात सहभागी झाले होते. म्हणून ही

बातमी वर्तमानपत्रात महत्त्वाचा प्रश्न असल्याने प्रकाशित झाली होती. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील दलित नेते डॉ. रामदास आठवले व इतर नेते सामील होते.

''भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विधानसभेत परवा रोजी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्यात यावे यासबंधी बहुजनसमाजाच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव पाटील यांनी मराठ्वाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याला नुकताच नकार दिला अशी बातमी प्रसिध्द झाली आहे. तथापि त्याची कारणे समजली नाहीत. वास्तविक महाराष्ट्रशासनातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमोल साहित्य प्रकाशित करण्याची एक योजना आखली असून त्या साहित्य समितीवर श्री. वसंतदादा पाटील हे आहेत आणि त्यांच्याच अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या साहित्य समितीची बैठक ता. ६ रोजी मंत्रालयात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नुसत्या दलितांचे पुढारी नव्हते, तर या देशातील सर्व उपेक्षित लोकांचे त्यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. त्यांच्या थोरवीची तुलना युरोपातील पोपशाहीविरूध्द बंड करून उठलेल्या मार्टिन ल्युथर किंगशी केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नुसते कायदेपंडितच नव्हते, तर ते राष्ट्रवादीही होते. आपल्या या राष्ट्रवादी भूमिकेतूनच त्यांनी भारतीय लोकशाहीचा ठाम पुरस्कार केला आहे. आज दलित, उपेक्षित व गिरीजनात जी लोकशाही रूजली आहे. त्याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच द्यावे लागेल. भारतीय राज्य घटना तयार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेले महान कार्य म्हणजे त्यांनी आपल्या घटनेत प्रौढ मतदान पध्दतीचा केलेला पुरस्कार होय! तसेच पुरष वर्गाबरोबरच भारतीय स्त्रियानांही समान संधी आणि समान हक्क, घटनेतून बहाल करण्याचे राष्ट्रीय काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. या प्रौढ मतदान पध्दतीला त्यावेळच्या कॉंग्रेसमधील बड्या बड्या धेंडाचा तीव्र विरोध होता. प्रौढ मतदान पध्दती हळूहळू वाढवीत न्यावी असे त्यांचे म्हणणे होते त्याचे कारण या देशात अशिक्षित लोकांची संख्या प्रचंड आहे. आणि प्रौढ मतदान पध्दतीने अशा अशिक्षित लोकांच्या हातात देशाची सत्ता गेली, तर या देशाचा राज्यकारभार चांगला राहणार नाही. असे त्यांचे मत होते. कॉंग्रेसमधील त्यावेळच्या या धेंडाचे हे मत आणि भारतावर राज्य

करणाऱ्या विशिष्ट साम्राज्यवादांचे मत, यांच्यात काहीही फरक नव्हता कारण ब्रिटीश सत्तेचे ठेकेदारही असेच म्हणत होते की, या देशाला हप्त्या हप्त्याने स्वराज्य देण्यात यावे! कारण भारतातील लोक अडाणी आहेत, आणि त्यांना दिलेले संपूर्ण स्वातंत्र्य त्यांना पेलताही येणार नाही! परंतु काँग्रेसमधील बड्या धेंडांच्या सरंजामशाही वृत्तीला कडाडून विरोध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रौढ मतदान पध्दतीचा म. गांधीजीनी जबरदस्त पुरस्कार केला. त्यामुळे काँग्रेसमधील बडी धेंडे हात चोळीत गप्प बसली! अर्थातच म. गांधीच्या या प्रौढ मतदान पध्दतीच्या पुरस्काराला प. नेहरूनीही जबरदस्त पाठिंबा दिला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी भारतीय राज्य घटनेत प्रौढ मतदान पध्दतीचा पुरस्कार केला नसता, तर आज भारतीय राजकारणात पुढे झालेले चरणसिंगासारखे शेतकरी कुटुंबातील पुढारी केव्हाच दिसले नसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी मूल्यांच्या दृष्टीने केलेली दुसरी महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी बौध्द धर्माचा केलेला स्वीकार. त्यांनी बौध्द, धर्माचा स्वीकार करताना हिंदू धर्मातील सनातनी पंडितांना सतत पंचवीस वर्षे संधी दिली होती. परंतू त्या संधीचा सनातनी पंडीतांनी फायदा करून घेतला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्म स्वीकारल्यामुळे त्यांच्या लक्षावधी अनुयायांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला आणि चातुवर्णाच्या लोखंडी पिंजऱ्यातून त्यांनी स्वतःला आणि दलित समाजाला मुक्त करून टाकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण प्रसाराची केलेली कामगिरी ही महान कामगिरी आहे. मुंबईला त्यांनी अनेक उच्च शिक्षण संस्था निर्माण केल्या. तथापि शिक्षण प्रसाराच्या बाबतीत त्यांनी मराठवाड्यात केलेली कामगिरी सर्वात मौलिक कामगिरी आहे. औरंगाबाद येथे जे मराठवाडा विद्यापीठ आहे त्या विद्यापीठाची जागा तीनशे एकराची आहे. परंतु मराठवाडा विद्यापीठ स्थापन होण्याच्या अगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे दोनशे एकर जागा मिळवून त्या ठिकाणी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची चार महाविद्यालये निर्माण केली.[१०२],,

## १२) सांगली जिल्ह्यात १०० मागासवर्गीय पोलीस पाटील –

प्राचीन व मध्ययुगीन काळात गावचा पाटील हा उच्च वर्गातील पिढ्यान्‌पिढ्या नेमला जात असे पण स्वतंत्र भारतात या अनुवांशिक पाटील नेमणे बंद करून नवीन नियमाप्रमाणे मागासवर्गीयपण जाऊ लागले. सांगली जिल्ह्यात १०० मागासवर्गीय पाटील नेमले हा एक क्रांतिकारक नियम होता, हे दलित चळवळीचे यशच म्हणावे लागेल, त्याचा वृत्तांत–

''सांगली जिल्ह्यात आता पावेतो एकूण १०० पोलिस पाटील अनुसूचित जाती–जमाती भटक्या जमाती व मागासवर्गीय वर्गापैकी नेमण्यात आले आहेत. ही माहिती जिल्हा अस्पृश्यता निर्मूलन दक्षता समितीच्या सभेत देण्यात आली. जिल्हाधिकारी श्री.विजयकुमार अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली काल ही सभा झाली.

जिल्ह्यात पोलिस पाटील पदे जशी रिकामी होताहेत, तशा या जागा भरण्यात येत आहेत. मिरज प्रांताधिकारी श्री. मुनीर मुजावर यांनी मिरज उपविभागीय माहिती देताना सांगितले की, या उपविभागात एकूण २५१ पोलीस पाटील आहेत. नियमाप्रमाणे ९० जागा मागासवर्गीयासाठी राखीव आहेत. यापैकी रिकाम्या होत गेलेल्या जागा आता पावेतो अनुसूचित जातीचे १६ भटक्या जमातीचे ५ व इतर मागास वर्गीय ३३ याप्रमाणे चौपन्न जागा भरण्यात आल्या आहेत.

वाळवा उपविभागाची माहिती देताना प्रांताधिकारी श्री.गायकवाड यांनी सांगितले की, या उपविभागात २८४ पोलीस पाटील आहेत, यापैकी राखीव जागा ९६ भरणे जरूर आहे. आता पावेतो रिकाम्या झालेल्या जागावर अनुसूचित जातीचे तेवीस भटक्या जमातीचे चार व इतर मागासवर्गीय एकोणीस याप्रमाणे ४६ जागा भरल्या गेल्या आहेत.[१०३]

पोलीस पाटील पदे भरण्याबाबत आजच्या विभागाकडून होत असलेल्या कार्यवाहीबद्दल आजच्या सभेत समितीचे सदस्य सर्वश्री पी. टी. मधाळे, एल. बी. भिंगारदेवे, बी. एल. पवार, देवीदास पोखर्णीकर, शिवरूद्ध

बामणे, रंगराव बनसोडे व समाज कल्याण सभापती अमृत सागर या सर्वांनीच समाधान व्यक्त करून जिल्हाधिकारी यांचे जाहीर अभिनंदन केले.''

**१३) आंतरजातीय विवाहाचा सत्कार –**

जगातील, भारतातील, महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी जाती व्यवस्था मोडायची असेल तर आंतरजातीय विवाह हा एक जालिम उपाय म्हणून सुचविला होता. महात्मा फुले, राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर यांनीही आंतरजातीय विवाहास मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला होता. त्यानुसार आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोड्यांचा सत्कार केला व प्रोत्साहन दिले, त्याची बातमी

''नाटोसी येथील नामदेव कांबळे (बी.ए) व ब्राम्हण मुलगी विजया जोशी यांचा आंतरजातीय विवाहाला एक वर्ष संपून त्या दांपत्याला पहिल्यांदा मुलाच्या बारशानिमित्त विश्वास सह. कारखान्याच्या कामगारांतर्फे त्यांना संसार उपयोगी भांड्यांचा सेट देवून एक आगळा सत्कार केला. त्याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन,संचालक श्री. बी. डी. कांबळे, श्री. रावजी धस, तानाजी साळुंखे व कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.[१०४]

आष्टा येथे आंबेडकर जयंती साजरी – येथील सिध्दार्थ तरूण मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ९३ वी जयंती मोठ्या प्रमाणात अती उत्साहाने साजरी करण्यात आली. त्यानिमित्त गावातून मोठी मिरवणूक काढण्यात आली. तसेच श्री. विलासराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख वक्ते शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूरचे प्राचार्य श्री. कुरणे यांचे व कॉलेज मधले प्राध्यापक बीडकर यांचे बाबासाहेबांच्या जीवनावर व शिकवणुकीवर भाषण झाले. बक्षीस समारंभ व विजय कलापथक कोल्हापूर यांचा कार्यक्रम झाला.[१०५]''

**१४) मागास वर्गीयांवर अन्याय नको : ना. देशमुख**

भारतीय घटनेप्रमाणे मागासवर्गीयांना संरक्षण असूनदेखील महाराष्ट्रात व सांगली जिल्ह्यात काही ठिकाणी दलितावर अन्याय होत होते म्हणून त्याविरोधी दलित चळवळ निदर्शने, मोर्चे काढून जिल्हाधिकारी, मंत्री यांना

निवेदने दिली जात होती. त्यानुसार मागासवर्गीयावर अन्याय नको म्हणून गृहराज्यमंत्री यांनी आदेश काढला, त्याचा वृत्तांत–

''दलित मागासवर्गीयांना न्याय मिळावा यासाठी डॉ. आंबेडकर यांनी आपले जीवन वेचले, त्यांची जयंती साजरी करताना आपण मागासवर्गीयावर अन्याय नको ही भूमिका घेतली पाहिजे. पोलीस यंत्रणा या वर्गाला न्याय मिळेल, असे वागेल असे आपण पाहू असे महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री श्री. शिवाजीराव देशमुख यांनी सांगितले.

वाळवा तालुक्यातील थानापुडे यागावी परवा समस्त ग्रामस्थातर्फे एकत्रितपणे डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी मंत्रीमहोदय बोलत होते. पन्हाळा तालुक्याचे आम. श्री. यशवंत एकनाथ पाटील हेही या जयंती सोहळ्यास मुद्दाम उपस्थित होते.

समाजातील जे दलित, गरीब असतात त्यांच्यावर प्रामुख्याने अन्याय होत असतो. असे सांगून श्री. देशमुख म्हणाले की, अशा अन्याय वागणूकीशी पोलीसांनी कठोरपणे मुकाबला करण्याची गरज आहे.

डॉ. आंबेडकर हे अन्यायाविरूध्द झगडणारे महामानव होते. असे सांगून त्यांच्या विचारांची पूजा झाली पाहिजे. असे श्री. देशमुख यांनी स्पष्ट केले. माणुसकी हा एकच धर्म मानला तर सर्व धर्मात समभाव वाढीस लागेल असेही त्यांनी सांगितले. सर्व ग्रामस्थांनी तसेच गावातील सर्व संस्थांनी एकत्र येवून जयंतीचा हा सोहळा सामुदायिकपणे साजरा करून इतर गावांना थानापुडे गावाचे उदाहरण घालून दिले आहे. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.[१०६]''

**१५) आंबेडकरवाद व बौध्द धर्मच राष्ट्रीय एकात्मता साधेल –**

डॉ. आंबेडकर यांचे विचार दलित वर्गाच्या सर्वांगीण प्रगती व उन्नतीसाठी उपयोगी होते. म्हणून दलित नेते म्हणत डॉ. आंबेडकरवाद व बौध्दधर्मच राष्ट्रीय एकात्मा साधेल म्हणून त्या विचारांचा प्रसार संपूर्ण सांगली जिल्ह्यात वेगवेगळ्या माध्यमातून केला जात होता, त्याचे वार्तापत्र पुढीलप्रमाणे–

''**प्रा. आंबेडकरांचे विचार –** आंबेडकरवाद व बौध्द धर्माचा विचारच राष्ट्रीय एकात्मता साधू शकेल असे विचार प्रा. जी. बी. अंबपकर यांनी येथील सांगली जिल्हा बौध्द साहित्य सभेने आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याखानमालेत आंबेडकरवाद व राष्ट्रीय एकात्मता या विषयावर बोलताना मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे दोन सत्र ठेवले होते. पहिल्या सत्रासाठी ''आंबेडकरवाद व राष्ट्रीय एकात्मता'' तर दुसऱ्या सत्रासाठी ''बौध्द दलित तरूण व सामाजिक बांधिलकी'' असे विषय ठेवले होते. पहिल्या सत्राचे अध्यक्ष पद प्रा. बापूसाहेब माने व दुसऱ्या सत्राचे प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांनी भूषविले.

पहिल्या सत्राची सुरवात बुध्द वंदनेने झाली. प्रास्ताविक भाषण आयु. आनंदराव घोडेस्वार यांनी केले. नंतर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अच्युत माने, प्रा. जी.बी. अंबपकर, प्रा. गौतमीपुत्र कांबळे हे होते. दुसऱ्या सत्राची सुरूवात दिनकर काकडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. दुसऱ्या सत्रात प्रमुख वक्ते विजय कांबळे व प्रा विनायक कांबळे हे होते.

दुसऱ्या सत्राच्या सुरवातीस या संस्थेमार्फत आयु. माणिकताई गायकवाड यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार व डॉ. चंद्रकांत गायकवाड यांना ए. डी. डी. जी. ओ. (मुंबई) पदवी मिळविले बद्दल सत्कार करणेत आला. दादासाहेब खांडेकर यांनी आभार मानले.[१०७]''

**१६) मागासवर्गीय शिक्षकांच्या नेमणुका –**

मागासवर्गीय मुले–मुली शिक्षण घेऊ लागली. प्रशिक्षित मागासवर्गीयांना शिक्षकांच्या नेमणुका मिळू लागल्या. त्यामुळे त्यांच्या शिक्षण प्रसार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. सांगली जिल्हाधिकारी मागासवर्गीयांना शिक्षकांच्या नेमणुकीसाठी विशेष लक्ष दिले हे पुढील वार्तापत्रावरून दिसून येते.

''सांगली जिल्हा परिषदेस दक्षता समितीचे धन्यवाद. सांगली जिल्हा परिषदेचे १९८४ मध्ये एकूण ६०० प्राथमिक शिक्षकांच्या नेमणुका केल्या. त्यामध्ये मागासवर्गीय उमेदवार हे प्रमाणाहून अधिक निवडले. खुद्द सांगली जिल्हा परिषदेस भरलेल्या अस्पृश्यता निर्मूलन दक्षता समितीच्या सभेत देण्यात आले.

सांगली जिल्हाधिकारी सौ. लीना मेहेंदळे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा भरली होती. १९८४ मध्ये झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या नेमणुकी मधील मागासवर्गीयांच्या भरतीबाबत गेल्या सभेत हा प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत उपशिक्षणाधिकारी श्री.एस.एन.पाटील यांनी या सभेत माहिती दिली. ते म्हणाले, शेड्युल्ड कास्टचे प्रमाणानुसार ७८ अधिक अनुशेष १३ मिळून ९१ घेणे आवश्यक असता प्रत्यक्षात १०० उमेदवार निवडले आहेत. विमुक्त व भटक्या जमाती ३० शिक्षका ऐवजी ४४ जणांच्या नेमणुका केल्या आहेत. तसेच इतर मागासवर्गीय ६० उमेदवार घेणेचे असता ७६ घेतले गेले आहेत.

काही ग्रामपंचायतीनी पाणी पट्टया भरल्या नाहीत. या सबबीवर मागासवर्गीय भागातील पाण्याचे नळ बंद केले होते. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने लक्ष घालून पाणी पुरवठा चालू केला याबद्दल जिल्हाधिकारी सौ. मेहेंदळे यांना सर्वच सदस्यानी या सभेत धन्यवाद दिले. अस्पृश्यता निवारण कायद्याखाली जिल्ह्यात जाने. ८४ पासून ७ गुन्हे दाखल झाले. त्यातील सहा न्यायालयात दाखल केले आहेत व गेल्या महिन्यातील एका गुन्ह्याचा तपास चालू आहे. अशी माहिती पोलिस निरीक्षक श्री. जगताप यांनी सभेत दिली.

ग्रामपंचायती नियमाप्रमाणे उत्पन्नांच्या १५% खते मागासवर्गीय लोकांच्यासाठी खर्च करतात की नाही याची माहिती जमा करण्याचाही सभेत निर्णय घेण्यात आला.[१०८],,

**समारोप –**

थोडक्यात १९६० ते २००० सालातील वरील बातम्या वार्तापत्रे हे मूळ दलित चळवळीचा इतिहास कथन करणाऱ्या आहेत. त्या चळवळीने केलेली आंदोलन, प्रचारसभा, शिक्षणाचे महत्त्व ओळखून दलित समाज संघर्ष करू लागला व आपल्यावरील अन्यायाविरुध्द उभा राहिला. आपले हक्क मिळवू लागला म्हणून वर्तमानपत्रातील बातम्या म्हणजे समकालीन साधने असल्याने त्याचे इतिहास लेखनात महत्त्वाचे स्थान आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्यामध्ये जनजागृती केल्यामुळे शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा विचार दलित युवकांसमोर मांडल्यामुळे दलित युवकांनी शिक्षण घेवून संघटितपणे कार्याला वाहून घेतले.

परिणाम १९६० ते २००० या कालखंडात अनेक दलित कार्यकर्ते व युवक निर्माण झाले. त्यामध्ये सांगली, सातारा, मिरज, विटा, शिराळा, वाळवा, इस्लामपूर, खानापूर ही शहरे व गावे आघाडीवर होती. सांगलीमध्ये वसंतदादा पाटील यांनी हरिजन वसाहतीच्या पुनर्वसनाची भक्कम पायाभरणी केली. याशिवाय बॅ. जी. डी. पाटील, धोंडीराम पाटील याही नेत्यांचे योगदान विसरता येणार नाही. त्याचबरोबर खानापूर, तासगाव, वाळवा, शिराळा, जत, इस्लामपूर, कवठेमहांकाळ या ठिकाणी शिवाजीराव शेंडगे, राजारामबापू पाटील, संपतराव माने, वसंतराव नाईक, बॅ. शेंडगे यांच्यामुळे दलित चळवळीला मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. डॉ. आंबेडकरांनी पदवीधर व दलित युवकांपुढे मार्गदर्शनपर विचार मांडून सांगली जिल्ह्यातील दलित युवकाला योग्य मार्ग मिळाल्यामुळे या भागातील चळवळ दिशादर्शक बनली. यादृष्टीने अनेक रिपब्लिकन कार्यकर्ते तयार झाले. त्यामध्ये पी. टी. मधाळे, मोहन साबळे, मधुकर कांबळे, किरण कांबळे, सरला कांबळे, नितीन कांबळे, सुधीर बनसोडे, धो. ल. थोरात, माजी आमदार उमाजीराव सनमडीकर, सिध्दार्थ जाधव, रमाकांत घोडके, आमदार सुरेश खाडे, गौतमीपुत्र कांबळे, सुरेश दुधगावकर अशा भक्कम युवकांची पिढी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे अग्रेसर राहिली.

**प्रकरण संदर्भ –**

१) दै. सत्यवादी, १७ मार्च १९६०, अंक २४५, पान १

२) दै. सत्यवादी, ४ ऑगस्ट १९६८ अंक ६५, पान १

३) दै. सत्यवादी, ४ ऑगस्ट १९६८ अंक ६५, पान १

४) दै. सत्यवादी, २५ जाने. १९६९, अंक २३६, पान २

५) दै. सत्यवादी, ८ जुलै १९७५, अंक ९१, पान ३

६) दै. सत्यवादी, दि. १३ एप्रिल १९६०, अंक २३८, पान ५

७) दै. सत्यवादी, दि. १५ एप्रिल १९६० अंक २६०, पान ३

८) कित्ता

९) दै. सत्यवादी, दि. २० एप्रिल १९६०, अंक २७४, पान ६

१०) दै. सत्यवादी, २० जून १९६०, अंक १७ पान ३

७५) दै. सत्यवादी, २२ ऑगस्ट १९७७, अंक १२४, पान ३

८३) दै. सत्यवादी, ४ मे १९७८, अंक ३, पान २

९) दै. सत्यवादी, १ नोव्हें. १९६०, अंक १२८, पान ३

८९) दै. सत्यवादी, २६ एप्रिल १९७९, अंक ३५५, पान ३

१०) दै. सत्यवादी, दि. १५ एप्रिल १९६० अंक २६०, पान ३

१२) कित्ता

१३) दै. सत्यवादी, १९ एप्रिल १९६२, अंक २७३, पान ३

१४) दै. सत्यवादी, १८ मार्च १९६५, अंक २८५, पान ३

१५) दै. सत्यवादी, १४ एप्रिल १९६५, अंक ३१२, पान ४

१६) दै. सत्यवादी, १७ एप्रिल १९७१, अंक ३१६, पान १

१७) दै. सत्यवादी, २५ जुलै  १९७१, अंक ५५, पान २

१८) दै. सत्यवादी, १७ मे १९७४, अंक ३३९, पान ३

१९) दै. सत्यवादी, २० जून १९७४, अंक २०, पान १

२०) दै. सत्यवादी, २८ जुलै १९७४, अंक ५९, पान ५

२१) दै. सत्यवादी, २७ ऑगस्ट १९७४, अंक ८८, पान ३

२२) दै. सत्यवादी, ११ फेब्रुवारी १९६२, अंक २१७, पान १

२३) दै. सत्यवादी, २३ सप्टेंबर १९७५, अंक १६७, पान २

२४) दै. सत्यवादी, ६ ऑक्टोबर १९७५, अंक १८०, पान २

२५) दै. सत्यवादी, १० ऑक्टोबर १९७७, अंक १४३, पान २

२६) दै. सत्यवादी, २० जून १९६०, अंक १७ पान ३

२७) दै. सत्यवादी, १ मे १९६१, अंक २८१, पान ४

२८) दै. सत्यवादी, १३ सप्टेंबर १९६१, अंक ९०, पान ३

२९) दै. सत्यवादी, २ फेब्रुवारी १९६४, अंक २४३, पान ५

३०) दै. सत्यवादी, ६ मार्च १९६४, अंक २७५, पान ३

३१) दै. सत्यवादी, २२ ऑगस्ट १९६५, अंक ८२, पान ७

३२) दै. सत्यवादी, १८ मार्च १९६४, अंक २८७, पान ३

३३) दै. सत्यवादी, ७ एप्रिल १९६४, अंक ३०७, पान ३

३४) दै. सत्यवादी, २८ नोव्हेंबर १९७०, अंक १७८, पान २

३५) दै. सत्यवादी, १९ डिसेंबर १९७०, अंक १९९, पान २

३६) दै. सत्यवादी, १६ ऑगस्ट १९६५, अंक ७६, पान ३

३७) दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७४, अंक ३०९, पान २

३८) दै. सत्यवादी, २२ ऑगस्ट १९६१, अंक ८२, पान २

३९) दै. सत्यवादी, २५ जानेवारी १९७५, अंक २३३, पान ३

४०) दै. सत्यवादी, २३ फेब्रुवारी १९७५, अंक २६३, पान ५

४१) दै. सत्यवादी, १३ मार्च १९७५, अंक २८०, पान ३

४२) दै. सत्यवादी, १९ एप्रिल १९७५, अंक १३, पान ३

४३) दै. सत्यवादी, २३ डिसेंबर १९७६, अंक २५३, पान ३

४४) दै. सत्यवादी, २ फेब्रुवारी १९७०, अंक २५३, पान ३

४५) दै. सत्यवादी, २८ नोव्हेंबर १९७०, अंक १७८, पान ३

४६) कित्ता

४७) दै. सत्यवादी, ८ जुलै १९७८, अंक ६८, पान २

४८) दै. सत्यवादी, २४ नोव्हें. १९७८, अंक २०३, पान १

४९) दै. सत्यवादी, २९ सप्टेंबर १९७९, अंक १५०, पान १

५०) दै. सत्यवादी, १ सप्टेंबर १९८०, अंक १२१, पान ३

५१) दै. सत्यवादी, १९ जानेवारी १९७१, अंक २३०, पान २

५२) दै. सत्यवादी, २६ नोव्हेंबर १९८०, अंक २०३, पान २

५३) दै. सत्यवादी, १० जून १९७२, अंक १०, पान ३

५४) दै. सत्यवादी, २७ ऑक्टो. १९८६, अंक १७६, पान ४

५५) कित्ता

५६) दै. सत्यवादी, १० जून १९६०, अंक ९ पान १

५७) दै. सत्यवादी, १ नोव्हेंबर १९६०, अंक १२८, पान ३

५८) दै. सत्यवादी, १० मे १९६१, अंक २८९ पान ३

५९) दै. सत्यवादी, २१ मार्च १९६१, अंक २४७, पान ३

६०) दै. सत्यवादी, ३ जून १९६१, अंक ३, पान २

६१) कित्ता

६२) दै. सत्यवादी, ११ फेब्रुवारी १९६२, अंक २१७, पान २

६३) दै. सत्यवादी, १५ सप्टेंबर १९६८, अंक १०६, पान ३

६४) दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७७, अंक ६५, पान २

६५) दै. सत्यवादी, ४ नोव्हें. १९७७, अंक १९६, पान ३

६६) दै. सत्यवादी, ११ जाने. १९७८, अंक २६३, पान ५

६७) दै. सत्यवादी, २२ एप्रिल १९७८, अंक ३६२, पान २

६८) दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७८, अंक २५८, पान ३

६९) दै. सत्यवादी, ११ जुलै १९६०, अंक ४१, पान ३

७०) दै. सत्यवादी, १० ऑगस्ट १९६१, अंक ६१, पान ३

७१) दै. सत्यवादी, २० सप्टेंबर १९६१, अंक ९५, पान ३

७२) दै. सत्यवादी, २० फेब्रुवारी १९६२, अंक २२४, पान ३

७३) कित्ता

७४) दै. सत्यवादी, ९ एप्रिल १९६२, अंक २७३, पान ३

७५) दै. सत्यवादी, २९ मे १९६२, अंक ३१०, पान १

७६) दै. सत्यवादी, १३ जाने. १९६५, अंक १९२ पान १

७७) दै. सत्यवादी, १ जुलै १९६५, अंक ४०, पान ३

७८) दै. सत्यवादी, १६ फेब्रुवारी, १९६७ अंक २५४, पान ३

७९) कित्ता

८०) दै. सत्यवादी, ६ जाने. १९७१ अंक २१७, पान ३

८१) दै. सत्यवादी, १८ फेब्रु. १९७१, अंक २६०, पान ४

८२) दै. सत्यवादी, १९ जाने. १९७१, अंक २३०, पान ४

८३) दै. सत्यवादी, १० जून १९७२, अंक १०, पान २

८४) दै. सत्यवादी, १२ सप्टेंबर १९८०, अंक १३२, पान ३

८५) दै. सत्यवादी, १३ जानेवारी १९६२, अंक १९२, पान ७

८६) दै. सत्यवादी, ११ फेब्रुवारी १९६२, अंक २१७, पान १

८७) दै. सत्यवादी, १२ फेब्रुवारी १९६२, अंक २१८, पान १

८८) दै. सत्यवादी, १९ एप्रिल १९७५, अंक १३, पान ३

८९) दै. सत्यवादी, २६ एप्रिल १९७९, अंक ३५५, पान २

९०) दै. सत्यवादी, कित्ता

९१) दै. सत्यवादी, १० जून १९७८, अंक ४०, पान ३

९२) दै. सत्यवादी, १२ सप्टेंबर १९८०, अंक १३२, पान २

९३) दै. सत्यवादी, २० एप्रिल १९६०, अंक २७४, पान ६

९४) दै. सत्यवादी, १४ एप्रिल १९६१, अंक २६८, पान ३

९५) दै. सत्यवादी, १६ ऑगस्ट १९६५, अंक ७६, पान ३

९६) दै. सत्यवादी, २ फेब्रुवारी १९७० अंक २५३, पान २

९७) दै. सत्यवादी, २५ जुलै १९८४,अंक ८०, पान ३

९८) दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७४, अंक ३०९, पान २

९९) दै. सत्यवादी, ८ मे १९७४, अंक ३३१, पान २

१००) दै. सत्यवादी, २३ जून १९७४, अंक २३, पान ३

१०१) दै. सत्यवादी, १२ फेब्रुवारी १९७७, अंक ३०४, पान ३

१०२) दै. सत्यवादी, ८ जुलै १९७८, अंक ६८, पान २

१०३) दै. सत्यवादी, २१ फेब्रुवारी १९७९, अंक २९२, पान ५

१०४) दै. सत्यवादी, २१ एप्रिल १९८३, अंक २८६, पान ३

१०५) दै. सत्यवादी, २८ एप्रिल १९८३, अंक २९३, पान ४

१०६) दै. सत्यवादी, १ मे १९८३, अंक १, पान ४

१०७) दै. सत्यवादी, २५ जुलै १९८४, अंक ८०, पान ४

१०८) दै. सत्यवादी, ७ ऑगस्ट १९८४, अंक ७०, पान ३

१०९) कित्ता

### प्रकरण ४ थे

# दलित पक्ष व संघटनांचे सांगली जिल्ह्यातील कार्य

भारतात दलितोध्दार करण्यासाठी काही पक्ष संघटना निर्माण झाल्या. त्यांच्या शाखा सांगली जिल्ह्यातपण सुरुवातीपासून कार्य करीत होत्या. त्याचा परामर्श या प्रकरणात घेण्याचा नम्र प्रयत्न केला आहे. ते प्रमुख पक्ष पुढीलप्रमाणे–

१) रिपब्लिकन पक्ष

२) दलित पँथर

३) दलित महासंघ

४) बहुजन समाज पार्टी

या सर्व पक्ष व संघटनांनी सांगली जिल्हा स्थापन झालेपासून कमी जास्त प्रमाणात दलितांच्या मागासलेल्या लोकांच्या उध्दारासाठी कार्य सांगली मिरज व संपूर्ण जिल्ह्यात केले आहे. त्याचा वृत्तांत बातम्या, त्यावेळचे वृत्तपत्रात येऊन गेल्या आहेत. त्याचा अभ्यास केल्यानंतर त्या त्या पक्षाचे योगदान आपणास समजेल. या ठिकाणी फक्त संकलन नसून त्या बातम्या म्हणजे त्या संघटनेने कार्य सांगणारे स्त्रोत आहे हे अभ्यासकाने लक्षात ठेवावे.

## रिपब्लिकन पक्षाच्या उदयाची पार्श्वभूमी –

आपल्या देशामध्ये अनेक लहानमोठे राजकीय पक्ष आहेत. रिपब्लिकन पक्ष हा त्यापैकीच एक असला तरी त्याचे भारतीय राजकारणात एक वेगळे असे स्थान आहे. हा पक्ष भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कल्पनेतील पक्ष आहे. हा पक्ष तत्त्वतः दलित व शोषितांच्या हिताच्या रक्षणासाठी स्थापन झालेला आहे.

बहिष्कृत हितकारणी सभा – अस्पृश्यांना सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून जागृत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला बहिष्कृत हितकारणी सभा नावाची एक संघटना स्थापन केली. 'शिका, संघटित व्हा आणि बंड करा' (Educate, Aqitate and organise) असे त्या संघटनेचे ब्रिदवाकय ठरविलेले होते. सर चिमणलाल हरिलाल सेटलवाड यांना व्यवस्थापकीय अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि सचिव म्हणून सीताराम नामदेव शिवतरकर यांना निवडण्यात आले होते.

स्वतंत्र मजूर पक्ष – आधुनिक भारतातील दलितांच्या राजकीय चळवळीचा इतिहास खऱ्या अर्थाने १९३६ पासून सुरू होतो असे म्हटले तर काही वावगे होणार नाही. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ ला 'स्वतंत्र मजूर पक्ष' नावाच्या एका राजकीय पक्षाची स्थापना केल्याची घोषणा केली. बाबासाहेब आंबेडकरांनी आतापर्यंत ज्या राजकीय स्वरूपाच्या मागण्या मागितल्या त्या 'बहिष्कृत हितकारणी सभा' या एका सामाजिक सुधारणेसाठी स्थापन केलेल्या मंचावरून यापुढे राजकीय कार्य करण्यासाठी त्यांनी एक स्वतंत्र असे संघटन स्थापन केले.

स्वतंत्र मजूर पक्षाचे मुख्य कार्यालय मुंबईला होते. तसेच त्याचे कार्यक्षेत्रदेखील मुंबई प्रांतापुरते मर्यादित स्वरूपाचे होते.

१९३६ पासून ते १९४२ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमिकांचे नेते होते.

अस्पृश्य वर्गातील सर्व जाती–जमातींना १९४२ पासूनच एका राजकीय पक्षाचया झेंड्याखाली आणणे तत्कालीन काळाची गरज होतीच.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ मध्ये नागपूर येथे अस्पृश्यांची एक परिषद बोलावली. त्यामध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन नावाचा राजकीय पक्ष स्थापन करण्याचे निश्चित झाले. अशा रीतीने क्रिप्स योजनेमुळे अस्पृश्यांच्या राजकीय चळवळीमध्ये स्थित्यंतर घडून आले. सर्वव्यापी अशा स्वतंत्र मजूर पक्षाकडून अस्पृश्यांशासाठी मर्यादित असलेल्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनकडे येणे भाग पडले.

शेड्युल्ड कास्ट बरखास्त करून सर्व दलितांसाठी शोषितांसाठी एक नवीन पक्ष स्थापन करण्यासाठी त्यांनी विचार केला होता, परंतु ६ डिसेंबर १९५६ ला त्यांचे महानिर्वाण झाल्यामुळे ते कार्य त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकले नाही.

**रिपब्लिकन पक्षाची स्थापना – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका –**

विजया दशमीच्या ऐतिहासिक पर्वावर दि. ३ ऑक्टोबर १९५७ रोजी ८ लाख लोकांच्या विराट उपस्थितीत रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. नागपूर येथील पवित्र दीक्षा भूमीवर बरोबर एक वर्षाआधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्र प्रवर्तन केले होते. त्याच स्थळावर हा अभूतपूर्व कार्यक्रम घडून आला. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेविषयी नेहमीच विचारणा केली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या महापरिनिर्वाणानंतर ६ डिसेंबर १९५६ नंतर या पक्षाची स्थापना झाली. म्हणून या पक्षाशी डॉ. बाबासाहेबांचे काहीही सोयरसुतक नव्हते असे म्हणण्यापर्यंत काही लोकांनी मजल मारली आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची रिपब्लिकन पक्ष निर्मितीमधील भूमिका तपासणे महत्त्वाचे ठरते.

धनंजय कीर यांच्या शब्दात ''आगामी सार्वजनिक निवडणुकीच्या अगोदर रिपब्लिकन नावाचा एक राजकीय पक्ष आपण काढणार आहोत, असे त्यांनी जाहीर केले. तो पक्ष त्या सर्वांना खुला असेल, ज्यांना तीन मार्गदर्शक तत्त्वे स्वातंत्र्य, समता व बंधुता मंजूर असतील.

प्रबुध्द भारत साप्ताहिकाच्या दि. ६ ऑक्टो. १९५६ च्या अंकात सर्वप्रथम रिपब्लिकन पक्ष स्थापनेची जाहीर घोषणा आढळते. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (पी. टी. आय) या वृत्तसंस्थेच्या हवाल्याने प्रबुध्द भारताने रिपब्लिकन पक्षाची स्थापना होणार असा मथळा अग्रभागी प्रकाशित केला होता. नवी दिल्ली येथे दि. ३० सप्टेंबर १९५६ रोजी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या बैठकीचे अध्यक्ष होते. याच बैठकीत अ. भा. दलित फेडरेशन (शेड्युल्ड कास्ट फेडरेशन) ऐवजी ''अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी'' स्थापन करण्याचा ठराव संमत करण्यात आला. या

बैठकीचा सविस्तर वृत्तांत ६ ऑक्टोबर १९५६ च्या प्रबुध्द भारत वृत्तपत्रात प्रसिध्द झाला. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेला मजकूर पुढीलप्रमाणे होता.

**अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या कार्यकारिणीचे ठराव –**

दिल्ली : ता. ३, ऑक्टो. १९५६– अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक दिल्ली येथे ता. ३०–९–५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली, त्यांच्या निवासस्थानी भरली होती. भारतातील निरनिराळ्या प्रदेशातील दलित फेडरेशनचे कार्यकारिणीचे सभासद हजर होते. कार्यकारिणीत चालू राजकीय परिस्थितीवर चर्चा झाली व निरनिराळ्या विषयानुसार ठराव संमत करण्यात आले. दलित फेडरेशन या राजकीय पक्षाऐवजी ''अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी'' या नावाचा राजकीय पक्ष स्थापण्याचा महत्त्वाचा असा निर्णय घेण्यात आला.

**काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांशी सहकार्य –**

संमत झालेल्या ठरावांमध्ये एक ठराव, काँग्रेस व्यतिरिक्त असलेल्या पक्षाबरोबर आगामी सार्वत्रिक निवडणुकांत सहकार्य करण्याबद्दलचा आहे. त्या ठरावात असे नमूद करण्यात आले की, काँग्रेस पक्षाशिवाय इतर कोणत्याही राजकीय पक्षास, अ. भा. दलित फेडरेशनबरोबर निवडणुकाबाबत संधी करावयाची असेल तर फेडरेशन त्या गोष्टीस तयार राहील. अशा निवडणुका संबंधी काय अटी व मुद्दे असावेत, याचा विचार काँग्रेस व्यतिरिक्त पक्षाबरोबर करील. कार्यकारिणीने केलेल्या ठरावात, नवा भारतीय रिपब्लिकन पक्ष काढण्याबाबतचा ठराव, राज्य पुर्नरचनेच्या प्रश्नांबाबत ठराव सध्याच्या भारतीय परराष्ट्रीय धोरणासंबंधीचा ठराव वा सुएझ कालव्यासंबंधाचा ठराव असे चालू महत्त्वाच्या विषयावर ठराव पास करण्यात आले.

**रिपब्लिकन पक्ष स्थापन होणार –**

नवा भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याबाबतच्या ठरावात कार्यकारिणीने नमूद केले की, ''आगामी सार्वत्रिक निवडणुकीपुरतीच काँग्रेस पक्षास विरोधी अशी एक संयुक्त आघाडी निर्माण करण्याची राजकीय वेळ

आलेली आहे. एवढेच नव्हे तर भारतातील काँग्रेस–विरोध मतदारांना एकाच संघटनेमध्ये आणून असे संघटन एका राजकीय पक्षाद्वारा करण्याची आवश्यकता निर्माण सध्याच्या राजकीय परिस्थितीप्रमाणे आवश्यक आहे. मानलेल्या अस्पृश्य जाती व अन्य जाती व इतर मागासलेल्या समाज हे समान अंतकरणांचे घटक आहेत. त्यांच्या परिषदा आगामी सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी व तद्नंतरही घ्याव्यात असा आदेशही कार्यकारिणीने ठरावात दिला आहे. या परिषदेद्वारा नवा भारतीय रिपब्लिकन पक्ष काढण्याचे कार्य करण्यात येईल.''

**शे. का. ले. कार्यकारिणीचे ठराव –**

कार्यकारिणीचे बैठक, ता. ३०–९–५६, दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले होते. या बैठकीस खालील सभासद उपस्थित होते. १) बॅ. बी. डी. खोब्रागडे, जनरल सेक्रेटरी, २) श्री. बी. के. गायकवाड (महाराष्ट्र), ३) श्री. ए. जी. पवार (महाराष्ट्र), ४) श्री. आर. डी. भंडारे (मुंबई), ५) श्री. जी. टी. परमार (गुजरात), ६) श्री. व्ही. टी. परमार (गुजरात), ७) श्री. बी. एस. मोरे (मराठवाडा), ८) श्री. एच. टी. आवडे (मध्यप्रदेश), ९) श्री. ए. रत्नम (मद्रास), १०) श्री. एम. जे. वेलू (मद्रास), ११) श्री. सी. एम. आर्मूगम (म्हैसूर), १२) श्री. हरदास अशाखार (विंध्यप्रदेश), १३) श्री. त्रिलोकचंद कुरील (उत्तर प्रदेश), १४) श्री. भगनसिंग आयुता (पंजाब), १५) श्री. सदाशिवराव गेडाम (नागपूर).

याशिवाय खालील व्यक्ती निमंत्रणपणाने हजर होत्या. १) श्री. बी. एच. वराळे २) श्री. आर. व्ही. कवाडे, ३) श्री. शामराव जाधव.

कार्यकारिणीत खालील पाच ठराव पास करण्यात आले.

**ठराव नं. १ –**

**विषय – आगामी निवडणुकीतील सहकार्य –**

''भारतीय राज्य घटना अंमलात आल्यापासून अखिल भारतीय दलित फेडरेशनने आपल्या तत्त्वानुसार व कोणाचे सहकार्य नसताना स्वतःच्या सामर्थ्यावर निवडणुका लढविल्या आहेत. दलित फेडरेशनने हे धोरण मुख्यः दोन कारणास्तव स्वीकारले होते. एक कारण हे की, राजकारण हे तत्त्वावर आधारलेले असले पाहिजे, अशी फेडरेशनची विचारसरणी आहे व त्यावर फेडरेशनचा विश्वासही आहे. दुसरे कारण असे की, दलित फेडरेशन ज्या तत्त्वांचा पुरस्कार करते, त्या अगर त्या सारख्या तत्त्वांचा पुरस्कार करणारा दुसरा राजकीय पक्ष भारतात आजवर तरी दलित फेडरेशनला सापडू शकला नाही. त्यामुळे दलित फेडरेशनला एका मागून एक असे पराभव पत्करावे लागले. तथापि निवडणुकात हरलो तरी मूल तत्त्वांचा त्याग करणारा नाही, अशी भूमिका दलित फेडरेशनने ठेवली.

हल्लीच्या भारतीय राजकीय परिस्थितीमुळे दलित फेडरेशनला एका गंभीर घटनेची दखल घेणे प्राप्त झाले आहे. ती घटना ही की, भरातामध्ये विरोधी पक्षाचा अभाव असल्यामुळे या देशात हुकूमशाहीचा भस्मासूर निर्माण झाला आहे. काँग्रेसच्या नावाखाली या हुकूमशाहीचा तो भस्मासूर आहे. भारतीय राजकारणातील ही विषवल्ली आहे. सदर विषवल्लीची वाढ वेळीच रोखून धरली नाही तर त्याचे परिणाम वाईट होतील आणि भारतीय राज्य घटनेमध्ये ज्या लोकशाहीचा पुरस्कार करण्यात आला आहे, त्या लोकशाहीचा नाश काँग्रेस विषवल्लीने केल्याचे दिसून येईल.

म्हणून अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या कार्यकारिणीस असे मनःपूर्वक वाटते की, सर्व बिगर काँग्रेसी व काँग्रेसी विरोधी पक्षांनी आगामी सार्वत्रिक निवडणकात सहकार्याने एकत्रित येवून काँग्रेसी हुकूमशाही बरोबर व काँग्रेसी राक्षसाबरोबर लढा द्यावा. दलित फेडरेशन कोणत्याही बिगर काँग्रेसी पक्षाबरोबर आगामी निवडणुकात सहकार्य करावयास तयार असून, ज्या कोणा बिगर काँग्रेसी पक्षास दलित फेडरेशनचे सहकार्य हवे असेल त्याच्या अटी व मुद्दे दलित फेडरेशन ठरवावयास तयार आहे.[१]

**ठराव नं. २, विषय– नवा भारतीय राजकीय पक्ष –**

''आगामी निवडणुकांमध्ये निवडणुकापुरती संयुक्त आघाडी स्थापन करण्याची वेळ आलेली आहे. एवढेच नव्हे तर काँग्रेसविरोधी असणाऱ्या सर्व मतदारांना एकाच राजकीय संघटनेमध्ये एकत्र आणण्याची आवश्यकता सध्याच्या भारतीय राजकारणात निर्माण झालेली आहे, असे दलित फेडरेशनच्या कार्यकारिणीचे मत आहे, अशी काँग्रेसविरोधी मतदारांच्या राजकीय संघटना, भारतीय रिपब्लिकन पक्ष नावाने काढता येईल. हे ध्येय डोळ्यापुढे ठेवून ही कार्यकारिणी अ. भा. दलित फेडरेशनला असा आदेश देते की, मानवी अस्पृश्य जमाती वन्य जमाती व इतर जमाती व ग्रुप्स (विभाग) यांच्यासारखे समान भावनांचे घटक एकत्रित करून त्यांच्या परिषदा घ्याव्यात. या परिषदा आगामी निवडणुकीपूर्वी अगर निवडणुकीनंतरही घ्याव्यात.''[२]

**ठराव नं. ३, विषय : द्विभाषिक राज्य –**

द्विभाषिक राज्य हे राज्य कारभारामध्ये सतत झगड्याचे मूळ असते. सार्वजनिक पैशाची वाटणी करताना असे राज्य वशिलेबाजीचे मूळ असते... म्हणून कार्यकारिणीचे असे मत आहे की, एक भाषिक राज्ये करून दरेक राज्याचे सरासरी क्षेत्र व लोकसंख्या काय असाव्यात, हे निश्चित करणे बिलकूल आवश्यक आहे.

**ठराव नं. ४, विषय : भारताचे परराष्ट्रीय धोरण –**

अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या कार्यकारिणीस हे दिसून येते की, भारताचे जे परराष्ट्रीय प्रश्न आहेत, ते मृतवतपणे तसेच अडगळीस पडून राहिले आहेत. गोव्याचा प्रश्न, काश्मीरचा प्रश्न, पाकिस्ता संबंधाचे प्रश्न जेथे होते तेथेच तसेच पडून आहेत. ते सुटलेले नाहीत... पंतप्रधानांच्या सध्याच्या धोरणास वेळीच लगाम घातला नाही तर हे धोरण भारतास रसातळास नेल्याशिवाय राहणार नाही.

**ठराव नं. ५, विषय : सुएझ कॅनॉल –**

सुएझ कालवा, त्याचप्रमाणे सुएझ कालव्यासारखे इतर जलमार्ग यावर आंतरराष्ट्रीय नियंत्रण असावे व तोच योग्य उपाय आहे, असे अ. भा. द. फेडरेशनच्या कार्यकारिणीचे मत आहे... आंतरराष्ट्रीय नियंत्रणाचे तत्त्व सुएझबाबत मान्य केलेलेच आहे.[३]

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया – ध्येय व उद्दिष्टे–

रिपब्लिकन पक्ष हा आंबेकरांच्या महानिर्वाणानंतर १९५७ ला अस्तित्वात आला. परंतु डॉ. आंबेडकर हयात असतानाच या पक्षऽची ध्येयधोरणे काय असावीत, याची चर्चा झाली होती. या पक्षाची प्रमुख ध्येय व धोरणे दलितांची व मागासलेल्या लोकांची सर्वांगीण प्रगती व्हावी, अशीच होती. ती ध्येय धोरणे आज सुध्दा अभ्यासकाने पाहिली पाहिजेत. कारण ती सर्व ध्येय धोरणे भारत स्वतंत्र होवून ६८ वर्षे झाली तरी पूर्णतः यशस्वी झाली नाहीत. अभ्यासकांनी संशोधकांनी त्यादृष्टीने लक्ष दिले पाहिजे म्हणून पुढीलप्रमाणे ध्येय धोरण देत आहे.

१) भारतीय घटनेचा उपोद्घात पुढीलप्रमाणे आहे.

''आम्ही भारतातील लोक प्रतिज्ञापूर्वक असे ठरवितो की, भारत हे स्वतंत्र सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र राहील आणि त्यातील सर्व नागरिकांना, सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय विचार, भाषण, मत आणि धार्मिक स्वातंत्र्य, संधी व सामाजिक प्रतिष्ठा याबाबत समता, व्यक्ती, स्वातंत्र्यव राष्ट्रऐक्य साधणारा बंधुभाव या गोष्टी मिळवून देण्यासाठी झटू.''

भारतीय घटनेच्या ह्या उपोद्घातामधील ध्येय व उद्दिष्टे (न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व) साध्य करणे हेच रिपब्लिकन पक्षाचे ध्येय व उद्दिष्ट राहील.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष सार्वजनिक व्यवहारात खालील तत्त्वांना बांधलेला राहील.

१) सर्व भारतीयांना समान न्याय मिळेल; एवढेच नव्हे तर समान न्याय हा प्रत्येक भारतीयाचा हक्क आहे असे मानण्यात येईल. आणि यानुसार जेथे समता नाही तेथे ती आणण्यासाठी पक्ष झटेल व जेथे ती नाकारण्यात येते, तेथे ती राबविण्यासाठी लढा देईल.

२) प्रत्येक व्यक्तीचे सुख हा केंद्रबिंदू समजण्यात येईल आणि आपल्या उध्दारास्तव प्रयत्न करण्याची प्रत्येक व्यक्तीस समान संधी मिळेल. शासन संस्था (राज्य) ही हे साध्य मिळविण्यासाठी वापरावयाचे साधन होय.

३) इतर देश बांधवांच्या हक्कांचे व शासन संस्थेच्या आवश्यक तेवढ्या अधिकारांचे संरक्षण करून प्रत्येक नागरिकास धार्मिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्यअ सले पाहिजे, असे हा पक्ष मानील.

४) प्रत्येक भारतीय नागरिकास समान संधीचा अधिकार असल्याचे हा पक्ष मान्य करील अर्थात ज्यांना आत्मोन्नतीसाठी कधीच संधी मिळाली नसेल त्यांना संधी मिळालेल्या लोकांपेक्षा अग्रक्रम देण्याचे तत्त्व पक्ष अंगीकारील.

५) प्रत्येक व्यक्तीस जीवनातील गरजा व भिती यापासून मुक्ती मिळवून देण्याच्या शासन संस्थेच्या कर्तव्याची जाणीव सरकारला हा पक्ष सातत्याने करून देईल.

६) हा पक्ष स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रह धरील आणि एका माणसाकडून दुसऱ्या माणसाची, एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची, किंवा एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रांकडून होणारी पिळवणूक व दडपशाही यांना पायबंद घालील.

७) व्यक्ती व समाज या दोहोंच्या भल्याच्या दृष्टीने, संसदीय राज्यपध्दती ही सर्वोत्तम राज्यपध्दती आहे अशी या पक्षाची श्रध्दा राहील.

## रिपब्लिकन पक्षाने केलेले कार्य –

### जत तालुका हरिजनांची सभा –

सांगली जिल्ह्यातील जत तालुका अतिपुर्वेकडे वसला असून कायम पर्जन्यमान कमी असल्याने कायम दुष्काळी होता. १९४८ पूर्वी जत हे डफळे यांचे एक संस्थान होते. १९६० ला सांगली जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. जत तालुक्यातील हरिजन व मागासलेल्या लोकांची दयनीय अवस्था होती. तेथील दलित चळवळीने एक सभा आयोजित करून आपली सुख–दुःखे, गाऱ्हाणी, अन्याय, जनता व शासनासमोरी मांडली, त्याचा हा वर्तमानपत्रातील आढावा –

''सांगली जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे वतीने जत तालुक्यातील दरीबडची या गावी हरिजनांची सभा श्री. एन. वाय. कांबळे यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. यावेळी बी. डी. कांबळे, श्री. सुतळे वकील व सांगलीकर आदि वक्त्यांची प्रचलित सरकार आणि काँग्रेस पक्ष यांच्या धोरणाविषयी भाषणे झाली. त्यानंतर ६ ठराव मंजूर करण्यात आले. त्यात हरिजनांना खेड्यातील जमिनी कसण्यासाठी मिळाव्यात. धान्याचे भाव खाली आणावेत, खेड्यातून हरिजनांना घरे बांधण्यासाठी सरकारकडून सहाय्य मिळावे हे महत्त्वाचे ठराव आहेत.''

### येत्या निवडणुकीतील विरोधी पक्षांचे संभाव्य उमेदवार –

१९५७ ला महाराष्ट्रात दुसरी सार्वजनिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसर सांगली जिल्ह्यातील राखीव जागेतील कोणाला उमेदवारी द्यावी या संबंधी दलित संघटना पक्ष विचारविनीमय करू लागले. या संबंधीचे पुढील वृत्त –

''जिल्ह्यातील येत्या सार्वत्रिक निवडणुकीत विरोधी पक्षाचे वतीने प्रजासमाजवादी पक्ष, संयुक्त महाराष्ट्र समिती आणि जनसंघ हे आपापले उमेदवार जिल्ह्यात उभे करण्याच्या तयारीस लागले आहेत. शिराळा भागात श्री. वाय. सी. पाटील, तासगाव पूर्व भागात श्री. भगवानराव पाटील, तासगाव पश्चिम भागात श्री. जी. डी.

लाड, सांगली विभागात श्री. भगवानराव सूर्यवंशी याशिवाय हरिजनांच्या जागेसाठी श्री. पी. टी. मधाळे हे उभे राहणार.[४]''

**सांगली जिल्हा प. स. पक्ष कार्यकारिणीची बैठक –**

**आगामी सार्वत्रिक निवडणुकीवर विचारविनिमय –**

लोकसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. आगामी सार्वत्रिक निवडणुकीत रिपब्लिकन (आठवले गट) पक्ष निवडणूक लढविण्यास इच्छुक होता. त्याचवेळी सांगली जिल्हा प्रजा समाजवादी पक्षाशी रिपब्लिकन पक्षाच्या युतीच्या वाटाघाटी सुरू करण्यासंबंधीची चर्चायुक्त बातमी पुढीलप्रमाणे माहिती –

''सांगली जिल्हा प. समाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीची व निमंत्रितांची बैठक महाराष्ट्र प्रजासमाजवादी पक्षाचे सरचिटणीस आ. शिवाजीराव पाटील हे आले होते. या जिल्ह्यातील एकूण सर्व मतदार संघाचा विचार करून पक्षाने सांगली, मिरज, तासगाव पश्चिम व तासगाव पूर्व व आटपाडी मतदार संघाची लोकसभेची जागा लढविण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत प. स. पक्षाचे ध्येय व धोरणाला अनुकूल अशा कांबळे गट रिपब्लिकन पक्षाची अधिक पातळीवर आम्ही वाटाघाटी करू, इतराशी आम्ही कोणत्याही परिस्थितीत निवडणूक करार करणार नाही असे आ. पाटील यांनी सविस्तर सांगितले.[५]''

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)

मा. विवेकजी कांबळे अध्यक्ष (सांगली जिल्हा)

प्रकाश इनामदार (उपाध्यक्ष)

महावीर कांबळे, उपाध्यक्ष मिरज तालुका.

पिपल्स रिपब्किलन पार्टी– प्रा. जोगेंद्र कवाडे

नितीन गोंधळे– अध्यक्ष सांगली जिल्हा

श्रीमती वंदना कागले– जिल्हाध्यक्ष (महिला आघाडी).

रिपब्लिकन कार्यकर्ते श्री. पी. टी. मधाळे यांचेवर हल्ला चाकूने वार झाल्याने जखमी – माजी आमदार सांगली जि. प. सदस्य व रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते श्री. पी. टी. मधाळे यांचेवर शिगाव येथे चाकू हल्ला झाल्याने त्यांच्या डोकीवर बराच मार लागला असून, त्यांना सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे.[६]

श्री. पी. टी. मधाळे हे हॉटेलमधून बाहेर पडत असताना हा हल्ला झाला. ता. १ ऑगस्ट रोजी हा प्रकार घडला.

**रिपब्लिकन कार्यकर्त्यांचा नवकाँग्रेसला पाठिंबा –**

येत्या निवडणकीत नव काँग्रेसला पाठिंबा देण्याचा डिग्रज, जि. सांगली येथे रिपब्लिकन कार्यकर्त्यांची बैठक झाली, त्याची बातमी –

''डिग्रज येथे रिपब्लिकन पक्ष कार्यकर्त्यांची बैठक घेवून आगामी लोकसभा निवडणुकीसंबंधी विचार विनीमय झाला. सदर चर्चेच्या शेवटी निवडणुकीत नवकाँग्रेसचे उमेदवार श्री. आण्णासाहेब गोटखिंडे यांनाच आपली मते देवून निवडून आणावे असा निर्णय घेण्यात आला. या संबंधीचे पत्रकावर कृ. म. कांबळे, स. बा. कांबये, ज. तु. कांबळे व भा. जि. कांबळे यांच्या सह्या आहेत.''

## सांगली जिल्ह्यात ८ जागांसाठी २२ उमेदवारात लढत –

सांगली जिल्ह्यात विधानसभेच्या आठ जागा होत्या. त्यासाठी २२ उमेदवार रिंगणात होते. त्यात काही राखीव जागा होत्या. त्या दलित कार्यकर्त्यांनी लढविण्याची तयारी केली, त्याची माहिती –

''महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी या जिल्ह्यातील ८ मतदार संघातून एकूण २२ उमेदवार उभे राहिले असून, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

शिराळा – भगवानराव भाऊसाहेब पाटील (नवकाँग्रेस), यशवंत चंद्रोजी पाटील (शे. का. प.), रंगराव भिवा बनसोडे (रिपब्लिकन). वाळवा– राजाराम गणपती जोशी (जनसंघ), राजाराम अनंत पाटील (नवकाँग्रेस), वसंत शंकर शिंदे (रा. का. पक्ष), संपतराव सिताराम माने (नवकाँग्रेस). तासगाव– बाबासाहेब गोपाळराव पाटील (काँग्रेस), वसंत हिंदुराव पाटील (अपक्ष), जयसिंह महादेव माने–देशमुख (शे. का. प.), सांगली– पंडीत शिवाजी पवार (जनसंघ), पांडुरंग बापूराव पाटील (काँग्रेस), शिवाजी रामचंद्र राडबाळे (शे. का. पक्ष). मिरज – दादासाहेब रामचंद्र जामदार (काँग्रेस), नरसिंह रामचंद्र पाठक (अपक्ष), शंकर कृष्णा शिगाण्णा (अपक्ष). आटपाडी–कवठेमहांकाळ – हरीभाऊ नाना खुजट (अपक्ष), आण्णासाहेब उध्दव लेंगरे (काँग्रेस). जत– राखीव विष्णु हरी आंबवडे (जनसंघ), आण्णा कृष्णा कांबळे (रिपब्लिकन), शिवरुद्र ठबाजी बामणे (काँग्रेस).[७]''

### बारा बलुतेदारांची बहुजन चळवळ उभारणार : शरद कांबळे

शरद कांबळे हे सांगली जिल्ह्यातील एक दलित कार्यकर्ता. त्यांनी बारा बलुतेदारांची बहुजन चळवळ उभारून त्याद्वारे त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. काही समस्या सोडविण्यासाठी भारिप बहुजन महासंघ सांगलीत शाखा स्थापन करून ७ जुलै १९७२ पासून काम सुरू केले, त्याची बातमी –

''बारा बलुतेदारांना एकत्र करून बहुजनांची चळवळ उभारणार असे प्रतिपादन भारिप बहुजन महासंघाचे जिल्हा संघटक शरद कांबळे यांनी पेठ येथील भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष गौतम लोटे होते.

प्रारंभी पेठ (ता. वाळवा) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास जिल्हा अध्यक्ष गौतम लोटे यांच्या हस्ते हार अर्पण करण्यात आला. यावेळी वाळवा तालुक्यातील भारिप बहुजन महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी भूपाल विष्णुपंत घाटे (रा. वशी) यांची निवड करून जिल्हा अध्यक्षस्थानी भारिप बहुजन महासंघाची तालुका कार्यकारिणी जाहीर केली.

वाळवा तालुका अध्यक्ष विलास कांबळे (इस्लामपूर), संघटक– रामराव शामराव नायकल (पेठ), सरचिटणीस काकासोा रामचंद्र कांबळे (कोळे) उपाध्यक्ष, संजय बबन कांबळे (गोटखिंडी)

इस्लामपूर शहर कार्यकारिणी – इस्लामपूर शहर अध्यक्ष– डॉ. संजय उमाजी उरुणकर (इस्लामपूर), संघटक– दत्तात्रय मारुती खोत, सरचिटणीस– उत्तम नामदेव पवार तर महिला आघाडी प्रमुख अध्यक्षा सौ. मिनाताई प्रकाश गायकवाड यांची निवड करण्यात आली. आभार राजू कांबळे यांनी मानले.[१०]


दलित पँथर – स्थापना ७ जुलै १९७२

संस्थापक अध्यक्ष – राजा ढाले

नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, संगारे–महातेकर इ.

स्थापना ठिकाण – सिध्दार्थनगर (मुंबई)''

**दलित पँथर – (स्थापना : १९७२ च्या मध्यात)**




स्थापना – ७ जुलै १९७२, संस्थापक : राजा ढाले

अमेरिकेत निग्रोंनी ब्लॅक टायगर (Black Tiger) ही १९६० च्या दशकात गोऱ्या लोकांच्या अन्यायाविरुध्द लढाऊ संघटना स्थापन केली होती. त्याचे अनुकरण करून दलित पँथर मुंबईला स्थापन केली.

दलित पँथर ही अन्यायाविरुध्द पेटून उठणारी व दलितांच्या हिताचे रक्षण करणारी लढाऊ संघटना होती. ही संघटना १९७२ ला राजा ढाले, ज. वि. पवार, नामदेव ढसाळ, प्रा. अरुण कांबळे आदींनी मुंबईत स्थापन केली. तिच्या शाखा महाराष्ट्रभर स्थापन झाल्या. स्थानिक कार्यकर्ते सदस्य झाले. सांगली जिल्ह्यातील काही उत्साही, लढाऊ वृत्तीचे दलित युवक यांनी सांगलीला दलित पँथरची शाखा उघडली व दलितावरील होणाऱ्या अन्यायाविरुध्द वेळोवेळी आंदोलने केली. त्याचा वृत्तांत त्यावेळच्या वेगवेगळ्या वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेला होता. त्याच्या आधारे पुढीलप्रमाणे भावार्थ– स्पष्टीकरण, अन्वयार्थ दिला आहे.

## कारणे –

दलित पँथर चळवळीच्या उदयास कारणीभूत ठरलेल्या घटकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे – १) सामाजिक आर्थिक स्थिती २) दलित युवकांमधील जाणिवा आणि सांस्कृतिक संघर्ष ३) दलितावरील वाढते अत्याचार ४) इतर बंडखोर चळवळींचा परिणाम ५) बंडखोर स्फोटक, दाहक दलित साहितयाची लोकप्रियता.

पँथरची पहिली बैठक सिध्दार्थनगर (मुंबई) येथे ९ जुलै १९७२ ला भरली.

ढालेंच्या दलित पँथर बरखास्तीच्या घोषणेनंतर ११ व १२ एप्रिल १९७७ ला औरंगाबाद येथे दलित पँथरचया कार्यकारिणी मंडळाची सभा भरविण्यात आली. अकरा सदस्यापैकी नऊ सदस्य उपस्थित होते. (६४) तद्नंतर वृत्तपत्रांना दिलेल्या निवेदनात म्हटले गेले की बरखास्तीचा निर्णय ढालेंनी व्यक्तिगत पातळीवर घेतला आहे. दलित पँथर संघटना अशीच कार्यरत राहील. तद्नंतर अरुण कांबळेंची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आणि संघटनेचे नामाभिधान 'महाराष्ट्र दलित पँथर' करण्यात आले. यासंदर्भात पुढील मुद्यानुसार सविस्तर विवेचन पुढे देण्यात आले आहे.

शाखा विस्तार, पार्श्वभूमी, ध्येय उद्दिष्ट्य, विचारसरणी, जाहीरनामा, कार्ये

## शाखाविस्तार –

दलितावरील अन्याय, अत्याचार सर्व देशभर मोठ्या प्रमाणात वाढला. त्याचा अहवाल प्रसिध्द झाल्यानंतर मुंबईमध्ये दलित पँथर उदयास आली. त्याच्या शाखाही सर्व महाराष्ट्रभर निघाल्या. त्याचकाळात सांगली जिल्ह्यातही या संघटनेच्या काही शाखा निघालेल्या आहेत. त्यांनी सांगली जिल्ह्यात दलितांच्यावर झालेल्या अन्याय अत्याचाराविरुध्द आवाज उठविलेला आहे.

## दलित पँथरच्या उदयाची पार्श्वभूमी –

महाराष्ट्रातील दलितांच्या प्रश्नांच्या संदर्भात लक्षणीय कर्तबगारी केलेली, वाघाचे काळीज बाळगून धाडसी, बेडर कामे केलेली व म्हणून सर्वपरिचित अशी दलितांची प्रामुख्याने महाराष्ट्रातील चळवळ कोणती असा प्रश्न जर कोणी विचारला तर त्याचे जवळपास एकच सर्वमान्य उत्तर येऊ शकेल, ते म्हणजे सत्तरीच्या दशकात स्थापन झालेली व कार्यरत राहिलेली 'दलित पँथर' ही चळवळ होय. म्हणूनच आजही 'दलित पँथर' या नावाचे एक विशिष्ट आकर्षण आहे. या नावाभोवती आजही एक वलय आहे व या चळवळीबद्दल जाणकारांमध्ये आजही एक उत्सुकता, कुतुहल आहे. याचे कारण या संघटनेने स्वतःचा असा एक दरारा सत्तरीच्या दशकात निर्माण केला होता. [११]

पँथर संघटनेने आंबेडकरोत्तर काळात त्यांच्या त्यांच्या परीने व पध्दतीने त्यांना शक्य झाले तेवढा काळ आंबेडकरी विचार जिवंत आणि सक्रिय ठेवण्याचे एक ऐतिहासिक काम केलेले आहे, असे म्हटले तर ते मुळीच वावगे ठरणार नाही.

एलिया पेरूमल चेट्टी कमिटीच्या १९७२ मध्ये आलेल्या अहवालाने १९७० च्या दशकात देशभर दलितावरील अत्याचारांची लाट कशी उसळली होती, हे दाखवून दिले. या अहवालातील आकडेवारी अशी–

१९४५–६० पर्यंत मागासवर्गीयावर पाच लक्ष अत्याचार. १९६०–६९ या काळात जाति वैमनस्यातून अकराश सतरा खून पडले. यामध्ये मागासवर्गीयांचेच बहुसंख्य बळी. याच काळात एकूण ५४० बलात्कार प्रकरणे मागास स्त्रियांबाबत नोंदवली गेली.

यासंदर्भात विस्ताराने माहिती देताना डॉ. शंकरराव खरात म्हणतात– त्या काळात देशात खेडोपाडी दलितांच्यावर अन्याय, अत्याचार होत होते. ते अधिकच वाढत चालले होते. या अत्याचाराचे स्वरूपही भयंकर स्वरूपाचे असत. दलित व्यक्तींना जिवंत जाळणं, दलित कुटुंबियांना घरात कोंडून जाळणं, दलितांचे घरे, वस्त्या पेटवणे, त्यांना मारपीट करणे, त्यांचे खून करणे, दलितांच्या पाणी पिण्याच्या विहिरीत विष्ठा, घाण

टकणे, त्यांच्या जमीन–शेतातील उभी पिकं दांडगाईनं कापून नेणं, त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांच्या दैनंदिन जीवनाची कोंडी करणे, दलित स्त्रियांचा विनयभंग करणे, त्यांची जबरदस्तीने अब्रू घेणे, अस्पृश्य म्हणून गुलामगिरीची कामं करण्याबद्दल त्यांच्यावर दंडेलीने रुढी परंपरेचे दडपण आणून जबरदस्ती करणे हे  अशाच स्वरूपाचे दलितावर अन्याय अत्याचार होत होते. अत्याचाराच्या या लाटेमागे इथल्या जातीयवाद्यांची, दलितविरोधकांची एक पध्दतशीर अशी चाल असावी. ती अशी की, डॉ. आंबेडकरांनी दलितामध्ये जागविलेला, चेतविलेला स्वाभिमान आणि अन्याय, सहिष्णुतेला नकार या दलितांना डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या अमूल्य देणग्या, अमानुष्य अत्याचाराचे अघोरी अस्त्र वापरून निकामी, निष्प्रभ करणे त्यांना दीनवाण्या मानसिकतेत ढकलणे आणि त्यांच्यावरील मनुवादी पगडा घट्ट करणे.

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित समाज बहुतांशाने नेतृत्वहीन व दिशाहीन झालेला आहे. त्यामुळे दलित चळवळीत एक पोकळी निमारण झालेली आहे. डॉ. आंबेडकरांच्या नंतरच्या दलित नेत्यांमध्ये ऐक्य नाही. एकवाक्यता नाही. पर्यायाने दलितविरोधी अत्याचारांना समर्थपणे रोखू शकणारे फारसे कुणी आजूबाजूला दिसत नाहीत व म्हणून दलितांना नमवायचे असेल तर हीच एक योग्य वेळ आहे, एक नामी संधी या तत्त्वाप्रमाणे हाच योग्य काळ आहे. असे या देशातील जातीयवाद्यांना वाटले असावे.

डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलितांमध्ये जागृत झालेल्या, स्वाभिमानाचे, आपला हक्क मागण्यांच्या आणि मिळवण्याच्या प्रयत्नांचे प्रवृत्तीचे दृष्टीकरण होण्यापूर्वीच तिला तोडायचे, कळीच्या स्वरूपातच तिला खुडायचे आणि डॉ. आंबेडकरांनी केलेल्या क्रांतीला तोड म्हणून प्रतिक्रांतीच्या दिशेने मार्गक्रमण सुरू करायचे असा विचार या देशातल्या मनुवादी मानिसकतेच्या दलित विरोधकांनी केला असावा व तो अंमलात आणण्याचा प्रयत्न दलितविरोधी शक्तींनी १९७० च्या आसपास केल्यामुळे देशभर दलितावरील अत्याचाराची लाट उसळली. हे पेरूमल कमिटीच्या अहवालावरून आपणास दिसते.[१२]

या दलितविरोधी मानसिकतेच्या देशभर चौखुर उधळू पाहणाऱ्या मनुवाद्यांच्या तथाकथित दिग्विजयी अश्वाला महाराष्ट्रात अत्यंत समर्थपणे आणि मोठ्या प्रमाणात अडवण्याचे, रोखण्याचे व त्याला लगाम

घालण्याचे एक ऐतिहासिक काम सत्तरच्या दशकात जर कुणी केले असेल तर ते दलित पँथरने! डॉ. आंबेडकर हयात नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट. पण म्हणून डॉ. आंबेडकरांची अनुपस्थिती म्हणजे जातीयवाद्यांना दलितावर अन्याय, अत्याचार करण्याचा परवाना नाही. डॉ. बाबासाहेबांचे विचार जिवंत आहेत व तोच आम्हाला मार्ग दाखवील व दलितावरील अन्याय रोखण्याचे बळ देईल. या विचाराने प्रेरित होवून कार्यरत राहिली ती दलित पँथर आणि त्याचा परिणाम म्हणून दलितांवर अन्याय करणे एवढे सोपे नाही. तसा अन्याय केला तर फार मोठी किंमत मोजावी लागते किंवा तशी किंमत मोजायला भाग पाडले जाते. या गोष्टीचा अन्यायकर्त्यांना अन्याय करण्यापूर्वी शंभरदा विचार करायला लागला तो दलित पँथरच्या अस्तित्वामुळे.

## दलित पँथरची ध्येय व उद्दिष्टे –

डॉ. आंबेडकर हे मूलगामी परिवर्तनवादी, लोकशाहीवादी नेते होते. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी घटनात्मक मार्गाचाच वापर केला जावा, यावर नितांत श्रध्दा होती. त्यांच्या दृष्टीने सांस्कृतिक परिवर्तन अथवा क्रांती म्हणजे जुन्या विषमता पूर्ण पक्षपाती अशा धोरणाचा त्याग करून त्या जागी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय व समानता या नवीन मूल्यांवर आधारित गोष्टींची स्थापना करणे होय. डॉ. आंबेडकरांचा असा ठाम विश्वास होता की, लोकशाही ही जबाबदार नागरीक निर्माण होण्यावर अवलंबून असते. ते शक्य होते ते धर्माच्या नैतिक शक्तीवर एडमंडबर्गशी सहमत होताना डॉ. आंबेडकर म्हणतात– राज्यव्यवस्था आणि समाज हे टिकून राहण्यासाठी धर्माची आवश्यकता आहे.

'धम्म' धम्म म्हणजे कुठल्याही मूर्तीपूजेचा किंवा विधी वगैरे गोष्टींचा अंगिकार न करता तुमची वर्तणूक कशी असावी हे सांगणारा, जगण्याचा मार्ग होय. त्यांचा बौध्दवाद हा वस्तुनिष्ठ, तर्कनिष्ठ, समाजवादी, लोकशाहीवादी आणि निधर्मीवादाची तत्त्वे अंगिकारलेला होता. डॉ. आंबेडकरांच्या मते नैतिकता हे बौध्दवादाचे सार होय. जर दलितांनी बौध्दवाद स्वीकारला तर त्यांचा सामाजिक दर्जा उंचावेल, असे ते प्रतिपादन करत. तसे करून दलितांवर जो अस्पृश्यतेचा कलंक होता तो त्यांना नष्ट करायचा होता.

डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने एकपक्षीय सरकार म्हणजे (डिस्पेजीशन) हुकूमशाही जुलमी राज्य. त्यामुळे डॉ. आंबेडकर बहुपक्षीय लोकशाहीस अनुकूल होते.

डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश संसदीय पध्दत आणि त्यातील उदारमतवाद याचा पूर्ण स्वीकार केला होता. डॉ. आंबेडकरांचा असा विश्वास होता की बौध्दवाद ही एकमेव नीतिमत्ता टिकवून ठेवणारी माती आहे. प्रथम सामाजिक समानता स्थापन झाली म्हणजे आर्थिक विषमता नाहिशी करता येईल. समाजवादी तत्त्वावर आधारित बँका, विमा, जमीन आणि उद्योगांचे राष्ट्रीयीकरण होय.

पँथरचे नेते आंबेडकरांच्या कल्पनाशी त्या व्यवहारात उतरवण्याच्या दृष्टीने नीटपणे जुळवून घेऊ शकले नाहीत. त्यांनी सांस्कृतिक मुद्यावर सामाजिक विषमतेवर भर दिला. डॉ. आंबेडकर अर्थव्यवस्थेचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण आणि राज्याच्या मक्तेदारीविरुध्द होते.

आंबेडकरांना वाटे की, ब्राह्मणवादाने हिंदू धर्मात विष पसरून त्याची नासाडी केली. ह्यामुळे बंधुत्व, समानता आणि स्वातंत्र्य या गोष्टी नाकारल्या गेल्या. डॉ. आंबेडकर ब्राह्मणद्वेष्टे नव्हते. सर्वच ब्राह्मण अस्पृश्याचे शत्रू आहेत असे धरून वागणे चुकीचे आहे. ते आपल्या अनुयायांना ब्राह्मणातील सद्गुणांचे अनुकरण करा, असे सांगत.

**काँग्रेस आणि गांधी विरोधात** – काँग्रेसने अस्पृश्यता नाहिशी व्हावी, यासाठी त्यांनी एकही उपवास केला नाही. डॉ. आंबेडकरांना त्यांचे लोक आदरणीय मानत व त्यांची पूजाही करत. त्यांच्या विचारांचे समीक्षात्मक दृष्टीकोनातून पृथःकरण झाले नाही, असे रावसाहेब कसबे म्हणतात. यामागचे कारण असे की, त्यांच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब हे केवळ दलितांचे नेते होते. लोक त्यांचे विचार आंधळेपणाने स्वीकारत. म्हणजे 'अत दीपभव!' आपला विचार स्वतंत्रपणे करावा, अंधश्रध्देने वागू नये, हेही ते विसरून गेले होते. भारिपचे क्षेत्र शहरातील सुशिक्षितापुरते मर्यादित राहिले.[१३]

## पँथर्सची विचारसरणी–

चळवळीच्या सुरुवातीच्या काळात कुठल्याही विशिष्ट विचारसरणीवर न बेतता वाढलेली चळवळ म्हणून जिच्याकडे बोट दाखविता येईल, असे उत्तम उदाहरण म्हणजे दलित पँथर चळवळ. चळवळीचे धोरण जाहीर करणारी विचारसरणी, लक्ष्य, उद्दिष्टये असे औपचारिक रूपातदेखील कुठे कागदोपत्री उपलब्ध नव्हते. चळवळीची विचारसरणी समन्वयासाठी पुढील साधने उपलब्ध होती. १) चळवळीच्या कालावधीत हँडबिल्स, बुकलेटस्, जाहीरनामे, निवेदनपत्रिका, प्रचारपत्रिका असे जे साहित्य प्रकाशित झाले ते २) नेत्यांची वेळोवेळी अधिकृतरित्या टिपणे काढलेली भाषणे ३) नेत्यांनी प्रेसला दिलेली निवेदने आणि विविध प्रसिध्दीमाध्यमात प्रसिध्द झालेले अहवाल. ४) दलित गटांच्या प्रमुख कार्यकारिणीतील सदस्यांच्या ज्या मुलाखती घेण्यात आल्या, त्यातून मिळालेली माहिती आणि (दलित आणि बिगरदलित अशा) विरोधी राजकीय पक्षांच्या व्यक्ती तसेच काही प्रमुख पुढारी व चळवळीशी संबंधित प्रमुख व्यक्ती.

## जाहीरनामा –

कुठल्याही प्रकारच्या निश्चित स्वरूपाच्या राजकीय विचारांची उणीव असल्यामुळे डॉ. आंबेडकरांचीच विचारसरणी पँथरला वेळोवेळी दीपस्तंभासारखी कामी आली. परंतु सुसूत्र अशा विचारसरणीच्या अभाव असल्याची जाणीव नेत्यांना होती. त्यांनी स्वतःचे असे आदर्श तयार केले. संघटनेची स्थापना झाल्यानंतर जाहीरनाम्याच्या स्वरूपात ते प्रकाशित केले. जाहीरनामा तयार करण्यासाठी ढसाळांनी पुढाकार घेतला. ह्या कामात दिघेंनी त्यांना मदत केली असे म्हटले जाते. एकीकडे जेव्हा पँथर्स डॉ. आंबेडकरांपासून स्फूर्ति मिळवून उभे राहिले होते, त्यावेळेस मार्क्सवादातून स्फूर्ति घेवून व्यापक अशा पायावरती आदर्श उभे करून जाहीरनामा बनवण्याचा प्रयत्न चालू होता. ज्यामुळे चळवळीचा अधिक उदारमतवादी दृष्टीकोन लोकांना दिसावा, असेही म्हटले जाते की, कम्युनिष्टांच्या १८४८ सालच्या जाहीरनाम्यावर हा जाहीरनामा बेतण्यात आला होता. याशिवाय ब्लॅक पँथर्सकडूनही त्यासाठी स्फूर्ति घेण्यात आली होती. भारिपच्या संसदीय आणि उदारमतवादी आदर्शवादापासून तो अगदी वेगळा होता. जाहीरनाम्यात सुरुवातीला घोषित करण्यात आले होते

की, पँथर्सचा उद्रेक हा केवळ भावनिक नसून राजकीयदृष्ट्या त्यांना काही लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. भांडवलशाही, जमीनदारी, पारंपरिक सत्ताधारी काँग्रेस आणि हिंदूधर्म व त्यांचे धर्मग्रंथ यांच्याविरुध्द ते बंड होते. त्या जाहीरनाम्यात सत्ताधारी पक्षाने वापरलेल्या 'गरीबी हटाव', लोकशाही समाजवाद व हरितक्रांती यासारख्या घोषणांचे वर्णन बहुसंख्य लोकांच्या डोळ्यात धूळ फेकणाऱ्या फालतू घोषणा' म्हणून केले आहे.

डॉ. आंबेडकरांनी सूचित केल्यानुसार 'तुम्ही सत्ताधारी होण्यासाठी प्रयत्न करा' यामागची भूमिका लक्षात घेवून पँथर्सद्वारा गंभीरतापूर्वक शपथ घेण्यात आली की, 'दलितमुक्तीच्या संघर्षाचे' उद्दिष्ट सर्वंकष क्रांती हे आहे. आम्हाला तात्पुरते सामावून घेणारा खंडीत असा बदल नको आहे. जोपर्यंत आपण आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात वर्चस्व गाजवू शकत नाही.[१४]

**पँथरचे कार्य –**

दलित पँथरच्या शाखा महाराष्ट्रभर झाल्या होत्या व त्यांनी अन्याय अत्याचाराविरुध्द आंदोलन केली. सांगलीतही अशी आंदोलने झाली, त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

सुरुवातीपासूनच पँथरने हल्ल्याची दुहेरी आघाडी उघडली होती. त्यांचा पहिला हल्ला होता तो सरकारविरुध्द. कारण त्यांनी दलितांचा विश्वासघात केला. तर दुसरा हल्ला होता तो म्हणजे भारिपने सत्तेत भागिदार होण्यासाठी केलेला भ्रष्टाचार आणि खऱ्याखुऱ्या अर्थाने दलित जनतेचे प्रतिनिधीत्व करण्यात त्याला आलेले अपयश. घटनात्मक मार्गांनी पददलितांसाठी संघर्ष करणे हे पँथर्सच्या दृष्टीने संघर्षाला चुकीची दिशा देण्यासारखे होते. कारण त्यांच्या मते या भारिप नेतृत्वाच्या अतिशय खेदजनक कृत्यामुळे ते आणि दलित जनता मते मागण्या, राखीव जागा, सलवती यांच्या दुष्टचक्रात अडकली. त्यांच्यादृष्टीने भारिप नेतृत्व हे स्वार्थी, प्रस्थापितांना साध्य करणारे आहे. ते भ्रष्ट असून त्यांना लोकांच्या वेदनेशी काही देणंघेणं नाही. हे सर्व सत्तेत असणाऱ्या लोकांनी त्यांच्यापुढे फेकलेल्या भाकरीच्या तुकड्यामुळे आहे. जाहीरनाम्यात चळवळीची जी उद्दिष्टे वर्णन केलेली आहेत ती साध्य करण्यासाठी पँथर्सनी अठरा कलमी कार्यक्रम आखून दिला होता.

**या कार्यक्रमातील काही प्राधान्यांची कलमे पुढीलप्रमाणे –**

अ) अनुसूचित जातीजमाती पैकी बहुसंख्य लोक भूमिहीन आहेत. त्यांच्या समस्या सोडवणे. ब) सर्व तऱ्हेचे शोषण थांबवण्यासाठी उत्पादनाच्या सर्व साधनांचे राष्ट्रीयीकरण करणे. क) श्रमिक आणि दुर्बल वर्गांना पूर्ण संरक्षण देणे.

**पँथरचे सांगली जिल्ह्यातील कार्य–**

१९७४ ची वरळीची दंगल माजली आणि पँथरच्या प्रसिध्दीच्या झगमगाटानं ते पँथरकडे आकृष्ट झाले. परंतु माहेरचं वळण तोपर्यंत सुटलं नव्हतं. याची निर्वाळा दि. ९ फेब्रुवारी १९७४ च्या संकष्टीच्या मुहूर्तावर केलेल्या स्टंटवरून देता येतो. सांगलीच्या गणेश मंदिरात प्रवेश करायचा हट्ट त्यांनी धरला व त्या लोकांना अटक करून सोडून देण्यात आलं. तेव्हा त्यांचा नेता नंदू कांबळे हा होता. तसेच एल.डी. कांबळे हेही यामध्ये सहभागी होते.

**दलित महासंघ –**

सांगली जिल्ह्यात दलित महासंघ ही दलितांच्या उध्दारासाठी कार्य करणारी तिसरी संघटना. त्याची स्थापना १९९२ ला प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी केली. ह्या संघटनेतही दलितांच्या उध्दारासाठी सांगली जिल्ह्यात मोलाचे योगदान दिलेले आहे. त्याची माहिती काही वर्तमानपत्रातून मिळते. त्या बातम्यांमुळे त्यांनी केलेलया कार्यावर नवीन प्रकाशन पडतो.

स्थापना वर्ष – १९९२, संस्थापक, प्रा. मच्छिंद्र सकटे, प्रा. सुकुमार कांबळे, प्रा. रघुनाथ केंगार, प्रा. मधुकर वायदंडे

१) दलित महासंघाची बंद खोलीत ११ जणानी स्थापना केली. योग्य वेळ येताच महामेळावा घेवून प्रस्थापित व्यवस्थेला हादरा देण्यासाठी सर्वांनी चंग बांधला. मात्र नेतृत्वासाठी हपापलेल्या मच्छिंद्र सकटे

यांनी कोल्हापूर येथे बिंदू चौकात सर्वांनाच अंधारात ठेवून एका आंदोलनाच्या निमित्ताने दलित महासंघाचे बॅनर फडकवले व मूळ संघटनेचे मुख्य सूत्रधार बाजूला गेले व सकट यांनी जातीच्या कोंदनात संघटनेला कोंडण्याचा प्रयत्न केला.

२) खऱ्या अर्थाने १९९५ नंतर दलित महासंघाचे कार्य सुरू झाले. प्रा. सकटे यांचे बरोबर प्रा. सुकुमार कांबळे (आळते), श्री. राम कांबळे (सावर्डे), श्री. मधुकर वायदंडे (कुरळप) या उच्चशिक्षित लोकांनी साथ करून संघटना नावारूपाला आणली.

३) क्रांतीवीर डॉ. नागनाथआण्णा नायकवडी यांनी दलित महासंघाच्या विविध परिषदा मोर्चे यांना अर्थपुरवठा करून खऱ्या अर्थाने पुरोगामी व परिवर्तनवादी चळवळ उभी करणेसाठी सहकार्य केले.

४) प्रस्थापित राजकारण्यांनी प्रा. मच्छिंद्र सकटे यांचेशी भांडवली करून संघटनेत फूट पाडण्याचा प्रयत्न केला. त्याची सुरुवात म्हणून कागल विधानसभा मतदार संघात दलित महासंघाचा उमेदवार उभा करून नंतर भांडवल करून माघार घेतली व सत्तेच्या राजकारणातील एक पद देवू असे आश्वासन शरद पवाराकडून घेतले व तेथेच फुटीची बिजे रोवली.

५) हुतात्मा नानकसिंग विद्यालय हुतात्मानगर (सोनवडे) ता. शिराळा जि. सांगली येथे प्रा. मधुकर वायदंडे यांनी प्रवक्ता या नात्याने प्रा. मच्छिंद्र सकटे यांची हकालपट्टी केली व प्रा. सुकुमार कांबळे यांची अध्यक्षपदी निवड केली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले असे कोणी तरी म्हटले आहे. अशा प्रकारचे वक्तव्य इतिहासाच्या पुस्तकातून किंवा वृत्तपत्रातून वाचावयास मिळते पण असं म्हणणारा किंवा लिहिणारा खोडसाळ असला पाहिजे असे आमचे मत बनले आहे. कारण आम्हाला या देशात कधी स्वातंत्र्य दिसलेच नाही. कोणत्याही गावात, शहरात, राज्यात आम्हाला स्वातंत्र्य आढळून आले नाही. कारण एका गावात दोन गावे आम्हाला आजही सर्वत्र दिसतात. एक गावकुसाच्या आतील गाव नि दुसरे गावकुसाबाहेरचं गाव!

दोन्ही गावातील राहणं, वागणं, जगणं एवढेच नाही तर खाणं–पिणंही वेगळं आहे. संस्कृती वेगळी आहे. गावकुसाबाहेरची माणसं आजही 'वेठबिगार' आहेत. त्यांना मदतानाचा हक्क असला तरी 'मत' नाही. गावटग्यांच्या दबावामुळे दलित माणसे पारतंत्र्यातच आहेत. दलितावरील अन्याय, अत्याचार आम्ही उघड्या डोळ्यांनी पहातोय... नि गावटग्यांना सामील असलेला आमच्यातला 'सूर्याजी पिसाळ' लाचार नि असहाय्य आहे. आजही दलितांच्या आया बहिणी असुरक्षित आहेत. मराठवाडा विद्यापीठाच्या जोरावर दलितांची झालेली होरपळ आम्ही अनुभवत आहोत. मंडल आयोगाच्या प्रश्नावर राखीव जागांच्या प्रश्नावर देशभर उसळलल्या दंगलीच्या ज्वाला आम्ही पहात आहोत. म. फुलेंची बदनामी करणारा तर्कट गांगल आम्ही पाहिला आहे. 'हिंदुत्वा'ची भगवी शाल घेवून फिरणारे 'बाळ–कृष्ण' आम्ही पाहिलेत... बाबरी मशिदीच्या प्रश्नावर उठलेले वादळं आम्ही पाहिलेत... [१५]

दलितावरील अन्याय–अत्याचार तर आम्ही रोजच पहात आहोत. पण या सर्वात आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे– एका बाजूला हे फुले–आंबेडकर–शाहू–अण्णाभाऊंच्या विचारांचे मारेकरी संघटित होत असताना दलित नेते मात्र लुले आंबेडकरांचे नाव घेत चक्क चळवळीचे सौदागर बनले. आपल्या गटाचा लिलाव करण्यासाठी हे नेते इतर पक्षी व पुढाऱ्यांच्या दारात उभे राहिले... यातूनच आंबेडकरी चळवळ, गटा–तटाच्या बेड्यात पूर्णपणे अडकली. सत्ता लालसेने आंबेडकरांचे अनुयायी बेधुंद झाले. आंबेडकरी चळवळीच्या रथाचे त्यांनी तुकडे तुकडे केले होते.... महार बौध्दांची ही अवस्था होती नि महारेत्तर दलितांच्या वाड्यात जातीयवाद्यांच्या संघटनांचे बोर्ड लागत होते... मोठे आव्हान संपूर्ण महाराष्ट्रात उभे होते... आम्ही हे जातीयवाद्यांच्या स्वतःला वाघ म्हणणाऱ्यांचे आव्हान स्विकारले नि त्यातून दलित महासंघ स्थापन झाला.[१६]

**ध्येय आणि धोरणे –**

१. आम्ही क्रांतीकारक आहोत. त्यामुळे संपूर्ण क्रांती करणे.

२) दलितांवरील सर्व प्रकारच्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात अत्यंत आक्रमक परंतु संघटितपणे संघर्ष करणे.

३) कोणाही व्यक्तीला विरोध न करता इथल्या अन्यायी अशा प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करणे.

४) विषमतेवर आधारलेली भारतीय समाजातील जाती–धर्म व्यवस्था आणि सर्व प्रकारची शोषण व्यवस्था समूळ उद्ध्वस्त करणे.

५) यासाठी अनुसूचित जाती–जमाती, भटके विमुक्त शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व भूमिहीन तसेच इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांकांना संघटित व जागृत करणे.

६) फुले–आंबेडकर, आण्णाभाऊ साठे यांच्या 'सत्यशोधकी' विचारावर निष्ठा असणाऱ्या सर्व परिवर्तनवादी लोकांशी प्रसंगी दोस्ती करणे व संपूर्ण क्रांतीच्या लढा तीव्र व व्यापक करणे.

७) फुले–शाहू–आंबेडकर अण्णाभाऊ साठे यांना अभिप्रेत असणारी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे.

८) भारतातील सर्व जातीयवादी रचना असणारी खेडी ही बुलडोझरने जमीनदोस्त करून नवी समताधिष्ठीत आधुनिक खेडी निर्माण करणे.

९) 'गाव तेथे शाखा नि घर तेथे छावा' हे ध्येय समोर ठेवून संपूर्ण भारतभर संघटना करणे.

**दलित महासंघ पक्षाचे कार्य –**

दलित महासंघ हा सांगली जिल्ह्या प्रभावी होता. त्यांनी दलितांच्या समस्या, प्रश्न सोडविण्याचे अनेक प्रयत्न केलेले दिसून येतात. तसेच त्यांनी मोर्चे काढून आपल्या समस्या, त्यावेळी मंत्री असलेले ना. डांगे यांच्या समोर मांडल्या व त्यांना निवेदने दिलेली दिसतात. तसेच मंत्री महोदयांनी त्यावर विचार करणेचे आश्वासन दिले.

दलित महासंघ ही व्यक्ती नसून अन्यायाविरुध्द लढणारी संघटना आहे. त्यांची मोर्चा काढून सनदशीर मार्गाने चळवळ करणारी संघटना होती. प्रा. मच्छिंद्र सकटे हे एक दलित चळवळीचे प्रभावी नेते होते.

युतीचे दलितविरोधी धोरणाच्या निषेधार्थ रविवारी आण्णा डांगेच्या घरावर मोर्चा– दलित महासंघाचा पुढाकार

महाराष्ट्रातील शिवसेना–भाजप युतीच्या सरकारच्या दलितविरोधी धोरणाच्या निषेधार्थ ना. आण्णासाहेब डांगे यांच्या निवासस्थानी मोर्चा काढणार असल्याची माहिती दलित महासंघाचे प्रदेश अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी इस्लामपूर येथे आयोजित एका पत्रकार बैठकीत दिली.

ना. डांगे हे दलित असून ते सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. दलित जनतेचे तरी पालकत्व ते स्विकारणार की नाहीत याचा जाब विचारण्यासाठी सदर मोर्चा काढण्यात येणार आहे.

दलित महासंघ ही व्यक्ती विरोधी लढणारी संघटना नसून ती धोरणांच्या विरोधात लढणारी संघटना आहे. घरावर मोर्चा काढण्यामागे कोणताही व्यक्ती द्वेष नाही. सदर मोर्चा हा लोकशाहीच्या मार्गाने निघणार आहे.

एका बाजूने ब्राह्मणी संस्थांना लाखो रुपयांची अनुदाने सढळ हस्ते देणारे ना. जोशी मागासवर्गीय महामंडळातून मिळणारेअ नुदान मात्र बंद करतात तेव्हा ही शिवशाही आहे की पेशवाई असा सवालही आम्ही विचारीत आहोत. सदर मोर्चामध्ये दलित महासंघाच्या सर्व सभासदांनी व पुरोगामी म्हणविणाऱ्या कार्यकर्त्यांनी १६ जून रोजी दुपारी १२ वाजता इस्लामपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ एकत्र जमावे असे आवाहनही प्रा. सकटे यांनी केले. दलित महासंघाच्या वतीने काढण्यात आलेल्या निवेदनावर प्रा. मच्छिंद्र सकटे अध्यक्ष दलित महासंघ महाराष्ट्र प्रा. सुकुमार कांबळे संघटक दलित महासंघ महाराष्ट्र मधुकर वायदंडे संघटक दलित महासंघ वाळवा तालुका यांच्या सह्या आहेत.

**अंजनी येथील मारहाणीप्रश्नी चौकशीची मागणी –**

अंजनी, ता. तासगाव हे माजी गृहमंत्री कै. आर. आर. पाटील यांचे जन्मगाव. त्या गावात चौघा दलित मजुरांना मारहाण झाली. त्याची चौकशी करावी म्हणून दलित नेते प्रा. सुकुमार कांबळे यांनी पत्रकार बैठक

बोलावून घेवून निवेदन दिले तसेच वाटेगावच्या आण्णाभाऊ साठे स्मारकाबाबत युती सरकारने मातंग समाजाची निराशा केली म्हणून राज्यव्यापी आंदोलन करणेचे जाहीर केले, त्याचा वृत्तांत –

''अंजनी, ता. तासगाव येथील चौघा जणांना शेतजमिनीच्या वादातून मारहाण केल्याप्रकरणी सदर प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी प्रा. सुकुमार कांबळे यांनी पत्रकार बैठकीत केली.

वाटेगावच्या आण्णाभाऊ साठे स्मारकाबाबत युती सरकारने मातंग समाजाची निराशा केली. वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथील सत्यशोधक आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाबाबत महाराष्ट्रातील युतीच्या सरकारने मातंग समाजाची घोर निराशा केली आहे. यासाठीच आम्ही दलित विरोधी आणि लबाड अशा युती सरकारच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन छेडणार आहोत. याचाच एक भाग म्हणून १२ डिसेंबर ९६ रोजी इस्लामपूर येथील तहसीलदार कार्यालयावरती दुपारी १ वाजता दलित महासंघाच्या वतीने लाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती दलित महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी इस्लामपूर येथे पत्रकार परिषदेत दिली.

मातंग समाजाचे प्रेरणास्थान असणाऱ्या आण्णाभाऊंचे वाटेगाव येथे बांधण्यात आलेले स्मारक हे स्मारक नसून एक गोदाम आहे. या स्मारकापेक्षा तालुक्यातील बचत भवने उत्कृष्ट आहेत म्हणूनच वाटेगावातील आण्णांचे स्मारक हा आम्ही मातंग समाजावरील कलंक मानतो. चार भिंती आणि पाच शौचालये म्हणजे कुठे स्मारक असते काय? असा आरोपही त्यांनी केला. ज्याप्रमाणे युती शासनाने गणवेशात भेद केला त्याचप्रमाणे स्मारकातही भेद निर्माण केला आहे. या स्मारक बांधकामातही भ्रष्टाचार झाला असून याचे ठोस पुरावे आम्ही लवकरच सादर करणार आहोत, असे असूनही त्या स्मारकामध्ये तिकिटावरती तमाशा, नाटके दाखविण्याचे काम येथील स्थानिक कार्यकर्ते बाजीराव नांगरे व वसंत जाधव हे करीत आहेत. यामुळे मातंग समाजाच्या भावना दुखावल्या असून ते स्मारक मातंग समाजाच्या ताब्यात नाही, यशवंतराव वेणूताई चव्हाण, वसंतदादा पाटील यांची स्मारके मराठ्यांच्या ताब्यात आहेत. टिळक, सावकरांची स्मारके ब्राह्मणांच्या ताब्यात आहेत. डॉ. आंबेडकरांचे स्मारक बौध्दांच्या ताब्यात आहे. मग आण्णाभाऊ साठे स्मारक मातंग समाजाच्या ताब्यात

का असू नये असाही त्यांनी सवाल केला आहे. यासाठी आम्ही १ ऑगस्ट ९६ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना काळे झेंडे दाखवून जोरदार निदर्शने केली होती. परंतु आण्णाभाऊ साठेंच्या रक्तामांसाच्या ६५० लोकांना शिराळा जेलमध्ये डांबून या युतीच्या सरकारने खोटा खोटा आण्णाभाऊ साठेंच्या जयजयकार केला. यासाठीच आम्ही दलितविरोधी आणि लबाड अशा ह्या युती सरकारच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन पुकारलेले आहे. या आंदोलनाची सुरुवात वाळवा तालुक्यातून होत आहे. मार्च १९९७ मध्ये स्मारक प्रश्नावर औरंगाबाद येथे राज्यव्यापी परिषदेचे आयोजन केले आहे तर मे महिन्यात नांदेड ते औरंगाबाद 'जनयात्रा' दलित महासंघाच्या वतीने काढण्यात येणार आहे. सदरचे आंदोलन हिंसक होणार असून आंदोलन कोणत्या पातळीवरती जाईल हे आताच सांगता येणार नाही असेही ते म्हणाले. आण्णाभाऊ साठेंच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांचा धनादेश (चेक) दिला आहे. पण प्रत्यक्षात आण्णाभाऊंच्या कुटुंबियांना अजूनही झुलवत ठेवले आहे. या सर्व खोट्या प्रचाराला मातंग समाज बळी पडणार नाही. या सर्व दलितविरोधी धोरणाच्या निषेधार्थ १२ डिसेंबर रोजी इस्लामपूर बसस्थानकावरून गांधी चौक मार्गे तहसीलदार कचेरीवर 'लाठी मोर्चा'चे आंदोलन आयोजित केले आहे. दलित महासंघाच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनावरती प्रा. मच्छिंद्र सकटे (अध्यक्ष, दलित महासंघ महाराष्ट्र प्रदेश), प्रा. सुकुमार कांबळे (संघटक), राजेंद्र बल्लाळ (अध्यक्ष, वाळवा तालुका), डॉ. विजय चांदणे (अध्यक्ष, इस्लामपूर शहर) आदींच्या सह्या आहेत.[१७]''

**मुंबई घटनेचे सांगली जिल्ह्यात तीव्र पडसाद, आज बंद**

मुंबई घटनेचे सांगली जिल्ह्यात तीव्र पडसाद आज बंद– मुंबई येथे प्रकाश खांडेकर यास भोकसल्याने त्यांचे मूळ गाव गुंडेवाडी, ता. मिरज या ठिकाणी व सांगली जिल्ह्यात तीव्र पडसाद उमटले. दलित नेत्यांनी सांगली जिल्हा बंद आंदोलन केले. शासनाने याची चौकशी करून दलितावर होणारे अन्याय थांबवावे, अशी मागणी केली. त्याला वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली. दलित संघटना संतप्त झाल्या. दलितांची मते चालतात, दलित महासंघाने जोरदार निदर्शने करून संपूर्ण जिल्हा जागृत करून अन्यायाला वाचा फोडली हे ह्या संघटनेचे यश म्हणावयाचे.

''बंदमधून गुंडेवाडी, ता. मिरज येथे रि. पा. ई. च्या प्रकाश खांडेकर यास भोकसल्याने तो मयत झाला. या प्रकारचे पडसाद मिरजेत पुन्हा उमटू नयेत म्हणून पोलिसांनी रात्रीच्या बंदोबस्तात प्रचंड वाढ केली आहे. दरम्यान व्यापारी वर्गात आजतागायत भितीचे सावट दिसत असून, शहरात तणावपूर्ण शांतता आहे.

आमचा खंडेराजूरीचा वार्ताहर कळवितो की, दुकान बंद करण्याच्या वादावादीतून दलित युवकाचा खून झाला आणि त्यातून संतप्त जमावाने आरोपीचे टेलरिंग दुकान आणि पानपट्टीचे दुकान पेटवून दिले. या प्रकरणी पोलिसांनी रामचंद्र पाटील, आनंदा गोविंद गडदे व सुभाष पाटील या तिघांना अटक केली.

**अनेक ठिकाणी पडसाद–** आमचा भिलवडी वार्तावर कळवितो की, आंबेडकर पुतळ्याच्या विटंबनाच्या निषेधार्थ माळवाडी, ता. तासगाव येथे दलित महासंघाच्या माळवाडी शाखेच्या वतीने बंद पाळण्यात आला. सर्वच नागरिकांच्या सहकार्याने बंद शाततेत पार पडला.

दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ भिलवडी येथील रिपब्लिकन पक्षाच्या शाखेने आज (रविवारी) भिलवडी बंदचे आवाहन केले आहे.''

**दलित संघटना संतप्त –**

दलित महासंघाच्या महाराष्ट्र संघटक प्रमुखावर गोळीबार झाला, त्याचे संतप्त पडसाद उमटले. त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे –

''दलित महासंघाचे महाराष्ट्र संघटक प्रा. सुकुमार कांबळे यांनी संतप्त भाषेत पत्रक काढून या घटनेचा निषेध केला आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी गोळीबाराचे समर्थन करून दलित शक्तीच्या जखमेवर मीठ चोळले आहे, असे स्पष्ट करून प्रा. कांबळे यांनी युती सरकार दलितविरोधी असल्याचे म्हटले आहे व दलित शक्तीला रोखणे शक्य नाही असा त्यांनी इशारा दिला आहे.

शिगाव (ता. वाळवा येथे आर. पी. आयचे जिल्हा पदाधिकारी प्रताप मधाळे यांनी एक बैठक घेवून या घटनेचा निषेध केला व दंगलीत बळी गेलेल्यांना श्रध्दांजली वाहिली.

या दुर्दैवी घटनेच्या निषेधार्थ उद्या दि. १३ जुलै रोजी दलित मोर्चाचे आयोजन केले असून निवेदनात दलित महासंघाने इस्लामपूर बंदचे आवाहन केले आहे.''

**दलितांची मते चालतात पण त्यांची संगत नको, गोरे गेले पण काळे अद्यापी छळ करतात–**

देशाला स्वातंत्र्य मिळवून अर्धे शतक झाले तरी अजूनही दलितावर अन्याय, अत्याचार करतात, त्याचा वृत्तांत वृत्तपत्रातून आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे –

''देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाली तरी गोरे इंग्रज जावून काळ्या इंग्रजांच्या वर्चस्वाखाली दलित समाज अजूनही वावरतो आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आणि दलितांना खरेखुरे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी दलित महासंघ प्रसंगी प्राणांची आहुती देईल, असे प्रतिपादन दलित महासंघाने राज्य संघटक प्रा. सुकुमार कांबळे यांनी केले. ते साखराळे, ता. वाळवा येथील दलित महासंघाच्या शाखा उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी दलित महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे होते.

प्रा. कांबळे पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील सर्वच आमदारांच्या खासदारांच्या गावच्या दलित वस्तीचे सर्व्हेक्षण केले पाहिजे. गेली ३०–३५ वर्षे झाले, साखराळ्यात दलितांना जागा मिळत नाही. घर मिळत नाही, त्यांची मते मात्र चालतात. एकीकडे मताचा जोगवा मागायचा परंतु दुसरीकडे दलितांना हीन वागणूक द्यायची या गंभीर बाबीचा दलित महासंघ निषेध करतो.[१८]

राज्यअध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, तमाम दलित ऐक्यासाठी मतभेद बाजूला ठेवून परिवर्तनाची चळवळ प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी दलित महासंघ नेहमीच पुढाकार घेत असून, त्याची नाळ दबलेल्या, पिचलेल्या दलित बांधवांशी आहे.

यावेळी जिल्हा संघटक मधुकर वायदंडे व पश्चिम महाराष्ट्र संघटक मारुतरताव साठे यांनी नामफलकाचे अनावरण केले. सुरुवातीला स्वागत व प्रास्ताविक चंद्रकांत गायकवाड यांनी केले. यावेळी राजेंद्र बल्लाळ, आदिकराव अवघडे, अशोक वायदंडे, अतुल चव्हाण, अर्जुन पांढरबळे, रावसाहेब क्षीरसागर, सौ. रंजना गायकवाड, भगवान बल्लाळ, जिल्हा संघटक मधुकर वायदंडे, मारुतीराव साठे आदींची भाषणे झाली. आभार दादू गायकवाड यांनी मानले.''

**डॉ. आंबेडकर पुतळा विटंबनेचा दलित महासंघातर्फे निषेध –**

डॉ. आंबेडकरांच्या मुंबईतील घाटकोपर येथील पुतळ्याची विटंबना केल्याची वार्ता सांगली जिल्ह्यात पोहोचली. त्याच्या निषेधार्थ दलित महासंघाने निदर्शने, मोर्चा, बंद पुकारला व शासनाचा निषेध केला आणि आपल्यावरील अन्याय दूर करावा अशी निवेदने दिली.

''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची मुंबईत घाटकोपर येथे झालेली विटंबना व पोलीस गोळीबारात दलित कार्यकर्त्यांची झालेली हत्येच्या घटनेचा दलित महासंघाच्या वतीने निषेध करण्यात आला आहे.

डॉ. आंबेडकर पुतळा विटंबना करणाऱ्या समाजकंटकांना शासन करावे, अशी मागणी दलित महासंघाचे प्रा. सुभाष घोंगडे व राम साठे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे.''

**इस्लामपुरात आज लोकदरबाराचे आयोजन–**

इस्लामपूर हे वाळवा तालुक्यातील महत्त्वाचे जागरुक शहर व चळवळीचे प्रमुख केंद्र होते. दलित मागासलेल्या जनतेचे काही प्रश्न रेंगाळले होते. त्यांना लवकर न्याय मिळत नव्हता म्हणून इस्लामपुरात लोक दरबाराचे आयोजन दलित महासंघाने केले व काही प्रश्न, समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

‘‘इस्लामपूर येथे दलित महासंघाच्या वतीने लक्ष्मी मंगल कार्यालयामध्ये रविवार, दि. २० रोजी दुपारी १२ वाजता लोक दरबाराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा संघटक श्री. मधुकर वायदंडे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले, वाळवा तालुक्यातील दलित बांधवांचे अनेक शासकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी प्रकारचे प्रश्न आहेत. त्याची सोडवणूक व्हावी म्हणून या दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील दलित बांधवांनी आपले सार्वजनिक प्रश्न तसेच शासकीय अडचणी याबाबत या मेळाव्यात हजर राहून त्या सादर कराव्यात. संघटनेच्या वतीने त्यांची सोडवणूक करण्यात येणार आहे व याचवेळी वाळवा तालुका कार्यकारिणी निवडण्यात येणार आहे.

या लोक दरबारासाठी महाराष्ट्र राज्य दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे व संघटक प्रा. सुकुमार कांबळे हे मार्गदर्शन करणार आहेत. सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वायदंडे यांनी केले आहे.[१९]’’

**दलितांना अद्याप खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले नाही : सकटे**

दलित महासंघाच्या शाखा संपूर्ण सांगल जिल्ह्यात काढणे हे प्रा. सकटे यांचे ध्येय होते. त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले होते. पोखर्णी व संतोषनगर येथे नवीन शाखेचे उद्घाटन त्यांनी केले. त्यावेळी ते म्हणतात– दलितांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले नाही कारण त्यांच्यावर अजुनी अन्याय होत आहेत.

‘‘देशाला स्वातंत्र्य मिळाले असले तरी दलितांना अद्याप खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यांच्यावर वेळोवेळी अन्याय होत आहे. यापुढे दलितावर होणारा अन्याय सहन करणार नाही. तसेच अन्याय करणाऱ्याचे ‘हात’ कलम करू, असा इशारा राज्य दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी दिला.

पोखर्णी (ता. वाळवा) येथे नव्याने स्थापन झालेल्या दलित महासंघाच्या पोखर्णी व संतोष नगर शाखेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्य दलित महासंघाचे संघटक प्रा. सुकुमार

कांबळे होते तसेच राजेंद्र बल्लाळ, प्रा. मधुकर वायदंडे, विलास लोंढे व राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक अशोकराव पाटील आदिंनी आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमास सांगली, सातारा, कोल्हापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातून दलित महासंघाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.''

**दलितावरील अन्यायाविरोधी संघटित लढा आवश्यक : सकटे**

दलितावरील अन्याय थांबविण्यासाठी आपण संघटित होऊन त्याचा प्रकार केला पाहिजे वा प्रखर लढा दिला पाहिजे असे प्रा. सकटे हे आटपाडी तालुक्यातील पिंपरी खुर्द येथील महासंघाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

''दलितावर होणारा अन्याय सोडविण्यासाठी सर्व दलितांनी एकत्र मिळून लढा देण्याची गरज आहे, असे मत दलित महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी पिंपरी खुर्द येथे बोलताना व्यक्त केले.

आटपाडी तालुक्यातील पिंपरी खुर्द येथे दलित महासंघाच्या शाखेचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. महासंघाचे संघटक सुकुमार कांबळे हेही यावेळी उपस्थित होते. प्रारंभी दलित महासंघाचे आटपाडी तालुका संघटक सुरेश भिसे यांनी नामफलकाचे उद्घाटन केले तर प्रास्ताविक जितेंद्र सावंत यांनी केले.

यावेळी होलार समाज संघाचे जिल्हाध्यक्ष नाराजण जावीर, अरुण लांडगे, बाबासाहेब कदम, सत्यवान काटे, ग्रामपंचायत सदस्य सुबराव काटे, रुबाई रुपटके इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. संघाच्या गाव पातळीवर झालेल्या कार्यकारिणी निवडीत अध्यक्षपदी युवराज खरात, उपाध्यक्षपदी हणमंत रुपटके तर सचिवपदी संजय हातेकर यांची निवड करण्यात आली. शेवटी संतोष काटे यांनी आभार प्रदर्शन केले.''

**कुरळप पोलिसांच्या बेबंद वर्तनाला वेळीच आळा घाला**

दलित महासंघाचे दुसरे नेते प्रा. वायदंडे यांनी कुरळप पोलिसांच्या बेबंद वर्तनावर तोफ डागली व दलितावरील अन्याय पोलीस का थांबवीत नाहीत, असा प्रश्न विचारला, त्याची माहिती पुढीलप्रमाणे–

''दारू, सिगारेट, गुटखा, लाच लुचपत यांचा अड्डा बनलेल्या कुरळप ता. वाळवा येथील पोलिसांची कसून चौकशी करावी, अशी मागणी दलित महासंघाचे मधुकर वायदंडे यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कुरळप पोलीस स्टेशनमध्ये दिवसाढवळ्या काही पोलीस दारू पिवून धिंगाना घालत आहेत. रात्रीच्या वेळी पोलीस स्टेशन की दारूचा अड्डा हे ओळखू शकत नाही. ग्रामीण भागातील लोक तक्रारी घेवून पोलीस स्टेशनात येतात. त्यांची दखल घेतली जात नाही. तक्रार साध्या कागदावर नोंदवून घेवून विरुध्द पार्टीला बोलावून घेतले जाते. दम देवून पोलीस केसची भिती घातली जाते. दोन परस्परविरोधी पार्ट्या समेटासाठी तयार असताना पैसे घेवूनच सदर प्रकरणे मिटवली जातात. एखाद्या गंभीर गुन्ह्याबाबत एखाद्या राजकीय पुढाऱ्याचा फोन आला की, ते प्रकरण दडपले जाते. या परिसरात बेकायदेशीर धंद्यांना एका नव्या प्रकारे उधाण आले असून बेकायदेशीर धंदे बंद करावेत, दारू पिणाऱ्या व तक्रारीच्या बाबत दखल न घेणाऱ्या पोलिसांवर व फौजदारावर कारवाई करावी, नाहक त्रास देवून पैसे घेऊन प्रकरण मिटविण्याच्या प्रकरणांना आळा बसावा, जनतेस वेठीस धरू नये. वरील सर्व बाबींची कसून चौकशी करावी अन्यथा दलित महासंघाच्या वतीने पोलीस स्टेशनवरती निदर्शने केली जातील. असा इशाराही मधुकर वायदंडे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. वरील आशयाच्या निवेदनाच्या प्रती जिल्हा पोलीस प्रमुख कुलवंत कुमार व सांगली जिल्हाधिकारी सांगली यांना पाठविण्यात आल्या आहेत.[२०]''

**वाळवा तहसीलदार यांचेकडे पोखर्णी दलित महासंघाच्या तक्रारी**

वाळवा तालुक्यातील पोखर्णी येथील दलितावर नेहमी अन्याय होत होता. त्याचा निषेध दलित महासंघाने केला व मोर्चा काढून वाळवा तहसीलदारास निवेदन दिले.

''पोखर्णी गावच्या मातंग समाजातील नागरिकावर अनेक प्रकारांनी सतत अन्याय सुरू आहे. समाज मंदिर स्मशानभूमी बरोबरच अन्य सुविधा गावातील नेते मंडळी हेतूपूर्वक मिळू देत नाहीत, अशी तक्रार दलित महासंघाच्या वतीने वाळवा तहसीलदार यांच्याकडे करणेत आली आहे. शासकीय योजना दलितापर्यंत पोचू दिल्या जात नाहीत, अशीही तक्रार सदर महासंघाची असून तहसीलदारांनी समक्ष येवून तक्रारी तपासून पहाव्यात, अशी मागणी करणेत आली आहे.[२१]''

**जिल्ह्यातील दलित वसाहतीतील दारूची दुकाने त्वरित बंद करा : दलित महासंघातर्फे आंदोलनाचा इशारा**

सांगली जिल्ह्यात खेडे गावात दारूची दुकाने होती. गरीब दलित जनतेतील व्यसनी लोक आपल्या संसाराची राख रांगोळी व्यसनापायी करतात. दारूबंदी व दारू दुकानबंद केल्यास ह्याला थोडा तरी पायबंद बसेल. दारुची दुकाने बंद नाही केली तर दलित महासंघातर्फे तीव्र आंदोलन उभारले जाईल असे प्रशासनास निवेदन दिले.

''जिल्ह्यातील दलित वसाहतीमधील दारूची दुकाने तातडीने बंद करावीत, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा दलित महासंघातर्फे आज येथे देण्यात आला. या मागणीसाठी दलित महासंघातर्फे मोर्चाही काढण्यात आला.

जिल्ह्यातील दलित वसाहतीमधील दारूची दुकाने बंद करावीत, तसेच मिरज येथील नवी वेस भागातील देशी दारूचे दुकान बंद करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना दमदाटी करणाऱ्या दुकान चालकाला अटक करावी व सांगलीतील इंदिरानगरमधील शासकीय घरकूल योजना लवकरात लवकर पूर्ण करावी, या मागण्यांसाठी दलित महासंघाच्या जिल्हा शाखेतर्फे आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. त्यावेळी झालेल्या सभेत आंदोलनाचा इशारा देण्यात आला.[२२]

मोर्चाची सुरुवात दुपारी तीन वाजता शास्त्री चौकातील डॉ. आंबेडकर पुतळ्यापासून झाली. शहरातील प्रमुख मार्गावर फिरून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आला. तेथे मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी महासंघाचे संघटक प्रा. सुकुमार कांबळे म्हणाले, मिरज येथील नदीवेस भागातील देशी दारू दुकान बंद करण्याबाबत लेखी तक्रारी करूनही दखल घेतली नाही. त्याचा मी निषेध करतो.

मोर्चाचे नेतृत्व प्रा. कांबळे, प्रा. मधुकर वायदंडे, संतोष कांबळे, राम कांबळे, राजेंद्र बल्लाळ, राम साठे, मंगला शिर्के यांनी केले. शिष्ट मंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी मनोहर बेलवलकर यांना निवेदन दिले.''

**अण्णाभाऊंनी साहित्यातून समाजपरिवर्तनाचे कार्य केले –**

अण्णाभाऊ साठे हे दलित समाजातील एक प्रभावी लेखक, कवी, साहित्यिक होवून गेले. त्यांनी आपल्या लेखनीद्वारे सृजन साहित्य निर्माण करून समाज परिवर्तनाचे काम केले. सांगली जिल्ह्यातील कुरळप या ठिकाणी आज अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी केली व त्यांच्या समाजपरिवर्तन कार्याचा गौरव खालील शब्दात वक्त्यांनी केला.

''अण्णाभाऊंनी साहित्याच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे कार्य केले असून, शाळेत न रमणाऱ्या अण्णाभाऊंनी शाळेच्या भिंतीबाहेर चांगले बस्तान बसविले. धनदांडग्यांनी मात्र अण्णाभाऊंच्या साहित्यावर चित्रपट काढून माड्यावर माड्या बांधल्या पण अण्णाभाऊंचे कुटुंब मात्र कित्येक वर्षे दैन्यावस्थेतच राहिले, अशी खंत बाबासाहेब शेटे यांनी व्यक्त केली. कुरळप येथे अण्णाभाऊ साठे पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात श्री. शेटे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी दलित महासंघाचे जिल्हा संघटक मधुकर वायदंडे उपस्थित होते. प्रारंभी पं. स. सदस्या सौ. लक्ष्मी वायदंडे यांनी दीप प्रज्वलन केले तर आण्णाभाऊंच्या प्रतिमेस सुभाष पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला.

याप्रसंगी मधुकर वायदंडे यांनी समाजास म. फुले, राजर्षी शाहू राजे, डॉ. आंबेडकर व आण्णाभाऊंच्या विचाराची गरज असल्याचे सांगितले तर सुभाष पाटील यांनी दलित सवर्ण अशी निर्माण झालेली दरी दूर

होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. यावेळी डॉ. आंबेडकर पुतळा विटंबना प्रकरणी बळी पडलेल्या लोकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. स्वागत व प्रास्ताविक शाखा संघटक संजय गायकवाड यांनी केले तर आभार सुभाष वायदंडे यांनी मानले. शेवटी व्ही. टी. पाटील, बाबाजी घनवट, सीताराम माने आदी उपस्थित होते.[२३]''

**दलित समाज अजूनही पारतंत्र्यात : वायदंडे**

दलित महासंघाचे जिल्हा संघटक मधुकर वायदंडे यांनी कुरळप येथे अण्णाभाऊंची पुण्यतिथी साजरी केंी. दलित समाज खऱ्या अर्थाने स्वतंत्र नाही तर तो अजूनही पारतंत्र्यात (सामाजिक) आहे असे ते म्हणाले.

''देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली तरीही दलित समाज अजूनही पारतंत्र्याचे जीवन जगत आहे. हे चित्र बदलण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची गरज आहे, असे मत दलित महासंघाचे जिल्हा संघटक मधुकर वायदंडे यांनी व्यक्त केले.

ते कुरळप येथे आयोजित केलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त बोलत होते. अध्यक्षस्थानी बाबासाहेब शेटे होते. यावेळी बाबासाहेब शेटे, सुभाष पाटील यांची भाषणे झाली.[२४]''

**थोर विचारवंतांच्या विचाराने जग बदलावे : मधुकर वायदंडे**

फुले, शाहू, आंबेकर हे थोर विचारवंत व त्यांच्या विचाराने जग बदलते असे प्रा. वायदंडे यांनी विचार व्यक्त केले.

''देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाली तरीही दलित समाज अजूनही पारतंत्र्याचे जीवन जगत आहे. हे चित्र बदलायचे असेल तर फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांच्या घावाने जग बदलावे लागेल, असे प्रतिपादन दलित महासंघाचे जिल्हा संघटक मधुकर वायदंडे यांनी केले. कुरळप ता. वाळवा येथे आण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त ते बोलत होते.[२५]''

**हिंदू दलितात जागृतीसाठी ऑक्टोबरमध्ये राज्यभर यात्रा : दलित समता परिषदेचा उपक्रम**

संपूर्ण राज्यभर हिंदू दलितात जागृतीसाठी राज्यभर यात्रा काढून दलितांच्या हक्कासाठी लढा द्यायचा असा कार्यक्रम दलित समता परिषदेने हाती घेतला, त्याचा हा वृत्तांत –

''स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हिंदू दलितांमध्ये जागृती करून हक्काच्या लढ्यासाठी त्यांनी संघटित व्हावे, त्यांच्यात अस्मितेची भावना निर्माण करून समाजातील या उपेक्षित घटकाचे प्रश्न जनतेसमोर आणावेत या हेतून येत्या १५ ऑक्टोबरला नाशिकपासून राज्यव्यापी अस्मिता यात्रा काढण्यात येईल, अशी माहिती दलित समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, डॉ. आंबेडकरांच्या आवाहनाला प्रतिसाद न देता हिंदूच राहिलेल्या दलितांची संख्या धर्मांतर दलिताएवढी आहे. मात्र या हिंदू दलितावर नेहमीच सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्याय व अत्याचार झाले. त्याला समाजधुरीण व सत्ताधारी सारखेच जबाबदार आहेत. हिंदू दलितांना अनेक सोयी सवलतीपासून हेतू पुरस्सर डावलण्यात आले. त्याऐवजी धर्मांतरित दलितांचे मन वळवणे, त्यांचा अनुनय करणे यातच शासन व समाजाने आपली शक्ती खर्ची घातली. त्यामुळे या उपेक्षित वर्गात जागृती निर्माण व्हावी, त्याला त्याचे सत्व ओळखता येवून त्याचे हक्क, सोयी सवलती यासाठी त्याने झगडावे, या हेतूने अस्मिता यात्रा काढण्यात येणार आहे.

ही यात्रा राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी जाईल. जीप व इतर वाहनातून निघणाऱ्या या यात्रेदरम्यान गावात जाहीर सभा घेतली जाईल.

यात्रेचा मार्ग असा, नाशिक, मालेगाव, धुळे, पारोळा, एरंडोल, जळगाव, भुसावळ, मलकापूर, खामगाव, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, परभणी, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, बीड, जालना, औरंगाबाद, नगर, नवी मुंबई व १७ नोव्हेंबरला मुंबई. मुंबईत त्याच दिवशी महामेळावा घेण्यात येईल.[२६]''

**दलितांमधील मतभेद खेदजनक : प्रा. मच्छिंद्र सकटे**

प्रा. मच्छिंद्र सकटे हे दलित महासंघाचे अध्यक्ष आणि एक लढाऊ राजकीय नेते होते. त्यांनी भाषणे, लेखन, मोर्चे याद्वारे दलित समाजात जागृती निर्माण केली. अनेक मोर्चे काढून शासन दरबारी दलित समाजाच्या व्यथा मांडल्या. शासनाला त्यांच्या निवेदनाकडे लक्ष द्यावे लागले. दलित चयवळीला काही प्रमाणात यश मिळू लागले हे त्यांच्या महासंघाच्या आलेल्या बातम्यावरून समजते. दलित समाजात जागृती निर्माण झाली.

''फुले–आंबेडकरांचे नाव घेवून आपल्याच माणसांचे पाय ओढण्याचे काम दलित करतात हेच खेदजनक असून दलितांमधील मतभेद मिटवून सन दोन हजार सालापर्यंत महाराष्ट्रातील तमाम दलितांचे ऐक्य दलित महासंघ घडवेल, असा विश्वास दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी व्यक्त केले.

अंगापूर येथील सत्यशोधक अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समितीच्या वतीने 'सत्यशोधक' अण्णाभाऊ साठे विचारवेध पुरस्कार आज प्राचार्य आर. डी. गायकवाड व डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते प्रा. सकटे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा. सकटे बोलत होते.[२७]

या पुरस्कारामुळे आपल्यावरील जबाबदारी वाढली असल्याचे सांगून प्रा. सकटे म्हणाले की, दलित कार्यकर्त्यांनी व मातंग समाजाने दाखविलेल्या विश्वासास आपण तडा जाऊ देणार नाही. अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दलित महासंघाची स्थापना करण्यात आली असून, समाजाला गतीमान करून स्वाभिमानी समाज निर्माण करण्याच्या दलित महासंघाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

महासंघाचे कार्य पुढे नेण्यासाठी प्रत्येक दलित कार्यकर्त्याने वर्षातील फक्त १५ दिवस दलित महासंघासाठी द्यावेत, असे आवाहन करून के. आर. नारायणन यांना राष्ट्रपती करून देशातील शासक वर्गाने एक राजकीय चाल खेळली आहे, असे स्पष्ट करून दलितांनी वेळीच सावध व संघटित होण्याची गरज प्रा. सकटे यांनी प्रतिपादन केले.

महाराष्ट्रातील सध्याची परिस्थिती पाहता महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा आहे, असे वाटत नाही तर महाराष्ट्र पुरोगामी होता असे म्हणावे वाटते असेही ते म्हणाले.

मातंग समाजासोबतच इतर दलित समाजानेही फुले–आंबेडकर, शाहू, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची कृती करणे ही काळाची गरज असल्याचे सांगून प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे दलितांनी आपल्या मनातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा यांना वेळीच पायबंद घातला पाहिजे व वैचारिक प्रबोधन घडवून आणले पाहिजे, असे मत प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य आर. डी. गायकवाड म्हणाले की, प्रा. सकटे यांच्यासारख्या दलित तरुण कार्यकर्त्यांची एक वैचारिक फळी कार्यरत असणे अतिशय महत्त्वाचे आहे. तसेच दलितांनी आपला शत्रू कोण आहे हे ओळखून आपापसातील मतभेद टाळावेत, असे झाल्यानेच समाज परिवर्तन घडेल, असे उद्‌गार प्राचार्य गायकवाड यांनी काढले.

शरद गायकवाड आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की, दलितांच्यासाठी झगडणाऱ्या व परिवर्तन सत्यशोधकी विचारांच्या कार्यकत्याला चहा पुरस्कार आमची समिती देत असते. पुढील वर्षीच्या पुरस्काराचे वितरण येत्या १५ ऑगस्ट रोजी करणार असल्याचे यावेळी गायकवाड म्हणाले.

संजय कांबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर सत्यवान भंडारे यांनी आभार मानले. कार्यक्रमास लालासाहेब खुडे, मारुती साठे, प्रा. पवार, सुकुमार कांबळे, राम कांबळे, समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते, नागरीक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रविंद्र मोरे, गोरख आवळे, सुरेश बोलातजी, मारुती गायवाड, संजय गायकवाड, रमेश गायकवाड यांनी परिश्रम घेतले.[२८]''

**दलितांनी जागृत राहण्याची गरज : सकटे**

सांगली जिल्ह्यात दलित महासंघाचे कार्य प्रभावी होते. दलितांनी जागृत राहण्याची गरज आहे असे विचार संस्थापक प्रा. सकटे यांनी व्यक्त केले.

''दलितांचे ऐक्य व्हावे हे जातीयवादी शक्तींना वाटत नाही म्हणूनच वेगवेगळ्या पातळीवर दलितांमध्ये भेदभाव निर्माण करून जाती-जातीत फूट पाडण्याचा प्रयत्न होत आहे. ते ओळखून दलितांनी जागृत राहणे गरजेचे आहे, असे उद्‌गार दलित महासंघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी इस्लामपूर येथील 'लोकदरबारात' बोलताना काढले. ते लोकदरबाराच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा संघटक मधुकर वायदंडे, सांगली शहर अध्यक्ष संतोष कांबळे हे होते. प्रा. सकटे पुढे म्हणाले, दलित महासंघाच्या वतीने गेल्या वर्षभरात अनेक कामे संघटनेकडून झाली असून, प्रलंबित कामे युध्द पातळीवर सोडवली जातील, असे आश्वासन प्रा. सकटे यांनी दिले.

या लोक दरबारात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. समाजाचे पाणीप्रश्न, बेघर योजना, दारिद्र्य रेषेखालील यादी, स्मशानभूमी, समाजमंदीर, वगैरे विविध प्रश्नांसंदर्भात शासकीय पातळीवर आंदोलन केली जातील, असे विचार अनेक वक्त्यांनी मांडले.

यावेळी स्वागत व प्रास्ताविक जिल्हा संघटक मधुकर वायदंडे यांनी केले. अमृता पांढरबळे, अतुल चव्हाण, संभाजी मस्के, दादासाहेब वायदंडे, संजय गायकवाड, भगवान बल्लाळ, सौ. रंजना गायकवाड, दिपक थोरात यांची यावेळी भाषणे झाली.

यावेळी डॉ. विजय चांदणे, राजेंद्र बल्लाळ, अशोक वायदंडे, नंदू नांगरे वगैरे ५०० हून अधिक कार्यकर्ते उपस्थित होते.[२९]''

**दलितांच्या हक्कासाठी जिल्ह्यात दलित महासंघ गतीमान करणार : प्रा. वायदंडे**

प्रा. मधुकर वायदंडे हे दलित महासंघाचे दुसरे महत्त्वाचे नेते. त्यांनीही दलित चळवळीत आपले आयुष्य वेचले. सांगली जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोर्चे, सभा, निदर्शने आयोजित केली व शासन दरबारी आपल्या समाजाच्या व्यथा मांडल्या. त्यासंबंधी आलेल्या वर्तमानपत्रातील बातम्यांद्वारे त्यांनी केलेले कार्य लक्षात येते.

''दलितांच्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी व दलितांच्या न्याय हक्कासाठी सांगली जिल्ह्यात दलित महासंघ गतीमान व क्रियाशील करणार, असे प्रतिपादन दलित महासंघाचे जिल्हा संघटक प्रा. मधुकर वायदंडे यांनी केले. दलित महासंघाच्या वाळवा तालुका कार्यकारिणीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

आज वाळवा तालुक्यात व सांगली जिल्ह्यात दलितावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत असून काही राजकीय पुढारी, राजकीय स्वार्थापोटी गावागावात दलितावर अन्याय करीत आहेत. पोलीस आरोपींना पाठिशी घालतात हे खपवून घेतले जाणार नाही. दलित महासंघ लवकरच अशा प्रवृत्तींचा बिमोड केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा प्रा. वायदंडे यांनी दिला. यावेळी दलित महासंघाच्या शाखावाढीच्या दृष्टीने प्रयत्न करणे, अन्यायाला वाचा फोडणे, आंदोलन करणे याबाबत विचारविनिमय करण्यात आला. तसेच कॅनडा येथे राज्याचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद सकटे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव झाला. तसेच प्रा. सकटे यांना तालुक्यातून उच्चांकी निधी गोळा करून देण्याचे ठरले.

यामध्ये अशोक वायदंडे, तानाजी मोरे, आनंद लोंढे, दादासाहेब साठे, राजेंद्र चव्हाण, सतिश लोंढे आणि सर्व शाखांचे पदाधिकारी या संघटनेत झोकून देऊन काम करीत आहेत.[३०]''

**आष्टा पोलीस स्टेशनचे फौजदार खंदारे, हवालदार कुंभार यांना त्वरित निलंबित करा : दलित महासंघाची मागणी**

आष्टा हे सांगली इस्लामपूर मार्गातील एक महत्त्वाचे शहर. ब्रिटिश काळात सव्वा लाख आष्ट म्हटले जायचे. सुपीक अव्वल जमीन, पाण्याची मुबलकता, कष्टाळू शेतकरी यामुळे आष्टा सांगली जिल्ह्यातील एक वैभवशाली व समृध्द नगर. पण या नगरात जातीभेद, उच्च–नीच असे जातीय व्यवस्था, गरीब पददलित यांच्यावर नेहमी उच्च वर्गियांकडून अन्याय होत असत. पोलिस ठाणे असून दलितांना न्याय मिळत नसे. म्हणून दलित महासंघाने फौजदार खंदारे, हवालदार कुंभारे यांना त्वरित निलंबित करावे म्हणून पुढील निवेदन दिले.

''दलित महासंघाच्या कार्यकर्त्यावर जाणीवपूर्वक खोट्या केसीस दखल करून नाहक त्रास देणाऱ्या आष्टा पोलीस स्टेशनचे फौजदार खंदारे व पोलीस हवालदार कुंभार यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे अशी आग्रही मागणी दलित महासंघाचे जिल्हा संघटक प्रा. मधुकर वायदंडे, वाळवा तालुका संघटक नंदकुमार नांगरे व तालुका अध्यक्ष राजेंद्र बल्लाळ यांनी केली आहे.

यावेळी अधिक माहिती देताना जिल्हा संघटक प्रा. मधुकर वायदंडे म्हणाले, बागणी, ता. वाळवा येथील शाखा प्रमुख राजेंद्र चव्हाण यांच्यासह १२ लोकांवर आष्टा पोलिसांनी ३९५ या दरोड्याच्या कलमाखाली अटक केली. ४–५–९८ ला भांडण झाले तथापि १२–५–९८ ला त्यांचेवर खोट्या केसीस दाखल केल्या. त्यावेळी फौजदार मुळे यांचेकडे आष्टा पोलीस स्टेशनचा चार्ज होता व कुंभार या हवालदाराने विरुध्द पार्टीस मार्गदर्शन करून केस दाखल केली.[३१]

त्याचप्रमाणे पोखर्णी, ता. वाळवा येथील विठ्ठल वायदंडे या वनरक्षक म्हणून सरकारी सेवेत असणाऱ्या व्यक्तीस रात्रीच्या वेळी गावातील काही गावगुंडांनी मारहाण करून जखमी केले. सदर जखमीच्या पत्नीने ३–६–९८ रोजी आष्टा पोलिसात फिर्याद देण्यास गेल्यावर तेथील पोलिसांनी जातीवाचक शिवीगाळ केली असा उल्लेख टाळून आरोपींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी ता. ९–६–९८ रोजी डी. वाय. एस. पी. इस्लामपूर यांना लेखी निवेदन दिले व नंतर अनुसूचित जाती जमाती कायद्याखाली फिर्याद नोंदवून घेण्यास टाळाटाळ केली म्हणून पोलीस फौजदार व कर्मचारी यांना निलंबित करावे या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी मनोहर बेलवलकर यांना प्रत्यक्ष भेटून दिले. पोलीस मुख्यालयात पो. फौजदार दिलीप कटके यांचेशी चर्चा करून त्यांनाही निवेदन दिले.[३२]

आष्टा पोलीस स्टेशन हद्दीतच असे प्रकार होत असून ते निंदनीय आहेत. दलित महासंघाला खीळ घालण्याचा कुटील डाव फौजदार खंदारे व पोलीस हवलदार कुंभार यांनी स्टाफच्या मदतीने रचला आहे, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.''

**जमावबंदी मोडून मोर्चा, २२ जणांविरुध्द गुन्हा नोंद –**

जमाव बंदीचा आदेश झुगारून दलित महासंघाने आष्ट्यात मोर्चा काढला. म्हणून २२ जणांविरुध्द गुन्हा नोंद केला, त्याची बातमी –

''जमावबंदीचा आदेश असताना दलित महासंघाने शहरात मोर्चा काढल्याबद्दल बावीसजणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा दाखल करण्यात आलेल्यामध्ये जिल्हाध्यक्ष मधुकर वायदंडे, पश्चिम महाराष्ट्राचे संघटक मारुतीराव साठे, रामदास कांबळे, सतिश लोंढे, अशोक वायदंडे, आनंदा चांदणे, गुंजनाबाई मिसाळ, इंदुताई कोरपाळे, हसिना पठाण, चित्रा कांबळे, कमल घस्ते, संगीता कांबळे, सुरेश बतालपी यांच्यासह बावीस जणांवर ३७(१) (३) चा आदेश असताना तसेच संबंधितांना पत्र दिले असतानादेखील मोर्चा काढल्याने सांगली शहर पोलीस स्टेशनचे पो. नि. प्रदिप भोसले यांनी त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.[३३]''

**आष्टा पोलिसांच्या निषेधार्थ इस्लामपुरात दलित महासंघाचा 'पायताण' मोर्चा–**

आष्टा पोलिसांच्या निषेधार्थ इस्लामपुरातही दलित महासंघाने मोर्चा काढून आष्ट्यातील दलितांना पाठिंबा दिला.

''आष्टा पोलिसांच्या अन्यायी कारवाईवाईच्या निषेधार्थ व आष्ट्याचे फौजदार विनायक खंदारे व हवालदार कुंभार यांच्या निलंबनाच्या मागणीसाठी दलित महासंघाच्या वतीने राज्य अध्यक्ष मच्छिंद्र सकटे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयावर पायताण मोर्चा काढण्यात आला. बागणी येथील शिवसेना व दलित महासंघाच्या कार्यकर्त्यात झालेल्या भांडणातून आष्टा पोलिसांनी दलित कार्यकर्त्यावर ३१५ हे दरोड्याचे कलम लावून खोट्या केसीस केल्या.तसेच पोखर्णी येथील विठ्ठल वायदंडे यास गावातील काही लोकांनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली पण आष्टा पोलिसांनी फिर्यादित जातीवाचक शिवीगाळाचा उल्लेख वगळला. या

अन्यायी कारवाईच्या निषेधार्थ फौजदार विनायक खंदारे व हवालदार कुंभार यांच्या निलंबनाच्या मागणीसाठी दलित महासंघाने हा मोर्चा काढला.[३४]''

**दलित महासंघ पोलादी संघटन होण्याची गरज : नायकवडी**

वाळवा तालुक्यातील नागनाथ नायकवड हे थोर स्वातंत्र्यसेनानी, क्रांतीसिं नाना पाटलाचे पत्री सरकारमधील सहकारी होते. नेहमी दलितासंबंधी त्यांची सहानुभूती होती. त्यांनी दलित महासंघास पोलादी संघटना व्हावी, म्हणून आशिर्वाद दिले.

''दलित महासंघ हे असे पोलादी संघटन व्हावे की त्याचा जातीयवादी शक्ती गाडण्याचा धाक तयार झाला पाहिजे. त्याचप्रमाणे स्वसामर्थ्यावर भारताचे राज्यकर्ते होऊ या हिंमतीने मुक्तीच्या दिशेने पुढे गेले पाहिजे, असे उद्गार क्रांतीवीर नाथनाथ नायकवडी यांनी काढले.[३५]''

**दलित महासंघातर्फे आज सांगलीत परिषदेचे आयोजन : कृती कार्यक्रमाची घोषणा शक्य**

दलित महासंघाची कार्यकक्षा दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसते. त्यांना भारत बचाव परिषद सांगलीला आयोजित करण्याचे ठरविले, त्या कार्यक्रमाची नियोजित रूपरेषा पुढीलप्रमाणे–

''दलित महासंघातर्फे उद्या येथे भारत बचाव परिषद होत आहे. या परिषदेत दलितांच्या विविध प्रश्नांबाबत कृती कार्यक्रम आणि निर्णायक भूमिका जाहीर केली जाईल, अशी माहिती दलित महासंघाचे प्रदेश संघटक प्रा. सुकुमार कांबळे यांनी दिली.

उद्या दुपारी एक वाजता येथील भावे नाट्यमंदिरात परिषदेतस प्रारंभ होईल. दै. लोकमतचे कार्यकारी संपादक, दशरथ पारेकर परिषदेचे उद्घाटक आहेत. दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे, आत्माराम चांदणे, व्ही. एन. कपाळे, सुरेश चव्हाण, रामदास कांबळे आदींची मार्गदर्शक भाषणे होतील, असे सांगून ते म्हणाले, परिषदेच्या पूर्वी वाटेगाव येथून येणाऱ्या क्रांतीज्योतीचे आणि माणगाव येथून येणाऱ्या समता

ज्योतीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापाशी स्वागत होईल. त्यानंतर या ज्योती मिरवणुकीने परिषदस्थळी आणण्यात येतील. सांगली, सातारा, कोल्हापूरसह राज्यभरातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते परिषदेस उपस्थित राहतील.[३६]''

**मागासवर्गीय पती–पत्नीस मारहाण –**

मागासवर्गीय पती–पत्नीस सवर्णाकडून मारहाण झाली. गुन्हेगाराला अटक व्हावी म्हणून दलित महासंघाने धरणे आंदोलन सुरू केले.

''येथील मिसळवाडी ऊर्फ विलासराव शिंदे नगरमध्ये राहणाऱ्या एका मागासवर्गीय व त्याच्या पत्नीस जागेच्या कारणावरून मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपावरून आष्टा पोलिसांनी २५ लोकांवर गुन्हे दाखल केले.

या प्रकरणातील मुख्य आरोपीस अटक करावी या मागणीसाठी दलित महासंघाच्या वतीने आज सकाळपासून आष्टा पोलीस स्टेशनजवळ बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.''

**दलित नेते १९ ऑक्टोबरला राष्ट्रपतींना भेटणार**

सांगली जिल्ह्यात व महाराष्ट्रात दलितावरील अन्याय, अत्याचार वाढत चालले, त्याचे निवेदन राष्ट्रपतींना भेटून देण्याचे दलित नेत्यांनी ठरविले.

''नोकरीतील बढती प्रकरणी दिल्ली सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासंदर्भात देशातील दलित नेते येत्या १९ ऑक्टोबरला राष्ट्रपतींची भेट घेवून चर्चा करणार असल्याचे दलित महासंघाचे मच्छिंद्र सकटे यांनी सांगितले.

या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात एक देशव्यापी आंदोलन उभे करण्याचा विचार सुरू केला असून त्याचाच एक भाग म्हणून येत्या ४ ऑक्टोबरपासून सातारा, सांगली, कोल्हापूर तसेच

मराठवाड्यातही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू करण्याचा इशारा दलित महासंघाचे मच्छिंद्र सकटे यांनी दिल्याचे स्पष्ट केले.[३७]''

**निवेदनातील अण्णाभाऊ साठेंचे कार्यालय पूर्ववत उभारण्याची मागणी**

निंबवडे येथील साहित्यकार अण्णाभाऊ साठे कार्यालयाची नासधूस केली, त्याची माहिती निवेदनात देण्याचे ठरले.

''तालुक्यातील निंबवडे येथील साहित्यकार अण्णाभाऊ साठे कार्यालयाची अतिक्रमण समजून ग्रामपंचायतीने मोडतोड करून राजकीय स्टंट घेण्याचा प्रकार घडला असून मोडतोड झालेल्या जागेवरच कार्यालय उभारले जावे, अशीमागणी दलित महासंघाने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामपंचायतीने ताब्यात घेतलेले या कार्यालयाचे खोके पुन्हा समितीकडे १४ ऑक्टोबरपूर्वी द्यावे, अन्यथा जिल्हाव्यापी आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात दिला आहे.''

**दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष वायदंडे यांची पदावरून मुक्ता करण्याची मागणी**

मतभेदामुळे वायदंडे यांना जिल्हाध्यक्ष पदावरून मुक्त करावे म्हणून त्यांच्या विरोधकांनी पत्रक काढले.

''दलित महासंघाचे मधुकर वायदंड मागणी दलित महासंघाचे उपाध्यक्ष राजेंद्र बल्लाळ यांच्यासह वाळवा, शिराळा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी एका निवेदनाद्वारे केली.

या निवेदनात वायदंडे, दलित महासंघाच्या कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची निंदाही करतात असे म्हटले आहे.

या पत्रकावर शिराळा तालुका दलित महासंघाचे बापू साठे (ट्रिप्सी) कुरळप विभाग प्रमुख संजय गायकवाड, कुरळप दलित महासंघाचे अध्यक्ष शशिकांत सखाराम वायदंडे, मिरज तालुका संपर्क प्रमुख सुभाष

वायदंडे, दलित महासंघ कुरळप शाखा संघटक आनंदा शामराव वायदंडे या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.[३८]''

**साखराळे वसाहतीतील झोपड्या काढणाऱ्यांना पेटवून देऊ**

साखराळे राजारामापू पाटील यांचा साखर कारखना इस्लामपूरला लागून असलेले गाव पण तेथे दलितांच्या झोपड्या पेटविल्या. त्याच्या विरोधात मोर्चा आंदोलनाची बातमी–

''सत्तास्थानी कुणीही असले तरी दलितांना संघर्ष करावाच लागणार आहे. यापुढे साखराळे वसाहतीतील झोपडी काढण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यास पेटवून देऊ, असा इशारा दलित महासंघाचे नेते प्रा. सुकुमार कांबळे यांनी केला.

शासनाच्या पडजागेत राहणाऱ्या लोकांना प्लॉट पाडून देवून घरे बांधून द्यावीत, या मागणीसाठी आज दलित महासंघाच्या वतीने तहसील कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चात ते बोलत होते. या मोर्चास झाडाझडती आंदोलन असे नाव देण्यात आले होते.

इस्लामपूर बसस्थानकापासून मोर्चास प्रारंभ झाला. स्टँडरोड, मोमीन मोहल्ला, गांधी चौक, यल्लमा चौक मार्गे हा मोर्चा तहसील कार्यालयावर गेला. त्या ठिकाणी मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. या मोर्चात पुरुष व महिलासह बैलगाडी, शेळ्या, मेंढ्या, कुत्री, मांजरे, कोंबड्या, गाढवे आदी प्राणी व पक्षांना सहभागी करून घेतले होते.

पडजागेत प्लॉट पाडून द्यावेत, साखराळे येथील सि. स. नं. ४६० मध्ये राहणाऱ्या सर्व जातीधर्माच्या लोकांना प्लॉट पाडून घरे बांधून द्यावीत, भूमिहीन व बेघर लोकांना विनाविलंब सुविधा पुरवाव्यात आदी प्रमुख मागण्यांचे निवेदन तहसीलदार संजय पाटील यांना देण्यात आले. त्यावेळी बोलताना तहसीलदार पाटील म्हणाले, पुनर्वसित लोकांसाठी दिलेल्या जमिनीतील उर्वरित जमीन पात्र लोकांना दिल्या जातील. यासाठी

वरिष्ठांशी बोलून निर्णय घेऊ, मोर्चाचे नेतृत्व राज्य अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे, जिल्हाध्यक्ष प्रा. मधुकर वायदंडे, नंदकुमार नांगरे, जालिंदर कांबळे व अन्य पदधिकाऱ्यांनी केले.[३९]''

**दलित महासंघाचे धरणे आंदोलन –**

दलित महासंघाने जिल्हाधिकारी कार्यालयात धरणे आंदोलने केली व सिध्देवाडी, ता. मिरज येथील दलितावरील अन्यायाला वाचा फोडली.

''दलित महासंघाच्या वतीने विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येवून जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवासी उपजिल्हाधिकारी सुनील पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सिध्देवाडी ता. मिरज येथे झालेल्या मारहाण प्रकरणातून दलित महासंघाच्या उपाध्यक्षा सौ. इंदुताई कोरपाळे यांचे नाव आरोपीच्या यादीतून वगळावे. यापूर्वी दलित महासंघाच्या कार्यकर्त्यांना दत्तू खोत याने मारहाण करून त्यानेच पोलिसात फिर्याद दाखल केली होती.

सदरच्या धरणे आंदोलनात सौ. इंदुताई कोरपाळे, संतोष कांबळे, सुरेश जगदाळे, सतिश लोंढे, सतिश पोटे आदींच्यासह अन्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.[४०]''

**दलित महासंघाचा बेमुदत उपोषणाचा इशारा**

वाळवा तालुका गायरान व पडीक जमीन भूमिहीन दलितांना प्लॉट पाडून द्यावा म्हणून दलित महासंघाने मोर्चा व निदर्शने केली.

''वाळवा तालुक्यातील गायरान व पडिक जागेत बेघर भूमिहीन लोकांना प्लॉट देवून त्यांना शासनाने किमान नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, या मागणीसाठी दलित महासंघाच्या वतीने वेळोवेळी मोर्चे काढून आंदोलन करूनही यावर काहीच कारवाई न झाल्याने दलित महासंघाने इस्लामपूर प्रांत

कार्यालयासमोर दि. ४ पासून बेमुदत उपोषण करण्याचा व दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब महापरिनिर्वाण दिनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत प्रा. मधुकर वायदंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.[४१]''

**शिगावामधील दलित समाजाची घरे काढल्याबद्दल कारवाई करा**

शिगाव, ता. वाळवा येथील दलित समाजाची घरे काढली, त्याच्या निषेधार्थ महासंघाने आंदोलन केले.

''वाळवे तालुक्यातील शिगाव येथील दलित समाजातील लोकांची घरे अतिक्रमण म्हणून काढल्याबद्दल इस्लामपूरच्या तहसीलदारावर कारवाई करण्याची मागणी दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांनी केली आहे.

श्री. कांबळे यांनी म्हटले आहे की, शिगाव हद्दीत दत्तात्रय विठू गायकवाड, जनार्दन रघुनाथ गायकवाड, नागनाथ तुकाराम गायकवाड, उत्तम सखाराम गायकवाड यांची कुटुंबे अनेक वर्षापासून राहतात. दोन डिसेंबरला तहसीलदार संजय पाटील यांनी दलित कुटुंबातील लोकांना बोलावून तुम्ही जिथे राहता, त्या जागा तुमच्या असल्याचा कागदोपत्री पुरावा देण्याची मागणी केली. संबंधित कुटुंबांनी ग्रामपंचायतीने लेखी व तोंडी मागणी करूनही नोंद केली नसल्याचे सांगितले. मात्र तहसीलदारांनी अतिक्रमण समजून घरे काढण्याचा आदेश दिला. दक्षिण भाग विकास सोसायटीचे अध्यक्ष विलास हंबीरराव पाटील यांनी १०० ते १५० जणांच्या मदतीने दलितांची घर पाडली व साहित्य पेटवून दिले. दलितांची १७ माणसे व २१ जनावरे त्यामुळे बेघर झाली आहेत.[४२]''

**मागण्या मान्य झाल्याने दलित महासंघाचे घेराव आंदोलन रद्द**

दलित महासंघाच्या २६ कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेतल्याने आंदोलन रद्द केले.

''राज्य शासनाने दलित महासंघाच्या २६ कार्यकर्त्यांवर असलेले खटले काढून घेण्याचा निर्णय घेतल्याने दलित महासंघाच्या वतीने आज जिल्हाधिकाऱ्यांना घेराव घालण्याचे आंदोलन रद्द करून धरणे आंदोलनही थांबविण्यात आले आहे. खटले काढून घेतल्याची माहिती महासंघाचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिली.[४३]''

**दलित साहित्य संमेलनासाठी जमविलेल्या निधीचा प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी हिशोब द्यावा : भिंगारदेवे**

श्री. भिंगारदेवे हे एक दलित महासंघातील नेते होते. काही कारणाने मच्छिंद्र सकटे यांच्याशी मतभेद झाल्याने त्यांनी दलित साहित्य संमेलन प्रसंगी गोळा केलेल्या निधीचा हिशोब मागितला. त्यावरून नेते संघटित होत नसून त्यांच्यात मतभेद होत असून एकंदर सामाजिक कार्याला अडथळा निर्माण होत असे.

''१९९३ साली येथे राज्यव्यापी दलित साहित्य संमेलन भरवण्यासाठी लागणारा निधी अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे व सहकाऱ्यांनी गोळा केला होता. पण येथील दलित बचाव कृती समितीने रास्त व न्याय मागणीसाठी या संमेलनास विरोध केला होता आणि त्यास यश आले. त्याबरोबर जमा केलेल्या पैशाचा हिशोब मागितला होता. आजअखेर तो दिला गेला नाही, असे तलाश भिंगारदेवे माजी सचिव दलित बचाव कृती समिती विटा याने निवेदनात म्हटले आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, १९९३ साली विटा येथे महाराष्ट्र साहित्य संसद बोगस संस्था सध्याचे दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी स्थापन करून राज्यव्यापी दलित साहित्य संमेलन भरवण्याची योजना आखली. त्यामध्ये दलित समाजातील होतकरूंना हाताशी धरून महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात पैसा गोळा केला गेला. यास कृती समितीने समाजासाठी वैचारिक विरोध केला होता आणि हे समितीला समजताच त्यांनी संमेलन गुंडाळले. वारंवार मागणी करूनही पैशाचा हिशोब मिळत नसल्याने दलित बचाव समितीने ७-१०-९३ रोजी जमा असणारी संपूर्ण रक्कम लातूर भूकंपग्रस्तासाठी देण्यात यावी अशी पत्राने मागणी केली होती. त्याकडेही महाराष्ट्र साहित्य संसदेने दुर्लक्ष केले. या संमेलनाचे

कार्याध्यक्ष विद्यमान आमदार अनिल बाबर होते. सध्या असणारा निधी आ. बाबर यांनी संमेलनाध्यक्ष व सदस्य यांच्याकडून जिल्हाधिकारी सांगली यांच्यामार्फत मुख्यमंत्री निधीसाठी पाठवावा.[४४]''

**अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ सांगलीत दलित महासंघाचा मोर्चा**

शासकीय अधिकारी दलितांच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, दिरंगाई करतात म्हणून त्यांच्या निषेधार्थ दलित महासंघाने मोर्चा काढला.

''विविध मागण्यांसंदर्भात शासकीय अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्याच्या निषेधार्थ आज दलित महासंघातर्फे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढला. पंधरा दिवसात मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आंदोलन तीव्र केले जाईल, असा इशारा श्री. नायकवडी यांनी दिला. त्यांच्या आवाहनानुसार महासंघाने गेले पाच दिवस सुरू असलेले बेमुदत धरणे आंदोलन सायंकाळी मागे घेतले.[४५]

आष्टा येथील सुरेश गवळी यांच्या खून प्रकरणाची सी. आय. डी. मार्फत चौकशी व्हावी, या मागणीसाठी दलित महासंघातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले.''

**दलित महासंघाचे १३ रोजी मंत्रालयासमोर धरणे –**

दलित महासंघाने मंत्रालयासमोरसुध्दा धरणे धरून आपल्यावरील अन्याय दूर करावेत म्हणून बातमी–

''घटना बदलाचा कुटील डाव केंद्र सरकारचा असून मनुवादी व्यवस्था आणण्याच्या प्रयत्नाचा निषेध करण्यासाठी दलित महासंघातर्फे ता. १३ एप्रिल रोजी मुंबई मंत्रालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असून, सांगली, सातारा, कोल्हापूर, जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते या धरणे आंदोलनात सहभागी होणार आहेत.[४६]''

**दलित नेत्यांना दलितांवरील अन्यायचा विसर चिंताजनक**

काही ठिकाणी दलित नेत्यावर आरोप करू लागले. कारण अन्यायाची दाद हवी तशी दलित नेते घेत नाहीत. उलट दुर्लक्ष करतात. म्हणून काही विरोधक होते हे दिसते.

''दलितांवर अन्याय होत असताना दलित नेत्यांना मात्र त्याचा विसर पडावा, ही चिंतेची बाब आहे, अशी खंत दलित महासंघाचे राज्याचे अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांनी ढवळेश्वर येथे बोलताना व्यक्त केले. दलित महासंघाच्या ढवळेश्वर शाखेचे उद्घाटन नुकतेच झाले, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

स्वार्थासाठी दलित महासंघाला राजकारणाच्या दावणीला बांधणाऱ्या प्रवृत्तींना ठेचले जाईल

समाजात समाजकार्याच्या नावाखाली दलाली करणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांचा सुळसुळाट झाला असून, समाजाला पक्षीय राजकारणाच्या दावणीला बांधून स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तींना ठेचून काढू, असा खणखणीत इशारा दलित महासंघाचे राज्य संघटक प्रा. मधुकर वायदंडे यांनी दिला. ते दलित महासंघाच्या इस्लामपूर (ता. वाळवा) या शहर शाखा उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्य अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे होते.

प्रा. सुकुमार कांबळे म्हणाले, केंद्रातले सरकार घटना बदलून मनुवादी व्यवस्था आणू पहात आहे. त्यांचा हा कुटील डाव दलित महासंघ उधळून लावेल.[४७]''

**दलित महासंघातर्फे पलूसमध्ये विविध मागण्यांसाठी मोर्चा –**

दलित महासंघामार्फत पलूस या तालुक्याच्या ठिकाणी दलितांच्या विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला, त्याचा हा वृतांत –

''विविध मागण्यांसाठी आज दलित महासंघाच्या तालुका शाखेतर्फे पलूस तहसील कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. पंधरा दिवसात मागण्या मान्य न झाल्यास काम बंद पाडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

आज सकाळी अकरा वाजता पलूस येथील चैतन्य नगरमधून मोर्चा निघाला. मुलकी पडीक व गायरान जमिनी दलितांना द्याव्यात, दारिद्र्यरेषा आदींचे फेरसर्व्हेक्षण करावे, प्लॉट व घरे पलूसच्या मातंग वसाहतीमध्ये सुरळीत पिण्याचा पाण्याचा पुरवठा, दुधोंडी येथे शिधापत्रिकांचे त्वरित वाटप व्हावे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. तहसीलदार ए. डी. चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.[४८]''

**दलित महासंघाच्या कार्यकर्त्याला पोलिसांची मारहाण : कारवाईची मागणी**

काही ठिकाणी पोलिसाकडून दलित महासंघाच्या कार्यकर्त्याला पोलिसांनी मारहाण केली. त्यांच्यावर कारवाई करावी म्हणून मोर्चा.

''सावळी, ता. मिरज येथे शुक्रवारी (ता. २८) डॉ. आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीत कुपवाड पोलिसांनी मारहाण केल्याची तक्रार अशोक मोरे या दलित महासंघाच्या कार्यकर्त्याने केली आहे. श्री. मोरे व त्याचे सहकारी दादासाहेब मोरे, भूपाल मोरे, शशिकांत मोरे या कार्यकर्त्यांना पोलिसांनी दंगल घडविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे.

श्री. मोरे यांना मारहाण करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षक बबन जाधव यांच्यावर कारवाई न झाल्यास सात मेस तहसीलदार कार्यालयावर मोर्चा नेण्याचा इशारा दलित महासंघाने दिला आहे.

कुपवाड पोलीस ठाण्यातून या संदर्भात देण्यात आलेला खुलासा असा– श्री. मोरे मिरवणुकीत हुल्लडबाजी व बिभत्स नृत्य करीत होते. मिरवणूक अनावश्यक रेंगाळली होती. यासंदर्भात विचारणा करणाऱ्या पोलिसाना श्री. मोरे व सहकाऱ्यांनी अपमानास्पद भाषा वापरली. समाजहित व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी कारवाई केली. श्री. मोरे याची पार्श्वभूमी गुन्हेगारीची आहे.[४९]''

**माळवाडी दलित महासंघाचा उपोषणाचा इशारा**

माळवाडी येथे गायरान जमिनीतील झोपड्या बांधून राहणाऱ्या दलितावर अन्याय झाला, त्याचा वृत्तांत–

''माळवाडीतील गायरान जमिनीत झोपडपट्ट्या घालून गेली ४० वर्षे वास्तव्य करणाऱ्या लोकांना रितसर प्लॉट पाडून देण्याच्या प्रश्नांकडे संबंधित शासकीय अधिकारी मुद्दामपणे दुर्लक्ष करीत आहेत. या प्रश्नाकडे शासनाने त्वरित लक्ष द्यावे, अन्यथा ३० तारखेपासून पलूस तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा दलित महासंघाच्या वतीने संदिप काटे यांनी दिला.[५०]''

**कोल्हापुरातील आरक्षण बचाव परिषदेस उपस्थित रहावे : अशोक वायदंडे**

इ. स. १९०२ ला कोलहापूरच्या राजर्षि शाहू महाराजांनी मागासलेल्या समाजासाठी ५० टक्के राखीव जागा करण्याचा वटहुकूम काढला होता. त्याच्या स्मरणात कोल्हापुरात आरक्षण बचाव परिषद दलित महासंघाने आयोजित केली होती. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, त्याची बातमी –

''कोल्हापूर येथे ९ डिसेंबर रोजी होणाऱ्या आरक्ष. बचाव परिषदेस इस्लामपूर, आष्टा, बागणी, कामेरी परिसरातील कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी करावी, असे आवाहन दलित महासंघाचे वाळवा तालुका संघटक अशोक वायदंडे यांनी ठिकठिकाणच्या दलित महासंघाच्या शाखा बैठकीत केले आहे.

सदरची परिषद दलित महासंघाचे राजाध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून परिषदेस समाज कल्याणमंत्री जयवंतराव आवळे, नागनाथअण्णा नायकवडी, माजी न्यायमूर्ती कोळसे पाटील व आर. पी. आयचे नेते खासदार प्रकाश आंबेडकर, भारत पाटणकर, बाबुराव गुरव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

मागासवर्गीयांना आरक्षण मिळालेच पाहिजे यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आवाजी मतांनी ठराव मंजूर करण्यात येणार आहे.[५१]''

**अण्णाभाऊ साठे स्मारक संदर्भात दलित महासंघाचे धरणे आंदोलन अखेर मागे –**

अण्णाभाऊ साठे स्मारकाचे काही काम अपुरे होते. महाराष्ट्र शासन पाहिजे तसे लक्ष देत नव्हते. शासकीय अधिकारी उदासिन होते. बऱ्याच आंदोलनानंतर स्मारकासाठी योग्य ते आश्वासन शासनामार्फत लेखी मिळाले व शेवटी महासंघाने धरणे आंदोलन मागे घेण्याचे ठरविले व ते मागे घेतले.

''येथील आण्णाभाऊ साठे स्मारक प्रश्नी दलित महासंघाच्या ज्या कार्यकर्त्यांवर गंभीर स्वरूपाचे खटले नाहीत, अशांचे खटले मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याने गेले तीन दिवस येथील जिल्हाधिकारी कचेरीसमोर सुरू असलेले धरणे आंदोलन आज दुपारी मागे घेणेत आले.

दरम्यान अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक दलित महासंघाच्या ताब्यात मिळावे, यासाठी शासन दरबारी प्रयत्न सुरू आहेत, असे प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी सांगितले.[५२]''

जिल्हा परिषद सांगलीच्या वार्षिक अहवालावरून मागासवर्गीयांना ज्या आर्थिक सवलती मिळाल्या त्याचे काही सविस्तर तक्ते पुढीलप्रमाणे– यावरून परीक्षा फी, शिक्षण फी, दलित मुला–मुलींना किती मिळाले हे दिसून येते. शासकीय पातळीवरसुध्दा दलित चळवळीमुळे कशा सवलती मिळत गेल्या, याची माहिती पुढील तक्त्यावरून दिसून येते.

समाजकल्याण विभागामार्फत दिलेल्या सोयी सुविधा

तक्ता नं. १, समाजकल्याण विभाग - अनुसूचित क्षेत्र -शिक्षण

| योजनेचे नांव | राज्य सरकारकडून मिळालेली तरतूद | | | चालू वर्षात झालेला खर्च | फरकाबाबत कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | सहेतूक | योजना | केंद्र सरकारद्वारा पुरस्कृत | | |
| राज्य सरकारने कलम १०० अन्वये जिल्हा परिषदेकडे सोपविलेल्या योजना<br>अ) शिक्षण<br>१) शिष्यवृत्त्या, शिक्षण फी व परीक्षा फी खालील जातींचे विद्यार्थ्यांना | रुपये | रुपये | रुपये | रुपये | |
| अ) अनुसूचित जाती | १४००० | १५००० | -- | १४०८९ | जादा झालेला खर्च रु. ११८१० टाळा येण्यासारखा असलेने खालीलप्रमाणे वर्ग करून रकमा घेतल्या<br>१) सहेतुक - ८९४६<br>अ) शिक्षण (१) (क) पहावा.<br>२) ''अनुसूचित जातीचे मुलांसाठी बालेवाडी योजनेतून वर्ग करून घेतले. |
| ब) अनुसूति (आदिवासी) जमाती | ७५० | १००० | -- | १०४०-२५ | योजनांमध्ये रु. ६३० अनुसूचित जातीचे विद्यार्थी वसतिगृहात अनुदान योजनेस वर्ग केले. |
| क) इतर मागासलेल्या जमाती. | १०००० | १०००० | -- | ५३७७-७५ | १) सहेतुकमध्ये रु. ८९४६ मागणी नसलेने शिल्लक म्हणून अनु. जातीचे विद्यार्थ्यांना शिक्षण फी परीक्षा फी देणे योजनेस वर्ग केले.<br>२) योजनेमध्ये रु. ५६७६ मागणी नसलेने शिल्लक म्हणून इतर मागासलेल्या जातीचे विद्यार्थ्यांचे मिश्र वसतिगृहांना अनु.देणे या योजनेस वर्ग केले |

जिल्हा परिषद सांगली वार्षिक अहवाल सन १९८५-८६

| योजनेचे नांव | राज्य सरकारकडून मिळालेली तरतूद | | | चालू वर्षात झालेला खर्च | फरकाबाबत कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | सहेतूक | योजना | केंद्र सरकारद्वारा पुरस्कृत | | |
| ड) विमुक्त जाती व भटक्या जमाती | ५००० | -- | -- | ७८४२-५४ | जादा खर्च रु. २८४३ नियमाप्रमाणे इतर योजनेतून वर्ग करून घेतले जसे - रु. २००० (ब आर्थिक (३) पहावा.) |
| इ) विमुक्त जाती | -- | -- | १००० | ७९५५-०० | रु. १००० (क घरबांधणी ब इतर) शिल्लक रु. १०४५ नियमाप्रमाणे इतर योजनेस वर्ग केले. |
| खालील जातींचे वसतिगृहास अनुदान अ) अनुसूचित जातीचे | १२०२०० | ६०००० | -- | २९४६६७-४८ | १) सहेतुक रु. ७८२३ मध्ये सदरची (१) (अ) शिक्षण ब) पहावा? अ) रु. ४९५ २) योजना - रु. ६६३४ मध्ये खालीलप्रमाणे इतर योजनांतून वर्ग करून घेतले. अ) रु. ६३० (शिक्षण-१ (ब) पहा.) |
| ब) इतर मागासलेल्या जाती | -- | १९००० | -- | ४२९२४-०० | २३९२४ जादा खर्च, कारण मागणी जास्त सबब खालीलप्रमाणे वर्ग करून घेतल्या १) १ रु. १६५०० (घरबांधणी व इतरमध्ये नं. २१ पहा) २) २ रु. ५६७६ (अ शिक्षण - १ (क)(२) पहा.) |
| क) विमुक्त जाती | २००० | -- | -- | ५०४६-७० | सहेतुक रु. १८३९ जादा खर्च |
| खालील जातीचे मिश्र वसतिगृहांना अनुदान अ) अनुसूचित जाती - | १५००० | ११००० | -- | २८६२८-९१ | सहेतुक रु. १८३९ जादा खर्च योजना रु. ७९० जादा खर्च |
| अनुसूचित जातींचे संस्कार केंद्रास अनुदान | ३४८० | २९७० | -- | २९०५-११ | सेहतुक शिल्लक रु. २०५८ ''अनुसूचित जातींचे वसतिगृहात अनुदान या योजनेस वर्ग केले योजना शिल्लक रु. १४७८ सदर प्रमाणे वर्ग केले. |

| योजनेचे नांव | राज्य सरकारकडून मिळालेली तरतूद | | | चालू वर्षात झालेला खर्च | फरकाबाबत कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | सहेतूक | योजना | केंद्र सरकारद्वारा पुरस्कृत | | |
| खालील जातीचे बालवाडींना अनुदान | | | | | |
| १) अनुसूचित जाती | २००० | ४८०० | -- | ३०१२-२५ | सहेतुक शिल्लक रुपये ४९५ ''अनुसूचित जातीचे वसतिगृहास अनुदान' योजनेस वर्ग केले. योजना शिल्लक रु. ३२९४ ''अनुसूचित जातीचे विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी देणे या योजनेस वर्ग केले. |
| ब) भटक्या जमाती | -- | २००० | -- | ३३७४-५० | योजना ३७४.५० जादा खर्च नियमाप्रमाणे इतर योजनेतून वर्ग करून केला. |
| क) विमुक्त जाती | -- | -- | २२४० | २३९२-८० | जादा खर्च रु. १५३ जादा खच नियमाप्रमाणे इतर योजनेतून वर्ग करून केला. |
| प्राथमिक शाळेतील गरीब विमुक्त जातीचे मुलांना कपडे वाटणे. | ५०० | -- | -- | ५००-०० | -- |
| अनुसूचित जातीचे वसतिगृहास इमारत अनुदान | -- | ३५७५०-०० | -- | ३६४९७-०० | जमाखर्च ७४० नियमाप्रमाणे वर्ग केलेल्या रकमेतून |
| ब) आर्थिक | | | | | |
| विमुक्त जातींना नांगणी करणारे बैल पुरविणेस मदत | १००० | -- | -- | १०००-०० | -- |
| विमुक्त जातींना बी-बियाणे पुरविणेस मदत | २५० | -- | -- | २५०-०० | -- |
| अंडर डेव्हलपमेंट एरियात विमुक्त जातींना नांगरणी करणारे बैल पुरविणेस मदत. | २००० | -- | -- | -- | सदरची योजना या जिल्ह्यास लागू नसलेने मे. संचालक समाजकल्याण यांचे सूचनेनुसार विमुक्त जातीचे मुलांना |

| योजनेचे नांव | राज्य सरकारकडून मिळालेली तरतूद | | | चालू वर्षात झालेला खर्च | फरकाबाबत कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | सहेतूक | योजना | केंद्र सरकारद्वारा पुरस्कृत | | |
| | | | | | फी, शिष्यवृत्ती वगैरे देणस या योजनेस वर्ग केली. |
| सुधारलेल्या शेतीची औजारे घेणेस कर्ज, मदत खालील जातींना | | | | | |
| अ) अनुसूचित जाती | | मदत २५०० | -- | ११८१-०० | १३१९-०० शिल्लक मागणी |
| | | कर्ज ७५०० | -- | ३५४३-०० | ३९५७-०० नाही. सबब ''अनुसूचित जातींचे लोकांना लघुउद्योग धंद्याठी मदत कर्ज'' योजनेस नियमाप्रमाणे वर्ग केले. |
| ब) इतर मागासलेल्या जाती. | -- | मदत ३१२५ | -- | ४००-०० | २७२५-०० शिल्लक मागणी |
| | -- | कर्ज ९३७५ | -- | १२००-०० | ८१७५-०० नाही. सबब 'इतर मागासलेल्या लोकांना लघु उद्योग धंद्यासाठी कर्ज, मदत' या योजनेस नियमाप्रमाणे वर्ग केले. |
| क) विमुक्त जाती | -- | | मदत १००० | ४३९-०० | ५६१-०० शिल्लक मागणी |
| | | | कर्ज १००० | ८८२-०० | ११८-०० नाही व मदत कर्जाचे प्रमाणात १, ३:२, ३ नियमाप्रमाणे न आलेने मदत रु. ५६१ जास्त शिल्लक सबब- 'विमुक्त जातींना दुध-दुभती जनावरे खरेदी करणेस मदत, कर्ज' योजनेकडे नियमाप्रमाणे वर्ग केले जसे - मदत - ११८-००<br>कर्ज - ११८-०० |
| ड) कोयना पुनर्वसाहत लोकांना लघुद्योग | -- | मदत १२५ | -- | १२५-०० | -- |
| धंद्यासाठी खालील जातींना मदत कर्ज- | -- | कर्जे ३७५ | -- | ३७५-०० | -- |

| योजनेचे नांव | राज्य सरकारकडून मिळालेली तरतूद | | | चालू वर्षात झालेला खर्च | फरकाबाबत कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | सहेतूक | योजना | केंद्र सरकारद्वारा पुरस्कृत | | |
| अ) अनुसूचित जाती | -- | मदत ४००० | -- | ५०४७-२५ | १०४७ जादा खर्च |
| | -- | कर्जे १२००० | -- | १५९५७-०० | ३९५७ मागणी मदत |
| | | | | | सदरची रक्कम नियमाने दुसऱ्या योजतून वर्ग केली |
| | | | | | ब) आर्थिक ४) अ पहा) |
| ब) इतर मागासलेल्या जाती | -- | मदत १९५० | -- | ४३०९-०० | २३५९ जादा खर्च |
| | -- | कर्ज ५८५० | -- | १४०२५-०० | ५१७५ मागणी जास्त केलेल्या रकमेतून |
| | | | | | ब) आर्थिक ४) ब पहा) |
| क) विमुक्त जाती | -- | -- | मदत १००० | ९६१.५० | |
| | -- | -- | कर्ज ३००० | ३००३-५० | |
| ड) कोयना पुनर्वसात लोकांना दुध-दुभती | -- | मदत ७५० | -- | ७५०-०० | |
| जनावरे खरेदी करणेस खालील लोकांना | -- | कर्ज १२५० | -- | २२५०-०० | |
| कर्ज व मदत. | | | | | |
| अ) अनुसूचित जाती | -- | मदत ३००० | -- | ३०००-०० | |
| | -- | कर्ज ३००० | -- | ३०००-०० | |
| ब) इतर मागासलेल्या जाती | -- | मदत २७०० | -- | २७००-०० | |
| | | कर्ज २७०० | -- | २७००-०० | |
| क) विमुक्त जाती | -- | -- | मदत ८०० | ८५७-५० | ८५७-५० - जादा खर्च |
| | -- | -- | कर्ज ८०० | ८५७-५० | ५७-५० मागणी जास्त वर्ग केलेल्या रकमेतून |
| | | | | | ब) आर्थिक ४) क. पहा) |
| ड) कोयना पुनर्वसाहत लोकांना | -- | मदत ३५०० | -- | ३५०० | |
| | -- | कर्ज ३५०० | -- | ३५०० | |

## समारोप –

यावरून सांगली जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या शाखा, दलित पँथरचा गट, दलित महासंघ यांनी पहिल्यापासून मागासलेल्या लोकांच्यासाठी आंदोलन, मोर्चा, धरणे काढून दलित समाजाला काही अंशी का होईना सन्मान मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेल्या वरील बातमीपत्रावरून निश्चितपणे दिसून येते. १९६० ते २००० सालातील दलित चळवळीत नेत्यांमध्ये कसे मतभेद निर्माण झाले व शाहीर आण्णाभाऊ साठे यांची स्मारक सांगली जिल्ह्यात कशी स्थापन झाली, ह्याचाही वृत्तांत आपणास पहावयास मिळतो व नवीन पिढील ह्या चळवळी, स्मारके नेहमी मार्गदर्शन ठरतील, अशी आशा वाटते.

प्रकरण ४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्यामुळे दलित संघटनांचे कार्य जोमाने सुरू झाले. या दृष्टीने रिपब्लिकन पक्षाची प्रारंभीची कामगिरी, स्थापना व रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाज, नेते व युवक, पुढारी यांचे केलेले संघटन महत्त्वपूर्ण ठरते. प्रामुख्याने सांगली जिल्ह्यामध्ये नितीन गोंधळे, नितीन कांबळे, महावीर कांबळे, वंदना कागले, विवेक कांबळे या नेत्यांनी सांगली जिल्ह्यामध्ये अस्पृश्य बांधवांमध्ये संघटनात्मक कार्य केले. शरद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली १२ बलुतेदारांची बहुजन चळवळ निर्माण झाली. या चळवळीने १२ बलुतेदारांना राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेतले.

या प्रकरणामध्ये संशोधकाने सांगली जिल्ह्यातील चळवळीबरोबर राजा ढाले, नामदेव ढसाळ यांची दलित पँथर, प्रकाश आंबेडकर भारिप बहुजन पक्ष, रिपब्लिकन आठवले गट, गौतमपुत्र कांबळे यांचा मास मुव्हमेंट अशा संघटना निर्माण झाल्या. वेगवेगळ्या दलितांविरोधी व अन्यायविरोधात संघटित लढा देऊ लागल्या. दलित महासंघाच्या वतीने प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी प्रबोधनात्मक काम केले. आण्णाभाऊ साठेंच्या साहित्यातून समाज परिवर्तनाचे काम थोर विचाराने जग बदलते, हा मधुकर वायदंडेंचा विचार आणि दलितांच्या हक्कासाठी दलित महासंघाला गतीशील व क्रियाशील बनविण्याचे काम मच्छिंद्र सकटे, प्रा. वायदंडे करू लागले. दलितावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम कार्यकर्ते, युवक, वर्तमानपत्रे व नेते करू लागले. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाच्या विचाराला द्यावे लागेल.

**प्रकरण संदर्भ –**


१) दै. सत्यवादी, २० एप्रिल १९६०, अंक २७४, पान ३

२) दै. सत्यवादी, १० मे १९६०, अंक २८९, पान ३

३) दै. सत्यवादी, २८ फेब्रुवारी १९६१, अंक १०२, पान ३

४) दै. सत्यवादी, १० ऑगस्ट १९६१, अंक ६१, पान ३

५) दै. सत्यवादी, २० सप्टेंबर १९६१, अंक ९५, पान ३

६) दै. सत्यवादी, ऑगस्ट १९६८, अंक ६५, पान १

७) दै. सत्यवादी, १८ फेब्रु. १९७१, अंक २६० पान ४

८) दै. सत्यवादी, ८ मे १९७४, अंक ३३१, पान २

९) दै. तरुण भारत, २५ ऑगस्ट १९९९

१०) दै. महासत्ता, दि. १४–१०–२०००

११) दै. सत्यवादी, दि. १५–६–१९९६

१२) दै. पुढारी, दि. १७–९–१९९६

१३) दै. अग्रदूत, दि. ११–१२–१९९६

१४) दै. तरुण भारत, दि. १३–७–१९९७

१५) दै. अग्रदूत, दि. १४–७–११९७

१६) दै. पुढारी, दि. १७–७–१९९६

१७) दै. पुढारी, १७ जुलै १९९७

१८) दै. पुढारी, २० जुलै १९९७

१९) दै. पुढारी, १४ मार्च १९९७

२०) दै. पुढारी, ११–४–१९९७

२१) दै. महासत्ता, दि. ११–४–११९७

२२) दै. अग्रदूत, दि. १६–४–१९९७

२३) दै. सकाळ, २ जुलै १९९७

२४) दै. तरुण भारत, दि. २१ जुलै १९९७

२५) दै. सकाळ, दि. २२ जुलै १९९७

२६) दै. महासत्ता, दि. २२ जुलै १९९७

२७) दै. सकाळ, दि. २२ जुलै १९९७

२८) दै. महासत्ता, दि. २२ जुलै १९९७

२९) दै. जनप्रवास, दि. २५ जुलै १९९७

३०) दै. जनप्रवास, दि. २४ जून १९९८

३१) दै. महासत्ता, दि. २८ जून १९९८

३२) दै. प्रतिध्वनी, दि. ९–१२–११९८

३३) दै. तरुण भारत, दि. २६ जून १९९८

३४) दै. पुढारी, दि. २८–८–१९९८

३५) दै. सकाळ, दि. १६ फेब्रुवारी १९९९

३६) दै. लोकमत, दि. ३०–९–१९९९

३७) दै. लोकमत, दि. २०–१०–१९९९

३८) दै. तरुण भारत, दि. ६ नोव्हेंबर १९९९

३९) दै. जनप्रवास, दि. ८–११–१९९९

४०) दै. जनप्रवास ३–१२–१९९

४१) दै. सकाळ, दि. १२ डिसेंबर १९९९

४२) दै. तरुण भारत, दि. १९–१२–१९९९

४३) दै. पुढारी, दि. २६ डिसेंबर १९९९

४४) दै. सकाळ दि. ६–१–२०००

४५) दै. जनप्रवास, दि. ९–४–२०००

४६) दै. सकाळ, दि. १०–४–२०००

४७) दै. अग्रदूत, दि. २९–४–२०००

४८) दै. सकाळ, दि. १ मे २०००

४९) दै. सकाळ, दि. ३ मे २०००

५०) दै. पुढारी, दि. २७–५–२०००

५१) दै. तरुण भारत, दि. ६–१२–२०००

५२) दै. अग्रदूत, दि. ९–१२–२०००

५३) सांगली जिल्हा परिषदेचे वार्षिक अहवाल

**प्रकरण ५ वे**

# सांगली जिल्ह्यातील दलित कार्यकर्ते साहित्यिक व इतर व्यक्तींच्या कार्याचा अभ्यास

ज्येष्ठ विचारवंतांच्या साहित्यकृतींनी समाज परिवर्तनाची कामगिरी बजावण्यात निर्विवाद महत्त्वाची भूमिका बजावल्याचे अनेक देशांचे इतिहास पाहता आढळून येतो. रुसो आणि व्हॉल्टेअर यांच्या साहित्याने १७८९ ची फ्रेंच क्रांती घडविली तर कार्ल मार्क्स लेनिन, टॉलस्टॉय, मॅक्झिम गॉर्की डीटोव्हस्कीचे साहित्य ही १९१७ च्या रशियन क्रांतीची प्रेरणा होती. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य, तरुण सुशिक्षित दलितांना 'दलित मुक्ती चळवळ' चालू ठेवण्यास कारणीभूत ठरली. डॉ. आंबेडकरांनी पेटवलेल्या आत्मजाणिवेच्या ज्योतीनेच पुढे विद्रोहात्मक ज्वलंत दलित साहित्याचे रूप धारण केले आहे.

इ. स. १९६० ते १९७० च्या काळात नवी साहित्य चळवळ उदयास आली, जिचा सूर नकारात्मक होता. या काळातील तरुणांनी प्रस्थापित समाज नियमाविषयी तुच्छता दर्शविण्यासाठी भडक कपडे वापरण्यास सुरुवात केली. वाढलेली दाढी आणि खांद्यावर शबनम (झोळी) असाही शब्दप्रयोग केला जातो.) हा जणू या पिढीचा अविभाज्य पेहराव बनला.

युवा संस्कृतीच्या उदयाचे दुसरे स्पष्टीकरण म्हणजे पिढीमधील अंतराच्या सिध्दांताची संकल्पना होय. विद्यमान समाजव्यवस्था संपूर्णपणे झिडकारण्याच्या अथवा तिचा निषेध करण्याच्या प्रवृत्तीचे प्रतिनिधीत्व हा सिध्दांत करतो.

महाराष्ट्रात १९६० च्या दशकात अशी युवा संस्कृती निर्माण झाली. त्याचे मुख्य कारण असे होते की वाढत्या उच्च शिक्षणाचया तुलनेत तेवढा रोजगार उपलब्ध नव्हता. परिणामी त्यांच्यात एक पोकळी निर्माण झाली. त्या काळात भारताचया इतिहासात प्रथमच दलित तरुण उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयामध्ये जात होते. एकत्र येत होते. या युवा संस्कृतीचा उदय अगदी योगायोगाने त्या काळाशी जुळला. त्यांची संख्याही खूप उल्लेखनीय हती. स्वाभाविकपणेच तेव्हा बंडखोर युवा संस्कृतीत ओढले गेले.

संदर्भ १४ मुरुगकर एकता (डॉ.), दलित पँथर चळवळ, पृष्ठ ६० ते ६१ सुगावा प्रकाशन, पुणे १९९५.

महार सर्वप्रथम गाव सोडून शहरात आले. शिक्षणाचा फायदाही त्यांनीच सर्वांच्या आधी घेतला. ह्या सर्व घटकामुळे त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मभान निर्माण झाले.

नव्या दलित साहित्य चळवळीचा उदय १९६० नंतर झाला. चीड आणि बंडही चळवळीची दोन प्रमुख वैशिष्ट्ये होती.

दलितासंबंधी लेखन केलेल्या दलितोत्तर साहित्यिकात सर्वप्रथम आहेत ते श्री. म. माटे, ज्यांचा उल्लेख बाबुराव बागुलांनी मराठी बुध्दिजीवीमधील 'महार' असा केला आहे. दलितेत्तर बुध्दिजीवी लेखकात दि. के. बर्डेकर, गं. बा. सरदार, मे. पु. रेगे, नरहर कुरुंदकर, य. दि. फडके, वसंत पळशीकर, सुधीर बेर्डेकर यांचा समावेश होतो. (पृ.६६)

प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या अस्मितादर्श या त्रैमासिकाने दलित साहित्यिकांना चांगले व्यासीठ मिळाले. अस्मितादर्श (१९६७) आणि आम्ही १९७१) या मासिकामुळे दलित साहित्य चळवळीने बाळसे धरले. 'आम्ही'चे संपादक होते बाबुराव बागुल (पृष्ठ ६९)

दलित साहितय चळवळीचे महत्त्व समाजातील वाईट तत्त्वांच्या विरोधात उपयोगात आणावयाचे सर्वात शक्तीशाली साधन म्हणजे साहित्य होय. (पृष्ठ–७०)

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सामाजिक विषमता दारिद्र्य डॉ. आंबेडकरांची शिकवण, दलित समाजातील शिक्षणप्रसार इत्यादी कारणामुळे सांगली जिल्ह्यातील दलित नवयुवक शिक्षण घेवून आपल्या हक्कासाठी झगडू लागले व दलित चळवळीस जोर आला. यातूनच सांगली जिल्ह्यात काही दलित नेत्यांचा उदय झाला. त्यांनी सांगली जिल्ह्यात आपल्या बांधवांसाठी कार्य करत असतानाच संपूर्ण महाराष्ट्रात व काही अंशी संपूर्ण देशात दलित चळवळीला नेतृत्व दिले. अशा काही राजकीय नेते साहित्यिकांनी केलेल्या समाजोन्नतीच्या कार्याचा ह्या प्रकरणात उहापोह केला आहे व त्यांचे योगदान सांगितले आहे.

ज्येष्ठ विचारवंतांच्या साहित्यकृतींनी समाज परिवर्तनाची कामगिरी बजावण्यात निर्विवाद महत्त्वाची भूमिका बजावल्याचे अनेक देशांचे इतिहास पाहता आढळून येतो. रुसो आणि व्हॉल्टेअर यांच्या साहित्याने १७८९

ची फ्रेंच क्रांती घडविली तर कार्ल मार्क्स लेनिन, टॉलस्टॉय, मॅक्झिम गॉर्की डीटोव्हस्कीचे साहित्य ही १९१७ च्या रशियन क्रांतीची प्रेरणा होती. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य, तरुण सुशिक्षित दलितांना 'दलित मुक्ती चळवळ' चालू ठेवण्यास कारणीभूत ठरली. डॉ. आंबेडकरांनी पेटवलेल्या आत्मजाणिवेच्या ज्योतीनेच पुढे विद्रोहात्मक ज्वलंत दलित साहित्याचे रूप धारण केले आहे.

इ. स. १९६० ते १९७० च्या काळात नवी साहित्य चळवळ उदयास आली, जिचा सूर नकारात्मक होता. या काळातील तरुणांनी प्रस्थापित समाज नियमाविषयी तुच्छता दर्शविण्यासाठी भडक कपडे वापरण्यास सुरुवात केली. वाढलेली दाढी आणि खांद्यावर शबनम (झोळी) असाही शब्दप्रयोग केला जातो.) हा जणू या पिढीचा अविभाज्य पेहराव बनला.

युवा संस्कृतीच्या उदयाचे दुसरे स्पष्टीकरण म्हणजे पिढीमधील अंतराच्या सिध्दांताची संकल्पना होय. विद्यमान समाजव्यवस्था संपूर्णपणे झिडकारण्याच्या अथवा तिचा निषेध करण्याच्या प्रवृत्तीचे प्रतिनिधीत्व हा सिध्दांत करतो.

महाराष्ट्रात १९६० च्या दशकात अशी युवा संस्कृती निर्माण झाली. त्याचे मुख्य कारण असे होते की वाढत्या उच्च शिक्षणाचया तुलनेत तेवढा रोजगार उपलब्ध नव्हता. परिणामी त्यांच्यात एक पोकळी निर्माण झाली. त्या काळात भारताचया इतिहासात प्रथमच दलित तरुण उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयामध्ये जात होते. एकत्र येत होते. या युवा संस्कृतीचा उदय अगदी योगायोगाने त्या काळाशी जुळला. त्यांची संख्याही खूप उल्लेखनीय होती. स्वाभाविकपणेच तेव्हा बंडखोर युवा संस्कृतीत ओढले गेले.

महार सर्वप्रथम गाव सोडून शहरात आले. शिक्षणाचा फायदाही त्यांनीच सर्वांच्या आधी घेतला. ह्या सर्व घटकामुळे त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मभान निर्माण झाले.

नव्या दलित साहित्य चळवळीचा उदय १९६० नंतर झाला. चीड आणि बंडही चळवळीची दोन प्रमुख वैशिष्ट्ये होती.

दलितासंबंधी लेखन केलेल्या दलितोत्तर साहित्यिकात सर्वप्रथम आहेत ते श्री. म. माटे, ज्यांचा उल्लेख बाबुराव बागुलांनी मराठी बुध्दिजीवीमधील 'महार' असा केला आहे. दलितेत्तर बुध्दिजीवी लेखकात दि. के.

बर्डेकर, गं. बा. सरदार, मे. पु. रेगे, नरहर कुरुंदकर, य. दि. फडके, वसंत पळशीकर, सुधीर बेर्डेकर यांचा समावेश होतो. (पृ.६६)

प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या अस्मितादर्श या त्रैमासिकाने दलित साहित्यिकांना चांगले व्यासीठ मिळाले. अस्मितादर्श (१९६७) आणि आम्ही १९७१) या मासिकामुळे दलित साहित्य चळवळीने बाळसे धरले. 'आम्ही'चे संपादक होते बाबुराव बागुल (पृष्ठ ६९)

दलित साहितय चळवळीचे महत्त्व समाजातील वाईट तत्त्वांच्या विरोधात उपयोगात आणावयाचे सर्वात शक्तीशाली साधन म्हणजे साहित्य होय. (पृष्ठ–७०)

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सामाजिक विषमता दारिद्र्य डॉ. आंबेडकरांची शिकवण, दलित समाजातील शिक्षणप्रसार इत्यादी कारणामुळे सांगली जिल्ह्यातील दलित नवयुवक शिक्षण घेवून आपल्या हक्कासाठी झगडू लागले व दलित चळवळीस जोर आला. यातूनच सांगली जिल्ह्यात काही दलित नेत्यांचा उदय झाला. त्यांनी सांगली जिल्ह्यात आपल्या बांधवांसाठी कार्य करत असतानाच संपूर्ण महाराष्ट्रात व काही अंशी संपूर्ण देशात दलित चळवळीला नेतृत्व दिले. अशा काही राजकीय नेते साहित्यिकांनी  केलेल्या समाजोन्नतीच्या कार्याचा ह्या प्रकरणात उहापोह केला आहे व त्यांचे योगदान सांगितले आहे.

सांगलीतील दलित चळवळीतून काही कार्यकर्ते स्वकर्तृत्वाने उदयास आले. त्यात सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा परिचय मी ह्या प्रकरणात घेणार आहे. श्री. रामदास आठवले केंद्रीय मंत्री, आजचे ज्येष्ठ साहित्यिक ॲड. शंकरराव खरात हे औरंगाबाद विद्यापीठाचे माजी कुलगुरू होते. त्यांचे शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात योगदान मोठे होते, त्याच बरोबर बंधू माधव अण्णाभाऊ साठे, धो. ल. थोरात, वामन होवाळ, तिरमारे गुरूजी, बी. सी. कांबळे, राजा ढाले, अरूण कांबळे, प्रा. मोहन साबळे, प्रा. गौतमी पुत्र कांबळे, विवेक कांबळे इत्यादी व्यक्ती या सांगली जिल्ह्यातील आहेत. या सर्वांचा सांगली जिल्ह्यातील चळवळीशी कमी जास्त प्रमाणात हातभार लागलेला आहे. तर काही व्यक्तींनी दलित चळवळीस नेतृत्व दिलेले आहे व मार्गदर्शन केलेले आहे.[१] म्हणून मी या प्रकरणात याचा थोडक्यात परिचय देत आहे व त्यांचे योगदान सांगत आहे.

राजकारणातील व्यक्ती – (भाऊसाहेब चंद्रकांत कांबळे )

**१) अॅड. बी. सी. कांबळे** – (बी. ए. एल. एल. बी.) (जन्मतारीख– १५ जुलै १९१९)

अॅड. बी. सी. कांबळे यांचे मूळ गाव सांगली जिल्ह्यातील पलूस होय. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून बी. ए. व पुणे लॉ कॉलेजातून एल. एल. बी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बोलावून घेवून त्यांच्या चळवळीचे मुखपत्र 'जनता' साप्ताहिकाचे' 'संपादकत्व' दिले. १९५२ मध्ये मुंबई असेंबली गाजविली, १९५४–५५ कॉन्स्टिट्यूशनल लॉ चे प्रोफेसर, १९५७ मध्ये लोकसभेवर छाप पडली. पुनः १९७७ मध्ये आणीबाणीवर प्रकाश टाकून लोकसभेत निवडून गेले. अस्पृश्य मूळचे कोण? 'मराठी भाषिकाचा महाराष्ट्र' 'राजा मिलिंदचे प्रश्न' त्रि–पिटक भाग १ ते ४ या ग्रंथाचे भाषांतरकार 'वतन बिलाचा अर्थ व अनर्थ' 'बौध्द धम्मावरील टीकाकारांना उत्तर' आणीबाणी ४४ व्या घटना दुरूस्ती बिलावरील विचार' ऐक्याच्या टीकाकारांना उत्तर 'भारतीय राज्यघटनेची मीमांसा' इत्यादी ग्रंथाचे लेखक 'जनता' 'प्रबुध्द भारत' 'रिपब्लिक साप्ताहिकांचे संपादक, भारतीय रिपब्लिकन पक्षाचे एक संस्थापक व सुप्रीम कोर्टाचे वकील समग्र आंबेडकर चरित्र खंड चोवीसचे लेखक? दलित चळवळीत कसे उपयुक्त व्यक्तिमत्त्व होते ते घ्यावयाचे.[२]

२) **राजा पिराजी ढाले –** (जन्मतारीख– ३० सप्टेंबर १९४०)

राजा ढाले हे आंबेडकरी चळवळीतील एक भारतीय नेते आणि ज्येष्ठ विचारवंत, लेखक व राजकारणी आहेत. राजा ढाले यांच्या वडिलांचे नाव पिराजी मारुती ढाले तर दीक्षा हे त्यांच्या पत्नीचे नाव आहे आणि मुलगी गाथा. त्यांचे मूळ गाव सांगली जिह्यातील मिरज तालुक्यात नांद्रे हे आहे. दलित पँथर नावाचा राजकीय पक्ष राजा ढाले यांनी अरूण कृष्णाजी कांबळे आणि नामदेव ढसाळ यांच्या मदतीने स्थापन केला. त्याअगोदर ते भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या (भारिप) राजा ढाले गटाचे प्रमुख होते.

कारकीर्द – राजा ढाले हे भारिप बहुजन महासंघाच्या तिकिटावर १९९९ सालच्या भारतीय संसदेच्या निवडणुकीत उत्तर –मुंबई मतदार संघातून उभे होते. पण निवडून आले नाहीत. २००४ साली यांनी त्याच पक्षाकडून ईशान्य मुंबई मतदार संघातूनही एक अयशस्वी निवडणूक लढवली.

मराठीतील सत्यकथेची सत्यकथा यांनीच लिहिली अणि महाराष्ट्रातल्या एका खेड्यात दलित तरूणीवर बलात्कार झाल्यानंतर भारतीय स्वातंत्र्यालाच प्रश्न करणारा काळा स्वातंत्र्यदिन हा लेख ही यांनीच लिहिला. प्राचीन काळात किल्ल्यात राहून गडकिल्ल्यांचे अहोरात्र संरक्षण करणारे आणि युध्दात आघाडीवर भला मोठा फडकणरा ध्वज घेवून उभे असणारे लोक म्हणजे ढाले, असा खुद्द राजा ढालेनीच आपल्या आडनावाच्या लोकांचा इतिहास शोधून काढला आहे. हे लोक ध्वज खाली पडू देत नसत. एक घायाळ झाला की दुसरा त्याची जागा तडफेने घेवून ध्वज वरच्यावर झेलत असे.

लेखन – तापसी, येरू, चक्रवर्ती, जातक, विद्रोह आदी लघुअनियतकालिके आज उपलब्ध नाहीत. या अनियतकालिकांत राजा ढाले यांचे लेखन प्रसिध्द झाले आहे. तसेच त्यांच्या कविता, कथा, प्रस्तावना, प्रसंगोपात लेख, संशोधनात्मक, लेखन, आणि संपादने हे सारे साहित्य विखुरलेले आहे, ढालेच्या आयुष्याचे तपशील फारसे उपलब्ध नाहीत. स्वतः ढालेनीही हे निगुतीने जपण्याचा आणि प्रस्थापित होण्याचा खटाटोप केलेला नाही. असे मातीच्या उदरात लुप्त झाल्यासारखे परंतु आतमध्ये अद्याप जिवंत असणारे झरे शोधून त्याचे पाणी सर्वांपर्यंत आणण्याचं काम अतिशय दुष्कर असते, ते हाती घेणे हेच एक दिव्य असते, त्यामुळे 'खेळ' या अंकातल्या काही त्रुटी मान्य करूनही त्याची दखल घ्यावी लागणार आहे. पुरस्कार आणि सन्मान – राजा ढाले यांच्यावर 'खेळ' या नियतकालिकाचा विशेषांक प्रकाशित झालेला आहे.

जीवनगौरव पुरस्कार

पुणे महापालिकेचा आंबेडकर पुरस्कार (१–१०–२०१५)[३]

## ३) रामदास आठवले – (सध्याचे मंत्री) (जन्मतारीख : २५ डिसेंबर १९५९)

रामदास बंडू आठवले हे १४ व्या भारतीय प्रजासत्ताकाच्या लोकसभेचे खासदार होते, लोकसभेत त्यांनी महाराष्ट्रातील पंढरपूर लोकसभा, मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) ह्या राजकीय पक्षाचे अध्यक्ष आहेत.

मा. रामदासजी आठवले भाजपच्या सरकारमध्ये पुन्हा एकदा सन्मानाने मंत्री झाले. कारण ध्यास एकच होता, पक्षाच्या माध्यमातून दलितांचा विकास साधणे, दलित बांधवांना न्याय देणे. कवठेमहांकाळ तालुक्याला पहिल्यांदाच केंद्रात मंत्रिपद मिळाले आठवले यांच्या रूपाने. सध्या भारतीय जनता पक्षाच्या म्हणजेच केंद्र सरकारमध्ये समाजकल्याण मंत्री म्हणून कार्यरत आहेत. हे खाते ते जबाबदारीने पेलत आहेत.

रामदास बंडू आठवले यांचा जन्म २५ डिसेंबर १९५९ ला कवठेमहांकाळ तालुक्यातील आगळगाव या गावी एका सामान्य कुटुंबात झाला. लहानपणी वडिलांचे छत्र हरविले. पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांची आई हौसाबाई बंडू आठवले ही काबाडकष्ट करीत होती. प्राथमिक शिक्षण ढालेवाडीत (कवठेमहांकाळ, जि. सांगली) झाल्यानंतर पुढे काकांकडे मुंबईत शिक्षण घेण्यासाठी गेले. पुढे वडाळ्याच्या सिध्दार्थ विहार वसतिगृहात राहायला गेले. त्यांची खऱ्या अर्थाने तेथे जडणघडण झाली. १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना झाली. पँथर्समध्ये सक्रिय झाले. त्यांच्या सोबत अनेक मंडळी बरोबर होती. पँथर्समुळे जीवनाला कलाटणी मिळाली. पँथर्सचा झंझावात निर्माण केला.

इ. स. १९७९ मध्ये मुंबई गाठली. विद्यार्थी दशेपासून अन्याय, अत्याचाराविरोधात लढले. वडाळ्यातील सिध्दार्थ विहारामध्ये महाराष्ट्रातील अनेक दलित आणि मागासवर्गीय समाजातील मुले शिक्षण घेण्यासाठी येत असत. हे वसतिगृहच गोरगरिबांचे आधारस्थान होते. तेथे चळवळीविषयी खूप चर्चा होत असत. पुरोगामी आणि दलित चळवळीतील अनेक मान्यवरांची भाषणे आणि व्याख्याने ऐकण्यासाठी जात असत. हळूहळू

लोकांशी संपर्क वाढत होता. प्रा. अरूण कांबळे सरांचे त्यांना वैचारिक पाठबळ मिळाले. दलित पँथर्सच्या चळवळीत सक्रिय झाल्यानंतर त्यांनी खऱ्या अर्थाने  महाराष्ट्र पालथा घातला.

जेथे जेथे दलितांवर अन्याय आणि अत्याचार होत असे तेथे पँथर्स धावून जात असे. अन्यायाविरोधात पँथर्सच्या माध्यमातून आम्ही आवाज बुलंद केला. आमच्या आंदोलनाची भल्याभल्यांना धडकी भरत होती. महाराष्ट्रात भटकंती करीत असताना दलित समाजाबरोबरच कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर भटक्या आणि फाटक्या माणसांची दुःखेही कळली. दलित समाज त्यांना ओळखू लागला. पुढे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे ही मागणी जोर धरू लागली. नामांतर चळवळीतही रामदास आठवले सहभागी झाले. जोपर्यंत मराठवाडा विद्यापीठाचे नामातंर होणार नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही असा निर्धार केला. संपूर्ण राज्यात वातावरण तापले.

नामांतराचा लढा काही वर्षे सुरू राहिला. सरकारशी संघर्ष केला. अनेक नेत्यांसह मोर्चे अणि आंदोलनात ते सहभागी झाले. शेवटी मराठवाड्याचे नामांतर झाले. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार मुख्यमंत्री असताना ऐतिहासिक निर्णय झाला. मार्ग निघाला, आंदोलनाची सरकारला दखल घ्यावी लागली. आंदोलन चळवळ अणि राजकारण सुरू असतानाच त्यांचा इ. स. १९९० मध्ये महाराष्ट्र मंत्रिमंडळात समावेश झाला.

प्रारंभी समाजकल्याण आणि परिवहन मंत्री म्हणून त्यांनी काम केले. पुढे मुंबई आणि पंढरपूर लोकसभा मतदार संघातून खासदारही झाले. दलितांना न्याय मिळत नव्हता. गावागावात सन्मानाने जगता येत नव्हते. अन्याय, अत्याचार पराकोटीला पोचले होते. गांजलेल्या गरीब जनतेला आम्ही पँथरचे बळ दिले. काळ बदलला मात्र परिस्थिती काहीशा फरकाने तशीच आहे. ''जुलमास जाळण्यास रामदास आठवले वात झाले'', असे त्यांचे प्रामाणिक मत आहे.[४]

मुंबई–माटुंगा पोलीस लाईनमध्ये चुलते व चुलतीसमवेत ते रहात होते. त्यांचे मित्र व दलित पँथरचे कार्यकर्ते अरुण कांबळे यांच्यामुळे त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. मुंबईत सुमारे पंचवीस वर्षांचा काळ त्यांनी चुलता–चुलतीसमवेत घालवला. लग्नाआधीच ते राज्याचे मंत्री झाले होते.

मा. आठवले साहेबांचा विवाह १६ मे १९९२ रोजी श्रीमती सीमा आठवले यांच्याशी संपन्न झाला. त्या अंडर ग्रॅज्युएट सिध्दार्थ कॉलेज, मुंबई येथे झाल्या शिवाय त्या आर्टिस्ट, पॉलिटिकल अँड सोशल वर्कर पदवीधर आहेत.

आठवले यांच्या पालनकर्त्या चुलती आक्काताई आठवले या सध्या ढालेवाडी गावात रहात आहेत. शांत पण तितकाच कडक स्वभावाचा असूनही सर्वांचा लाडका असलेले रामदासजी मंत्री झाले.

रामदास आठवले म्हणतात ''ज्या भागात एस. सी. एस. टी. चे प्रमाण अधिक आहे त्या भागांना विशेष अनुदान द्यायला हवे. त्यासाठी जादा निधी दिला तरच त्या भागाचा विकास होईल.''

मा. आठवले यांचा पता– संविधान सी. टी. एस. वियर गुरुनानक हॉस्पिटल गांधीनगर, बांद्रा (ईस्ट) मुंबई ४०० ०५१ टेलि. ०२२–२६४५५१६४, मोबा. ९००४८०९६२७, कायमचा पत्ता– १०२, न्यू महाराष्ट्र सदन के. जी. मार्ग, न्यू दिल्ली ११०००१ टेलि. ०११

१९९०–१९९५ मेंबर, महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह कौन्सिल, १९९०–१९९५ कॅबिनेट मिनिस्टर, सोशल वेल्फेअर अॅड ट्रान्सपोर्ट एम्प्लायमेंट क्वॉरंटी, स्किम अँड प्रोव्हिबोशन प्रोपोगांडा, गव्हर्नर ऑफ महाराष्ट्र, १९९८ – १२ व्या लोकसभेवर ते निवडले गेले तसेच १९९९ – १३ व्या लोकसभेवर दुसरी वेळीही ते निवडून आले. त्याचप्रमाणे २००४ १४ व्या लोकसभा तिसऱ्या वेळी निवडून आले आणि सध्या मंत्री असलेले हे एप्रिल २०१४ राज्यसभेवर नियुक्ती झाली आहे. ते ५ जुलै २०१६ मिनिस्टर ऑफ स्टेट सोशल जस्टीस अँड इमपॉवरमेंट गव्हर्मेंट ऑफ इंडिया येथेही कार्यरत आहेत.

आठवले यांच्या पालनकर्त्या चुलती आक्काताई आठवले या सध्या ढालेवाडी गावात रहात आहेत. शांत पण तितकाच कडक स्वभावाचा असूनही सर्वांचा लाडका असलेले रामदासजी मंत्री झाले.

४) **प्रा. अरूण कांबळे –** (जन्म १४ मार्च १९५३)

अरूण कृष्णाजी कांबळे हे दलित चळवळीचे लढाऊ नेते आणि मराठी साहित्यातील चिकित्सक लेखक, संशोधक, गाढे अभ्यासक होते. ते दलित पँथर्स या संघटनेचे संस्थापक सदस्य व अध्यक्ष होते. मुंबई

विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून ते शिकवत होते. समाजातील विषमता नष्ट होवून समाज एकजिनसी व्हावा यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. प्रभावी आणि कणखर वक्र्तृत्व हा त्यांचा नेतृत्व वैशिष्ट्याचा भाग होता.

**जीवनचरित्र –** प्रा. अरूण कांबळे यांचा जन्म १४ मार्च १९५३ साली सांगली जिल्ह्यातील करगणी या गावी झाला. त्यांच्या आई शांताबाई या गटशिक्षणाधिकारी आणि वडील कृष्णाजी जीवन शिक्षणमंदिर दिघंची या शाळेत शिक्षक होते. करगणी येथे त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. त्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात आले. तेथून बी. ए. झाले. मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालयातून एम. ए. ला मराठी विषयात सुवर्ण पदक मिळवले. १९७३ मध्ये प्राध्यापकी पेशात प्रवेश केला.

ते १९८३ पर्यंत वडाळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात तर १९८३ ते १९९० पर्यंत ते दादरच्या किर्ती महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. १९९१ पासून ते मुंबई विद्यापीठात होते. सध्या विद्यापीठाच्या मराठी विभागा अंतर्गत फुले आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक म्हणून काम पहात होते. प्रा. कांबळे यांचा प्रामुख्याने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात वावर होता. चतुरस्त्र व्यासंगी, सडेतोड भाषा आणि प्रबळ वर्क्तृत्व यामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात दबदबा होता, त्यांचा विवाह आंतरजातीय असल्या कारणाने अनेक जातीय संघर्ष उभे ठाकले.

राजकीय कार्य – आटपाडी तालुक्यातील करगणी या छोट्या गावातून बाहेर पडून मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या प्रमुखपदापर्यंत आणि दलित पँथर सारख्या संघटनेपासून आंबेडकरी चळवळी पर्यंतचा प्रवास केला.[५]

**दलित पँथर मधील दिवस** – १९६८–७० या काळात दलित पँथर्सच्या सर्जनशील तरूणांनी जेव्हा तत्कालीन प्रस्थापित रिपब्लिकन नेतृत्वाला आणि त्याचबरोबर साहित्यातील सारस्वतांना सर्वकष आव्हान दिले. तेव्हा अरूण कांबळे १५ वर्षाचे होते. त्या बंडाचा त्यांच्यावरचा संस्कार मात्र अगदी प्रखर होता.

महाराष्ट्राच्या साहित्याचा आणि राजकारणाचा बाज कायमचा बदलून टाकण्याची जिद्द बाळगणाऱ्या पँथर्सना पहिल्या दशकातच आपल्या घट्ट रूतलेला हित संबंधाच्या व्यवस्थेने विस्कळीत करून टाकले. आणीबाणी नंतर जनता पक्षाने आणि विशेषतः त्यांच्यातील समाजवादी मंडळींनी काही पँथर्सना जवळ केले अरूण कांबळे तेव्हा पंचविशीत होते. आणि त्यांच्याकडे दुर्दम्य आशावाद होता. आपण पँथर्सना पुन्हा तीच चित्त्याची झेप घ्यायला प्रवृत्त करू शकू, असा आत्मविश्वास त्यांच्याकडे होता. तसे पाहिले तर अरूण आणि सिनिअर पँथर्स यांच्यात वयाचे फार अंतर होते असे नाही. पण तरीही विस्कळीत झालेले दलित नेते आणि साहित्यिक. जनता दलातही त्यांनी कार्य केले.

वाङमयीन कार्य – अरूण कांबळे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विं. दा. करंदीकर यांच्या बरोबर होते. अरूण कांबळे यांनी आपली भीमगर्जना मात्र कायम चालूच ठेवली होती. ती गर्जना महाराष्ट्रव्यापी झाली. ती रामायणातील संस्कृती संघर्ष.' या प्रबंधरूपी पुस्तकामुळे. त्याच्या व्यासंगाचा पुरावा आहे.

विजय तेंडुलकरांनी अरूण कांबळे मधील व्यासंगी बंडखोरी पूर्वीच ओळखली होती. त्यांनी रामायणातील संस्कृती संघर्ष या पुस्तकावर टिपणी करताना म्हटले होते. या छोटेखानी पण वैचारिक पुस्तकाचे मी स्वागत करतो. मराठीत जेव्हा विव्दता सिध्द करायची असते तेव्हा ४०० ते ५०० पानांचा ग्रंथ लिहावा लागतो. रामायणावर तर तो हजार पानांचाही होवू शकला असता. पण अरूण कांबळे यांनी केवळ ७० ते ७५ पानात सिध्द केलं आहे.

माता शांताबाईच्या माज्या जन्माची चितरकथा व वडीलांच्या आत्मकथनाचे प्रकाशन केले होते.

**प्रकाशित साहित्य –**

१) धर्मांतराची भिमगर्जना, सांस्कृतिक संशोधन प्रतिमा प्रकाशन १९५६

२) वाद–संवाद वैचारिक प्रतिमा प्रकाशन १९९६

३) चिवर (३) (४) ललित आशय प्रकाशन १९९५

४) युग प्रवर्तक आंबेडकर (५) सांस्कृतिक संशोधन पँथर प्रकाशन, १९८२, १९८७

**ब) साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते –**

**१) तुकाराम भाऊराव साठे (आण्णा भाऊ साठे)** (जन्म : १ ऑगस्ट १९२०) (मृत्यू : १८–७–१९६९)

जन्म : १ ऑग. इ.स. १९२० सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी मांग कुटूंबात आण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. हे गाव कुरूंदवाड संस्थानात होते. त्याच्या वडीलांचे नाव भाऊराव व आईचे नाव वालुबाई होते. मुलाचे नाव तुकाराम ठेवले असले तरीही सर्वजण प्रेमाने त्यांना आण्णा म्हणत.

आणा भाऊ साठे यांची दोन लग्ने झाली होती. दुसऱ्या पत्नीचे नाव जयवंताबाई. आण्णाप्रमाणेच याही साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्या होत्या.

आण्णा भाऊ हे मराठी लेखक, शाहीर व समाज सुधारक होते.

वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनांपर्यंत पोहचविणारा महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेवून आलेला सिध्दहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. ग्रामीण भागातील रांगड्या तमाशाला लोकनाट्य हेबिरूद त्यांनी दिले.

अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांव्दारे जनजागृतीसाठी प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेल्या मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या नवनिर्मितीत लोकशाहीर, अमरशेख व शाहीर कॉ. द. ना. गव्हाणकरांचे मोलाचे योगदान होते. साठे हे अंतर्बाह्य मार्क्सवादी तसेच जातीच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून समग्र विकासापासून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक समृध्द

व्यक्तिमत्व होते. वैयक्तिक दुःखाचा विचार न करता, आपले विचार,कार्य व प्रतिभा यांच्या सहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर होते.[५]

लेखन – अण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ६ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथा संग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले.

बंगालचा दुष्काळ, तेलंगण, संग्राम, पंजाब दिल्लीचा पोवाडा, अमळनेरचे हुतात्मे, काळ्या बाजाराचा पोवाडा, 'माझी मैना' हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील छक्कड, कामगार चळवळीवरील एकजुटीचा नेता ते हिटलरच्या फॅसिझम विरोधात स्टॅलिन ग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा चिनी क्रांतिवरील चिनी जनांची मुक्ति सेना हे गौरवगान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरावरील गाजलेले 'जग बदल घालुनी घाव, सांगुनी गेले भीमराव' हे गाणे अशी अनेक गाणी, कवने, पोवाडे अण्णा भाऊ साठे यांनी रचलेली. त्यांनी आपल्या गाण्यातून पोवाड्यातून अनेक सामाजिक राजकीय प्रश्नांना आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे. अशा या महाराष्ट्राचे सुप्रसिध्द शाहीर आण्णाभाऊ साठे यांचे दिनांक १८ जुलै १९६९ रोजी वाटेगाव येथे निधन झाले.[६]

२) **ॲड. शंकरराव खरात** (जन्म : ११ जुलै १९२१) (मृत्यू : ९ एप्रिल २००१)

दलितांच्या जीवनाची वास्तव दाहकता, दुःखे शंकरराव खरातांनी आपल्या लिखानातून मांडलेली आहेत. ही प्रेरणा त्यांना डॉ. बाबासोहब आंबेडकर यांनी दिली. त्यांचा सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग होता. त्यांचा परिचय पुढील प्रमाणे–

शंकरराव खरात यांचा जन्म दि. ११ जुलै १९२१ रोजी सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यात झाला. त्यांच्या आईचे नाव सावित्री व वडिलांचे नाव रामचंद्र होते. ही औंध संस्थानची दुसरी राजधानी होती. ते अनुसूचित जाती जीवनाचे भाष्यकार होते[७] आणि मराठीतील सुप्रसिध्द कथाकार. त्यांनी लिहिलेले कथा संग्रह

म्हणजे बाराबलुतेदार, सांगावा, तडीपार, टिटवीचा फेरा, सुटका, गावकी, दौंडी, आडगावचे पाणी, मुलाखत, लिलाव, माझे नाव, माझा काय दोष इत्यादी त्यांनी कथे बरोबरच विविध कांदबऱ्या लिहिल्या –

हातभट्टी, गावचा टिनोपाल गुरूजी, झोपडपट्टी, मसालेदार गेस्ट हाऊस, मी मुक्त मी मुक्त, पारधी, बऱ्याची दिंडी इ. वैचारिक लेखन –अस्पृश्यांचा मुक्ती संग्राम.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आत्मकथा, पददलितांचा अस्पृश्यांचा मुक्ती संग्राम, गावकी भावकी, गाव शिवार, चोखोबाचा विद्रोह, संताची सामाजिक दृष्टी, भटके जाती, विमुक्त जाती, जमातीचा प्रश्न, सामाजिक चळवळीचा इतिहास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार[८] इ.

तसेच ''तराळ अंतराळ'' ही आत्मकथा ही त्यांनी लिहिली आहे. यात आपले जीवन दलितांचे जीवन कसे विदारक होते हे मांडलेले आहे.

१९७३ साली ते मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे कुलगुरू होते. तसेच भारतीय रेल्वे बोर्डाचे सदस्यही होते. त्यांचा मृत्यू दि. ९–४–२००१ रोजी झाला.[९]

३) **माधव दादाजी मोडक उर्फ बंधु माधव –** (जन्म ३ नोव्हेंबर १९२७)

हे मराठी प्रसिध्द लेखक होते. दलित साहित्य रचनेसाठी ते परिचित आहेत. बंधु माधव यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९२७ मध्ये झाला. यांनी दलित समाजामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेल्या जनता व प्रबुध्द भारत या साप्ताहिकातून प्रबोधनाकारी लिखाण केले. कलापथकाच्या माध्यमातून आणि कथासंग्रह कादंबऱ्या या माध्यमातून त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले.[१०]

**जीवनकार्य –** बंधु माधव यांनी नोकरी सोडून पददलित समाजात जागृती घडवून आणण्यासाठी 'कलापथक' स्थापन केले. सांगली कोल्हापूर सातारा या जिल्ह्यात ते कलापथकाव्दारे समाज जागृतीचे काम

करत. महाराष्ट्र दलित साहित्य संघ मुंबई तर्फे प्रखर, अविरत आणि समाजहित उपयोगी लेखनासाठी इ.स. १९५६ मध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला.

शाळेत असतानाच बंधू माधव हस्तलिखितातून कथालेखन करीत होते. तसे त्यांचे कथालेखन इ.स. १९४२ पासून सुरू झाले. त्यांनी म्हटले आहे की, ''कथा वाचन ऐकत शिकलो; वयाने वाढत गेलो वयात आलो, तारूण्याची गुलाबी स्वप्ने मला पडू लागली. त्या गुलाबी स्वप्नातील कथाच प्रथम प्रेमकथा म्हणून लिहू लागलो.

**प्रकाशित साहित्य** – वग सम्राट, पेटलेले आकाश, शाहीरभाऊ फक्कड, आम्हीही माणसं आहोत, रमाई.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांती चालू होते. त्याच काळात बाबासाहेबांच्या ज्वालाग्राही तत्त्वज्ञानातील ठिणगी घेवून तिच्या सहाय्याने बंधुमाधवांनी आपल्या कथाव्दारे दलितांना पेटवून उठविले. त्यांच्यात अस्मिता व स्वाभिमान प्रभावीपणे जागृत करण्याचे कार्य केले. म्हणूनच त्यांचा उल्लेख केल्याशिवाय दलित कथा साहित्याची मीमांसाच होवू शकत नाही. बंधू माधव मूळचे सांगली जिल्ह्यातील सांगलीवाडी गावचे सध्या त्यांचे वास्तव्य मालाड पश्चिम (मुंबई) येथे होते. लहानपणी त्यांच्या घरातच कलावंताचा गोतावळा जमत असे. त्यांचे वडील तमाशा फडाचे ठेकेदार वा तमाशा शौकीन होते, त्यामुळे शाहिर बापूराव कुपवाडकर, सोंगाड्या इंदूराव, ढोलकीपटू अंतू, पट्टेबापूराव शाहीर भाऊ फक्कड व त्यांची भंगारी या साऱ्या कलावंताच्या सहवासाचा परिणाम त्यांच्या बालमनावर झाला. बंधू माधव यांच्या रक्तातच कलागुण होते. अकरा वर्षे पोलीस खात्यात नोकरी केली. तिथे त्यांचे मन रमले नाही. साहित्य क्षेत्रात ते प्रथम कवी म्हणून उभे असावेत. कारण १९४२ ला त्यांनी कविता लेखनही केले आहे.

त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा थोडक्यात परिचय – १९४४ मध्ये 'जग हे असं आहे.' हे नाटक लिहिले. शाहीर भाऊ फक्कड यांच्या जीवनावर रंगली ओठावर लावणी, वगसम्राट आणि रमाई ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नीच्या जीवनावरील कादंबरी इत्यादी जबरदस्त कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या आहेत.

बंधू माधवांनी १९४८ पासून कथा लेखनाला सुरवात केली.

त्यांच्या प्रारंभीच्या कथा या नागर लेखकांच्या कथाप्रमाणे प्रेमकथा होत्या. पण प्रसिध्द साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर आणि त्यांची भेट झाली. त्यानंतर बंधूमाधवांनी दलित बांधवावर त्यांनी 'विखारी भाकरी'ही पहिली ग्रामीण कथा लिहिली, ते येताळ आजोबाच्या वास्तव जीवनावर आहे.

आंबेडकरांच्या चळवळीने प्रेरीत होवून त्यांनी एका मागून एक अशा भरपूर कथा लिहिल्या आहेत. यावरून हे स्पष्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कथांच्या माध्यमातून लोकांच्या पर्यंत पोहोचविणे व दलितांना जागृत करणे हा लेखनामागील त्यांचा हेतू स्पष्ट होतो. त्यांनी लिहिलेल्या कथांचा आज 'आम्हीही माणसं आहोत' (१९२१) व पेटलेले आकाश हे दोन कथा संग्रह प्रसिध्द झालेले आहेत.

बंधू माधवाच्या कथांना प्रामुख्याने सांगली, कोल्हापूर येथील गावातील दलितांच्या जीवनाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. आंबेडकरांची विचारसूत्रे हेच दलित जीवनाचे संदर्भ मानून त्यांनी आपले कथाविश्व साकारलेले आहे.

दलितांच्या वास्तव जीवनाचे दर्शन त्यांनी आपल्या काही कथांतून प्रभावीपणे चित्रित केलेले आहे. गावकीच्या कामाने हैराण झालेल्या कुटुंबावर सतत चिडणारा, घाणीला जुंपलेल्या बैलासारखा राबराब राबणारा, बलुतेदार म्हणून करावे लागणारे कष्ट आणि कष्टाचा मोबदला मात्र मिळत नाही. त्यामुळे आतल्या आत कुढणाऱ्या एका दादू महाराच्या जीवनाचे प्रभावी चित्रण महार जन्माची चितर कथा' या कथेत येते.

सुईला सांग्या, आम्ही गगनाला गवसणी घालू ही दलितांच्या मनात महार वतनाविरूध्दच्या संघर्षाला वाचा फोडणारी ही उत्कृष्ट कथा होय.

तसेच त्यांनी केवळ कायद्याने अस्पृश्यता नष्ट होत नाही. हे 'सव्वा रूपया कप' या एका चांगल्या कथेतून दाखवून दिलेले आहे. 'फुटला गहिवर माणुसकीचा ' ही अत्यंत प्रक्षोभक कथा. एक ब्राम्हण दुसरा पददलित व तिसरा मुसलमान या तिघांच्या परस्पर भावबंधातून प्रेमातून तयार झालेली ही कथा.

'कपाळी लिवल्यालं कंदी पसुलं' या कथेतील महादेवाची आई महादेवाला सांगते 'महादेवा, बाबा तू असं रडू नगस रं. आता बैल्यांचा बैल म्हणून तू जगू नगस लिवनं शिकं....

मोडक यांना समाजपरिवर्तन अभिप्रेत होते, या समाजपरिवर्तनाच्या भूमिकेतून अस्पृश्य वर्गाच्या सामूहिक भावनांचा, इच्छा आकांक्षाचा पहिला परिणामकारकरिता अविष्कार करणाऱ्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या तेजस्वी चळवळीतून निर्माण झालेले क्रांतीसूक्ते म्हणजे त्यांच्या कथा होय.[११]

४) **वामन गोविंद होवाळ –** (जन्म : १–४–१९३८)

वामन होवाळ यांचा दि. १ एप्रिल १९३८ ला सांगली जिल्ह्यातील तडसर या गावी जन्म झाला. आपले प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण त्यांनी त्यांच्या जन्मगावीच घेतले. १९५६ साली ते मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाले. वडील मुंबईला गोदीत कामाला होते. त्यामुळे पुढील शिक्षणासाठी मुंबईला आले. १९७४ साली सिध्दार्थ कॉलेज आणि ठाणे महाविद्यालयातून बी. ए. ची पदवी घेतली, पुढे त्यांनी रेल्वेत नोकरीही मिळवली. कार्यालयीन अध्यक्षक पदावरून ते सेवा निवृत्त झाले होते. जवळ जवळ ७८ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले.

होवाळांना शालेय जीवनातच कथेची आवड निर्माण झाली होती, त्या आवडीपोटी ते कथा लेखनाकडे वळले. किर्लोस्कर मासिकातून त्यांना शंकर पाटलांच्या कथा प्रथम वाचायला मिळाल्या. त्या कथा वाचनाने आपणही कथा लिहावी असे त्यांना वाटू लागल्याची कबूली त्यांनी दिलेली आहे. 'माणूस' ही त्यांची पहिली कथा प्रसिध्द झाली ती 'कथालक्ष्मीच्या' मार्च १९६३ मधील अंकात. त्यानंतर त्याकाळी कथालेखननाला वाव देणाऱ्या सत्यकथा धनुर्धारी, राजश्री, यशवंत, 'वसुधा' यासारख्या मासिकातून त्यांच्या अनेक कथांना प्रसिध्दी मिळत गेली. त्यातूनच वामन होवाळांसारख्या समर्थ कथाकार मराठी कथाविश्वाला साहित्यात परिचित झाले.

वामन होवाळांच्या कथा – बेनवाड १९७३ येळकोट (१९८५) वारसदार १९८६, ‘वाटा’ आडवाटा, १९८७ यासारखे कथासंग्रह मराठी कथाविश्वात दाखल झाले.

त्यांच्या गाजलेल्या ‘मजल्याच घर’ आणि ‘पाऊसपाणी’ या कथा भाषेच्या देशाच्या भिंती ओलांडून इंग्रजी आणि फ्रेंच भाषेत अनुवादीत झाले आहेत.

वामन होवाळ विशेषतः ग्रामीण आणि दलित कथाकार म्हणून जितके सर्वपरिचित झाले तितकीच त्यांची लोक नाट्येही लोकप्रिय झाली आहेत. त्यांनी ‘नाम्या म्हणे मी उपाशी’ ‘जपून पेरा बेण’ ‘आंधळयाची वरात बहिऱ्याच्या घरात’ यासारखी प्रबोधनात्मक परिवर्तनवादी विचारधारेच्या लोकनाट्याची निर्मिती केली.

दलित कथाकारांची एक समर्थ पिढी बाबुराव बागुलांपासून सुरू होते. अर्जुन डांगळे योगीराज वाघमारे केशव मेश्राम, भास्कर चंदन शिवे हे या पिढीचे बिनीचे शिलेदार म्हणता येतील त्यामध्ये वामन होवाळ हे नावही तेवढेच महत्वपूर्ण असे आहे.[१२]

त्यांच्या ‘यळकोट‘ या कथा संग्रहाला राज्य पुरस्काराने गौरविले आहे.

त्यांनी आपल्या कथा मधून गावाकडील, खेड्यातील सवर्ण दलित यांच्या मधील संघर्ष अधोरेखित झाला आहे.

गावगाड्यातील दलितामधील असणाऱ्या अज्ञानाला अंधश्रध्दांना त्यांनी आपल्या कथालेखनातून नेमकेपणाने वाचा फोडली. त्यांनी साकारलेल्या विशेष कथा मध्ये मजल्याच घर, आतली टांग, वसुली, देव धावला, देव पावला, हिसका, बेनवाड, कुरघोडी साखरेचं खाणार इ.

## सामाजिक कार्यकर्ते –

**१) शिवराम कृष्णाजी तिरमारे गुरूजी –** (जन्म : २२-४-१८९४) (मृत्यू : १९६४)

दीनदलित मागासलेल्या समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रसिध्द समाजसेवक शिवराम कृष्णाजी तिरमारे गुरूजी यांनी अथक प्रयत्न केले आहेत. राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर व्यक्तींचा प्रत्यक्ष सहवास आणि मार्गदर्शन त्यांना लाभले. सांगलीत, बाबासाहेबांचा सत्कार करण्याचे भाग्यही त्यांना मिळाले.

मागासवर्गीयांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी एक व्रतस्थ शिक्षक म्हणून गुरूजी आयुष्यभर राबले. सांगलीत डॉ. बापट विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना करून त्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची मोठी सोय केली. सहकारी तत्त्वावरील गृहनिर्माण संस्थेची स्थापना आणि सिव्हील हॉस्पिटल रस्त्यास डॉ. आंबेडकर यांचे नाव अशा उपक्रमांतही गुरूजींचा पुढाकार होता.

पलूस तालुक्यातील दुधोंडी हे तिरमारे गुरूजींचे मूळ गाव. व्हर्न्याक्युलर फायनल (सातवी) पर्यतचे शिक्षण गावातच झाल्यावर ते शिक्षक म्हणून सांगलीत रूजू झाले. त्यांनी सांगली हीच कर्मभूमी मानली. शाळा आणि परिसराचा शैक्षणिक दृष्टीने कायापालट घडवून आणला. समाजाला शिक्षणाबरोबरच मुलभूत स्वरूपाचे हक्क मिळावेत, यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच दलित विद्यार्थ्यांना हायस्कूलमध्ये प्रवेश मिळू लागला. तिकिट काढून नाटक किंवा चित्रपट पाहण्याचा हक्कही त्यांनी राजापर्यंत मांडून समाजाला मिळवून दिला.

दुधोंडी गुरूजींचे वडील शेती करत खोडशी धरणाचे पाणी गावात आणण्याचे ठरले, त्यावेळी त्यांची कालव्याच्या कामावर मुकादम म्हणून नेमणूक झाली होती. गुरूजींच्या प्राथमिक शिक्षणाची सोय दुधोंडीतच झाली. श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन आणि संस्थानच्या शिक्षण खात्याचे गुरुजीकडे लक्ष होते. ते चौथीत असताना सरकारने त्यांना दरमहा दोन रूपये शिष्यवृत्ती सुरू केली होती. सातवी उत्तीर्ण झालेले गुरूजी हे सांगली संस्थानातील पहिलेच मागासवर्गीय  विद्यार्थी असावेत. सातवीनंतर संस्थानातर्फे गुरूजींना पुण्यातील ट्रेनिंग कॉलेजमध्ये पाठवण्यात आले.

एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर त्यांची सांगलीत पालिकेच्या शाळा क्रमांक चारमध्ये नेमणुक झाली. त्यावेळी या शाळेत माधव विठ्ठल कल्याण, बहिरनाथ गोविंद संकपाळ, यल्लाप्पा रामचंद्र कांबळे व तातोबा रामचंद्र कुदळे असे चारच विद्यार्थी होते. मुलांना शाळेकडे वळविण्यासाठी गुरूजींना फार खटपट करावी लागली. खेळाच्या निमित्ताने ते मुलामध्ये मिसळू लागले. पालक व समाजातील प्रमुखांच्या त्यांनी बैठका घेतल्या. त्यामुळे विश्वास निर्माण होवून शाळेचा पट वाढला.

सांगलीतील सदासुख थिएटरमध्ये झालेल्या एका सभेच्या वेळी गुरूजींनी पुढाकार घेवून मोठ्या धाडसाने भाषण केले. शाहू महाराजांना ती हकीकत समजली. त्यांनी गुरूजींना बोलावून घेतले. चार दिवस पाहुणचार केला. महाराजांनी गुरूजींना मामलेदार म्हणून कोल्हापूर संस्थानात रूजू होण्यास सांगितले. मात्र मला शिक्षण क्षेत्रातच काम करायचे आहे, समाजात शिक्षणाचा प्रसार करायचा आहे, असे गुरूजींनी नम्रपणे सांगितले, गुरूजींना कोल्हापूरात न्यावे अशी महाराजांची मनःपूर्वक इच्छा होती. त्यामुळे सांगलीत आले की, त्यांची मोटार शाळेकडे येत असे. कोल्हापूरला केव्हा येता? असे ते गरूजींना विचारीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२१ मध्ये इंग्लंडमधून बॅरिस्टर होवून मायदेशी परतले. त्यावेळी माणगाव येथील परिषदेसाठी ते कोल्हापूरात आले होते. राजर्षी शाहूमहाराज त्या परिषदेचे अध्यक्ष होते. कोल्हापूर रेल्वे स्टेशनवर बाबासाहेबांच्या स्वागतासाठी स्वतः शाहूमहाराज उपस्थित होते. गुरूजीनांही त्यांनी बोलावून घेतले होते. महाराजांनीच गुरूजींची बाबासाहेब बरोबर ओळख करून दिली होती. सांगलीत एका खटल्याच्या कामासाठी बाबासाहेब आले होते. सिध्दार्थ नगर परिसरात त्यांनी यावे व लोकांशी बोलावे.

अशी गुरूजींनी विनंती केली. सांगलीतील प्रख्यात कायदेपंडीत केशवराव चौगुले बाबासाहेब बरोबर होते. खटल्याचे काम संपताच बाबासाहेबांनी मोटार सिध्दार्थ नगरच्या दिशेने घ्यायला सांगितली. प्रचंड उत्साह आणि आनंद अशा वातावरणात बाबासाहेबांचे स्वागत झाले. गुरूजींना धन्यता वाटली. मा. सो. कांबळे (गरूजी) – आंबेडकरी चळवळीसाठी ज्यांनी आपली सारी हयात घालविली, बौध्द धम्माचा प्रचार प्रसार

करण्यासाठी ते रात्रंदिवस राबले. अशा बुजुर्ग कार्यकर्त्यात मा. सो. कांबळे गुरूजी यांचे कार्यकर्तृत्व फार मोठे आहे. ते आजच्या पिढीला फारसे माहित नाही.[१३]

**मा. सो. कांबळे** – (जन्म : २३–८–१९११)

यांचा जन्म २३–८–१९११ रोजी सांगली जिल्ह्यातील कवलापूर या गावी एका अत्यंत गरीब अशा कुटुंबात झाला. आईवडील मोलमजुरी करायचे. काबाडकष्टात दिवस काढावयाचे. तरीही त्यांनी आपल्या मुलाचे नाव शाळेत घातले. त्यावेळी ग्रामीण भागात कडक अस्पृश्यता पाळली जात होती. मा. सो. कांबळें यांना वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागे. त्या काळात शिक्षणाचे एवढे महत्व नव्हते. अस्पृश्य समाजात तर नव्हतेच नव्हते. परंतु मा. सो. कांबळे यांनी जिद्दीने शिक्षण घेतले.

इयत्ता सातवीत असताना सांगली जिल्ह्यातील शैक्षणिक साहित्य प्रदर्शनात १९२१ मध्ये मा.सो. कांबळे यांना उत्कृष्ट हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम पुरस्कार मिळाला होता. सातवी इयत्ता पास होताच सांगली संस्थान कार्यालयात त्यांना बोलावून वयाच्या सतराव्या वर्षी प्राथमिक शिक्षकाची नोकरी दिली. बुधगाव येथील शिक्षक ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षक असताना त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली.

यातूनच लेखनाची उर्मी आली आणि ते साहित्य लेखनाकडे वळले.

या दरम्यानच्या काळात लेखनाबरोबरच शुध्द भाषा बोलण्याची व वर्क्तृत्व कला त्यांनी आत्मसात केली. नोकरी करता करता साहित्य विशारद हिंदी भाषारत्न या परीक्षाही प्रथम श्रेणीत पास झाले. या दरम्यानच त्या काळच्या रिवाजानुसार कमी वयातच ते विवाहबध्द झाले. अस्पृश्य समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय झाला होता .त्यांच्या सभा, भाषणांनी सारा समाज भारावून गेला होता. मा.सो. कांबळेही आंबेडकरी चळवळीतले एक कार्यकर्ते म्हणून कार्य करू लागले होते. त्या काळात शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचा दबदबाही होता. तसेच समता सैनिक दलाचेही कार्य जोमाने सुरू झाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज जागृतीसाठी जनता, मूकनायक, बहिष्कृत, भारत ही वृतपत्रे संपादित केली होती. ती मिळवून मा. सो. कांबळे गुरूजी गावागावात बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार करू लागले. शुध्द भाषा व रसाळ वाणी असल्यामुळे त्यांचा जनमानसावर प्रभाव पडत असे. त्या काळात प्रवासाची साधने नव्हती. तरी सुध्दा प्रत्येक गावी मैलोन मैल चालत जावून आंबेडकरी चळवळ व बाबासाहेबांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्याचा ते आटोकाट प्रयत्न करू लागले.

शिक्षकी पेशात असताना तरूणपणी सांगली येथे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालविलेल्या बालअपंग शाळेत तीन वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केली. या दरम्यान माधवनगरचे डॉ. कृ. पा. बापट या सेवाभावी समाजसेवकाशी ओळख झाली. त्यांच्या गोरगरीबांच्या सेवेने प्रभावीत होवून 'लागाबांधा' हे पुस्तक लिहिले. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वावर 'दलितांचा हिरा' हे पुस्तक लिहिले. त्या काळात हे पुस्तक खूपच गाजले. इतके की या पुस्तकाच्या पाच आवृत्या हातोहात खपल्या. खरे तर या पुस्तकामुळेच लेखक म्हणून ते नावारूपाला आले.

यानंतर लेखन कार्यातही त्यांची उमेद वाढली. मग हिंदी व्याकरणावरचे त्यांनी हिंदी का घरेलू शिक्षक हे शिक्षकासाठी व विद्यार्थ्यासाठी अभ्यासक्रमात उपयुक्त ठरावे असे पुस्तक प्रकाशित केले. यानंतर माणुसकीचा पोशिंदा 'ज्ञानसागर डॉ. बाबासाहेब', 'शांतीदूत पं. जवाहरलाल नेहरू' डॉ.आंबेडकरांची उपदेश सुत्रे, दृष्टीदाता, डॉ. आंबेडकर, वेशीबाहेरचा महाराष्ट्र, चिरडलेल्या कळ्या , (कथासंग्रह ) शिवा –संभा कौलापूरकर अशी कितीतरी पुस्तके प्रकाशित केली आहेत. तरूणपणी लेखनाच्या छंदात झपाटल्या सारखे त्यांनी स्वतःला झोकून दिले होते.

मा. सो. कांबळे (गुरूजी) यांचे वेशीबाहेरचा महाराष्ट्र हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रातल्या अस्पृश्य समाजाचा धगधगता इतिहासच होय. एक संदर्भ म्हणून अजूनही साहित्यिक इतिहाससंशोधक या पुस्तकाचा उल्लेख आवर्जुन करतात.

कौलापूर म्हणजे महाराष्ट्रात लोकनाट्य कलावंत काळूबाळू यांचे गाव. या घराण्याच्या चार पिढ्या तमाशा क्षेत्रात आहेत. हा इतिहास पुस्तकरूपाने जतन करण्याचे कार्य कांबळे यांनी केले आहे. तमाशा या कलेचा एक संदर्भग्रंथ म्हणून या पुस्तकाचा संशोधकांना उपयोग व्हावा.

१९६३ साली सांगली येथे महाराष्ट्र बौध्द सभेचे एक भव्यदिव्य असे अधिवेशन संपन्न झाले होते. तीन दिवस चाललेल्या या संमेलनाचे उद्घाटन त्या काळातले सुप्रसिध्द, कादंबरीकार वि.स. खांडेकर यांनी केले होते. तर अध्यक्ष होते कथा कांदबरीकार ना. रा. शेंडे, संमेलनाचे नियोजन यशस्वीपणे मा.सो. कांबळे यांनी करून साऱ्या साहित्यिकांची वाहवा मिळविली होती.

राजकीय व सांस्कृतिक व्यासपीठावर तसे एकदिलाने एकत्र आले नाहीत. त्यानंतर काही महिन्यातच मराठवाडा विद्यापीठीच्या नामांतराचा प्रश्न आला.[१४]

**सामाजिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती –**

**डॉ. मोहन साबळे**

डॉ. साबळे हे पेशाने प्राध्यापक म्हणून काम केले असून सध्या ते रिटायर आहेत. त्यांनाही सामाजिक कार्याची चांगली आवड आहे. त्यांनी सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीतील विविध आंदोलने कशी घडून आलीत याचा सविस्तर खुलासा करून सांगितला. ही मुलाखत गुरुवार, दि. २५ जून २०१७ रोजी सायं. ५ ते ७ या वेळेत घेतली.

**मा. धो. ल. थोरात**

मा. थोरातसर हे पेशाने शिक्षक होते. सध्या रिटायर आहेत. त्यांची मुलाखत दि. २–१–२०१७ रोजी दुपारी सायं. ५ ते ७ यावेळेत घेतली. मुलाखतीतून असे निदर्शनास दिसून आले की, त्यांनीही सांगली जिल्ह्यात सामाजिक कार्य केलेले आहे. रिपब्लिकन पक्षाची सांगली जिल्ह्यातील कार्य त्यांनी कथन केली.

त्याचबरोबर निवडणुकीच्या काळामध्ये रिपब्लिकन पक्षाची लोकप्रियता कशी होती, याचीही माहिती देऊन भगवानराव पवार यांनी बंडखोरी केल्याचे सांगितले व पवारसाहेब पुन्हा काँग्रेसमधून निवडून आल्याचीही त्यांनी सांगितले. पुतळा उभारणीच्या कार्यातही त्यांचा मोलाचा वाटा होता हेही त्यांनी आपल्या मुलाखतीतून प्रकट केले. बापट वसतिगृहाविषयी माहिती सांगितली.

**प्रा. गौतमीपुत्र कांबळे**

प्रा. गौतमीपुत्र कांबळे हे उच्च विद्याविभुषित आहेत. ते सध्या रिटायर्ड आहेत. त्यांची मुलाखत सायंकाळी ४ ते ५ या वेळेत, सोमवार दि. ४–२–२०१७ रोजी घेतली. दलित चळवळीसंबंधी चर्चा करताना सांगलीतील आंदोलनाची  माहिती त्यांनी विस्तृत केली. विशेषकरून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या स्थापनेविषयी माहिती सांगितली.

**प्रा. डॉ. अमर पांडे**

प्रा. अमर पांडेसर कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातून प्राचार्य पदावरून रिटायर झालेले असून ते सामाजिक कार्यकर्तेही आहेत. त्यांची बुधवार, दि. १५ एप्रिल २०१७ रोजी सायं. ५ ते ७ या दरम्यान मुलाखत घेतली. त्यांनी सांगलीतील दलित पँथरच्या कार्याविषयी सविस्तर माहिती सांगितली.

**डॉ. मोहन कांबळे**

हे सध्या विलिंग्डन महाविद्यालय सांगली येथे इतिहास विभागात कार्यरत आहेत. सहयोगी प्राध्यापक म्हणून ते रूजू आहेत. त्यांची, मंगळवार, दि. १२–३–२०१७ रोजी मुलाखत घेतली. या दरम्यान त्यांनी सांगली जिल्ह्यातील वेगवेगळ्या झालेल्या आंदोलनाची माहिती दिली.

**श्री. जगन्नाथ ठोकळे –**

सांगलीतील आर. पी. आयचे जिल्हा अध्यक्ष तसेच सांगली कुपवाड मिरज महानगर पालिकेचे नगर सेवक म्हणून सध्या कार्यरत आहेत. ते वार्ड नंबर १६ मधून निवडून आलेले आहेत. त्यांनीही निवडणुक आर.पी. आय. या पक्षातून लढविली आहे.

जगन्नाथ ठोकळे यांनी बोरगाव दलित समाजातील व सवर्णामध्ये घडलेल्या जातीय संघर्षाबदल माहिती दिली. महारसमाजातील मुलगा सवर्ण समाजातील मुलीशी प्रेमसंबंध निर्माण झाले त्यातून तेथे दंगल झाली.

तसेच इतर सामाजिक कार्यकर्ते याविषयी माहिती दिली.

**श्री. किरणराज रघुनाथ कांबळे –**

माजी जिल्हा सरचिटणीस (भारतीय रिपब्लिकन पक्ष बहुजनमहासंघाचे प्रमुख नेते मा. प्रकाश आंबेडकर ) किरणराज कांबळे यांच्याशी चर्चा करताना त्यांनी रिपब्लिकन पक्षातील विविध गटांची माहिती सांगितली. त्यामध्ये रिपब्लिकन प्रकाश आंबेडकर गट, गवई गट, आठवले गट, बी.सी. कांबळे गट, राजा ढाले गट, तसेच डी. पी. आयचे नेते मच्छिंद्र सकटे, सुकुमार कांबळे इ. कार्यकर्ते या विषयी माहिती सांगितली.

दलित साहित्यिकाच्या बदल माहिती देताना शंकरराव खरात, मा. सु. कांबळे गुरूजी, काळूबाळू कवलापूरचे पी.टी. मधाळे, (दक्षिण सातारचा वाघ ) यल्लाप्पा धोंडी कांबळे , कवठेएकंद पीपल्स रिपब्लिकन पार्टी जोगेंद्र कवाडे गट वरही चर्चा केली.

**शिवलाल धनाजीराव वाघ (सरकारी ऑडिटर)**

नामकरण जयंतीच्या शुभहस्ते केलेले आहे. ही संस्था दलित विद्यार्थ्यांच्या हिताचे कार्य करत आहे. विशेष म्हणजे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन.

या अकॅडमीच्या कामाची वेळ सकाळी ९ ते १ व दुपारी ४ ते ६ अशी आहे. ही संस्था सांगलीत गुलाब कॉलनी, दक्षिण शिवाजी नगर येथे आहे. तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय देखील आहे.

**मा. विवेक कांबळे**

मा. कांबळेसाहेब हे राजकीय व सामाजिक कार्यकर्ते असून सांगलीतील विविध आंदोलने राजकारणातून त्यांचा प्रभाव दिसून येतो. त्यांची मुलाखत गुरुवार, दि. २५ एप्रिल २०१७ रोजी सायं. ४ ते ५.३० या दरम्यान घेतली. त्यामध्ये त्यांनी असे निदर्शनास आणून दिले रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे सांगली जिल्ह्यातील कार्याविषयी माहिती दिली.

## मा. गौतम लोटे

श्री. लोटे हे भारिप बहुजन महासंघ सांगली शाखेत कार्यरत आहेत. त्यांनी बऱ्याच आंदोलनामध्ये भाग घेतलेला आहे. दलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी धडाडीने कार्य करतात. अशी बऱ्याच प्रकारची अन्यायकारक घटनाविरोधी त्यांनी आवाज उठविलेला असून दलित समाजाला चांगली मदत झालेली आहे.

**मा. नितीन गोंधळी**

मा. गोंधळीसाहेब हे भारिप बहुजन महासंघाचे सांगली जिल्ह्यातील सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांनी दलितांच्या अन्यायाविरुध्द केलेली आंदोलनाची माहिती सांगितली. तसेच जिल्ह्यातील इतर सामाजिक व राजकीय घडामोडीविषयीही माहिती विषद केली. सदरची मुलाखत ही बुधवार, दि. १० मे २०१७ रोजी सायं. ५ ते ६ या दरम्यान घेतली.

**मा. श्रावस्ती वडमारे**

मा. वडमारे या सामाजिक कार्यकर्त्या असून, त्यांची मुलाखत मंगळवार, दि. २५ मे २०१७ रोजी घेतली. त्यांनी सांगली जिल्ह्यातील विविध दलित आंदोलनामध्ये, मोर्चामध्ये महिलांच्या सहभागाविषयी माहिती सांगितली.

**प्रा. सुकुमार कांबळे**

प्रा. कांबळे सर हे ज्युनिअर विभागाचे मानस शास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते सामाजिक कार्यकर्तेही आहेत. त्यांनी दलित चळवळीमध्ये प्रत्यक्ष कार्य केलेले असल्याने अनेक आंदोलनांची माहिती मुलाखतीमध्ये प्रकट केली. ही मुलाखत बुधवार, दि. ३० मे २०१७ रोजी घेतली.

**१) मुलाखती देणाऱ्याचे नावे**

**२) मुलाखत देणाऱ्याचे शिक्षण –**

| अ.क्र. | प्रतिसादक | पीएच. डी. | एम. फिल | पदव्युत्तर | पदवी | इतर | शेकडा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | ०२ | ०० | २० | १९ | १३ | ५४ |
| | | ३.७०% | ०० | ३७.०४% | ३५.१९% | २४.०७% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून उच्चशिक्षित मुलाखत देणाऱ्यांची संख्या अधिक आहे

**३) धंदा/व्यवसाय –**

| अ.क्र. | प्रतिसादक | प्राध्यापक शिक्षक | सामाजिक कार्यकर्ते | शिक्षण | शेती | मजूर | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | ११ | ०५ | १२ | ०१ | ०१ | २४ | ५४ |
| | ५४ | २०.३५% | ९.२५% | २२.२% | १.८५% | १.८५% | ४४.४% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून असे निरीक्षण दिसते की शिक्षण घेणारे व इतर व्यवसाय करणारे प्रतिसादक जास्त आहेत.

### ४) डॉ. आंबेडकरी चळवळीशी संबंध –

| अ.क्र. | प्रतिसादक | स्वतःची संस्था | संघटनाद्वारे कार्य | दलित लेख साहित्य | प्रबोधन | राजकीय व्यक्तीबरोबर कार्य | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | ५ | २० | १९ | १३ | ०१ | ०० | ५४ |
| | | ९.२५% | ३७.०४% | ३५.१९% | २४.१९% | १.८५% | ०० | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून आपणास असे निदर्शनास येते की, आंबेडकरी चळवळीशी संबंधित असणारे व संघटनाद्वारे साहित्य लेखनाद्वारे कार्य करणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

### ५) डॉ. आंबेडकर चळवळीतील कार्य –

| अ.क्र. | प्रतिसादक | सामाजिक प्रबोधन | मार्गदर्शन | जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यात सहभाग | मोर्चा आंदोलने आदी | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | १५ | १० | १२ | ८ | ९ | ५४ |
| | | २७.७५% | १८.५% | २२.२% | १४.८% | १६.६५% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की सामाजिक प्रबोधन व जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यातून आंबेडकरी चळवळीचे कार्य करणारे प्रतिसाद अधिक आहेत.

### ६) वाचन लेखन –

| अ.नं. | प्रतिसादक | वर्तमान पत्रातून | आंबेडकरी साहित्य | शिक्षणाशी संबंधित | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | २२ | १८ | १० | ०४ | ५४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ४०.७% | ३३.३% | १८.०५% | ७.४% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारवणीवरून असे निदर्शनास येते की वर्तमान पत्रातून व आंबेडकरी साहित्यातून वाचन, लेखन करणारे प्रतिसादक अधिक आहेत.

**७) सांगली जिल्ह्यात दलितोध्दारक कार्य –**

| अ.नं. | प्रतिसादक | गोरगरीब दलितांना मदत | सामजिक संघटनांना मदत | दलित विद्यार्थ्यांना मदत | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | १५ | २० | १० | ९ | |
| | | २७.७५% | ३७% | १८.५% | १६.६५% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, वर्तमान पत्रातून व आंबेडकरी साहित्यातून वाचन लेखन प्रतिसादक अधिक आहेत.

**८) अन्यायी मोर्चाचे नेतृत्व किंवा सहभाग –**

| अ.क्र. | प्रतिसादक | सहभागी असणारे | एकूण |
|---|---|---|---|
| १ | ५४ | ५४ | ५४ |
| | | १००% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की अन्यायी मोर्चाचे नेतृत्व किंवा सहभाग हा सर्वच जण नोंदवितात.

**९) उल्लेखनीय कार्य –**

| अ.नं. | प्रतिसाद | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मदत | दलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य | कायद्याची अंमल–बजावणी कडक होण्यासाठी प्रयत्न | शिष्य वृत्तीसाठी प्रयत्न | रास्ता रोको, मोर्चा | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | ५४ | १७ | १० | ०५ | १० | १२ | ५४ |
| | | | ३१.४५% | १८.५% | ९.२५% | १८.५% | २२.२% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की दलितावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या अधिक आहे.

**१०) दलितावर होणाऱ्या अन्यायात सध्याचे कायदे पुरेसे आहेत का?**

| अ.नं. | प्रतिसादक | नाही | होय | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ५४ | ५४ | ०० | ५४ |
| | | १००% | ०० | १००% |

**निरीक्षण –**

दलितांवर होणाऱ्या अन्यायाला सध्याचे कायदे पुरेसे आहेत असे कोणालाही वाटत नाही.

**११) भावी काळात दलित समाजाचा उध्दार होण्यासाठीच्या उपाययोजना**

| अ.नं. | प्रतिसादक | ऐक्यावर भर | कडक कायदे | शिक्षण, स्पर्धा परीक्षा | स्त्री शिक्षण | स्वयंरोजगार | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | १० | ०४ | २० | ०८ | १० | ०२ | ५४ |
| | | १८.०५% | ७.४% | ३७% | १४.८% | १८.०५% | ३.७% | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की ऐक्यावर भर, शिक्षण, स्पर्धा परीक्षा व स्त्री शिक्षणाच्या वाढीनेच दलितांचा उध्दार होऊ शकतो, असे बहुतानश प्रतिसादकांना वाटते.

**१२) दलित संघटनेत सहभाग केव्हापासून?**

| अ.नं. | प्रतिसादक | १९६१–८० | १९८१–२००० | २००१–२०१७ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५४ | १ | १५ | ३८ | ५४ |
| | | १.८५% | २७.७५% | ७०.०३% | १००% |

**निष्कर्ष –**

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, २००१ ते आजपर्यंत दलित चळवळीत सक्रिय सहभाग असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या अधिक आहे.

**१३) सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ यशस्वी झाली असे वाटते?**

| अ.नं. | प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ५४ | २८ | २६ | ५४ |
| | | ५१.८% | ४८.२% | १००% |

**निष्कर्ष –**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ यशस्वितेबद्दल अजूनही ४८ टक्के लोकांना खात्री वाटत नाही.

**१४) सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीत प्रामाणिकपणे काम करणारे कार्यकर्ते –**

| अ.नं. | प्रतिसादक | प्रा. गौतमीपुत्र कांबळे, | डॉ. सुधीर बनसोडे, | यशवंत खरात, राजू | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रा. सुकुमार कांबळे, विवेक कांबळे, डॉ. राजू सावंत, किरण कांबळे | श्रावस्ती वडमारे, नितीन गोंधळे, प्रा. योगेश्वर किर्तीकर | गोंधळे, अशोक सकटे, अशोक कांबळे | | |
| १ | ५४ | २२ | ०४ | ११ | १७ | ५४ |
| | | ४०.७% | ७.४% | २०.३५% | ३१.४५% | १००% |

**निष्कर्ष –**

वरील सारणीवरून असे दिसते की दलितोध्दारासाठी कार्य करणाऱ्या अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या बद्दल प्रतिसादकांना माहिती आहे. तसेच प्रा. गौतमीपूत्र कांबळे, प्रा. सुकुमार कांबळे, विवेक कांबळे, प्रा. मोहन साबळे, धो. ल. थोरात, डॉ. राजू सावंत, प्राचार्य डॉ. अमर पांडे, जगन्नाथ ठोकळे, भिमराव जाधव यांना कार्याची माहिती अधिक आहे.

**समारोप–**

या प्रकरणामध्ये संशोधकाने सांगली जिल्ह्यातील दलित कार्यकर्ते, साहित्यिक व इतर व्यक्तिंच्या कार्याचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ॲड. बी. सी. कांबळे, राजा ढाले, रामदास आठवले, नामदेव ढसाळ, आ. सुधीर गाडगीळ, प्रा. अरुण कांबळे, डॉ. घोबले, तुकाराम ऊर्फ आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, माधव मोडक, वामन होवाळ, शिवराम तिरमारे गुरुजी, नाजूका, मा. सो. कांबळे, जगन्नाथ ठोकळे, किरणराज कांबळे, डॉ. अमर पांडे, डॉ. राजू सावंत, प्रा. पी. बी. पाटील इत्यादी सांगली जिल्ह्यातील साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते यांच्या कार्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित युवकांसमोर स्वाभिमान व अन्यायाविरुध्द लढण्याची क्षमता कशी निर्माण केली पाहिजे यादृष्टीने त्यांचे विचार, त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी ठरलेले दिसून येते. त्याचाच परिणाम आज सांगली जिल्ह्यातील दलित युवक दिशादर्शक विचाराने पुढे येऊ लागला. यादृष्टीने या

संशोधनामध्ये सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीच्या माध्यमातून डॉ. अमर पांडे यांच्यासारखे महान नेतृत्व दलित चळवळीला व दलित युवकांना पुढे नेण्यास प्रेरक व स्फूर्तिदायक ठरले.

**प्रकरण संदर्भ –**


१) बहिष्कृत भारत, २१ डिसेंबर १९२८, अंक ३ रा, पान नं. २०५

२) कांबळे बी. सी. (अॅड.) समग्र आंबेडकर चरित्र, खंड १, द्वितीय आवृत्ती, ६ डिसें. २००६, पान नं. २७.

३) अंबपकर जी. बी., (प्रा.), राजा ढाले यांच्या ज्वलंत मुलाखती, प्र. आ., विचारधारा प्रकाशन, कोल्हापूर. ३० सप्टें. २०१४, पान नं. ७.

४) महाराष्ट्र विधान मंडळ, विधानसभा, विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय १९८०–८५, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई १९८२. पान नं. २२

५) नामदेव ढसाळ, दलित पँथरची भूमिका, पँथर प्रकाशन, १९७६, पान नं. १५

६) गुरव बाबुराव, प्रकाश विश्वासराव लोकवाङमय गृह, भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५, आवृत्ती दुसरी, ऑगस्ट १९९६. पान नं. २५

७) पानतावणे गंगाधर (प्रा.), विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, नागपूर १९९८, पान नं. ३०

८) बहिष्कृत भारत, ४–११–१९२७, अंक १४, पान नं. १२२.

९) दै. लोकमत, २४ फेब्रुवारी २००८, पान ६

१०) दै. सम्राट, मा. सो. कांबळे (गुरुजी) मुंबई, १९९३ पान नं. २

११) पानतावणे गंगाधर (संपा.) (प्रा.), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडख पुरस्कृत, अस्मितादर्श, कार्यालय औरंगाबाद, १९९६, पान नं. १७

१२) पानतावणे गंगाधर (प्रा.), विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, नागपूर १९९८, पा नं. ३६

१३) आटपाडी कॉलेज आटपाडी स्मरणिका पान ७१, ९ व १० फेब्रु. २००८

१४) दै. सकाळ, दि. ११ ऑक्टो. १९९७, पान ३

## प्रकरण ६ वे

# सांगली जिल्ह्यातील राखीव आमदारांचे दलित उध्दारक कार्य

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला आणि भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी घटना समिती स्थापन झाली. मसुदा समितीचे अध्यक्ष जागतिक किर्तीचे प्रज्ञावंत व दलितांचे कैवारी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले आणि दोन वर्षात अव्याहतपणे काम करून भारतीय राज्य घटना तयार झाली व २६ जानेवारी १९५० ला भारतीय संसदेने घटना स्विकारून भारतीय गणराज्य अस्तित्वात आले.

१९५२ ला नवीन राज्य घटनेप्रमाणे भारतात पहिली विधानसभा व लोकसभा यांची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि तेव्हापासून ते आजतागायत भारतात सर्वसाधारणपणेदर पाच वर्षाने निडणुका होऊ लागल्या आणि भारतीय राज्यघटनेत दलित मागासलेल्या भटके विमुक्त अशा वेगवेगळ्या घटकांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या. प्रत्येक जिल्ह्यात एक किंवा दोन राखीव जागा विधानसभेच्या ठेवण्यात आल्या होत्या. त्याचा प्रमुख उद्देश म्हणजे त्या जिल्ह्यातील किंवा त्या भागातील दलित मागासलेल्या लोकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे व शासन दरबारी होणाऱ्या योजना त्या लोकांपर्यंत पोहोचतात की नाही किंवा दलितावर भटक्या विमुक्ती जातीवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करणे हे राखीव आमदारांचे राखीव संसद सदस्याचे प्रमुख कर्तव्य घटनेमध्ये नमूद केलेले होते.

१९५२ व १९५७ ला भारतात पहिल्या दोन सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यावेळी स्वतंत्र सांगली जिल्हा अस्तित्वात नव्हता. त्यातील काही भाग दक्षिण सातारा म्हणून ओळखला जात होता. तर काही भाग संस्थानिकांच्याकडे होता व १९६० पूर्वी सांगली जिल्ह्याचा सर्व भाग दक्षिण सातारा म्हणून ओळखला जात होता.

सांगलीचे सर्वेसर्वा व काँग्रेसचे एक प्रमुख नेते, थोर स्वातंत्र्यसैनिक कै. वसंतरावदादा पाटील आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रयत्नाने सांगली हा १९ नोव्हेंबर १९६० महाराष्ट्राच्या नकाशावर नवीन सांगली जिल्हा अस्तित्वात आला.

१९६२ ची तिसरी सार्वत्रिक निवडणूक झाली तेव्हापासून ते आजअखेर सांगली जिल्ह्यात एक किंवा दोन जागा ह्या राखीव ठेवण्यात आल्या होत्या व आजही आहेत. माझ्या अभ्यासाचा कालखंड १९६० ते २००० हा असून या कालावधीत प्रामुख्याने 'जत' हा सांगली जिल्ह्यातील अति पुर्वेकडील व कायमदुष्काळी असणारा तालुका राखीव म्हणून ठेवण्यात आला होता व आजही आहे. तेथून नेहमी राखीव आमदाराचे निवडून असे व काही वेळा विटा हा विटा–खानापूर (खानापूर तालुका) आहे. मतदार संघ राखीव ठेवलेला दिसतो. सांगली जिल्ह्यातील या दोन तालुक्यातून राखीव आमदार निवडून येत असत व त्यांनी सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ चालू होती. तसेच दलितांचे हक्क शाबूत राहण्यासाठी कायमपणे सहकार्य केलेले दिसते. बऱ्याच वेळा ज्या त्या वेळी दलितावर अन्याय होतील, त्यावेळी त्यांनी विधानसभेत प्रश्न विचारून शासनाचे लक्ष दलित समस्यांकडे वेधून घेतलेले आहे व त्या समाजावर होणाऱ्या अन्यायाची बाजू विधानसभेत समर्थपणे मांडलेली दिसते.

सर्वसाधारणपणे १९६० ते २००० या कालखंडातील महाराष्ट्र विधानसभेचे डिबेटस् खंड व संबनधित राखीव आमदारांच्याकडून मिळणारी माहिती तसेच त्यांची चरित्रे (विधानसभा सदस्य चरित्र कोश यातून मिळणारी माहिती वरून राखीव आमदारांची, सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीचे काय योगदान होते हे दिसून येते. म्हणून ह्या प्रकरणात त्या काळातील राखीव आमदारांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात उहापोह पुढे केला आहे.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला आणि भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी घटना समिती स्थापन झाली. मसुदा समितीचे अध्यक्ष जागतिक किर्तीचे प्रज्ञावंत व दलितांचे कैवारी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले आणि दोन वर्षात अव्याहतपणे काम करून भारतीय राज्य घटना तयार झाली व २६ जानेवारी १९५० ला भारतीय संसदेने घटना स्विकारून भारतीय गणराज्य अस्तित्वात आले.

१९५२ ला नवीन राज्य घटनेप्रमाणे भारतात पहिली विधानसभा व लोकसभा यांची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि तेव्हापासून ते आजतागायत भारतात सर्वसाधारणपणेदर पाच वर्षाने निडणुका होऊ लागल्या आणि भारतीय राज्यघटनेत दलित मागासलेल्या भटके विमुक्त अशा वेगवेगळ्या घटकांसाठी राखीव

जागा ठेवण्यात आल्या. प्रत्येक जिल्ह्यात एक किंवा दोन राखीव जागा विधानसभेच्या ठेवण्यात आल्या होत्या. त्याचा प्रमुख उद्देश म्हणजे त्या जिल्ह्यातील किंवा त्या भागातील दलित मागासलेल्या लोकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे व शासन दरबारी होणाऱ्या योजना त्या लोकांपर्यंत पोहोचतात की नाही किंवा दलितावर भटक्या विमुक्ती जातीवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करणे हे राखीव आमदारांचे राखीव संसद सदस्याचे प्रमुख कर्तव्य घटनेमध्ये नमूद केलेले होते.

१९५२ व १९५७ ला भारतात पहिल्या दोन सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यावेळी स्वतंत्र सांगली जिल्हा अस्तित्वात नव्हता. त्यातील काही भाग दक्षिण सातारा म्हणून ओळखला जात होता. तर काही भाग संस्थानिकांच्याकडे होता व १९६० पूर्वी सांगली जिल्ह्याचा सर्व भाग दक्षिण सातारा म्हणून ओळखला जात होता.

सांगलीचे सर्वेसर्वा व काँग्रेसचे एक प्रमुख नेते, थोर स्वातंत्र्यसैनिक कै. वसंतरावदादा पाटील आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रयत्नाने सांगली हा १९ नोव्हेंबर १९६० महाराष्ट्राच्या नकाशावर नवीन सांगली जिल्हा अस्तित्वात आला.

१९६२ ची तिसरी सार्वत्रिक निवडणूक झाली तेव्हापासून ते आजअखेर सांगली जिल्ह्यात एक किंवा दोन जागा ह्या राखीव ठेवण्यात आल्या होत्या व आजही आहेत. माझ्या अभ्यासाचा कालखंड१९६० ते २००० हा असून या कालावधीत प्रामुख्याने 'जत' हा सांगली जिल्ह्यातील अति पुर्वेकडील व कायमदुष्काळी असणारा तालुका राखीव म्हणून ठेवण्यात आला होता व आजही आहे. तेथून नेहमी राखीव आमदाराचे निवडून असे व काही वेळा विटा हा विटा–खानापूर (खानापूर तालुका) आहे. मतदार संघ राखीव ठेवलेला दिसतो. सांगली जिल्ह्यातील या दोन तालुक्यातून राखीव आमदार निवडून येत असत व त्यांनी सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ चालू होती. तसेच दलितांचे हक्क शाबूत राहण्यासाठी कायमपणे सहकार्य केलेले दिसते. बऱ्याच वेळा ज्या त्या वेळी दलितावर अन्याय होतील, त्यावेळी त्यांनी विधानसभेत प्रश्न विचारून शासनाचे लक्ष दलित समस्यांकडे वेधून घेतलेले आहे व त्या समाजावर होणाऱ्या अन्यायाची बाजू विधानसभेत समर्थपणे मांडलेली दिसते.

सर्वसाधारणपणे १९६० ते २००० या कालखंडातील महाराष्ट्र विधानसभेचे डिबेटस् खंड व संबनधित राखीव आमदारांच्याकडून मिळणारी माहिती तसेच त्यांची चरित्रे (विधानसभा सदस्य चरित्र कोश यातून मिळणारी माहिती वरून राखीव आमदारांची, सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीचे काय योगदान होते हे दिसून येते. म्हणून ह्या प्रकरणात त्या काळातील राखीव आमदारांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात उहापोह पुढे केला आहे.

सांगली जिल्ह्यातील विटा व जत हे दोन राखीव मतदार संघ १९५२ ते आज तागायत दिसतात. ह्या मतदार संघातून निवडून आलेल्या आमदारांनी दलित चळवळीस सहकार्य व मार्गदर्शन करून दलित समाजाचे प्रश्न महाराष्ट्र विधानसभेत मांडलेले दिसतात. त्यांचाही वृत्तांत आपणास विधानसभेच्या डिबेटसमध्ये वेळोवेळी दिसतो, त्याची माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

| **आमदारांची नावे** | **कार्यकाळ** |
|---|---|
| १) पिराजीराव तायापराव मधाळे (पी. टी. मधाळे) | |
| २) शिवरुद्र बामणे | १९६७ ते १९७२ |
| ३) सोहानी जयवंत ईश्वर | १९७८ ते १९८० |
| ४) उमाजी धनाप्पा सनमडीकर | १९८५ ते १९९० |
| ५) मधुकर शंकर कांबळे | १९९५ |
| ६) उमाजी धनाप्पा सनमडीकर | १९९९ |
| ७) भगवानराव लालासोा पवार | |

महाराष्ट्रात २८८ विधानसभा मतदार संघ आहेत. त्यापैकी २९ मतदार संघ अनुसूचित जातीसाठी आहेत. या मतदार संघातून निवडून आलेल्या आमदारांची थोडक्यात माहिती व त्यांनी मागासवर्गीयांसाठी केलेले कार्य मांडत आहे.

### १) पिराजीराव तायापराव मधाळे (पी. टी. मधाळे)

**पूर्वचरित्र –**

स्वातंत्र्यपूर्व काळातील व सांगली जिल्हा निर्मितीपूर्वीचे राखीव आमदार म्हणून मधाळे यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. आबांचा (मधाळे) जन्म – वारणा खोऱ्यातील शिगाव, ता. वाळवा जि. सांगली. येथे इ. स. १९०२ साली गरीब शेतकरी कुटुंबात झाला. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असताना त्यांनी समाजकार्याचे धडे गिरविले. मोर्चे, धरणे, आंदोलने, निषेध सभा, संमेलनासाठी अनेक मैल पायपीट करीत गावोगावी फिरले. त्या काळी त्यांना दलित समाजाचे दुःख, हालअपेष्टा, अज्ञानीपणा, अंधश्रध्दा, उपासमारी, बेघर, तुच्छ वागणूक, प्रत्यक्षात दिसली, अनुभवली. मात्र स्कूल बोर्डाच्या शाळेत सातवी पास झाल्यावर घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षणासाठी कामधंद्यासाठी कोल्हापूरला मावशीकडे राहिले.

**राजर्षि शाहू महाराजांच्या सहवासात –**

इ. स. १९२०–२१ चा काळ. छ. शाहू महाराजांच्या कोल्हापूर संस्थानातील परिवर्तनाचा काळ. सर्व बहुजन समाजासाठी त्यांनी आपले संस्थान खुले केले होते. त्याचवेळी मधाळे आबांनी छ. शाहू महाराजांच्या दरबारात फौजदार म्हणून नोकरी पत्करली. त्याचकाळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नुकतेच बॅरिस्टर होवून मायदेशी आले होते. छ. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या संस्थानात सत्कारासाठी बोलावले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संपूर्ण व्यवस्था करण्यासाठी कार्यकुशल असलेल्या पी. टी. मधाळे यांच्यावर जबाबदारी सोपविली.[१]

**पन्हाळ गडावर डॉ. आंबेडकरांची पहिली भेट–**

आपल्या समाजातील डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक तळमळीविषयी पेपर वाचून ऐकून होते व साक्षात त्यांचीच व्यवस्था करण्याचा योगायोग पन्हाळगडावरील शासकीय विश्रामधामात प्रत्यक्षात होतोय, याचा आनंद झाला. छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांच्या मुक्कामाच्या भेटीतील भारतातील सामाजिक, धार्मिक,

विषमतेबाबतची वैचारिक खलबते, चर्चा, अत्यंत जवळून पाहण्याचा, ऐकण्याचा व चर्चेत सहभागी होण्याचा योग आला व त्यांनी या सामाजिक क्रांतीच्या लढ्यात स्वतःला झोकून देण्याचा ठाम निर्णय घेवून त्याचक्षणी मधाळेआबांनी आपल्या नोकरीचा राजीनामा छ. शाहू महाराजांकडे सुपुर्द केला व डॉ. आंबेडकरांच्या सोबत कर्नाटक राज्यातील चिकोडी, निपाणी, धारवाड येथील सभांना हजर राहून आपल्या सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. बाबासाहेब यांच्या नेतृत्वाखाली परिवर्तनशील समताप्रणित समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या लढ्यात क्रांतीकारी चळवळ अधिक तीव्र करण्यासाठी प. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कडेकपारीत खेड्यापाड्यात कार्यकर्त्यांचे जाळे तयार करून डॉ. आंबेडकरांच्या सभा आयोजित करून क्रांतीचे बीज पेरण्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली.[२]

**माणगाव परिषद –**

शाहू महाराजांच्या आदेशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील माणगाव परिषद यशस्वी करण्यासाठी प्रचंड कष्ट घेवून जनजागृती करून गावागावातील माणूस जागा करून लाखोंच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वास प्रोत्साहित केले. त्याचवेळी अस्पृश्यांच्या मुक्तीचे रणशिंग फुंकले. शाहू महाराजांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मधाळे आबांच्या संघटन कौशल्याबद्दल गौरव करून डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या लढ्यास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे जाहीर केले.

**सत्याग्रहात सहभाग –**

२० मार्च १९२७ महाडच्या चवदार तळ्यासाठी सत्याग्रह करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आपल्या प्रमख कार्यकर्त्यांना हाक दिली. त्यावेळी मधाळेआबांनी आपल्या हजारो कार्यकर्त्यांना सोबत घेवून परिस्थितीवर मात करीत, तब्बल तीन दिवस डोंगरकपाऱ्या तुडवीत महाड गाठले. सत्याग्रहसमयी डॉ. आंबेडकरांसोबत आघाडीवर असणाऱ्या मधाळे आबांना दगडधोंड्यांचा मार खावा लागला. इ. स. १९३० च्या नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशामध्येसुध्दा मधाळे आबांना लाठीमार सोसावा लागला. परंतु अनेक हालअपेष्टा

सोसूनदेखील चळवळीपासून बाजूला गेले नाहीत. उलट डॉ. बाबासाहेबांच्या सानिध्यामध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व झुंझार होत चालले होते.

**पुणे सत्याग्रह, तुरुंगवास –**

पुण्याच्या सत्याग्रहामध्ये मधाळे आबा आघाडीवर होते. कौन्सिल हॉलवर मधाळे आबांच्या तुकडीने उग्र निदर्शने करून तेथील संरक्षण व्यवस्थेची त्रेधातिरपीट केली होती. तेव्हा गोप्या सार्जंट पोलीस अधिकाऱ्यांनी त्याच्यावर बेछूट लाठीचार्ज करून त्यांना जखमी करून आबासहित शेकडो कार्यकर्त्यांना पंधरा दिवस तुरुंगात ठेवले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पालन करणारे होते.

इ. स. १९३९ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली अंकलखोप, ता. तासगाव जि. सांगली येथे सवर्ण समाजाच्या बालेकिल्ल्यात तमाम दलित बांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी जातीवादाला खिंडार पाडण्यासाठी विद्यार्थी युवक महिलांना चळवळीची दिशा देण्यासाठी लाखोंच्या उपस्थितीत ही परिषद आयोजित केली होती. परंतु सवर्णांनी मोठा विरोध केला होता. त्याला न जुमानता हजारो तरुणांचे समात, सैनिक दल निर्माण करून डॉ. आंबेडकरांच्या जीवितास धोका होऊ नये म्हणून स्वतः अंगरक्षक होवून गावाच्या वेशीपासून सभेच्या विचारमंचापर्यंत डॉ. आंबेडकरांना कुऱ्हाडी–भालेबरची काठीच्या कमानीच्या जयघोषात विचार पिठाकडे नेण्यात आले. या त्यांच्या धाडशी कामगिरीबद्दल लाखोंच्या जनसमुदायास मार्गदर्शन करताना मधाळेआबांचा माझा 'दख्खनचा वाघ' म्हणून सार्थ गौरव केला.[३]

**स्वतंत्र मजूर पक्ष संघटनेतील सहभाग –**

डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून तळगाळातील सर्वसामान्य जनतेपर्यनत पोहोचून त्यांना आपल्या हक्कासाठी प्रवृत्त केले. समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही हे ओळखून राजकीय नेते कार्याला लागले. शेतकरी कामगारांच्या चळवळींना विधायक स्वरूप देण्यासाठी सर्व कार्यकर्ते कार्यरत होते. पक्षाचे

राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून ते कार्यरत राहिले. पक्षाच्या माध्यमातून मधाळे आबांनी शेकडो मेळावे घेतले. ग्रामीण समस्या सरकारपुढे मांडल्या.

१९५३ च्या वारणेच्या पुरात दलितांचे प्रचंड नुकसान झाले. त्याची दखल घेऊन आबांनी या दीनदलितांना सरकारकडून मदत मिळविली.

महारवतनी जमीन – जन आंदोलन डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर संपूर्ण आंबेडकरी चळवळीची सूत्रे रिपब्लिकन पक्षाच्या सतरा आमदार व खासदारावर येवून पडली. दादासाहेब गायकवाड, पी. टी. मधाळे आणि सर्व नेत्यांनी लढा तीव्र केला. धरणे, मोर्चे, आंदोलनांनी सरकारला जेरीस आणले. अखेर दलित बांधवांना महारवतनी इनामी जमिनी मिळवून देण्यात इतर नेत्याप्रमाणे मधाळे आबांचा सिंहाचा वाटा होता. ते शेवटपर्यंत आंबेडकरवादीच राहिले.

**२. शिवरुद्र ठ. बामणे –**

स्वतंत्र सांगली जिल्हा असित्वात आलेनंतर जत हा राखीव मतदार संघ निर्माण झाला. त्याचे प्रतिनिधीत्व (१९६७–१९७२) बामणे यांनी केले. बामणे यांनी सांगलीतील दलित चळवळीस पहिल्यापासून सहकार्य कले. तसेच ज्या–त्या वेळी दलित मोर्चे, आंदोलने निघतील, त्यावेळी त्यांनी नेतृत्व केलेले आहे. विधानसभेत दलितावरील अन्यायास वाचा फोडलेली आहे. एक सत्वशील, सज्ञन आमदार म्हणून सांगली जिल्ह्यात त्यांना मानाचे स्थान होते.

स्वतंत्र सांगली जिल्हा असित्वात आलेनंतर जत हा राखीव मतदार संघ निर्माण झाला. त्याचे प्रतिनिधीत्व (१९६७–१९७२) बामणे यांनी केले. बामणे यांनी सांगलीतील दलित चळवळीस पहिल्यापासून सहकार्य कले. तसेच ज्या–त्या वेळी दलित मोर्चे, आंदोलने निघतील, त्यावेळी त्यांनी नेतृत्व केलेले आहे. विधानसभेत दलितावरील अन्यायास वाचा फोडलेली आहे. एक सत्वशील, सज्ञन आमदार म्हणून सांगली जिल्ह्यात त्यांना

मानाचे स्थान होते. इ. स. १९६७ ला इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षातून आमदारकीची निवडणूक लढवून विरोधी उमेदवार कांबळे अण्णा कृष्णा (आरपीआय) यांचा पराभव करून विधानसभेत प्रवेश केला.

**पूर्वचरित्र –**

कार्य – महाराष्ट्र विधानसभेतील प्रश्न उत्तरात सहभाग घेतलेला दिसतो.

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी नियुक्त केलेल्या आयुक्तांच्या अहवालावर चर्चा

२) जत तालुक्यात यल्लाप्पा गणू बामणे यांचा खून झाल्याची तक्रार (३०–३–७६) श्री. शि. ठ. बामणे (जत) सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा विचार करतील काय?

अ) जत तालुक्यातील उमराणी भागात यल्लाप्पा गणू बामणे यांचा खून करण्यात आल्यानंतर जानेवारी १९७६ मध्ये पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय?

ब) असल्यास सदरहू तक्रारीची चौकशी करण्यात आली आहे काय?

क) असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताविरुध्द काय कारवाई करण्यात आली?[४]

**३) सोहानी जयवंत ईश्वर –** (१९६२–१९६७)

स्वतंत्र सांगली जिल्हा अस्तित्वात १९६० ला आल्यानंतर १९६२ ची विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आणि जत हा राखीव मतदार संघ निर्माण झाला. सोहानी हे स्वतंत्र सांगली जिल्ह्याचे पहिले राखीव आमदार होण्याचा मान त्यांना मिळाला. नुकतीच दलित चळवळ सांगली जिल्ह्यात सुरू झाली. बऱ्याच वेळा त्यांनी चळवळीचे नेतृत्व केले व दलित नेत्यांना सहकार्य केले, त्यांचा परिचय पुढीलप्रमाणे –

**पूर्वचरित्र –**

सोहानी श्री. जयवंत ईश्वर यांचा जन्म १५ मार्च १९६३ मध्ये नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील पहिणे या गावी झाला. त्यांनी बी. ए. एल. एल. बी. पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा येतात. त्यांना समाजसेवेची विशेष आवड आहे. ते वकिलीचा व्यवसाय करतात आणि इंदिरा काँग्रेस पक्षाचे ते सभासद आहेत. त्यातून ते कार्य करतात. (मु. पो. ता. जत, जि. सांगली. मतदार संघाचा क्रमांक २७६, जत विधानसभा (अनुसूचित जाती)

इ. स. १९७८ ला आय. एन. सी. सी. पक्षातून जत मतदार संघातील (विधानसभा राखीव) आमदारकीची निवडणूक लढविली व विरोधी उमेदवाराचा पराभव करून विजय प्राप्त केला आणि विधानसभेत प्रवेश केला.

**कार्य –**

गरीब दुर्बल घटकासाठी सर्वतोपरी मोफत कायदेशीर सल्ला व प्रत्यक्ष कोर्टातून काम, कुटुंब नियोजन कार्यक्रमास चालना देणे व शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य, काँग्रेस पक्षाचे क्रियाशील सभासद, सन १९७९ पासून जत शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष, १९७८ मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून प्रथम निवड, १९७८–७९ मध्ये पंचायत राज समितीचे सदस्य, १९७९–८० मध्ये आश्वासन समितीचे सदस्य, १९८० मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून पुन्हा निवड.[५]

**४) उमाजी धनाप्पा सनमडीकर –**

श्री. सनमडीकर यांनी जत तालुक्यातून राखीव आमदार म्हणून १९८५–१९९९ प्रतिनिधीत्व केले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा राखीव आमदार म्हणून जत व संपूर्ण सांगली जिल्ह्यातील दलितांचे प्रश्न समस्या सोडविण्याचा विधानसभेत त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केलेचे दिसून येतात. त्यांची माहिती व जीवन चरित्र थोडक्यात पुढीलप्रमाणे –

श्री. सनमडीकर यांनी जत तालुक्यातून राखीव आमदार म्हणून १९८५–१९९९ प्रतिनिधीत्व केले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा राखीव आमदार म्हणून जत व संपूर्ण सांगली जिल्ह्यातील दलितांचे प्रश्न समस्या सोडविण्याचा विधानसभेत त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केलेचे दिसून येतात. त्यांची माहिती व जीवन चरित्र थोडक्यात पुढीलप्रमाणे –

**पूर्वचरित्र –** सनमडीकरसाहेबांचा जन्म २२ जून १९३९ रोजी सनमडी, तालुका जत, जि. सांगली या गावी तर त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले आहे. त्यांना मराठी, हिंदी, कानडी भाषा येतात. त्यांची सहचारिणी म्हणून श्रीमती कमल हिच्याशी विवाह झाला. त्यांना एकूण एक मुलगा व २ मुली अशी अपत्ये आहेत. ते स्वतः शेती करतात पूर्वी १९६१ ते ७० भारतीय स्थलसेनेत नोकरीस होते. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) पक्षाचे कार्यकर्ते व नेते आहेत. त्यांचा (अनुसूचित जाती) २७६, जत हा विधानसभा मतदार संघ आहे.

सन १९८५ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षातून जत विधानसभेची निवडूक लढवली आणि या निवडणुकीत  विरोधी पक्षाचे उमेदवारी शिवशरण ज्ञानू काळू यांना पराभूत केले होते.

इतर माहिती – संस्थापक सिध्दार्थ शिक्षण प्रसार मंडळ सनमडी, राजर्षि शाहू महाराज आश्रम शाळा जत, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आश्रमशाळा माडग्याळ, म. फुले आश्रम शाळा सनमडी, डी. एड्. कॉलेज जत (कन्नड माध्यम), नियोजित रेणुकादेवी मागासवर्गीय सहकारी शेतकरी सूतगिरणी जत (कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य), चेअरमन, दत्त शिक्षण प्रसारक मंडळ सनमडी, संस्थापक चेअरमन सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय जत, चेअरमन– विविध कार्यकारी से. सोायटी सनमडी, संस्थापक सदस्य, गजानन दूध उत्पादक सहकारी संस्था मायथळा, अध्यक्ष– संजय गांधी निराधार योजना जत, अध्यक्ष– जत तालुका रोजगार हमी योजना, तालुक्याच्या विविध कमिट्यांचे अध्यक्ष सदस्य, तालुका खरेदी विक्री सहकारी संघ जत, व्हाईस चिफ प्रमोटर नियोजित जत तालुका शेतकरी सहकारी साखर कारखाना १९७८–८५, उपसरपंच ग्रामपंचायत सनमडी १९७९–८५, सदस्य पंचायत समिती जत १९८५, सदस्य जिल्हा नियोजन मंडळ १९८५–९०, सदस्य महाराष्ट्र विधानसभा, ऑक्टोबर १९९९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.[६]

१)	मु. पो. सनमडी, ता. जत जि. सांगली. २) रुम नं. ५२१, आमदार निवास, मुंबई.

२)	फोन : २०२२३८३ निवडणूक निकाल– (२७६, जत विधानसभा, अनुसूचित जाती)

एकूण मतदार – १,६८,७२१, एकूण वैध मतदार – १,०५,७२१

पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या – १) सनमडीकर उमाजी धनाप्पा– ५१,११८ (काँग्रेस) २) वानखडे सीताराम बसाप्पा – २६,४०२ राष्ट्रवादी काँग्रेस.

**५) भगवानराव लालासाहेब पवार**

भगवानराव पवार हे सांगली जिल्ह्यातील विटा (खानापूर) मतदार संघातून राखीव विधानसभेचे आमदार होते. त्यांनी सांगली दलित चळवळीस मार्गदर्शन केले. दलितांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. विधानसभेत प्रश्न विचारले. महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्‌मध्ये त्यांनी विचारलेले प्रश्न दिसतात. त्यांचा प्रथमच उल्लेख या संशेधनात केला आहे.

**पूर्वचरित्र –**

इ. स. १९३२ ला पेठ, ता. वाळवा येथे श्री. भगवानराव यांचा जन्म झाला. वडील श्री. लालासाहेब तुळशीराम पवार हे प्राथमिक शिक्षक आणि त्याचप्रमाणे सत्यशोधक चळवळीतही काम करीत होते. प्राथमिक शिक्षण वडिलांच्या नोकरीमुळे वडगाव हवेली जिल्हा सातारा येथे झाले. स्वातंत्र्य चळवळीने सारा सातारा जिल्हाच भारलेला होता. बालपणीच काँग्रेसचे संघटनात्मक संस्कार मनावर होवून श्री. भगवानराव यांनी आपले दुय्यम शिक्षण इस्लामपूर येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी पुण्यास वाडिया कॉलेजमध्ये गेले. तेथेच त्यांनी बी. ए. ची पदवी संपादन केली.

सार्वजनिक कार्य – कॉलेज शिक्षण चालू असतानाच त्यांनी सार्वजनिक कामात भाग घेण्यास सुरुवात केली. १९५५ साली आपल्या विद्यार्थी दशेतच त्यांनी 'मुंबई राज्य मागास वर्ग विद्यार्थी संघटना' स्थापन केली. ते त्या संघटनेचे अध्यक्षही होते. १९५७ साली पुणे येथेच लॉ कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेण्यास

सुरुवात केली. विद्यार्थी दशेतील बराचसा काळ मागास वर्गातील विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी निरनिराळ्या संघटनामार्फत फार प्रयत्न केले. कायद्याची परीक्षा उत्तीर्ण होताच निरनिराळ्या विद्वान लोकांशी राजकारणावर चर्चा करीत करीत श्री. पवार हे शेवटी या निष्कर्षावर आले की, आपण नोकरी केली तर आपल्या कुटुंबाचे कल्याण होईल. पण म. गांधीजी आणि कै. बाबासाहेब आंबेडकर यांनी कालच्या हरिजन आणि आजच्या नवबुध्द समाजाच्या उध्दारासाठी सतत कष्ट घेतले. त्या समाजाच्या सेवेचे काम जास्त मोलाचे.[७]

**विधान सभेतील कार्य –**

सरकारी नोकरीत मागासलेल्या वर्गासाठी जागा राखून ठेवण्याबाबत देशमुख समितीच्या अहवालावर चर्चा–

श्री. भ. ला. पवार (विटा) : अध्यक्ष महाराज श्री. देशमुख समिती नेमण्याच्या आधीच्या मुंबई सरकारने या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक स्टार्ट समिती नेमली होती. यासंबंधी या अहवालाच्या पान नं. १४७ वर पुढीलप्रमाणे सांगण्यात आले आहे. ''त्यावेळच्या मुंबई सरकारने मि. स्टार्ट या आय. सी. एस. अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने नमूद केल्याप्रमाणे दलित वर्गाचा प्रश्न या वर्गातील लोकावर समाजात विशिष्ट स्थान लादण्यात आल्यामुळे निर्माण झाला आहे. समाजातील या एका मोठ्या गटाचे नेमके स्थान कोणते हे निश्चितपणे सांगणे सोपे नाही. या लोकांची संस्कृती हिंदू समाजाची आहे. हिंदू समाजातील प्रचलित धार्मिक विधी सण ते साजरे करतात. तरीदेखील दलित वर्गातील लोकांचा नुसता स्पर्श झाला तरी ते भ्रष्टाचाराचे कारण मानले जाते. या लोकांना समाजातील इतर लोकांपासून अलग राहण्यास भाग पाडण्यात आले होते.

अध्यक्ष महाराज हा प्रश्न आता तितका राहिलेला नाही. दलित समाजाच्या लोकांना सरकारी नोकरीत योग्य प्रकारची वागणूक दिली जात नाही हे महत्त्वाचे आहे. हा समाज जवळजवळ ३० टक्के आहे. माझ्या अगोदरच्या सन्माननीय सभासदांनी सांगितले आहे की या लोकांवर अन्याय होत राहिला आहे. यांना जमीन,

धंदा, काही नसल्याने नोकरीशिवाय तरणोपाय नाही, ही वस्तुस्थिती आहे. या समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्या योग्य आहेत. त्या सर्व सरकारने स्विकाराव्यात, असे माझे मत आहे. या समितीच्या शिफारसी पाहण्याचा दृष्टीकोन शासनाने बदलला पाहिजे. या समाजाच्या कल्याणासाठी जे कायदे केले जातात किंवा शासकीय ठराव केले जातात, त्याची अंमलबजावणी जी व्हावयास पाहिजे ती होत नाही ही दुःखाची गोष्ट आहे. या समाजासाठी ज्या सवलती देण्यात आल्या आहेत, त्याची अंमलबजावणी केली जात नाही, त्याबद्दल अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. मला शासनाला एक नम्र विनंती करावयाची आहे की, समाजकल्याण खात्याचे जे संचालक आहेत, त्यांना विशिष्ट अधिकार देण्यात आले पाहिजेत. या संचालकांनी प्रत्येक खात्यात जावून विचारणा केली पाहिजे. शासनाच्या ठरावाप्रमाणे राखीव जागांच्या बाबतीत असलेल्या आदेशाची अंमलबजावणी होत नसेल तर समाज कल्याण खात्याच्या संचालकांनी योग्य तो अहवाल सरकारला सादर केला पाहिजे आणि सरकारने अशी अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांना शासन केले पाहिजे.[८]

सरकारी नोकरीत मागासलेल्या वर्गाच्या लोकांना भरती करण्यासाठी जागा राखून ठेवण्यासंबंधात एवढे सांगितल्यानंतर मला त्यांच्या बढत्यासंबंधी सांगावयाचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शेतकी खात्यात एक गोष्ट घडून आली. तेथे श्री. सी. टी. कांबळे नावाचे गृहस्थ कंपोस्ट इन्स्पेक्टर म्हणून काम करीत होते. त्यांच्याविषयी कॉन्फिडेन्सीयल रेकॉर्ड लिहिताना एका अधिकाऱ्याने असे नमूद केले आहे की, कांबळे हे हरिजन असल्याने त्यांना चांगले काम करता येत नाही म्हणून त्यांना बढती देण्यात येऊ नये, असा रिपोर्ट ज्यावेळी लिहिला जातो, त्यावेळी त्या अधिकाऱ्याला निश्चितपणे शासन केले पाहिजे तेव्हा तेव्हा समाजकल्याण खात्याच्या संचालकांना योग्य तो अधिकार देवून अशा गोष्टी करणाऱ्या जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना योग्य शासन दिले जावे, अशी अपेक्षा व्यक्त करून आपले भाषण संपविले.

**श्री. भ. ला. पवार (विटा)–**

अध्यक्ष महाराज येथे शिक्षण खात्याच्या व समाजकल्याण खात्याच्या मागण्यावर चर्चा चालू आहे. अध्यक्ष महाराज, ह्या राज्यात मागासलेल्या जाती–जमाती ह्यांच्या शिक्षणाचा प्रश्न फार बिकट आहे. आपण जी घटना तयार केली आहे, त्या घटनेत ह्यासाठी खास तरतूद करण्यात आली आहे. भारतीय घटनेचे आर्टिकल ४६ आहे. ते असे आहे– The state shall promote with special care the educational and economic interest of the weaker sections of the people and in particular of the scheduled castes and the sheduled tribes and shall protect them from special injustice and all forms of exploitation.

त्याबाबत मला असे सांगायचे आहे की समाजकल्याण खात्याचे जे काम आज चालले आहे, ते चालावे तितके व्यवस्थित चालले नाही. समाजकल्याण खात्याने ह्या मागासलेल्या वर्गासाठी अनेक योजना आखल्या आहेत. परंतु त्या योजनांची अंमलबजावणी मात्र आजकाल जिल्हा परिषदाकडे देण्यात आली आहे आणि जिल्हा परिषदाकडून ही अंमलबजावणी वेळेवर चांगल्या प्रकारे होत नाही म्हणून मला असे सुचवायचे आहे की बॅकवर्ड क्लासच्या योजना कार्यान्वित करण्याचे जे काम जिल्हा परिषदाकडे देण्यात आले आहे ते त्यांच्याकडून काढून घेण्यात आले पाहिजे.

शेड्युल्ड कास्ट आणि शेड्युल्ड ट्राईब्जसाठी गव्हर्मेंट ऑफ इंडियासाठी आणि स्टेट गव्हर्मेंटने अनेक योजना आखल्या आहेत. शेड्युल्ड कास्टच्या लोकांना शैक्षणिक सवलती देण्याबाबत येथे असे सांगण्यात आले की, इन्कमची तेथे अट आहे. मला असे सुचवायचे आहे की मागासलेल्या जातीच्या बाबतीत इन्कमची जी अट आहे ती काढून टाकली पाहिजे व फक्त मागासलेल्या वर्गाचा आहे, एवढ्यावरच त्याला शैक्षणिक सवलती मिळाल्या पाहिजेत, एवढी विनंती करून व या मागण्यांना पाठिंबा देवून मी माझे भाषण संपवितो.[१]

**समारोप –**

या प्रकरणामध्ये संशोधकाने सांगली जिल्ह्यातील दलित आमदारांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या कार्याची प्रेरणा घेऊन ते आमदार त्यांच्या विचाराचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पुढे आहे. त्यामध्ये पी. टी. मधाळे, शिवरुद्र बामणे, सोहानी ईश्वर, उमाजी सनमडीकर, मधुकर कांबळे, भगवान पवार या दलित कार्यकर्त्यांनी अस्पृश्यांच्या उध्दारासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या. सवलती मिळवून दिल्या. समाज प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न केला. यादृष्टीने आमदारांनी मिळालेल्या आपल्या अधिकाराचा योग्य असा वापर केला. डॉ. आंबेडकरांच्या विचारामधला भारत सक्षम बनविण्यासाठी दलित युवकाला शिस्त व जागृतीचे धडे दिले. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्तर दलित समाजाचा कसा उंचावेल, याकडे या आमदारांनी प्रामाणिकपणे लक्ष दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिलेल्या हक्क कर्तव्य या भावनेतून दलित आमदार अस्पृश्य समाजाच्या उध्दारासाठी अग्रेसर राहिले. त्यातूनही समाजाचा विकास घडत गेला. आमदारांच्या या कार्यामुळे सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ अधिक मजबूत व बळकट होण्यास मदत झाली, असे म्हणणे योग्य ठरते.

## दलित चळवळीस यशवंतराव चव्हाणांचे योगदान :–

**यशवंतराव चव्हाण व दलितांचे शिक्षण –** यशवंतराव चव्हाण म्हणजे एक देशभक्त, मुत्सद्दी, व्यवहारी राजकारणी व महाराष्ट्राचे शिल्पकार अशी ओळख सामान्यतः महाराष्ट्राच्या नवीन पिढीसमोर आहे.

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर काही प्रागतिक कायदे केले. त्याचा उपयोग खेड्यातील व शहरातील गोर–गरीब व दलित विद्यार्थ्यांना झाला. त्यांनी ईबीसी आर्थिक मागासलेल्यांना सवलती हा कायदा करून १९५६–५७ ला ज्यांच्या पालकाचे उत्पन्न ९०० रू आहे. त्यांना शाळेच्या फीमध्ये सवलत दिली. त्यामुळे बहुजन समाजातील व दलित समाजातील अनेक मुलं मुली शिकू लागल्या संपूर्ण महाराष्ट्रात ई.बी.सी. मुळे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढू लागली. तसेच त्याचा परिणाम सांगली जिल्ह्यात झाला. सांगली जिल्ह्यात अनेक दलित विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घेवून १९६० नंतरच्या दलित चळवळीत जोमाने भाग घेतला काही

दलित विद्यार्थी पुढील काळात दलित चळवळीचे नेते बनले तर काही राजकारणात जावून जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार झाले आणि दलितांच्या समस्या, प्रश्न, दलितांच्यावर होणारे अन्याय यांना वाचा फोडू लागले व आपल्या समाजाच्या समस्या प्रश्न सोडवू लागले, तर शंकरराव खरातासारखी शिक्षणतज्ञ सांगली जिल्ह्यात तयार झाले व त्यांनी दलितांच्या समस्या आपल्या लिखाणाद्वारें कथा, कादंबरी, लेख, समाजापुढे दलित वर्गाची करून समस्या मांडू लागले. तसेच मा. रामदास आठवले सारखे आमदार, खासदार, मंत्री यांनी राजकारणात उतुंग झेप घेवून दलितांचे प्रश्न सोडवू लागले. यशवंतराव चव्हाणांच्या शैक्षणिक धोरणाचा अशारितीने दलित वर्गावर झाला हे कोणालाही नाकारता येत नाही. दलित वर्गातील आजही अनेक मुलंमुली ई. बी. सी. धोरणाचा फायदा घेवून उच्च पदवीधर व उच्चशिक्षित होत आहेत. सांगली जिल्हातील दलित चळवळीस मदत करत आहेत. आज ई. बी. सी. सवलत महाराष्ट्रात चालू असून त्यांची मर्यादा टप्पाटप्प्याने शासनाने वाढवलेली आहे. आणि त्याचा फायदा सर्व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या दलितांना होत आहे. त्याचे श्रेय मा. यशवंतराव चव्हाणांना द्यावे लागेल.[१०]

**यशवंतराव चव्हाण व महारवतन :-**

मला एकदा महारवतन रद्द करण्यासंबंधी झालेला वादविवाद आठवला १९४६ च्या अखेरीस महाराष्ट्रभर महारवतन रद्द करण्यासंबंधी मोठी चळवळ झाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या त्या चळवळीला माझा मनातून पाठींबा होता. पक्षाच्या बैठकीत प्रांतिकच्या नेत्याजवळ मी चर्चा केली होती. महारवतन रद्द करा असे मागणे घेवून जेव्हा प्रचंड मोर्चा आला. तेव्हा आपण वतने नष्ट करण्याची घोषणा करू या असे मी सुचविले होते, पण मला मिळालेला प्रतिसाद निराशा जनक होता. पुढे मी मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्या काही दिवसातच आम्ही महारवतने नष्ट केली. त्याची पार्श्वभूमी इतकी जुनी होती.

महारवतन रद्द केल्याचा फायदा जसा संपूर्ण महाराष्ट्राला झाला तसा सांगली जिल्ह्यातील महारांनाही झाला. आणि हा समाज मानसिक गुलामगिरीतून कायमचा मुक्त झाला व ह्या समाजाला प्रतिष्ठा व मान मिळू लागला त्याचा परिणाम दलित नवशिक्षित पिढीवर झाला आणि त्यांना नैतीक बळ व ताकद आली. आणि

दलित चळवळीमध्ये हिरीरीने भाग घेवून आपले हक्क मिळविण्यात संघर्ष व लढा दिला यशवंतरावांचे यातून सामाजिक पुरोगामित्व सिद्ध होते.

## यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचे योगदान –

**मोफत शिक्षण योजना** – शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी पुस्तकी शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षणापर्यंत वेगवेगळे कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केले. प्रौढ शिक्षणाची व्याप्ती वाढवली. मोफत शिक्षणाची योजना राज्यात प्रथमच राबवली. त्यामुळेच शिक्षणाची दारे सर्वांना खुली झाली. मागासवर्गातील लोकांना याचा फार फायदा झाला?

**बौद्धांना सवलती** – बौद्ध धर्माचा स्विकार करणाऱ्या हरिजनांना मिळणाऱ्या सवलती सरकारने बंद केल्या होत्या. हरिजनांनी बौद्ध धर्म स्विकारल्याने त्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपणा कमी होणार नव्हता, हरिजनांना मिळणाऱ्या सवलती बौद्ध धर्मियांना मिळाव्यात ही मागणी यशवंतरावांनी मान्य केली. १४ एप्रिल रोजी म्हणजे डॉ. आंबेडकर जयंती दिनी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. हरिजन व बौद्ध यांच्या समस्या सोडविण्यासाठी यशवंतरावांनी केलेले कार्य बहुमोल असून ते इतरांना आदर्शवत असेच आहे.

**महारवतन पद्धत नष्ट –** महाराष्ट्रात महारवतन पद्धत अस्तित्वात होती. या पद्धतीने हरिजन समाजाचा अद्यःपात झाला होता. त्यांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागत होते. यशवंतरावांनी ‘‘बॉम्बे इन्फिरियर व्हिलेज वॉन्टस ॲबॉॅलिशन डॉक्ट १९५८ हा कायदा करून महारवतन पद्धतीला प्रतिबंध घातला आणि अस्पृश्य व नवशिक्षित बौद्ध यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने मोलाची कामगिरी करून डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकार केले. भाकरीसाठी पोटासाठी जमिन ही मागणी न्याय मानून भूमिहीनांना जमिनीचे वाटप केले.[११]

○ यशवंतराव चव्हाण यांचे दलित साहित्याविषयी मत – यशवंतराव चव्हाण यांनी दलित साहित्याचे स्वागत केले समर्थन केले. दलितांच्या राजकीय हक्कांना सामाजिक बळ न लाभल्यामुळेच आपल्या समाज जीवनात जो विसंवाद व सकुंचितपणा निर्माण झाला आहे त्याची दलित साहित्य ही फलश्रुती आहे. दलित साहित्यिकांनी साहित्य क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. उच्चभ्रू साहित्याचा संकल्पनेचे मापदंड दलित

साहित्याला लावणे चुकीचे आहे. दलित साहित्य भाषेला ओंगळ ठरविणाऱ्या समिक्षकांना यशवंतराव चव्हाण कानपिचक्या देतात. उपेक्षित समाजाच्या व्यथा दलित साहित्यातून मांडल्या जातात असे त्यांचे मत आहे. दलित साहित्याचे अंतरंग आस्थापूर्वक उलगडून दाखवणारे यशवंतराव दलित साहित्याचा विचार व्यापकपणे करत होते. ना. सी. फडके यांच्या मते यशवंतराव चव्हाण हे उत्तम साहित्यिक झाले असते. त्यांनी कृष्णाकाठ हे आत्मचरित्र लिहून साहित्य क्षेत्रात मोलाची भर टाकली आहे.

**भूमिहीनांच्या जमिनी** – रिपब्लिकन पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात खा. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूमिहिनांचे प्रचंड स्वरूपात आंदोलन झाले. या सत्यागृहात हजारो स्त्री–पुरूषांनी भाग घेतला. हजारोंना अटक होवून कारावासही पत्करावा लागला.

भूमिहीनांचा सत्यागृह भाकरीसाठी होता. पोटासाठी होता. भूमिहीन सत्याग्रहाची मागणी अशी होती की आम्हाला पोटाचे साधन म्हणून कसण्यासाठी, शेतीसाठी, सरकारी पडीक जमीन दया, या आंदोलनात मुख्यत्वे ऐंशी टक्के नव दीक्षित बौद्धजन भूमिहीन होते. त्याच बरोबर इतर अस्पृश्य भिल्ल, कोळी, मराठे आदि जाती जमातीचेही भूमिहीन होते.

भूमिहीनांच्या आर्थिक समस्या मूलभूत आहेत यांच्या रोजच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे. तो सोडविला पाहिजे. ही मूळविचार सरणी ना. यशवंतराव यांनी आनंदाने मान्य केली. भूमिहीनाच्या वतीने रिपब्लिकन पक्षाचे शिष्टमंडळ जेव्हा मुख्यमंत्र्यांना भेटले तेव्हा त्यांनी भूमिहीनांची मागणी न्याय्य आहे. या जाणिवेने ती मान्य केली आज महाराष्ट्रात सरकारी पडीक जमीन किती आहे? सर्व भूमिहीनांना तिचे वाटप करता येईल इतकी ती पुरेशी आहे का? हा प्रश्न वेगळा आहे. पण भूमिहीनांचा भाकरीचा प्रश्न सोडविला पाहिजे, ही मूलभूत समस्या मान्य केली आणि ती सोडविण्याच्या दृष्टीने ना यशवंतराव यांनी लागलीच पुढचे पाऊल टाकले यावर प्रत्येक जिल्ह्यात भूमिहिनांना जमीन वाटपाचे काम चालू आहे. त्यातून काही प्रमाणात भूमिहीनांच्या भाकरीचा प्रश्न काही अंशी तरी सुटेल, अशी आशा आहे. ना. यशवंतराव चव्हाण यांची ही पावले हितकारक आहेत. त्यांच्या कार्याबद्दल लक्षावधी महाराष्ट्र जीव भूमिहीन त्यांना दूवा देतील हे निश्चित.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाण्याचे तिसरे–महादेव शिवाप्पा कांबळे दलित समाजातले होते. तर या कारखान्यात मागासवर्गीय १११ कामगार होते.

१९८३ ते १९८५ या ११ महिन्याच्या कालावधीत वसंतदादा पाटील यांनी वैदयकिय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतन विद्यालये विनाअनुदान तत्वावर स्थापन करण्याचा निर्णय घेतला त्यात १०% विद्यार्थी मागासवर्गीयातून घ्यावयाची निर्णय घेतला.

**यशवंतराव चव्हाण व सहकार चळवळ :–**

सहकार चळवळही महाराष्ट्रात इतर प्रांताच्या मानाने दृष्ट लागावी अशी उभारलेली चळवळ आहे. महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात १९६० नंतर सहकार चळवळ फार जोमाने वाढली. त्याचे श्रेय सुद्धा यशवंतराव चव्हाण व सांगलीचे वसंतराव दादा यांनाच दयावे लागेल, सहकारी चळवळीमुळे पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साखर कारखाने, सुतगिरण्या शेती संघ सहकारी दुकाने सांगली जिल्ह्यात निघाली. ह्या सहकारी संस्थेमध्ये इतर समाजाप्रमाणे दलितवर्गातील व्यक्तींना नोकऱ्या मिळू लागल्या व अनेक दलित वर्ग आर्थिक दृष्ट्या थोड्या प्रमाणात का होईना सबल झाला. यशवंतरावाचा जन्म सांगली जिल्ह्यातील विटा या ठिकाणी झाला. त्यांचे नंतरचे शिक्षण कराडला झाले आणि कर्मभूमी संपूर्ण महाराष्ट्र होती. पण सांगली जिल्ह्यातील वसंतराव पाटील व इतर नेत्वाशी त्यांचे अतिशय जिव्हाळ्याचे व स्नेहाचे संबंध संपूर्ण आयुष्यभर होते त्यामुळे ते नेहमी सांगली जिल्ह्यातील दलितांच्या समस्याकडे सहानुभूतीने पहात असत व समस्या सोडवण्यासाठी आपल्या मंत्री पदाचा उपयोग करत असत. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीस त्यांचा पहिल्यापासून पाठिंबा होता हे नाकारून चालणार नाही.

शेवटी जातीयता नष्ट झाली पाहिजे तरच सर्व समाज एक जिनसी होईल व सामंज्यस निर्माण होईल अशी त्यांची विचारधारणा होती. मराठी मन एकसंघ करावयाचे तर जातीयवादाचाही निरास केला पाहिजे. या बाबतीत केवळ ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर प्रश्नच आहे. असे नाही. अस्पृश्यतेचा, नवबौद्धांचा प्रश्न घ्या याबाबतीत नव्या मराठी राज्याने खटपट केली पाहिजे. दलित समाजाच्या बाबतीतील उपेक्षा आपण सोडली पाहिजे

महारवतनाचा कायदा आपण अगदी अलिकडे केला वतन नष्ट करण्यासंबंधीची मागणी न्याय्य होती, प्रथम दहा वर्षापूर्वी महारवतनाचा कायदा केला असता तर

त्या समाजात विश्वास निर्माण झाला असता असे मला आज वाटते. पूजा गुणाची जातीची नाही. असे मी म्हणतो ते याचकरिता बहुजन समाज म्हणजे काय याविषयीची आपली भावनाही व्यापक बनवून त्यात सर्व कष्ट करणारांचा समावेश व्हावयास हवा.

शेवटी यशवंतराव चव्हाण लिहितात महाराष्ट्रात विदर्भाच्या उपासनेची एक थोर जुनी परंपरा आहे. आपले शैक्षणिक जीवन समृद्ध आहे. अगदी अलीकडच्या इतिहासात सुद्धा अखिल भारताची राज्यघटना तयार करून आंबेडकरांनी आपल्या विद्येच्या उपासनेच्या व बौद्धीक गुणवतेचा ध्वज फडकावला आहे.

माझा नम्र दावा असा आहे की, महाराष्ट्रात राजकारण हे जातीयवादापासून अलिप्त राहावे यासाठी मी मनस्वी कष्ट घेतले आहेत. मनातून स्वतः मी कधी जातीयवादी भावनेला बळी पडलो नाही. समाजात एकजिनशीपणा आणण्याचेच ध्येय मी निरंतर बाळगले.

## वसंतदादा पाटील व दलित चळवळ

## (१९१३–१९८३)

मा. यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणे सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीस सहकार्य व प्रोत्साहन नामदार वसंतदादा पाटील यांचे मिळाले होते. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत व उभारणीमध्ये ज्या व्यक्तींचे योगदान लाभले. त्यामध्ये वसंतदादा पाटील यांचे नाव महत्त्वपूर्ण आहे. आपल्या हयातीत ज्या व्यक्ती समाजहिताशी भूमिका घेत कार्यरत असतात, त्यांची नोनद भलेही बऱ्याचदा वर्तमानपत्रातयेत नसेलपण इतिहासाला मात्र याची दखल घ्यावीच लागते. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री होते. महाराष्ट्राच्या राजकीय, औद्योगिक व सहकारी क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविणाऱ्या नेत्यांमध्ये दादांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

वसंतदादा पाटील यांचा जन्म बंडोजी व रुक्मिणीबाई यांच्या पोटी १३ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला. सांगलीच्या उत्तरेस तीन कि. मी. अंतरावर असलेले पद्माळे हे त्यांचे मूळ गाव होते. बंडोजीकडे पद्माळी गावची पाटीलकी तसेच ३० एकर जमीन होती. वसंतदादा १० महिन्याचे असताना त्यांचे आईवडील एन्फ्ल्यूएंझाच्या साथीने मरण पावले. आईवडिलांच्या निधनानंतर वसंतदादा कागलला आजोळी आले व त्यांचे प्राथमिक शिक्षण हिंदुराव घाटगे विद्यामंदिर कागल या ठिकाणी झाले.[१२] त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते तर काही ठिकाणी त्यांचे शिक्षण सहावीपर्यंत झाले होते असा उल्लेख आहे. परंतु भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत व सांगली जिल्हा निर्मितीत त्यानचा सिंहाचा वाटा होता. राजकारणात सहार व शैक्षणिक क्षेत्रातपण त्यांनी भरीव काम केलेले आहे.

१९६२ साली ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व १९६४ साली प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व २४ मार्च १९६६ रोजी ते अध्यक्ष झाले. आपल्या चातुर्याने राज्यातील निवडणुका मोठ्या दिमाखाने जिंकल्या. १९६९ साली ते राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष झाले. ते नेहमी म्हणत की, ‘मी पुस्तक नाही वाचले पण मी माणसं वाचली. आजही माणसंच वाचतो’ हा त्यांचा गुण नेत्याचे लक्षण सांगणारा आहे. वसंतदादा महाराष्ट्राचे एकूण चार वेळा मुख्यमंत्री झाले.

१७ एप्रिल १९७७ ते ६ मार्च १९७८, ७ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८, २ फेब्रुवारी १९८६ ते ९ मार्च १९८५, १० मार्च १९८५ ते १० जून १९८९ या काळात दादांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. महाराष्ट्राचे नेतृत्व करताना दादांनी अनेक समाजहितकारक दूरगामी परिणाम साधणारे निर्णय घेतले.

वसंतदादांचे महाराष्ट्राच्या उभारणीतील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी सहकार क्षेत्राचा केलेला विकास व विस्तार होय. १९६० ला त्यांच्याच प्रयत्नाने नवीन सांगली जिल्हा अस्तित्वात आला आणि त्यांच्या हयातीत सांगली जिल्ह्यातील राजकारणात वसंतदादा म्हणती ते सांगली जिल्ह्यातील राखीव विधानसभा मतदारसंघ (जत व विटा) विटा मतदार संघ यातील उमेदवारांची निवडही वसंतदादा यांच्या सल्ल्यानेच केले जात. त्याचबरोबर जिल्हा परिषद, पंचायत समिती यातील राखीव उमेदवार तेच तिकिटासाठी

निवडत असत. त्यामुळे राखीव निवडून आलेले उमेदवार भावी काळात दलित नेते बनले आणि दलित चळवळीस प्रेरणा मिळाली. म्हणून वसंतदादांचे अप्रत्यक्षरित्या व काही वेळा प्रत्यक्षरित्या दलित चळवळीस सहभाग मिळाला.

राजकारणाबरोबर वसंतदादा सहकारात फार मोठे योगदान आहे. त्यांनी सांगली जिल्ह्यात १९५६ ला साखर कारखाना काढला. त्या कारखान्यात शासकीय धोरण राबवून ३३% जागा या दलित व मागासवर्गीय मुलांच्यासाठी ठेवल्या. हे दलित युवक आर्थिकदृष्ट्या सबल झाले व त्यांनी दलित चळवळीत भाग घेवून आपल्या परीने हातभार लावला. तसेच त्यांनी सांगलीला इंजिनिअरिंग कॉलेज काढून त्यामध्ये सुध्दा त्याने १०% राखीव जागा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ठेवल्या होत्या.

त्यांच्या सहकारी चळवळीत नियमितपणे एक किंवा दोन मागासवर्गीय संचालक असत. हे संचालक काही वेळा दलित चळवळीचे नेतृत्व करत व साखर कारखान्यामार्फत अर्थसहाय्य सुध्दा दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांना दिलेले आहे. म्हणून वसंतदादा दलित चळवळीतील योगदान विसरता येणार नाही.

सहकारमहर्षि म्हणून मान्यता पावलेल्या पद्मविभूषणाने सन्मानित झालेल्या राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री पद भूषविलेल्या व राजस्थानचे राज्यपालपदी आवड झालेले महापुरुष वसंतदादाच होते.[१३]

**दलित चळवळीचा विकास –**

सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीमुळे मागासवर्गीय समाजातील मुले–मुली मोठ्या प्रमाणात शिक्षण घेऊ लागली. प्राथमिक, माध्यमिक शिक्षक प्राध्यापक या समाजातील आहेत. आर्थिक उन्नती व विकास ह्या समाजाचा झालेला आहे. मांग, महार, चांभार ढोर या मागासलेल्या जातीतील मुले, मुली शिकून सहार शिक्षण शासकीय नोकरीत आहेत. तसेच दलित चळवळीमुळे खेड्या–पाड्यातील दलित समाजावर होणारा अन्याय कमी झाला आहे. शासकीय सवलतीचा व योजनांचा ह्या समाजास फायदा मिळत आहे. म्हणून पूर्णपणे नसला तरी ७०–८०% विकास झालेला आहे, असे दिसते.

परंतु रामोशी, पारधी, कैकाडी या समाजातील मुले, शिक्षणाच्या बाबतीत फारशी प्रगती झाली नसल्याने त्यांचा विकास झालेला दिसत नाही. उलट रामोशी समाज अजूनही बऱ्याचअंशी पिढीजात धंदा (चोऱ्या करणे) व समाज त्यांच्याकडे गुन्हेगारी जमात समजतात तर पारधी समाज हा चोऱ्या लुटमार करतात. बऱ्याचवेळा स्थलांतर करत असल्यामुळे शिक्षणाकडे फारसे लक्ष देत नाहीत. तसेच कैकाडी समाजही एके ठिकाणी रहात नसून भटके जीवन जगत आहे. त्यामुळे ह्या समाजाचा विकास अतिशय धिम्या गतीने होत आहे. त्यांच्यात अजून शिक्षणाचे महत्त्व कळले नाही. संपूर्ण भारतात हा समाज मागासलेला आहे, तसा सांगली जिल्ह्यातही आहे.

**प्रकरण संदर्भ –**


१. गायकवाड प्रदिप (संपा.) : प्रबुध्द भारत, आंबेडकर महानिर्वाण विशेषांक (१९५७), समता प्रकाशन, नागपूर पान ५५

२. खरात शंकरराव (संपा.) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रे, प्रकाशक शाम दयार्णव कोपर्डेकर, दि. १५ मे १९९०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष, पान १७

३. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर, २००८, पान २३

४. पवार ज. वि., आंबेडकरोत्तर आंबेडकर चळवळ (१९६०–१९६५), खंड २ रा, अस्मिता प्रकाशन, मुंबई १०३, तृतीय आवृत्ती २०१२, पान ५६

५. पवार ज. वि., आंबेडकरोत्तर आंबेडकर चळवळ (१९६५–१९७१), खंड ३ रा, अस्मिता प्रकाशन, मुंबई १०३, तृतीय आवृत्ती २०१२ पान ९७

६. पवार ज. वि., आंबेडकरोत्तर आंबेडकर चळवळ (१९७२–१९७७), खंड ४ था, अस्मिता कम्युनिकेशन प्रकाशन, मुंबई १०३, तृतीय आवृत्ती २०१२, पान ११४

७. निकुंभे सी. एच., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद, वास्तव आणि विपर्यास, सुगावा प्रकाशन, प्रथम आवृत्ती जून २००८, पुणे ३०, पान १६

८. गायकवाड प्रदिप (संपा.), जनता, ३१ ऑक्टोबर १९३१ ते डिसेंबर १९३२, अंक १ ते ४८, समता प्रकाशन, नागपूर. तृतीय आवृत्ती, ६ डिसेंबर २०११, पान ५.

९. चव्हाण सर्जेराव, (संपा.), प्रज्ञासूर्य व्याख्यानमाला स्मरणिका, ऑक्टोबर १९९५, प्रज्ञासूर्य व्याख्यानमाला प्र. सु. सु. मंडळ, बुलढाणा.

१०. देशमुख शिवाजीराव, यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षा लेखन व भाषणे, कौशल्य पब्लिकेशन सोलापूर, आवृत्ती वर्ष २००९, पान १०६

११. पाटील वि. वि., यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व, साकेत प्रकाशन, आवृत्ती पहिली १९९४, पान १०६

१२. राम प्रधान (संपा.), यशवंतराव चव्हाण शब्दांचे सामर्थ्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१, प्रथम आवृत्ती नोव्हें. २०००, पृ. ६३.

१३. जोशी लक्ष्मण शास्त्री तर्कतीर्थ, श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, श्री. यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती तहाळ, नागपूर आवृत्ती, १२ मार्च १९६१, पृष्ठ २७, प्रकाशक जोशी लक्ष्मणशास्त्री तर्कतीर्थ, श्री. यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती, तहाळ, नागपूर.

**प्रकरण ७ वे**

# उपसंहार

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे महाराष्ट्राला मिळालेले एक वैचारिक वैभवच म्हणावे लागेल. आपल्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाने हजारो वर्षांची बुरसटलेल्या विचारांची परंपरा झुगारून देऊन समाजाने नव्या विचारांची कास धरावी. माणसाला माणूस म्हणून सन्मान द्यावा, यासाठी त्यांनी केलेले कार्य केवळ आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शक असे आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य समाजाला नवीन ऊर्जा आणि नवी दिशा देणारी आहे. हे नव्याने सांगण्याची गरज नाही.

अशा थोर भारतरत्न व आंतरराष्ट्रीय किर्तीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने विचाराने भारतभर दलित नवयुवकांनी समाजाला व युवकांना चळवळीची प्रेरणा मिळाली आणि सर्व देशभर दलित चळवळ स्वातंत्र्योत्तर काळात जोमाने सुरू झाली. त्यास सांगली जिल्हाही अपवाद नव्हता. सांगली जिल्ह्यातील संस्थाने काही दलित नेते राज्य पातळीवर व देश पातळीवर दलित चळवळीचे नेतृत्व केले.

सांगली जिल्ह्यातील आद्य दलित कार्यकर्ते व नेते म्हणजे तिरमारे गुरुजी, मागासवर्गीय समाजात जन्माला येऊनही शिक्षण घेण्याची संधी मिळालेले शिवराम तिरमारे ऊर्फ तिरमारे गुरुजी यांनी चांगल्या नोकरीच्या संधी नोकरी नाकारत आपले आयुष्य मागासवर्गीयांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी व्यतित केले. बहिष्कृत शिक्षण मंडळाच्या माध्यमातून १९२२ मध्ये त्यांनी सांगलीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहास सांगलीतील डॉ. बापट यांनी देणगी दिली तर ॲड. केशवराव चौगुले यांनी वसतिगृहाचे संचालक म्हणून कामकाज सांभाळले. अनेक मागासवर्गीय विद्यार्थी येथे राहून शिकले.

अज्ञान, अशिक्षित, अस्पृश्य व मागासलेल्या जातीवर अनेक वर्षे अन्याय झाला. शोषणही मोठ्या प्रमाणावर झाले. ते दूर करण्यात जिल्ह्यातील दलित चळवळ काही प्रमाणात यशस्वी झाली. माझ्या जीवनाची चित्तरकथा, नाजूकाची लखिका प्रा. नंदा पाटील, आ. सुरेश खाडे, तानाजी वाघमारे, प्रा. आप्पाहेब केंगार, प्रमोद सांगले, नंदकुमार बनसोडे, प्रा. सरला कांबळे, प्रा. मच्छिंद्र सकटे, प्रा. मोहन साबळे, विजय कांबळे,

माजी आमदार मधुकर कांबळे जत, दादासाहेब ढेरे, राजकीय कार्यकर्ते व सुकुमार कांबळे, जगन्नाथ ठोकळे, आ. किरण कांबळे, डॉ. सुधीर बनसोडे, मा. सुरेश दुधगावकर, शुभांगी कांबळे, प्रमोद सारनाथ, प्रमोद कुदळे, अशोक भटकर, दगडू खाडे, विकास कांबळे, प्रा. एन. डी. बिरनाळे यांनी दलित चळवळीत प्रबोधनाचे मोलाचे कार्य केले आहे.

सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ ब्रिटिश कालखंडात सामाजिक सुधारणेची चळवळ म्हणून सुरू झाली. नंतर ती विकसित होत गेली व बळकट झाली.

शाहू महाराजानंतर दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व लाभले. त्यांनी दलित समाजाला चांगली दिशा दिली. देश राज्य पातळीप्रमाणेच सांगली जिल्ह्यातही दलित चळवळीला योग्य दिशा मिळाली. राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे दलित व मागासलेल्या समाजास राजकीय व सामाजिक क्षेत्रात अधिकार मिळाले. सांगली जिल्ह्यात ही बाब १९६० ते २००० या कालखंडात दिसून येते. दलित चळवळीमुळे आपले हक्क प्राप्त करता आले, ही बाब प्रकर्षाने दिसून येते.

- सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीत रामदास आठवले, ॲड. बी. सी. कांबळे, राजा ढाले, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, प्रा. अरुण कांबळे हे नेते तसेच गौतमीपुत्र कांबळे, प्रा. सुभाष दगडे, नामांतर चळवळीचे नेते प्राचार्य अमर पांडे, साहित्यिक, इत्यादींमुळे जिल्ह्यात दलित चळवळ जोमाने वाढली.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रा. प्रकाश बी. पाटील, नितीन कांबळे यांनी विद्यार्थी स्वयंसेवक यांना चांगली दिशा दिल्या. सांगली जिल्ह्यात रिपब्लिक पक्ष, दलित पँथर, दलित महासंघ, बहुजन समाज पार्टी, भारिप, बहुजन महासंघ व राष्ट्रीय प्रादेशिक पक्षाच्या शाखातील दलित चळवळ मजबूत होण्यास मदत झाली.
- १९६० नंतर भारताच्या व महाराष्ट्राच्या इतर भागात जसा दलित चळवळीने संघर्ष केला, त्याप्रमाणेच सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ दलित कार्यकर्त्यांनी या जिल्ह्यात सुरू केली.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजात अन्यायाची चीड निर्माण केली. स्वाभिमान जागृत करून माणुसकीच्या हक्कासाठी झगडण्यास प्रवृत केले.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे प्रचंड अन्याय व शोषीत दलित समाजाने हिंसात्मक क्रांतीचा अवलंब केला नाही.
- डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वामुळे दलित समाजाच्या चळवळीला लोकशाही वळण लागले.
- भारतात जातीभेद शतकानुशतके चालत आलेली रुढी असल्याने ती एकदम नष्ट होणार नाही. सांगली जिल्ह्यातही हीच परिस्थिती आहे.
- दलित चळवळीमुळे सांगली जिल्ह्यातील दलित बांधवांचा शैक्षणिक विकास घडून आला.
- दलित चळवळीमुळे सांगली जिल्ह्यातील दलित बांधवांच्या शैक्षणिक विकासामुळे १९४० ते २००० या कालखंडात आर्थिक विकास झाल्याचे दिसून येते.
- सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीमुळे शैक्षणिक, आर्थिक विकासाबरोबर एकूण जीवनमानामध्येदेखील अनुकूल बदल झाल्याचे आढळून आले.
- सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीमुळे एकूणच सामाजिक परिवर्तन व सामाजिक स्तर यात अनुकूल बदल घडून आलेला आहे.
- सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीमुळे कवलापुरातील लोकनाट्य कलावंत काळू बाळू यांच्या घराण्याचा ४ पिढ्या लोककला क्षेत्रात सातत्याने चांगले कार्य करीत राहिल्या. अशा कलाकारांमुळे इतर दलित कलाकारांना प्रेरणा मिळून कलाक्षेत्रात देखील प्रगती होऊ शकली आहे.
- अण्णाभाऊ साठे, ॲड. शंकरराव खरात, माधव दादाजी मोडक, वामन गोविंद होवाळ यांनी लेखन साहित्य निर्मिती करून गावगाड्यातील दलितामधील असणाऱ्या अज्ञानाला व अंधश्रध्दांना नेमकेपणाने वाचा फोडली.
- दलित चळवळ अन्याय व अत्याचाराच्या विरोधात अत्यंत आक्रमकपणे संघटितपणे संघर्ष करू शकली.

- दलित चळवळीला सांगली जिल्ह्यात कोणत्याही विशिष्ट व्यक्तीला विरोध न करता इथल्या अन्यायी अशा प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करणे शक्य झाले.
- सांगली जिल्ह्यात विषमतेवर आधारलेली जातीधर्म व्यवस्था आणि शोषणव्यवस्था नष्ट करण्यात बऱ्याच प्रमाणात यश आले आहे.
- सांगली जिल्ह्यात अनुसूचित जाती जमाती, भटके विमुक्त, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व भूमिहीन तसेच इतर मागासवर्गीय यांना संघटित करण्यात यश मिळालेले दिसून येते.
- सांगली जिल्ह्यात दलित चळवळीने देशात महाराष्ट्रात जसा संघर्ष केला त्याप्रमाणेच संघर्ष करून आपले हक्क अधिकार मिळवून घेतले.
- सांगली जिल्ह्यात दलितांनी राजकीय क्षेत्रातदेखील एक स्थान निर्माण करण्याचे काम दलित चळवळीने केले आहे. रामदास आठवले, पी. टी. मधाळे, रा. सु. गवई, जोगेंद्रनाथ कवाडे, प्रकाश आंबेडकर, प्रा. अरुण कांबळे, राजा ढाले, ॲड. बी. सी. कांबळे अशी नेतेमंडळी राजकीय क्षेत्रात नेतृत्व निर्माण होवून नावारूपाला आली.
- धो. ल. थोरात, एम. एच. पद्माळकर, जगन्नाथ मोरे या नेत्यांनीसुध्दा दलितांची परिस्थिती बदलली.
- जिल्ह्यातील दलित चळवळीने अस्पृश्यांना न्याय मिळविण्यासाठी दलितांचे संघटन बळकट करून अनेक आंदोलने यशस्वी केली.

१) डॉ. बी. आर. आंबेडकर संपर्क व कार्यकर्त्यांचा अभ्यास. २) १९६० ते २००० दलित नेत्यांचे कार्य ३) विविध संघटनाचे कार्य ४) दलित कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिणाम ५) शासनाचे धोरण ६) साहित्यीकांचे कार्य.

दक्षिण सातारा – सांगली, मिरज, जत. पी–२५, सांगली संस्थांनात अनेक जाती–जमातीचे अस्तित्व पी–२६, समाजोन्नमीसाठी संस्थांनाचे प्रयत्न पी–२६, पी–२७,२८ १९, ३३ डॉ. आंबेडकर सांगलीत आले.

**आंबेडकर उत्तर परिणाम –**

हरिजन निवारण कायदा–१९४७ –संस्थानात अंमल बजावणी, वैचारीक जागृती वाढली पी–३० विविध नेत्यांचा उदय – पी. ३१, जिल्ह्याला बळकटी मिळाली. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला. दलित नेत्यांनी झझांवाती कार्य केली. विविध संघटनांमुळे दलितांमध्ये एकीची भावना निर्माण झाली. साहित्यिकांच्या लेखकामुळे चैतन्य निर्माण झाले. लोकप्रतिनिधींनी दलितांचा आवाज दिल्लीपर्यंत नेला. आरक्षणामुळे दिन दुबळ्यांना आत्मसन्मान दिला. विविध सवलतीमुळे दलित सामाजिक प्रवाहात आले.

- डॉ. आंबेडकर हे दीर्घ व्यासंगी जाज्वल्य स्वाभिमानाचे व निधडे मनोधैर्य, राजकारणी शीलवान स्वभावाचे होते.
- डॉ. आंबेडकरांनी सांगली, मिरज, जत, अंकलखोप, पेठ, कासेगांव, इस्लामपूर भागात दौरे करून दलित मागासलेल्या समाजामध्ये जनजागृती केली. स्वाभिमानाच्या ज्योतीचे स्फूलींग पेटेवले.
- डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाची प्रगती, सामाजिक आर्थिक व शैक्षणिक तसेच सांस्कृतिकता घडवून आणली.
- डॉ. आंबेडकरांच्या कार्याची प्रेरणा घेऊन त्यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी नेत्यांनी कंबर कसलेली दिसते. यामध्ये मधाळे, बामणे, उमाजी सनमडीकर, माजी आमदार मधुकर कांबळे, पवार यांचा समावेश होतो. अस्पृशांच्या उद्धारासाठी वेगवेगळ्या उपाय योजना केल्या. सवलती मिळवून दिल्या. समाज प्रगती पथावर नेण्याचा प्रयत्न केला. दलित युवकाला शिस्त व जागृतीचे धडे दिले. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्तर उंचावण्यास मदत केली समाज विकासास हातभार लावला.
- डॉ. आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेला समाज विविध संघटनांच्या माध्यमातून एकत्रित येऊ लागला. बलुतेदारांची चळवळ उभी राहिली. यामध्ये प्रामुख्याने भारीप, पास मुव्हमेंट दलित महासंघ या सर्वांनी अस्पृश्य लोकांसंबंधी प्रबोधनात्मक कार्य केले दलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली.

- शासनाची धोरणांमध्ये आपणास अनेक सकारात्मक बदल झाल्याचे दिसते. यामध्ये दलितांवर होणाऱ्या अन्यायासंदर्भात कडक कायद्याची अंमलबजावणी केली. तसेच वतन जमिनी, महसूल, आरक्षण यामध्येही सुधारणा झाल्या.
- समाज परिवर्तनासाठी रूढी, परंपरा यांचा त्याग करण्यासंबंधीचे अनेक योजना शासनाने राबविल्याचे दिसून येते.

## सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीचे वेगळेपण

सांगली जिल्ह्यातील दलित नेत्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील दलित चळवळीस नेतृत्व दिले. उदा. ॲड. बी. सी. कांबळे, रामदास आठवले, राजा ढाले हे मूळचे सांगली जिल्ह्यातीलच पण नंतर मुंबईत स्थायिक झाले व नंतर संपूर्ण महाराष्ट्राच्या दलित चळवळीस नेतृत्व दिले एवढेच नव्हे तर अखिल भारतीय पातळीच्या दलित चळवळीस मूळ सांगलीतील नेत्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आंबेडकरांची मिशन यशस्वी करण्याचा प्रयत्न केलेला आहे व आज रोजी करत आहेत. तसेच मा. शंकरराव खरात सारखा थोर साहित्यिकसांगली जिल्ह्याने निर्माण केला. त्यांचे साहित्य संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे दलित समस्या मांडलेल्या आहेत. त्याची शासनाने गांभिर्याने दखल घेऊन काही प्रमाणात का असेना दलितावर होणारा अन्याय सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. मा. खरात काही काळ विधानपरिषदेचे आमदार व मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु होते. त्यावेळी त्यांनी मराठवाडा विभागातील इतर समाजाप्रमाणे दलित वर्गाच्या शैक्षणिक समस्या सोडवलेल्या आहेत. त्यांना वेगवेगळे पुरस्कार देवून गौरवण्यात आले आहे.

सांगली जिल्ह्यातील सहकार चळवळ व दलित चळवळ – सांगली जिल्ह्यातील सहकार चळवळीचा मोठा परिणाम सांगली जिल्ह्यात झालेला दिसून येतो. सांगली जिल्ह्यात सहकार चळवळीचे जाळे वसंतदादांनी पसरवले होते. सहकारी साखर कारखाने व इतर सहकारी संस्था स्थापन केल्या आणि या सहकारी संस्थेत मागासलेल्या व दलित समाजासाठी शासकीय नियमानुसार राखीव जागा ठेवल्या होत्या. बऱ्याच मुला–मुलींना साखर कारखान्यात व शैक्षणिक संस्थेत नोकऱ्या मिळाल्या व त्यांचे आर्थिक जीवन सुधारले. दलित विद्यार्थी,

शैक्षणिक सवलतीमुळे शिकले आणि दलित चळवळीच्या कार्यात सहभाग घेऊ लागले. हा संदर्भ महत्वाचा आहे.

सांगली जिल्ह्यातील काही नेते राज्यपातळीवर व अखिल भारतीय पातळीवर कार्य केले आहे व आजही करत आहेत व त्यामुळे दलित चळवळीचे स्वरूप अखिल भारतीय झालेले आहे. दलितांच्या समस्या कमी होत आहेत व दलित वर्गास थोडे चांगले दिवस येत आहेत. याची माहिती ह्या प्रबंधामुळे सर्व समाजाला आहे, ही माझ्या अभ्यासाची फलश्रुती होय.

त्याचबरोबर माझ्या प्रबंधाचा अभ्यास दुसऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यासास मार्गदर्शक नमुना ठरणार आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील व त्यानंतर संपूर्ण भारतातील दलित चळवळीच्या समस्या स्वरूप जगापुढे येणार आहे. ही अभ्यासाची फलश्रुती होय.

वरील संशोधनातून सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ १९६० ते २००० या कालखंडावर प्रकाश टाकण्यात आला. त्यामध्ये खालील गृहितकावरून निष्कर्ष दिसून येतात.

**गृहितक –**

१९६० ते २००० या काळात दलित नेत्यांनी सांगली जिल्ह्यासाठी कार्य केले.

**साध्यता –**

वेगवेगळ्या दलित नेत्यांनी सांगलीला एक पवित्र क्षेत्र म्हणून पाहिले आहे. पटवर्धन व डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नातून अस्पृश्यांबद्दल झालेल्या जनजागृतीची चेतना दलित नेत्यांनी आणखीन प्रखरतेने पेलल्याचे जाणवते. त्यांनी शिक्षण, अर्थकारण, समाजकारण, शेती, व्यवसाय, नोकरी, स्वयंरोजगार तसेच विविध कुटिरोद्योग, लघुउद्योगाठीच्या भरभरासाठीचे प्रयत्न केले. सामान्यातील सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते.

**गृहितक –**

१९६० ते २००० या काळात विविध संघटनांनी सांगली जिल्ह्यासाठी कार्य केले आहे.

**साध्यता –**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, अखिल भारतीय दलित फेडरेशन, नव भारतीय रिपब्लिकन पक्ष या विविध पक्षांनी समान न्याय, समता, व्यक्तीसुख, समान संधी, हक्क, स्वातंत्र्य, भितीपासून मुक्तता, पिळवणूक, दडपशाहीविरुध्द आवाज उठविणे, लोकशाही, संसदीय लोकशाहीवर भरवसा ठेवणे, अस्पृश्य समाजाला मानाचे स्थान मिळवून दिले. तसेच सरकारच्या धोरणावर दबाव आणून आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी संघटित व्हावयाचे हेही या विविध पक्षाची धोरणे होती.

**गृहितक**

१९३० ते २००० या काळात सांगली जिल्ह्यातील दलित नेते व संघटनांच्या कार्याचा कार्यकर्त्यांच्या जीवनात परिणाम झाला.

**साध्यता –**

दलित चळवळीतून नामवंत असे कार्यकर्त्यांचा उदय झाल्याचे दिसते. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी झेप घेतल्याचे दिसून येते. यामध्ये रामदास आठवले, शंकरराव खरात, बंधू माधव, आण्णाभाऊ साठे, धो. ल. थोरात, वामन होवाळ, तिरमारेगुरुजी, बी. सी. कांबळे, राजा ढाले, अरुण कांबळे, मोहन साबळे, गौतमीपुत्र कांबळे, विवेक कांबळे या व इतर अनेक नेत्यांचा जिल्ह्यात उदय व विस्तार झाला. यांच्या प्रेरणेमुळेच कार्यकर्त्यांचा उत्साह वाढीस लागला. यामध्ये विविध प्रकारचे साहित्य उदयास आले. चळवळी निर्माण झाल्या. समाज अन्यायाविरुध्द पेटून उठला. विविध विहार बांधले, शिक्षणामध्ये भरारी घेतली. पुरोगामी विचारांना चालना मिळाली. दलित समाजाची दुःखे समाजासमोर येऊ लागली. लेखनाचा दर्जा वाढला. समाजातील विषमता नष्ट होण्यास हातभार लागला.

**गृहितक**

१९६० ते २००० या काळात सांगली जिल्ह्यातील दलित नेत्यांनी (आमदारांनी) कार्य केले.

**साध्यता –**

सांगली जिल्ह्यामध्ये पिराजीराव तायापराव मधाळे, शिवरुद्र बामणे, सोहानी जयवंत ईश्वर, उमाजी धनाप्पा सनमडीकर, मधुकर शंकर कांबळे, भगवानराव पवार इत्यादी दलित आमदार होऊन गेले. त्यांनी पुढीलप्रमाणे कार्य करून आपल्या समाजाला सन्मान मिळवून दिला... यामध्ये

१) दलितांच्या प्रश्नाला विधानसभेत वाचा फोडली

२) विविध मोर्चे चळवळींनी दलितांना एकत्र आणले.

३) इनाम जमिनी सोडविण्यास प्रयत्न केले.

४) गावकुसाबाहेर ही संकल्पना पुसण्याचा प्रयत्न केला.

५) कुटुंबनियोजन, आरोग्य, कायदेशीर सल्ला देण्यात आला.

६) गाव पातळीवरील समाजमंदिरांची उभारणी करून तरुणांना, आबालवृध्दांना एकत्र आणले.

७) शिक्षण प्रसाराचे कार्य केले.

८) रोजगार हमी योजना, संजय गांधी निराधार योजना, तळागाळातील लोकापर्यंत पोहोचविल्या.

९) विविध संघटना स्थापन केल्या.

१०) विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यास तत्परता

११) समाजकल्याण खात्याचा कारभार योग्य रितीने चालावा म्हणून प्रयत्न.

१२) दलित युवकांना शिस्त व जागृतीचे धडे दिले.

**गृहितक**

१९६० ते २००० या काळात सांगली जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाने विविध धोरणांची अंमलबजावणी केली.

**साध्यता –**

महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या प्रयत्नामुळे दलित नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या प्रभावामुळे दलितांना विविध योजनांचा लाभ मिळू लागला.

यामध्ये सामाजिक न्याय, विविध नोकऱ्या, नोकऱ्यांमध्ये बदल्या, शिक्षण, शिष्यवृत्त्या, विशेष कक्ष स्थापना, योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी विविध प्रयत्न, फिरती न्यायालये, अॅट्रॉसिटी कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी, समाजमंदिरांना मदत.

लोकशाही बळकट करण्याचे प्रयत्न, रुढी परंपरांना पायबंद, आर्थिक विकासामध्ये बरोबरीचे प्रयत्न. सामाजिक स्तर उंचावण्यास मदत, कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

**गृहितक**

१९६० ते २००० या काळात विविध दलित साहित्य प्रकाशित झाले

**साध्यता–**

या काळामध्ये आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधु माधव, होवाळ इत्यादी अनेक साहित्यकारांनी आपल्या लेखनातून समाजाला जागे केले. यामध्ये जीवनाची वास्तवता, दाहकता, भाऊबंदकी, पाऱ्यावरच्या गप्पा, गावगाडा तसेच सामाजिक विषमता, आर्थिक बिकटता, चणचण तसेच अवहेलना, ससेहोलपट, निराशा, दुःख आवेश उद्विगनता असे अनेक प्रसंग साहित्यिकांनी आपल्या लिखाणातून मांडल्या. तसेच समाजमनात आपला एक वेगळा ठसा उमटविला. या ठिकाणी असे म्हणावे लागेल की, साहित्यिक झाले नसते तर बहुजन जागृतच झाला नसता. प्रबोधनाची खरी सुरुवात ही साहित्यिकांनीच सुरू केली.

सदरच्या संशोधन कार्यातून असे समजून येते की, सांगली जिल्ह्यातील दलित चळवळीला योग्य दिशा मिळाली. या समाजामध्ये शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक याबाबत अनेक अनुकूल बदल घडून या समाजाचा विकास होण्यास मदत झाली. दलित चळवळीमध्ये वेळोवेळी हा समाज जो भरकटला असता त्यास योग्य दिशा व वळण देण्याचे काम झाले. शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक याबाबत नवीन पिढीला सदरचे संशोधन मार्गदर्शक ठरेल, असे मत आहे.

# संदर्भ सूची –

### अ) प्राथमिक साधने –


१) आंबेडकर बाबासाहेब (डॉ.) (संपा. मं), गायकवाड भाऊराव कृष्णराव, भंडारे आर. डी., कांबळे बी. सी., आंबेडकर मुकुंदराव आ. (सह. संपा), आंबेडकर बौध्द दीक्षा विशेषांक, प्रबुध्द भारत २७ ऑक्टो. १९५६, प्रकाशन, प्रदीप गायकवाड, दीक्षाभूमी संदेश, डॉ. आंबेडकर उड्डानपूल, लष्करी बाग, नागपूर १७. तृ. आवृत्ती.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, २००२, महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, भाग १ (१९२०–१९३६)

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, २००२, महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, भाग १ (१९३७–१९४५)

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, २००२, महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, भाग १ (१९४६–१९५६).

५) डॉ. बापट विद्यार्थी वसतिगृह, हिरक महोत्सवी स्मरणिका १९८६.

६) गायकवाड प्रदीप (संपा), 'जनता' (३१ ऑक्टो. १९३१ ते ३ डिसेंबर १९३२) प्रकाशक : प्रदीप गायकवाड, समता प्रकाशन, नागपूर १७.

७) गायकवाड प्रदीप लतिकाबाई (संपा), प्रबुध्द भारत, समात प्रकाशन, नागपूर महा. १७

८) गायकवाड बी. के. (संपामं), भंडारे आर. डी., कांबळे बी. सी., आंबेडकर एम. ए. (सहसं), रिपब्लिकन पार्टी स्थापना विशेषांक, १ ऑक्टो. १९५७, संपादन व प्रकाशन प्रदीप गायकवाड, दीक्षाभूमी संदेश, डॉ. बा. आं. उड्डानपूल बाग, नागपूर ४४००१७.

९) गायकवाड भाऊराव कृष्णराव (संपा. मं.), भंडारी आर. डी., कांबळे बी. सी., आंबेडकर मुकुंदराव (सह संपा.), प्रबुध्द भारत, आंबेडकर महानिर्वाण विशेषांक १९५७, समता प्रकाशन, नागपूर १७.

१०) गायकवाड प्रदीप (संपा. मं.), समाज समता संघाचेपाक्षिके मुखपत्र, समता चक्रधर प्रिटिंग प्रेस, गेट बाग रोड, नागपूर १७.

११) गरुड, मिरज महार सत्याग्रह खास अंक, दलित समाजाचे जागृत दैवत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वर्ष १६ वे, १ जानेवारी १९४२

१३) कांबळे बी. सी. (ॲड.), समग्र आंबेडकर चरित्र खंड १ ते २४, सुगावा प्रकाशन पुणे ३०, द्वितीय आवृत्ती २००७.

१४) कद्रेकर भास्कर रघुनाथ (संपाप्र.), गायकवाड प्रदीप (पुसंपा), जनता खास अंक १९३३, समता प्रकाशन २००५.

१५) खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. भिमराव रामजी आंबेडकर (चरित्रग्रंथ खंड १, पुणे ३०), सुगावा प्रकाशन, पा. आ., चौथी आवृत्ती २०१३. खंड १ ते १२.

१६) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई पॉप्युलर प्रकाशन मुंबई, पुनर्मुद्रण १४ एप्रिल १९९६.

१७) खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रे, शाम दयार्णव कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य, २७३, शनिवार पेठ, पुणे ३०, दि. १५ मे १९९०, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष.

१८) लोकसभा डिबेटस् १९५२ ते २०००.

१९) मून वसंत (संपा), मूकनायक प्रकाशन, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई–३२ प्र. आ.

२०) मून वसंत (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत, (१९२७ ते १९२९) शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई–३२ प्र. आ.

२१) महाराष्ट्र विधान मंडळ, विधानसभा व विधान परिषद, १९७८–८० (पाचवी महाराष्ट्र विधान परिषद), विधान भवन, मुंबई ४०० ०३९.

२२) महाराष्ट्र विधान मंडळ, विधानसभा व विधान परिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय १९८०–८५, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई १९८२.

२३) राज्यसभा डिबेटस् १९५२–२०००.

२४)	सांगली डिस्ट्रीक्ट गॅझेटियर (मुंबई : १९६२)

२५)	सांगली नगर परिषद शताब्दी महोत्सव स्मरणिका (१८७६ ते १९७६)

२६)	विधानसभा डिबेटस् १९५२ ते २०००, महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह असेंब्ली डिबेटस्, मुंबई खंड–१९, पी. टी. आय. १९६६.

२७)	विधानसभा डिबेटस् १९५२ ते २०००, महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह असेंब्ली डिबेटस् पार्ट १, मुंबई खंड १५–२, १९६५.

२८)	विधानसभा डिबेटस् १९५२ ते २०००, महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह असेंब्ली डिबेटस् पार्ट–२, मुंबई

२९)	१० वी महाराष्ट्र विधानसभा १९९९, सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

३०)	विधान परिषद डिबेटस् १९५२ ते २०००, खंड ९–१, मुंबई, १९६३.

३१)	वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली वार्षिक अहवाल १९६२.

**ब) इंग्रजी साधने –**

32) Chandrashekahr Y. K., Historica research Teory and Method (Awastick Publications) 31 Gali No. 1, A Block, Pocket 5, water tank sonia Vihar, New Delhi 110094.

33) Gupta R. C. (Prof.), King's Histogrophy (King Books (Regd. 1684\ Naisarak, Delhi - 110006

34) Keer Dhananjay, Dr. Babasaheb Ambedkar Life and Mission. (Popular Prakashan)

35) Kuber W. N., B. R. Ambedkar, Publication Division Govt. of India, New Delhi (1978)

36) Maharashtra legislative Assembly who's who 1985. Maharashtra legislative secretariat., Vidhan Bhavan, Bombay 400 032.

## क) दुय्यम साधने –


१) अनाव्रत विनोद (डॉ.), नव–रिपब्लिकन आणि बहुजनवादाचे अंतर्बाह्य (सुगावा प्रकाशन २०१५), प्र. आ.

२) अंबपकर जी. बी. (प्रा.), राजा ढाले यांच्या ज्वलंत मुलाखती, प्र. आ. विचारधारा प्रकाशन, कोल्हापूर १९९६.

३) डॉ. आंबेडकरांच्या सहवासात पुणे, इनामदार बंधू, प्रकाशन १९८२.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, पुणे इंद्रायणी साहित्य १९९०.

५) भावे मधुकर (संपा), बापू, प्रकाशक राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी, इस्लामपूर, सांगली २०१४–१५.

६) ढाले राजा, दलित पँथरची संस्थापना, वस्तुस्थिती आणि विपर्यास, प्रकाशन फुले, आंबेडकर विचार प्रसाद केंद्र २००२, प्र. आ.

७) देशपांडे दीपा (संपा), लोकनेता मा. राजारामबापू पाटील, प्रकाशक : राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी, इस्लामपूर सांगली. ४१५ ४०९, प्र. आ. २००७

८) धर्माधिकारी भालचंद्र विष्णुपंत, क्रांतीवीर स्वातंत्र्यसेनानी, नागनाथ (आण्णा) नायकवडी, क्रा. ना. (आण्णा) नायकवडी, गौरव समिती वाळवे, जि. सांगली, प्र. आ., २००७.

९) डांगळे अर्जुन, आंबेडकरी चळवळीचे अंतरंग प्रकाशक, दुसरी आवृत्ती, ऑक्टोबर २००७, प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मयगृह, भूपेंद्र गुप्ता भवन ८५, प्रभादेवी मुंबई ४०० ०८५.

१०) ढसाळ नामदेव, दलित पँथर (संपा), शरद कुमार लिंबाळे, सुगावा प्रकाशन, १९९६

११) ढसाळ नामदेव, दलित पँथरची भूमिका, पँथर प्रकाशन, १९७६.

१२) गायकवाड प्रदीप (संपा), महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती, दहन, समता प्रकाशन, प्र. आ. २०१५.

१३) होवाळ, रविनंद नामदेव, जोडा आणि राज्य करा, प्रकाशक णमोक्रांती प्रकाशन, द्वारा नमोक्रांती प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्र. आ. २००६.

१४) होवाळ, रविनंद नामदेव, धर्मांतराची पन्नास वर्षे काय कमावले, काय गमावले? णमो क्रांती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, ६ ऑक्टोबर २००७.

१५) जाधव श्रीराम, भारतीय राजकारण आणि डॉ. आंबेडकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद १९९७.

१६) जाधव नरेंद्र, आमचा बाप आणि आम्ही ग्रंथाली प्रकाशन, १ जानेवारी २०१०.

१७) जोशी सी. जे. (डॉ.), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, २१० दु. आ.

१८) क्षीरसागर रा. का. (डॉ.), भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, के. एस. अतकरे, ६ डिसेंबर २००६. (आरपीआय सुधारिता आवृत्ती)

१९) कस्तुरबा वालचंद महाविद्यालय स्मरणिका.

२०) कठारे अनिल (डॉ.), शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास (१९३० ते १८१८), तृ. आ. सुगावा प्रकाशन पुणे २००९.

२१) कसबे रावसाहेब (डॉ.), आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे १९८९.

२२) कांयदे पाटील गंगाधर वि., यशवंतराव चव्हाण, प्र. आ. चैतन्य पब्लिकेशन्स १५/३, पंचम सावरकरनगर, गंगारोड, नाशिक २०००.

२३) कांबळे विजया गेडाम, कांबळे अरुण (संपा), बहिष्कृत भारतातील विचार विश्व, गोदा प्रकाशन, औरंगाबाद २०१३.

२४) कांबळे गौतमीपुत्र (डॉ.) सेक्युलर मुव्हमेंट भूमिका २०१६, पॉप्युलर प्रकाशन १९९२, किरवले डॉ. कृष्णा, आंबेडकरी कायदा, एक शोध, पुणे नालंदा प्रकाशन १९९२.

२५) कुदळे डी. एस., विचारमंथन, प्रियांका ऑफसेट, सदासुख थिएटरजवळ, सांगली. १९९५

२६) किरकिरे न. ना., सांगलीचे दिवस गुरुपोर्णिमा प्रकाशन, २०००

२७) खरात शंकरराव (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे चौ. आ. २०१३.

२८) खरात शंकरराव, तराळ अंतराळ, सुगावा प्रकाशन, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, पुणे. मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन १९६०.

२९) लोखंडे भालचंद्र, रिपब्लिकन पक्षाला भ्रष्ट करणारे नालायक पुढारी कोण, १९८९.

३०) लिंबाळे शरणकुमार (संपा), प्रज्ञा सूर्य, कोल्हापूर प्रकाशन, सौ. नंदिनी गवळी, १९९५

३१) माने संगीता सुरेखा (डॉ.), सांगली जिल्हा इतिहास भूगोल, संस्कृत, प्रकाशक सौ. उज्वला चंद्रकांत सोळंकी, अक्षरगंगा प्रकाशन.

३२) मांजरे मा. क. (सं), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, नागपूर अशोक प्रकाशन, १९८६.

३३) मालशे मिलिंद– शोध निबंधाची लेखन पध्दती, चतुर्थ आवृत्ती, डिसेंबर २००८, प्रकाशक– प्रकाश विश्वासराव लोकवाङमय गृह भूपेश गुप्ताभवन ८५, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई ४०० ०२५

३४) मिरजकर शामसुंदर (प्रा.), ब्राम्हणी विषमतेच्या विरोधात समतावादी आरक्षण, नालंदा प्रकाशन २०१२.

३५) मुरुगकर लता (डॉ.), दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन, पुणे ३० (१९९५)

३६) निकुंभे सी. एच. (प्रा. डॉ.), डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद, वास्तव आणि विपर्यास, सुगावा प्रकाशन, पुणे ३०. प्र. आ. २००९.

३७) पवार ज. वि., भारतीय राजकारण आणि आंबेडकरी चळवळ, सुगावा प्रकाशन पुणे ३० (१९९५)

३८) पवार ज. वि., आंबेडकरोतरी आंबेडकर चळवळ, खंड–१, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई १०३ (१९१६ ते ५९) तृतीय आवृत्ती २०१२.

३९) पवार ज. वि., आंबेडकरोतरी आंबेडकर चळवळ, खंड–२, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई १०३ (१९६० ते ६५) तृतीय आवृत्ती २०१२.

४०) पवार ज. वि., आंबेडकरोतरी आंबेडकर चळवळ, खंड–३, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई १०३ (१९६५ ते ७१) तृतीय आवृत्ती २०१२.

४१) पवार ज. वि., आंबेडकरोतरी आंबेडकर चळवळ, खंड–४, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई १०३ (१९७२ ते ७७) तृतीय आवृत्ती २०१२.

४२) पवार ज. वि., आंबेडकरोतरी आंबेडकर चळवळ, खंड–५, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई १०३ (१९७७ ते १९९४) तृतीय आवृत्ती २०१२.

४३) प्रधान राम (संपा), यशवंतराव चव्हाण शब्दाचे सामर्थ्य, अमेय प्रकाशन पुणे ३०., प्र. आ. २०००.

४४) पानतावणे गंगाधर (प्रा.), विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, नागपूर १९९८.

४५) पोवार सुधीर, राजर्षि शाहू डॉ. आंबेडकर आणि कोल्हापूरची दलित चळवळ, प्रकाशक दलित मित्र, जी. एम. पंडत, अध्यक्ष, भारतीय बौध्द समाज (रजि.) पंचशील., सी २९२१, ब सिध्दार्थनगर, कोल्हापूर ४१६ ००२, (प्र. आ.)

४६) फडके भालचंद्र (डॉ), आंबेडकरांचे समाजचिंतन, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९६.

४७) सकटे मच्छिंद्र (प्रा.), नामांतर आणि नंतर, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९६.

४८) साळवी मधुकर (डॉ.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्याची सामाजिक राजकीय धार्मिक चळवळ, नालंदा प्रकाशन, भोर, जि. पुणे. प्र. आ. २०१०.

४९) उद्‌गावकर मेघना दिपक (प्रा. डॉ. सो.), सांगली संस्थानचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास (१८८० ते १९४८), प्र. आ. प्रकाशक, प्रा. डॉ. सौ. मेघना दिपक उदगावकर, आद्यश्री अपार्टमेंट, अंकली पोलीस चौकीजवळ, गावभाग, सांगली २०१२.

५०) वराळे बळवंत हणमंतराव, डॉ. आंबेडकरांचा सांगाती, दलित जनतेच्या अपेक्षा, सुगावा प्रकाशन पुणे ३०, प्र. आ., १९९९.

५१) वाघ विलास (संपा), शिंदे पी. एन. (प्रा.डॉ.), थोरात ए. जी., रिपब्लिकन खासदारांकडून आधुनिक महाराष्ट्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर प. आ. २०१६.

ड) नियतकालिके, स्मरणिका ग्रंथ व इतर

१) अस्मितादर्श (संपा), डॉ. गंगाधर पानतावणे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत प्रातिक विचार संसदेचे अस्मितादर्श ऑक्टोबर ते डिसेंबर १९९४, वर्ष २७, अंबू ४.

२) अस्मितादर्श दलित नाट्यविशेषांक १९९४, वर्ष २९ अंक – १

३) अस्मितादर्श (संपा), गंगाधर पानतावणे, जाने. ते मार्च १९९५

४) अस्मितादर्श, गंगाधर पानतावणे, वर्ष २८, अंक ४, एप्रिल ते जून १९९५

५) अस्मितादर्श, गंगाधर पानतावणे, वर्ष २८, अंक ३ ऑक्टो. ते डिसेंबर १९९५

६) अस्मितादर्श, गंगाधर पानतावणे, वर्ष २८, अंक, वार्षिक विशेषांक १९९५

७) अस्मितादर्श, गंगाधर पानतावणे, वर्ष २९, जानेवारी १९९६

८) अस्मितादर्श एप्रिल ते जून २००१, २४ अस्मितादर्शन साहित्य संमेलन, इचलकरंजी.

९) आटपाडी कॉलेज आटपाडी, स्मरणिका दि. ९ व १० फेब्रुवारी २००८ (संपा. मंडळ) प्रा. आण्णासाहेब भांबुरे, प्रा. भारत खाडे, प्रा. सदाशिव मोरे, प्रा. दिनेश भिंगे, प्रा. महावीर कवटगे, प्रा. पोपटराव देशमुख.

१०) डॉ. आंबेडकर प्रेरणा विशेषांक १९९५, आंबेडकरवाद आणि बहुजनवाद (संपा), विलास वाघ, नोव्हें. १९९५.

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श पावनभूमी स्मृती विशेषांक (संपा) मा. सुधीर काळबागे, मु. पो. चिखलगोठ, ता. तासगाव जि. सांगली, २०१७

१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक पाक्षिकातून दुर्मिळ लेख, रघुवंशी प्रकाशन, २४२ (ब), शुक्रवारपेठ, पुणे २

१३) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक (संपा), प्रा. एस. बी. माणगावकर, प्रा. एस. डी. पवार जन्मशताब्दी वर्ष १९९१–९२.

१४) जनता साप्ताहिक, (संपा.), गंगाधर निळकंठ, सहस्रबुध्दे बी. ए., ६ जानेवारी १९४०, अंक ४५ वा.

१५) लोकराज्य कर्मवीर दादासाहेब गायकवाड विशेषांक, ऑक्टो. २००१, वर्ष ५३, अंक नववा (संपा) श्रध्दा, बेलसरे–खारकर

१६) प्रज्ञासूर्य व्याख्यानमाला, बुलढाणा स्मरणिका ऑक्टो. १९९५
(संपा) सर्जेराव चव्हाण, (संपा) सुरेश साबळे, मनोहर धनराज, नारायण जाधव, बेळगावकर, शि. वि. इतिहास परिषद, कोल्हापूर १३ वे अधिवेशन

१७) साप्ताहिक माणुसकी २२ मार्च १७ ते २९ मार्च १७

१८) विलिंग्डन कॉलेज, सांगली सुवर्णमहोत्सवी स्मरणिका (१९९१ ते १९६९)

## इ) वृत्तपत्रे –

१) दै. अग्रदूत, दि. १०–८–१९९८

२) बहुजन नायक, संपादक काशिराम ७ मार्च १९९९

३) दक्षिण महाराष्ट्र केसरी १६ एप्रिल १९९५

४) दै. केसरी, ७ जाने. १९९६

५) महाराष्ट्र टाईम्स, २७ डिसेंबर १९९५.

६) महाराष्ट्र टाईम्स, १९ डिसेंबर १९९५

७) दै. लोकसत्ता, ६ डिसेंबर १९९७.

८) लोकसत्ता लोकरंग, ७ जुलै २०१३.

९) दै. लोकमत, अक्षररंग दि. ११ एप्रिल १९९९

१०) महाराष्ट्र टाईम्स, ६ डिसेंबर १९९५.

११) दै. पुढारी, कोल्हापूर सांगली.

१२) दै. पुढारी, २५ डिसेंबर १९९२

१३)	दै. सम्राट, वृत्तरत्न (संपा.) मुंबई. १९९५

१४)	दै. सकाळ, १८ नोव्हें. १९९८.

१५)	दै. सकाळ, अंक २५४, १४ एप्रिल २०००.

१६)	दै. सकाळ, ६ डिसेंबर १९९७

१.	जनता अंक, ६  जानेवारी १९४०, अंक ४५

२.	जनता अंक, ६  जानेवारी १९४०, अंक ४५

३.	पॉलिटिकल विभागीय फाईल नं. २३३–४६ (१९४८) सी. के. देसाई विभागीय आयुक्त, कोल्हापूर व दलित संस्थान यांचा दि. १२ फेब्रुवारी १९४८, हुकूमपॉलिटिक विभाग फाईल नं. २३२५/४६ (१९४८), १३ मार्च १९४८ चा एम. डी. भट, मुख्य सचिव, मुंबई सरकार यांचा दिनांक १३ मार्च १९४८ आदेश.

४.	 मूकनायक, १४–२–१९२०, अंक २

५.	बहिष्कृत भारत, ४–११–१९२७ अंक १४, १५१६

६.	बहिष्कृत भारत, २५ नोव्हें. १९२७, अंक १७, १८

७.	बहिष्कृत भारत २१ डिसेंबर १९२८ अंक ३ रा

८.	बहिष्कृत भारत, २ डिसेंबर १९२७, अंक १९, २०, २१

९.	जनता, ऑक्टो १९३१, अंक १

१०.	जनता, ऑक्टो १९३१, अंक १

११.	जनता २८ नोव्हेंबर १९३१, अंक ४ था

१२.	जनता २६ डिसेंबर १९३१ अंक ८ वा

१३.	जनता २३ जाने. १९३२ अंक ११ वा

१४.	जनता ६ फेब्रुवारी १९३२, अंक १३ वा

१५. जनता ६ फेब्रुवारी १९३२, अंक १३ वा

१६. जनता ६ फेब्रुवारी १९३२, अंक १३ वा

१७. जनता ६ फेब्रुवारी १९३२, अंक १३ वा

१८. जनता १३ फेब्रुवारी १९३२, अंक १४

१९. जनता २ एप्रिल १९३२, अंक १९

२०. जनता २ एप्रिल १९३२, अंक १९

२१. जनता २ एप्रिल १९३२, अंक १९

२२. जनता ३० एप्रिल १९३२ अंक २४

२३. जनता २५ जून १९३२ अंक २८

२४. जनता १६ जुलै १९३२, अंक २९

२५. जनता २३ जुलै १९३२ अंक ३०

२६. जनता ६ जानेवारी १९३९, अंक ४५ वा

२७. जनता ६ जानेवारी १९३९, अंक ४५ वा

२८. प्रबुध्द भारत, दि. १६–६–५६ अंक १७

२९. प्रबुध्द भारत, दि. १६–६–५६ अंक १७

३०. प्रबुध्द भारत, दि. २३–६–५६, अंक १८

३१. प्रबुध्द भारत, दि. १७ नोव्हें. ५६, अंक ३७

३२. जनता अंक उपरनिर्दिष्ट

३३. जनता अंक उपरनिर्दिष्ट

३४. दै. सत्यवादी, १७ मार्च १९६०, अंक २४५

३५. दै. सत्यवादी, दि. १३ एप्रिल १९६०, अंक २३८

३६. दै. सत्यवादी, दि. १५ एप्रिल १९६० अंक २६०

३७.	दै. सत्यवादी, दि. १५ एप्रिल १९६० अंक २६०

३८.	दै. सत्यवादी, दि. २० एप्रिल १९६०, अंक २७४

३९.	दै. सत्यवादी, २० जून १९६०, अंक १७

४०.	दै. सत्यवादी, १० जून १९६०, अंक ९

४१.	दै. सत्यवादी, ११ जुलै १९६०, अंक ४१

४२.	दै. सत्यवादी, १ नोव्हें. १९६०, अंक १२८

४३.	दै. सत्यवादी, १४ एप्रिल १९६१, अंक २६८

४४.	दै. सत्यवादी, १ मे १९६१, अंक २८१

४५.	दै. सत्यवादी, १० मे १९६१, अंक २८९

४६.	दै. सत्यवादी, २८ फेब्रुवारी १९६१, अंक १०२

४७.	दै. सत्यवादी, २१ मार्च १९६१, अंक २४७

४८.	दै. सत्यवादी, ३ जून १९६१, अंक ३

४९.	दै. सत्यवादी, १० ऑगस्ट १९६१, अंक ६१

५०.	दै. सत्यवादी, २० सप्टेंबर १९६१, अंक ९५

५१.	दै. सत्यवादी, १३ सप्टेंबर १९६१, अंक ९०

५२.	दै. सत्यवादी, १३ जानेवारी १९६२, अंक १९२

५३.	दै. सत्यवादी, २ फेब्रुवारी १९६२, अंक २०९

५४.	दै. सत्यवदी, ११ फेब्रुवारी १९६२, अंक २१७

५५.	दै. सत्यवादी, ११ फेब्रुवारी १९६२, अंक २१७

५६.	दै. सत्यवादी, १२ फेब्रुवारी १९६२, अंक २१८

५७.	दै. सत्यवादी, २० फेब्रुवारी १९६२, अंक २२४

५८.	दै. सत्यवादी, २० फेब्रुवारी १९६२, अंक २२४

५९. दै. सत्यवादी, ९ एप्रिल १९६२, अंक २७३

६०. दै. सत्यवादी, १९ एप्रिल १९६२, अंक २७३

६१. दै. सत्यवादी, २९ मे १९६२, अंक ३१०

६२. दै. सत्यवादी, २ फेब्रुवारी १९६४, अंक २४३

६३. दै. सत्यवादी, ६ मार्च १९६४, अंक २७५

६४. दै. सत्यवादी, १८ मार्च १९६४, अंक २८७

६५. दै. सत्यवादी, ७ एप्रिल १९६४, अंक ३०७

६६. दै. सत्यवादी, १३ जाने. १९६५, अंक १९२

६७. दै. सत्यवादी, १८ मार्च १९६५, अंक २८५

६८. दै. सत्यवादी, १४ एप्रिल १९६५, अंक ३१२

६९. दै. सत्यवादी, १६ ऑगस्ट १९६५, अंक ७६

७०. दै. सत्यवादी, १ जुलै १९६५, अंक ४०

७१. दै. सत्यवादी, २२ ऑगस्ट १९६५, अंक ८२

७२. दै. सत्यवादी, १६ फेब्रुवारी, १९६७ अंक २५४

७३. दै. सत्यवादी, २२ नोव्हेंबर १९६७ अंक १७२

७४. दै. सत्यवादी, ४ ऑगस्ट १९६८ अंक ६५

७५. दै. सत्यवादी, १५ सप्टेंबर १९६८, अंक १०६

७६. दै. सत्यवादी, २५ जाने. १९६९, अंक २३६

७७. दै. सत्यवादी, २ फेब्रुवारी १९७० अंक २५३

७८. दै. सत्यवादी, २८ नोव्हेंबर १९७०, अंक १७८

७९. दै. सत्यवादी, १९ डिसेंबर १९७०, अंक १९९

८०. दै. सत्यवादी, ६ जाने. १९७१ अंक २१७

८१. दै. सत्यवादी, १८ फेब्रु. १९७१, अंक २६०

८२. दै. सत्यवादी, १७ एप्रिल १९७१, अंक ३१६

८३. दै. सत्यवादी, २५ जुलै १९७१, अंक ५५

८४. दै. सत्यवादी, १९ जाने. १९७१, अंक २३०

८५. दै. सत्यवादी, १७ फेब्रुवारी १९७२, अंक २५८

८६. दै. सत्यवादी, १० जून १९७२, अंक १०

८७. दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७४, अंक ३०९

८८. दै. सत्यवादी, १४ एप्रिल १९७४, अंक ३०७

८९. दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७४, अंक ३०९

९०. दै. सत्यवादी, ८ मे १९७४, अंक ३३१

९१. दै. सत्यवादी, १७ मे १९७४, अंक ३३९

९२. दै. सत्यवादी, २० जून १९७४, अंक २०

९३. दै. सत्यवादी, २३ जून १९७४, अंक २३

९४. दै. सत्यवादी, २८ जुलै १९७४, अंक ५९

९५. दै. सत्यवादी, २७ ऑगस्ट १९७४, अंक ८८

९६. दै. सत्यवादी, २५ जानेवारी १९७५, अंक २३३

९७. दै. सत्यवादी, २३ फेब्रुवारी १९७५, अंक २६३

९८. दै. सत्यवादी, २६ फेब्रुवारी १९७५, अंक २६६

९९. दै. सत्यवादी, १३ मार्च १९७५, अंक २८०

१००. दै. सत्यवादी, १९ एप्रिल १९७५, अंक १३

१०१. दै. सत्यवादी, १९ एप्रिल १९७५, अंक १३

१०२. दै. सत्यवादी, ८ जुलै १९७५, अंक ९१

१०३. दै. सत्यवादी, २३ सप्टेंबर १९७५, अंक १६७

१०४. दै. सत्यवादी, ६ ऑक्टोबर १९७५, अंक १८०

१०५. दै. सत्यवादी, २३ डिसेंबर १९७६, अंक २५३

१०६. दै. सत्यवादी, १२ फेब्रुवारी १९७७, अंक ३०४

१०७. दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७७, अंक ६५

१०८. दै. सत्यवादी, २२ ऑगस्ट १९७७, अंक १२४

१०९. दै. सत्यवादी, २२ ऑगस्ट १९७७, अंक १२४

११०. दै. सत्यवादी, १० ऑक्टोबर १९७७, अंक १४३

१११. दै. सत्यवादी, ४ नोव्हें. १९७७, अंक १९६

११२. दै. सत्यवादी, ११ जाने. १९७८, अंक २६३

११३. दै. सत्यवादी, १६ एप्रिल १९७८, अंक २५८

११४. दै. सत्यवादी, २२ एप्रिल १९७८, अंक ३६२

११५. दै. सत्यवादी, २८ एप्रिल १९७८, अंक ३५८

११६. दै. सत्यवादी, ४ मे १९७८, अंक ३

११७. दै. सत्यवादी, १० जून १९७८, अंक ४०

११८. दै. सत्यवादी, ८ जुलै १९७८, अंक ६८

११९. दै. सत्यवादी, २४ नोव्हें. १९७८, अंक २०३

१२०. दै. सत्यवादी, २० फेब्रुवारी १९७९,अंक २९१

१२१. दै. सत्यवादी, २१ फेब्रुवारी १९७९, अंक २९२

१२२. दै. सत्यवादी, २६ एप्रिल १९७९, अंक ३५५

१२३. दै. सत्यवादी, २९ सप्टेंबर १९७९, अंक १५०

१२४. दै. सत्यवादी, १ सप्टेंबर १९८०, अंक १२१

१२५. दै. सत्यवादी, १२ सप्टेंबर १९८०, अंक १३२

१२६. दै. सत्यवादी, २६ नोव्हेंबर १९८०, अंक २०३

१२७. दै. सत्यवादी, २१ एप्रिल १९८३, अंक २८६

१२८. दै. सत्यवादी, २८ एप्रिल १९८३, अंक २९३

१२९. दै. सत्यवादी, १ मे १९८३, अंक १

१३०. दै. सत्यवादी, २५ जुलै १९८४, अंक ८०

१३१. दै. सत्यवादी, ७ ऑगस्ट १९८४ अंक ७०

१३२. दै. सत्यवादी, २७ ऑक्टो. १९८६, अंक १७६

१३३. दै. सत्यवादी, २० एप्रिल १९६०, अंक २७४

१३४. दै. सत्यवादी, १० मे १९६०, अंक २८९

१३५. दै. सत्यवादी, २८ फेब्रुवारी १९६१, अंक १०२

१३६. दै. सत्यवादी, १० ऑगस्ट १९६१, अंक ६१

१३७. दै. सत्यवादी, २० सप्टेंबर १९६१, अंक ९५

१३८. दै. सत्यवादी, ऑगस्ट १९६८, अंक ६५

१३९. दै. सत्यवादी, १८ फेब्रु. १९७१, अंक २६०

१४०. दै. सत्यवादी, ८ मे १९७४, अंक ३३१

१४१. दै. तरुण भारत, २५ ऑगस्ट १९९९

१४२. दै. महासत्ता, दि. १४–१०–२०००

१४३. दै. सत्यवादी, दि. १५–६–१९९६

१४४. दै. पुढारी, दि. १७–९–१९९६

१४५. दै. अग्रदूत, दि. ११–१२–१९९६

१४६. दै. तरुण भारत, दि. १३–७–१९९७

१४७. दै. अग्रदूत, दि. १४–७–११९७

१४८. दै. पुढारी, दि. १७–७–१९९६

१४९. दै. पुढारी, १७ जुलै १९९७

१५०. दै. पुढारी, २० जुलै १९९७

१५१. दै. पुढारी, १४ मार्च १९९७

१५२. दै. पुढारी, ११–४–१९९७

१५३. दै. महासत्ता, दि. ११–४–११९७

१५४. दै. अग्रदूत, दि. १६–४–१९९७

१५५. दै. सकाळ, २ जुलै १९९७

१५६. दै. तरुण भारत, दि. २१ जुलै १९९७

१५७. दै. सकाळ, दि. २२ जुलै १९९७

१५८. दै. महासत्ता, दि. २२ जुलै १९९७

१५९. दै. सकाळ, दि. २२ जुलै १९९७

१६०. दै. महासत्ता, दि. २२ जुलै १९९७

१६१. दै. जनप्रवास, दि. २५ जुलै १९९७

१६२. दै. जनप्रवास, दि. २४ जून १९९८

१६३. दै. महासत्ता, दि. २८ जून १९९८

१६४. दै. प्रतिध्वनी, दि. ९–१२–११९८

१६५. दै. तरुण भारत, दि. २६ जून १९९८

१६६. दै. पुढारी, दि. २८–८–१९९८

१६७. दै. सकाळ, दि. १६ फेब्रुवारी १९९९

१६८. दै. लोकमत, दि. ३०–९–१९९९

१६९. दै. लोकमत, दि. २०–१०–१९९९

१७०. दै. तरुण भारत, दि. ६ नोव्हेंबर १९९९

१७१. दै. जनप्रवास, दि. ८–११–१९९९

१७२. दै. जनप्रवास ३–१२–१९९९

१७३. दै. सकाळ, दि. १२ डिसेंबर १९९९

१७४. दै. तरुण भारत, दि. १९–१२–१९९९

१७५. दै. पुढारी, दि. २६ डिसेंबर १९९९

१७६. दै. सकाळ दि. ६–१–२०००

१७७. दै. जनप्रवास, दि. ९–४–२०००

१७८. दै. सकाळ, दि. १०–४–२०००

१७९. दै. अग्रदूत, दि. २९–४–२०००

१८०. दै. सकाळ, दि. १ मे २०००

१८१. दै. सकाळ, दि. ३ मे २०००

१८२. दै. पुढारी, दि. २७–५–२०००

१८३. दै. तरुण भारत, दि. ६–१२–२०००

१८४. दै. अग्रदूत, दि. ९–१२–२०००

१८५. समग्र आंबेडकर चरित्र, खंड १, अॅड. बी. सी. कांबळे

१८६. दै. लोकमत, २४ फेब्रुवारी २००८

१८७. सम्राट मा. आ. कारंडे (गुरुजी) मुंबई, १९९३

१८८. अस्मितादर्श १९९६

१८९. आटपाडी कॉलेज आटपाडी स्मरणिका पान ७१, ९ व १० फेब्रु. २००८

१९०. दै. सकाळ, दि. ११ ऑक्टो. १९९७

१९१. जनहित प्रवर्तक साप्ताहिक पत्र, जनता ३१ ऑक्टोंबर १९३१ ते डिसें. १९३२ अंक १ ते ४८

१९२. प्रज्ञासूर्य व्याख्यानमाला, बुलढाणा, स्मरणिका ९५.

- अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध

१) जगताप अनिल (डॉ.), सातारा जिल्ह्यातील दलित चळवळ २०१४

२) कांबळे विजया गेडाम (डॉ.), बहिष्कृत भारत, भारतातील विचार विश्व

- मुलाखती –

# परिशिष्ट्ये –

१) नमुना १ – निवडणूक अधिसूचना (विधानसभा)

२) मुलाखत प्रश्नावली

३) सांगली जिल्हा नकाशा

४) फोटो –
सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ व दलित चळवळीतील कार्यकर्ते

५) दलित चळवळीतील मोर्चे, आंदोलने आदी कार्यकर्ते

## परिशिष्ट

नमुना – १

## निवडणुकीची सूचना (Notice of Election) महाराष्ट्र विधानसभेसाठी निवडणूक

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की,

१. महाराष्ट्र विधानसभेच्या जत मतदार संघास जागा भरण्यासाठी निवडणूक घ्यावयाची आहे.

२. नामनिर्देश पत्राचे नमुने, परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयामधून दिनांक १३–१–१९६२ पासून दिनांक २०–१–१९६२ पर्यंत, सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मिळू शकतील.

३. नामनिर्देश पत्रे उमेदवाराला किंवा त्याच्या सूचकाला परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यापैकी कोणत्याही अधिकाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात दिनांक २० जानेवारी १९६२ अगर तत्पूर्वी कोणत्याही दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यत दाखल करता येतील.

४. नामनिर्देश पत्रांची छाननी दिनांक २२–१–१९६२ रोजी सकाळी ११ वाजता मिरज येथील प्रांत ऑफिसर मिरज भाग यांची कचेरी येथे करण्यात येईल.

५. उमेदवारी मागे घेण्याबद्दलची सूचना, उमेदवाराला त्याच्या सूचकाला किंवा निवडणुक प्रतिनिधीला परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यापैकी कोणत्याही अधिकाऱ्यास त्याच्या कार्यालयात दिनांक २५–१–१९६२ रोजी दुपारी ३ वाजे पावेतो देता येईल.

६. नामनिर्देश पत्रे आणि उमेदवारी मागे घेण्याबद्दलच्या सूचना खालील तक्त्याच्या पहिल्या रकान्यात दर्शविलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याजवळ, त्याच तक्त्याच्या दुसऱ्या रकान्यामध्ये दर्शविलेल्या त्यांच्या कार्यालयात देता येतील –

**तक्ता**

| अधिकाऱ्याचे पदनाम | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|
| १. निवडणूक निर्णय अधिकारी<br>प्रांत ऑफिसर, मिरज भाग, मिरज | प्रांत ऑफिसर, मिरज भाग, यांची कचेरी, मिरज |

७. निवडणूक लढविण्याचे ठरल्यास मतदान दिनांक २५–२–१९६२ रोजी सकाळी ८ आणि सायंकाळी ५ वाजता या वेळात घेण्यात येईल.

दिनांक – १३.१.१९६२ डी. जी. जुन्द्रे

ठिकाण –मिरज निवडणूक निर्णय अधिकारी

जत विधान सभा मतदार संघ [१९]

## १. परिशिष्ट

# मुलाखत – प्रश्नावली

१) नांव : ______________________

२) शिक्षण : ______________________

३) धंदा/व्यवसाय : ______________________

४) डॉ. आंबेडकरी चळवळीशी संबंध : ______________________

५) आंबेडकर चळवळीतील कार्य : ______________________

६) वाचन लेखन : ______________________

७) सांगली जिल्ह्यातील दलित उध्दारक कार्य : ______________________

८) अन्यायी मोर्चाचे नेतृत्व किंवा सहभाग : ______________________

९) आपल्या हातून झालेले उल्लेखनीय कार्य : ______________________

१०) दलितांवर होणाऱ्या अन्यायात सध्याचे कायदे पुरेसे आहेत काय? : ______________________

११) भावी काळात दलित समाजाचा उध्दार होण्यासाठी काय उपाय केले पाहिजेत?

______________________

______________________

______________________

______________________

_______________________________________________

१२) दलित संघटनेत सहभाग कधीपासून आहे? _______________________

१३) सांगली जिल्ह्यातील दलित चळवळ यशस्वी झाली असे वाटते काय?

_______________________________________________

_______________________________________________

१४) सांगली जिल्हातील दलित चळवळीत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची माहिती सांगा- _______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

३. परिशिष्ट : नकाशा – सांगली जिल्हा



४. परिशिष्ट : फोटो –

दलित चळवळीचे कार्यकर्ते – श्री. गौतम लोटे



## परिशिष्ट – ५, दलित चळवळीतील मोर्चे, आंदोलने आदी कार्यकर्ते

विविध मागण्यांसाठी लाक्षणिक उपोषण करत असताना दलित महासंघाचे कार्यकर्ते




दलित महासंघाच्या वतीने आदिवासी, पारधी समाजाचे प्रबोधन करण्यासाठी करण्यात आलेले परिषदेचे आयोजन



दलित चळवळीतील कार्यकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना




दलित चळवळीतील कार्यकर्ते मा. गॅब्रियल तिवडे आणि इतर



दलित चळवळीतील महिला कार्यकर्त्या



सांगली जिल्हा सुधार समितीच्या वतीने दलितांना प्रबोधन करताना दलि चळवळीचे कार्यकर्ते डॉ. अमर पांडे व उपस्थित समुदाय




शाळेतील मुलांना मार्गदर्शन करताना डॉ. अमर पांडे



विशेष प्रशिक्षण केंद्रतर्फे दलितांना मिळणाऱ्या सोयी सवलतीविषयी मार्गदर्शन करताना कार्यकर्ते




विशेष प्रशिक्षण केंद्रतर्फे दलितांना मिळणाऱ्या सोयी सवलतीविषयी मार्गदर्शन डॉ. अमर पांडे

